मोरोपंतकृत

द्रोणपर्व

आर्या.

रा.रा. परशुराम बल्लाळ गोडबोले

यांच्यासहायानें

शुद्ध करून

माधवचंद्रोबा

यांनीं

लोककल्याणार्थ


आपल्या छापखान्यांत छापिल्या.



मुंबई.

लोहारचाळ.

शके १७८४



मोरोपंतकृतद्रोणपर्वाच्याआर्या.



योधवरतातपतनें[1] अनुदिन[2] धृतराष्ट्र होय कष्टी, तें
किति वर्णावें! विजनीं अंध रडे, हारवूनि यष्टीतें[3]. १
योगीश्वरसा[4] साक्षात्–जो पाहे सर्व संजय-ज्ञानी,
तो ये पुरासि चिंतित–जें गावें पाद-कंजें[5] यज्ञानीं. २
"शिबिराहुनि आलों मी.–संजय,–नमितों"–असें वदे; त्यानें
नृप वृत्त पुसे; सांगे गावल्गणि[6] कर्ण-चित्त दृत्यातें. ३
"भीष्म पडतांचि, गेले सर्वांचेही, पळांत, आवांके[7].–
नसतां धुरंधर[8] वृषभ[9], बाळ वृष भरें[10], करूनि आ, वांके[11]. ४
"कुरुकटका आठवला कर्ण महासंकटीं–गजा[12] हरिसा.
देउनि दर्शन, वदला तो जें, तें सर्व सांगतों, परिसा. ५
'देवव्रतेंचि[13] केली सत्य असाधारणा प्रतिज्ञा ती.–
आहे क्षम भाराच्या कोण असा धारणा[14]-प्रति ज्ञाती? ६
'रविरुचिचें[15], तीमागें, संपादे स्वल्प काज वातीस.
विसरविल काय, तेज प्रकट करूनि, अल्प [illegible] तीस? ७
'भीष्माच्या पतनाची चित्तांत धरूं नको व्यथा, राया;
[illegible]रुगुरुपुढें समर्थ न सुरगुरु[16], तोही न कव्य[17], [illegible][18]. ८

---

१ योधश्रेष्ठभीष्मपतनानें, –२ एकांतीं, –३ काठीस, –४ व्यासासारिखा, –५ चरणकमल, –६ संजय, –७ धैर्यें, –८ रथाची धूरवाहणारा, –९ बैल, –१० भारानें, –११ तोंड वासून, –१२ गजेंद्रास, –१३ भीष्मेंच, –१४ धरावयास, –१५ सूर्यप्रभेचें किंवा किरणांचें, –१६ बृहस्पति, –१७ शुक्र, –१८ स्थिर छायास, –* अल्पहीं, ** सेनातलभूमि.

‘प्रार्थुनि अभिषेकाचा; देइल वर, होय स्फुरतरुचि! राज्या
वरितिल देवी–जाणति सर्व कला विविध स्फुरतरुचिरा ज्यां.’ ९
“कुरुराज म्हणे,‘गुरुजी! सेनापति, शत्रुबलविरामा! व्हा.
तुमची ओंव्हा पळऊं अहितमदा, जेविं पळवि रामोव्हा.’ १०
“द्रोण म्हणे,‘सेनापति होतों, म्हणतोसि जरि; परि स्पष्ट–
धृष्टद्युम्नासि न मी वधिन; करीन त्वदर्थ बहु कष्ट. ११
‘मी समर पांडवांसीं करिन, हरिन अरिनराधिपति कटकें.–
भट केविं टिकेल इतर!– गरुड निरखिजेल काय, गा, चटकें? १२
‘मज गुरुसीं गुरुवत्सल पांडव रण न करितील उत्साहें.
येईलचि तच्चित्तीं कीं, होइल सज्जनांस कुत्सा हे.’ १३
“ऐसें वदोनि, कुरुगुरु विधिनें अभिषेक करुनि घे, राया;–
त्यासि न शकले पांडव- भट कोटिहि, धैर्य धरुनि, [illegible]! १४
“गुरु-रथ-वेग असह्यचि झाला त्या विष्णु-पत्ररथ-वेगा!
केला पांच दिवस बहु युद्ध-चमत्कार, तो न कथवे, गा! १५
“धृष्टद्युम्नें वधिला अन्यायें, सकळ सैन्य हळहळतें.
गुरु-मरण तसें देतें,–जैसें दे मोह, दैन्य, हळहळ तें.” १६

धृतराष्ट्र विलाप करी बहु.– आपण आपणासि निंदुनि घे.
स्मृति हरपे, करपेचि! न तन्नयनांतूनि अश्रु बिंदु निघे! १७

---

१ कल्पतरुच,–२ स्फुरतरम्या,– ३ हे शत्रुसैन्यनाशका–४ नाम,–५ अहितमद– शत्रुच्या गर्वास;– ६ रामनाम,– ७ युद्ध,–८ अरि-नराधिपति- कटकें – शत्रुराज्यांचीं सैन्यें,– ९ थोडा,–१० चिमण्यानें,–११ अपकीर्ति,– १२ विष्णु-पत्ररथ-वेग- विष्णूचा पक्षी गरुड त्याच्या वेगा,– १३ विष

"सूता! जो वाढविला– स्वपराक्रमसाच–विप्र मत्तातें,
धृष्टद्युम्नें वधिला,–हें वाटो साच विप्रमतातें. १८
"भीष्म, द्रोण–रवि, शशी–गिळिले पांचाळ-काळ-राहूनीं!
निर्वापित होते कीं ते जननयनां सर्वकाळ राहूनीं! १९
"मरण नये, उर न उले, जरि हें बहु शोकपर्व पावितें;–
विधि न धरी भेदाया कां या धृतराष्ट्र-पर्वता पवितें? २०
"कविवृंद सदुपदेशें तुज शिणवुनि, देवि वाणि! तळमळले!
हा कोळसा, कराया शुद्ध, धुतां व्यर्थ पाणि-तळ मळले! २१
"बहु जन बुडवुनि शोकीं, दुष्टा दुर्योधना! बुडालास!–
मकरालय लंघाया, मत्ता मशका! कसा उडालास? २२
"गज गोष्पदीं बुडाला!– हा! देवा! सिंधु शोषिला मशकें!
न शकें सोसाया हें.–वधिला तो केसरी कसा शशकें? २३
"आली मूर्च्छा, सूता! उत्तम होईल जरि न वांचेन!–
कांचेन आधि-पाशीं;–स्रुत-शोकचि गुण स्रुपाक यांचे न. २४
"हा! भार्गवास्त्र सव-स्रुपात्रा! तद्बळें हरिप्रति मी
न वञ्चकेलों.–नव्हतों जेय कृण कल्पित अर्जुनीं–हरिप्रतिमीं. २५
"हा द्रोणा! हा द्रोणा! हा द्रोणा! मृत्यु तुज कसा घडला?"
ऐसें रडोनि,–धडडड– धरणीवरि तो धरापती पडला. २६

१संजया,–२मत्–तात्–माझापिता भीष्मजोयाणें,–३उन्मत्तास,–४चंद्र,–५कळ्ाते,–६कविसमुदाय,–७समुद्र,–८घुंगुरट्या,–९गाईचा खुरउमटेलेल्या जागींच्या पाण्यांत,–१०सिंह,–११ससानें,–१२भार्गव-अस्त्र-सव-स्व-स्रु-पात्र-परशरामाच्याअस्त्ररूपीसर्वधनाच्याउत्तमपात्रा, १३म्यालों,–१४जयलेश,–१५हरिसदृशीं,–१६धृतराष्ट्र.

यापरि कुरुगुरुच्या बहु- शोक-भरें होय कायँ कारा[1] ज्या,
उठविति, वारा घालुनि, शिंपुनि शीतांबु[2], बायका राज्या. २७
देवें, आप्तोपायें, कश्मल[3]-जलधीस तो नरपति तरे.
करुनि बहु विलाप म्हणे, "निंदिल धर्मासि, तो नर पतित[4], रे! २८
"रे, संजया! म[illegible], राजर्षि अजातशत्रु[*] कोपविला.—
पुण्य-श्लोक, तपोनिधि,— भस्म कटाक्षें करील तो पविला! २९
"एकेंचि गदा घातें भेदिल भीम[5]-प्रभाव भीम नगा[6].—
[illegible]रभास[7] जसें हरिचें[8], माझें, ऐकोनि त्यास, भी मन, गा. ३०
"अर्जुन नर; नारायण कृष्ण-प्रभु;-परम-पूत[9] नामा! या,
बाळपणींहि, न शकली माराया, करुनि पूतना मायां. ३१
"वधिला वत्स, अघ, तृणा- वर्त, कपटि, खलैवतंस[11] बक, राहो.
कालिय-केशि-दमन हरि;- हरि! हरि! हरि! होय कंस बकरा, हो! ३२
"न सरेल, वानिलें जरि दिव्य सहस्राब्द[12], आठ-यामेंहि[13], ग्यां!
लाजोनि, अनंता[14]च्या ज्ञानें दिधलीच पाठ या महिम्या! ३३
"जात्यंधासहि मजला देवें निज दिव्य रूप दाखविलें!
दावुनि दयोदधीनें[15] दीना-सेंगदास[16]-अमृत चाखविलें! ३४
"केला नाहींच नरक[17] निज नामानें, तसाचि चक्रानें.

१ बंदिशाळा,-२ शीत-अंबु=शीतोदक,-३ कश्मल-जलधि-मूर्छासागरास,-४ पडलेला, नीच,-५ भयं-रपराक्रम ज्याचा,- ६ पर्वतास,-७ पुराणांतरीं वर्णिलेला आठपायांचा मृगविशेष, जो सिंहास मारितो,-८ सिंहाचें,-९ परमपवित्र नावाचा,-१० कपट,-११ खलनायक,-१२ सहस्र-अब्द-हजार वर्षें,-१३ अष्टोमहर ही,-१४ शेषाच्या,-१५ दया-उदधि [illegible];-१६ रोग्यास,-१७ नरकराक्षस आणि दुर्गति,-* धर्मराज. * वपु.

बल, पारिजात हरितां, दारवविलें यासि काय शक्रानें ? ३५
"दुर्वासा भगवान् बहु वर देता जाहला सदारा ज्या,
जी जगदीश्वर जपती— निज निधिला .पणासा—सदा राज्या. ३६
"मरतील जरि कथंचित् तनय पांडव [illegible] हे, तथापी,
न भलें, कीं, राज्यपदीं ईश्वरचि, करुनि समस्त हित, थापी. ३७
"तो ईश्वर-कृष्ण-करें कवळिल कदना कराल करवाल,
सांगा तुम्ही, कवि कुशळ! काय, कसें मग कराल, करवाल? ३८
"कौरव मारुनि, देइल निष्कंटक सर्व राज्य आतेला.—
त्यजुनि हित, अहित घे तो खल; करितो, वमुनि आज्य, आ तेला! ३९
"मी-माझें,-हें घातक! लागो या आजि आग मोहाला!
न मनांत अहंममता- भ्यधिका लोकांचिया गमो हालां! ४०
"सांग रणकथा; काढिल, नसतां मनिं मोह, काय बाप रडें?
वांकेल ताजव्याचें भारावांचूनि काय, बा, परडें?" ४१
संजय म्हणे, "नृपा! मन लाऊनि नश्वरां स्मरवीं, न रडें.
हो सावध, काळानें जों नाहीं घातलें मुखीं नरडें! ४२
"पुत्राप्त-राज्य-मोहें होय जरि तुज व्यथा,—परि सराया
मोह श्रोत्यांचा, मी कथिन गुरुवरें कथा; परिस, राया. ४३
"स्वीकारुनि अभिषेक, द्रोण म्हणे, 'मज अभीष्ट वर मागें—
लोपविलाचि नतजना- ऽस्कृत्दर्क गुरुप्रसाद-चरमागें. ४४

१ अत्रिपुत्र,— २ स्वकीयद्रव्यास,— ३ स्थापी,— ४ हस्तानें,— ५ युद्धास, किंवा, मारायास,— ६ भयंकर,— ७ तलवार,— ८ घृत,— ९ अहंममतेहून अधिक,— १० मद्य,— ११ अविनाशी,— १२ रक्षित,— १३ [illegible]त-जन-अस्कृत्द्-अर्क- [illegible]रणागतजनांचे शत्रुरूपसूर्य,— १४ गुरु-प्रसाद-चरम-अग- गुरुप्रसादरूप[illegible] [illegible]चलानें

"दुर्योधन नमुनि म्हणे, 'धर्म धरुनि मज[*]समीप आणावा.—
गुरुजी, मज कोटि-वर- स्थानीं हा वर अभीष्ट[**] जाणावा.' ४५
"द्रोण म्हणे, 'कुरु राया! या भरतकुलांत धन्य पांडव, गा;—
नरिच सुर म्हणति, 'नर हो! धर्माचे गुण, करुनि तांडव, गा.' ४६
'पुण्यश्लोक, युधिष्ठिर, अजातरिपु, धर्मराज,- ज्या नांवें,
वानावें भगवत्सम कविनीं, मानव असें न मानावें. ४७
'बहुधा त्याचा द्वेष्टा कोण्ही नाहींच, आजि हें कळलें:—
मळलें न द्वेषें मन, तरिच प्रेमें रसें असें वळलें. ४८
'प्रथम रणीं जिंकावें, मग द्यावें काय राज-पद भावा?
आणा धरूनि, न वधा—म्हणसी, याच्या स्वयेंचि वद भावो. ४९
"त्वत्पुत्र म्हणे, 'गुरुजी! अर्जुन भीमहि न आवरायाचा;
पाहुनि तुम्हांसि सन्मुख, समरीं, जाईल ओंव गयाचा. ५०
'कीं, जन्हि तेजस्वी, तो साधु मृदु शशी; तुम्ही तपनसे, हो.—
कुतुकें धराल. त्याच्या पदरांत तुम्हां असें तप नसे, हो. ५१
'कथितों, द्यूतीं पहिल्या- परि जिं[illegible]यास, पांडव धराया.
कां अन्यथा न [illegible], —बा! हाण उरांत कांडें, वध राया! ५२
'वधिल्या धर्म नसे जय. भीमार्जुन, परम उग्र अंतकसे,
कोपें रवचळुनि आम्हां सकळांचा न करितील अंत कसे? ५३

---

१ नृत्य,-२ आज्ञा,-३ अभिप्रायास,-४ धैर्य,-५ सूर्यासारखे,-६ कौतुकानें,-७ शर,-८ यमासारखे,-* मजकडे,-** इच्छित,-+ चंद्र.

'म्हणउनि दवडावा हां, द्यूतीं जिंकुनि, वनास दायोद.—
जाणे स्वहितद्यूता मच्चित्त—जसें वेना सदा योद'. ५४
"हृदईं बहु हांसोनि, द्रोण म्हणे,'युक्ति बहु भली रुचली!
राज-मना जी कांहीं रूचली, तीच प्रजा-मना रुचली. ५५
'परि,जरि हरिसारथि मज, धर्माला गांठितां, न लक्षील,
तरि करिन कार्य हें मीः—भीमादि न अन्य शूर रक्षील. ५६
'याकरितां, सर्व तुम्ही तो कुरुसंतानवलिनरवि रोधा.
विजयापुढें जय कवण पावेल करूनि बलि-नर विरोधा? ५७
'जरि म्या प्रथम पढविला,-बाळपणीं, पुत्रसाच खेळविला,
तरि मदधिक! कीं तेणें परमेशास्त्र-प्रसाद मेळविला. ५८
'वृद्ध ब्राम्हण मी, तो तरुण क्षत्रिय;-मला न भारेल.—
भार्गव-नंदीज-समर स्मरतां, मद्वचन सत्य वाटेल. ५९
'त्याल उपायें अर्जुन दूर, तरि धरिन रणांत धर्मातें'.—
"या सांतर - रदानें पावे बालिश-सं- ह शर्मातें. ६०
"परहित म्हणुनि,गुरु करी मंत्रींचा स्व कटकांत -भाट.
होय, श्रुत-प्रतिज्ञा- स्थैर्यार्थ, नृप स्वयेंच तो भाट. ६१

१ शत्रु,-२ उदका,-३ जलचर,-४ हरि आहे सारथी ज्याचा असा अर्जुन,-५ कुरु-संतान-नलिन रवि- कौरवकुलरूपकमलाचा सूर्य,-६ पाशुपतास्त्रप्रसाद,-७ परशुराम भीष्मयुद्ध,-८ अर्जुनाचें दूर करणें हें अंतर आहे ज्यांत,-९ मूर्खसमुदाय,-१० कलवास,-११ गुह्य गोष्टीची.

*"म्हणउनि दवडावा या द्यूतीं जिंकुनि वनास दायाद." असाही एक पाठ आहे. परंतु एथें या शब्दाचा उपयोग बरोबर होत नाहीं. तो द्यूताचा दर्शक केला तर द्यूतविशेष दाखविलेले नाहीं. जर दायादशब्दाचा दर्शक आहे तर दायाद प्रथमांत असून याचा दर्शक द्वितीयांत होतो. असें होऊं शकत नाहीं. "या द्यूतीं" म्हणजे या पुढ द्यूतीं असा संशयच नको-

“हें दूतमुखें परिसूनि, धर्म म्हणे, ‘अर्जुना महाबाहो!
बा! हो त्राता! कोणा, व्यसनीं घेऊनि नाम, हो बोहो? ६२
‘गुरुनें सुयोधनाला— देतां मज धरुनि—हा दिला वर, हो.
न घडो हें! समरीं मी मेल्यावरि, तो सुखें इला[४]-वर हो. ६३
‘अंतर वरांत आहे, वत्सा! तें कळवितों; बरें परिस.
‘धर्म धरिन जरि विजय न रक्षिल, गुरुवर वदे असें अरिसे[५]. ६४
‘यास्तव समीपचि रहा समरीं, होऊनि अनलस[६] मदवना[७];—
आश्चर्य गुणें लघुहि गुरु होय जनाऽलंघ्य–अनल[८] समंद[*]-वना’. ६५
“विजय म्हणे, ‘त्या गुरुचा वध, या गुरुचाहि उचित न त्याग.—
जरि करिन भवदुपेक्षा[१०], तरि मग त्याहूनि कोण अत्यांग[११]? ६६
‘सोडीन प्राण; परि न गुरुवरि, मद्रक्षणार्थ, बाण सोडीन;—
मोडीन न प्रतिज्ञा; बोलुनि अनृत[१२] न अकीर्ति जोडीन. ६७
‘क्षितिवरि खचोनि, सहसा, सग्रह[±] नक्षत्र-मंडल पडेल,
पृथिवी विरेल, परि हे दुष्टाची कार्यसिद्धि न घडेल. ६८
‘प्रभुजी! हा मी सेवक जीवंत असें;—तसें कसें होतें?
पुण्य-प्रताप तुमचा सिंह! सकळ शत्रु-बळ ससें, हो, तें! ६९
‘जरि सस्करोस्कर[१३], साक्षात् स्मरहर[१४] होइल महापापा[१५], हो[१६].

१ संकटीं, –२ मी धर्मजो हा, –३ हाकमारो- बोलावो, –४ पृथ्वीपति, –५ शत्रूस, –६ आलस्यरहित, –७ मत्- अवन-मद्रक्षणार्थ, – ८ अग्नि, –*महान्, –९ अरण्य, – १० भवत्- उपेक्षा—तुमचीउपेक्षा, –११ अति-आग- महापराध, अतिपाप; –१२ असत्य, – १३ देव दैत्यसहित, – १४ शिव, – १५ पाप्या दुर्योधनास, – १६ होवो, ± नवग्रहासहित, – * ससा.

समरीं अदृष्टपूर्व[1] स्वपरिभवा तो महातपा पाहो. ७०
'असतां समर्थ सारथि, अरिची आम्हासि काय परवा, हो?–
शोणित-पूरीं[2] गृध्र-[3] श्येन कृत ग्रास काय पैर वाहो. ७१
'दुर्लभ अहिंचा[5] बाब्ध, होय स्पर्शींच कालसाचि, मणी;
होईल काय हंसी, गतिटाकूनीहि, आर्ळसा[6] चिमणी? ७२
'त्याला वर कुरुगुरुनीं, अभयवर दिला तुम्हासि गुरुगुरुनीं[7];–
सिंह शरभाश्रितांचें करितील अनिष्ट काय गुरुगुरुनी?'
"अर्जुन-वागवसानीं[8] बहुधा ते वीर गर्जले हरिसे.–
अरिसेना भी, जाणों– ती सिंह-रवासि गज-घटा[9] परिसे. ७४
"मग, आम्ही, ते, करिते- झालों, स्वजयार्थ, आहवारंभा[10].
भट म्हणती वीररसें, शृंगाररसांत वाहवा रंभा. ७५
आम्हा अर्जुन-पालित- धर्मनृप-बलाकडे पहावेना;
त्यां पांडवांहि कुरुगुरु- रक्षित-कटक-प्रभा सहावेना. ७६
"राया! दोन्हीहि चमू स्तिमित[11] क्षणमात्र राहिल्या होत्या;
चित्रीं जेविं लिहाव्या, सर्वांहीं तेविं पाहिल्या, हो, त्या. ७७
"व्यूहांतुनि रुक्मरथ द्रोण-चमूपति निघे-महाते.।:–
'घनै[12]-पटल-निर्गत, तरुण तरणि'-म्हणति निपुणही पहाते ज्या ७८
"इतर भट किती? पाहों न शकेचि श्वेतवाह वीरा या!

१ पूर्वीं पाहिला नाहीं ऐसा, - २ रक्तपूरांत, ३ गृध्र-श्येन-कृत-ग्रास-काय-गीध ससाण्यानीं केला आहे ग्रास शरीराचा ज्याच्या ४ शत्रू ५ सर्पांचा ६ आळसा ७ श्रीकृष्णानें ८ अर्जुन-वाक्-अवसान-अर्जुनाच्या भाषणांतीं ९ समुदाय १० आहव-आरंभ-युद्धारंभास ११ स्थिर १२ अभ्रपटलांतून निघालेला बालसूर्य

सोमक, पांचाळ वधुनि, रक्तांचा सिंधु वाहवी, राया ! ७९
"भट गांठिती भटांतें— अहि अहितें— जेविं पतग [illegible].—
कीं, हरि हरितें.— अत्य[3]द्भुत होय द्वंद्व-युद्ध-शत, गा, तें ! ८०
"सौभद्र पौरवाचें अत्युग्र द्वंद्व-युद्ध परिसा, हो ;
तुमचें- निजोपकर्षा, धर्मोत्कर्षासि चित्त, परि, साहो. ८१
"करितां सारथि[6]मस्तक- कोदंड-छेद पौरवें अहितें,
आर्जुनि, असिचर्म धरुनि, गांठी अरितें— जसा गरुड अहितें. ८२
"खंडुनि सूतशिरें-ध्वज, वामकरें केशभार दृढ धरिला ;—
पाडुनि रथाखालें, घावीं जों त्या कबंधता-अरिला, ८३
"तों खड्ग-चर्म घेउनि, सिंधुप[13], टाकुनि उडी रथा-वरुनी,—
गर्जुनि— हरिपरि, अरिवरि धांवे, तद्वध-मनोरथा वरुनी. ८४
"त्या पौरवासि सोडुनि, सौभद्र जयद्रथावरि उगारे ;
हांसुनि म्हणे, 'हरिपुढें वृक-शश-कार्या न थांबवि[14]; उगा, रे.' ८५
"सैंधव-सैनिक-शस्त्रें, खड्गें, खंडुनि सरोज-नाभा[15]च्या
मोही— वीरजना हर- सा,— स्मरसा अप्सरोजना[16],— भाच्या. ८६
"असि भंगतां प्रहारें लोकांत, न थापडुनि भुजा-माता,
ज्या मातापी,- तें करि:— कीं जाय तुझा पळोनि ज[illegible] ! ८७
"कटकीं जयद्रथाच्या कदन करी, त्यजुनियां दया, द[17]वसा—

१ समुद्र,- २ पक्षि,- ३ अति- अद्भुत,- ४ अभिमन्यु,- ५ आपलामोड,— ६ सारथि मस्तकाचा आणि धनुष्याचा छेद,- ७ शत्रूनें,- ८ अभिमन्यु,- ९ ढालतलवार १० सर्पास, ११ [illegible]च्यांचा शेर आणि ध्वज,- १२ शिरहीनता,- १३ सिंधुदेशपति जयद्रथ,- १४ संपादी, १५ कमलनाभ कृष्णाचा,- १६ रंभादि अप्सरांच्या मनः हरणास,- १७ वणव्यापरि.

गमला परां जनेकसा तो; किंवा, दानवांसि यादवसा. — ८८
"लोकमुखें 'धन्य' असें जो म्हणुनि, रणांगणांत राहुनि, घे,
सौभद्र-सुधांशुवरि [2] [illegible] मद्रराज-राहु निघे. ८९
"वारुनि सुतासि भीम, स्यंदन सोडुनि-महा भुज-गदेतें
घेउनि, शत्रुभटांला दे, भेकोला महाभुजग दे, तें. ९०
"अवकाश सिंहनादें भरती ते शूर [4] [illegible] नभाचा;
मामासा-नात्यासि न दे वीररस-प्रमत्त मन, भाचा. ९१
"भीमगदा शल्यातें, शल्यगदा, एकदांचि, भीमातें,
ताडी, मूर्च्छित पाडी;-कांपविती सांगतांहि भी मातें. ९२
"कृतवर्मा शल्यातें स्वरथीं वाहोनि शीघ्रतर पळवी;
होय स्वयेंचि सावध भीम; न तो मोह [illegible] मळवी. ९३
"उठतांचि तो गदीश्वर [6] भीम, पळे कुरु चमू, न राहे ती;
अमराहि [7] जी न सोसे, त्याची सोसेल कसि नरा हेती? ९४
"कर्णाचा नंदन, वृष- सेन, कुरुबलासि अ[illegible]य दे, वारी;
तेणें केले पांडव वीर-गुहें जेविं [illegible] देवारी. ९५
"पाहुनियां निजसैन्यें वृषसेन-शर-प्रलय-घनाकुळितें,
जें आश्रितावनें यश गिरिधर जोडी;-स्वयेंहि नाकुलि तें. ९६
"चाप, ध्वज खंडुनि, बहु शर सोडी कर्णसुत शतानीकीं;-

१ अभिमन्युपिता अर्जुनसा, - २ अभिमन्युरूपअमृतकर-चंद्रजोत्याचेवरि, - ३ मंडुकांला, - ४ शूरश्रेष्ठ, - ५ भीति, - ६ गदी-ईश्वर- गदाधारणकरणारांचा ईश्वर, - ७ देवांसही, - ८ शस्त्र, - ९ षडानन, - १० देव- अरि- दैत्य, - ११ वृषसेनाचे बाणरूप प्रलयमेघांनीं व्याकुळकेलेलीं, - १२ आश्रित- अवन- आश्रितांचें रक्षण, - १३ नकुलपुत्र.

बंधु म्हणति,'हा केला अहि विकल पिपीलिका शतानीं,कीं ! ९७
"ते द्रौपदेय चवघे वृषसेनीं विशिखें वर्षले शतदा;
न उरे कुरु-कटक-मनीं युद्ध-जयोत्साह-हर्ष-लेश तदा. ९८
"त्या द्रौपदी-सुतांवरि कर्ण,कृप,द्रौणि,धांवले-हरिसे;
त्यांवरि पार्षत,सात्यकि, भीमहि,उठले जवें-मनासरिसे. ९९
"करिते झाले युद्ध- क्रुद्ध[6] शरभ-सिंह-देव-दानवसे.-
मानवसें गमलें न; स्नेह-कणाहि तन्मनीं,तदा,न वसे. १००
"उठली युधिष्ठिर-चमू-जसि महिषासुर-बलावरि भवानी.-
शोभति सुभट-भुज जिचे असकृत्कृत[7]शत्रु-बल-परिभवानीं. १
"स्व-बल-क्षय पाहूनि, द्रोण करि क्षत्रियांत[8]-भार्गवसा.
वीरांसि म्हणे,'स्वर्गी जा;मच्छर दावितील मार्ग,वसा.' २
"रविला झांकी गगनीं कुरुगुरु बहु शरभरीं,तिमिर[10] विखरी[11];
लीलेनें नर-केसरि[12] लक्ष चिरी, शरभरीति भिरवी खरी. ३
"धर्माला गांगया धांवे तो विप्र,कटक[13] विसकटुन
वाटे तदेकविशिखा[14]हुनि सिंधुजे[15]-गरल-घट कविस कटु न. ४
"मदमत्त मतंगजें[16],कीं मर्दी जैसा समीर[17] कदलींतें,-
कुरुगुरु तसें करी;तें परिसा कटकें-सकंप-वदलीं तें. ५
"पक्षिपति[18], पक्ष-पवनें उडवुनि जल,सागरीं अहिस धरितो !

१ व्याकुल,-२ मुंग्यानीं,-३ बाण,-४ द्रुपद,-५ वेगानें,-६ कोपलेला,-७ असकृत्-कृत-शत्रु-बल-परिभव-वारंवार केलेजे शत्रुसैन्याचे पराभव त्यांहीं करून,-८ क्षत्रिय-अंत-क्षत्रिय नाश,-९ मत्-शर-माझे बाण,-१० अंधकार,-११ पसरी,-१२ लक्ष्मनरसिंह,-१३ सैन्य,-१४ तत्-एक-विशिख-ती द्रोणजीच्या एका बाणाहून,-१५ सागरोत्पन्नविषघट,-१६ हस्ती,-१७ वायु,-१८ गरुड.

करितो तसेंचि कुरुगुरु;-हा! हा! कृतकृत्य होतसे अरि तो! ६
'हा आला! हा आला! कोंडील युधिष्ठिरासि शरभयेनीं!'-
शिरला समोरचि जसा- सिंहासि वधावयासि शरभ वनीं. ७
"आम्ही वदलों,'केलें, जें हृदय निसर्ग-मृदुल, कर्कश तें;
धरिलाचि धर्म गुरुनें;'-निश्चय केला असाचि तर्कशतें. ८
"येतां समीप गुरुला पाहुनि आधीं मनांत कर जोडी;
सोडी श्वास शर तया धर्म म्हणुनि धर्म संगरीं झोडी. ९
"धर्माच्या चापातें कुरुगुरु एकेंचि मार्गणें तोडी;
झोडी भीमप्रमुखवां बहुतांतें, बहुबळें बळें मोडी. १०
"भग्नार्तस्वभटोच्च- ध्वनि परिसुनि विजय निज यशोदात्या-
'सूता! हूं, हांक,'म्हणे- ज्या जपत्या देवकी यशोदा त्या. ११
"दुस्तर संकट पडतां मारिति शक्रादि हाक वीरा ज्या,
त्या जगदीशाकरवीं, 'हूं'-म्हणुनि हयांसि हाकवी, राजा. १२
"द्रोणानीकीं केला, शर-वृष्टी करुनि, घोळ वीरानें;
डोळविलीं रथवृंदें बहु,-जेसीं वात लोळवी रानें. १३
"रक्तनदी वाहविली, राया त्या शत्रु-सिंह शरभानें
केवल कुरु-कटकाचीं हरिलीं, विखरुनि अनंत शर, भानें. १४
"जे विजय-मुक्त सायक भरिती, झांकुनि रविभाति, नभा ते-

१ शरवृष्टीं,- २ शरें,- ३ सैन्यें,- ४ भग्न-आर्त-स्व-भट-उच्च-ध्वनि-छिन्नव्याकुल [illegible] यांचा योग शब्द,- ५ द्रोण-अनीक-द्रोणाच्यासैन्यांत,- ६ शुद्धी,- ७ बाण,- × स्वभावानें मृदु,- ** कठोर,- * यशदेणाऱ्यास,- ‡ रथसमुदाय,- * पसरुनि,- ‡‡ अर्जुनानें सोडलेले.

सरेतिल, सरेतिल मागें, कधिं-तरि,वारिहि अपांपति; न भाते.१५
"दाटे बहु निबिड-तिमिर, राया!त्या विजय-रचित शर-भवनीं.-
आम्हा दिग्भ्रम झाला,-जैसा सिंहासि होय शरभ-वनीं. १६
"असुर-चमूचा,बहुधा, धीर नसा नृहरिनें नसे नेला;
त्यां सर्पदष्टकन्ये- हूनि उणें पाहिलें न सेनेला. १७
"तों रवि गेला जाणों सकल-करकरदन राहवाया :—
करिजेल कां न अद्भुत शक्राद्यजितें नराहवा यातें. १८
"आलों शिबिरा वर्णित विजया गुरुहून, अंगपा ,न;
झालों अन्योन्याचें पर्ण-कुसुम-वर्ण अंग [illegible]. १९
"परते पार्थ;-गजांच्या शून्य-करुनि जेविं हरि समस्त वना.
अजितत्वंगुणें होय स्तोत्यांच्या विषय-हरिसम-स्तवना . २०
"द्रोण म्हणे, 'कुरुराजा! मद्वचन प्रत्ययासि आलें कीं?
विजय-निवारण-शक्ति न माझ्या चापीं, न माझिया लेकीं.२१
"युद्ध कराया हटकुनि, विजयाला न्याल दूर जरि सारे,
धरिन,न पळतां,धर्मा; कौरवहो, हें यथार्थ परिसा, रे. २२
"तेव्हां म्हणे सुशर्मा,'जरि न द्वि भुजहि सहस्रंबाहून
अर्जुन,नेऊं वोढुनि दूर,बळें संगरा [illegible] बाहून. २३
'आम्हाला तो,किंवा त्याला आम्ही वधूं, प्रतिज्ञानीं;—

---

१ संपतील,- २ हटतील,-३ सागर,-४ अर्जुनरचितबाणगृहीं,-५ दिक्-भ्रम-रि शोविषयींभ्रांति,-६ शरभांच्या वनांत, - ७ कर्णाहून, - ८ पलाशपुष्पवर्ण,- ९ अजिंक्य गुणेंकरून, - १० सहस्त्रबाहूपेक्षांउणा,-११ बोलावून, -+ अंधकार,-✱ नरसिंहानें, - ✱ सर्पचावलेल्याकन्येहून.

बहु रक्षिति प्रतिज्ञा- पति-जैसे कुलवधूपति ज्ञानी.' २४
"बोलुनि ऐसें स्वमतीं, घे तो सुत-बंधु-वीर-वर्गातें
स्वर्गातें साधाया, सुरवचाया रण-मखांत मर्गातें. २५
"सुत-बंधु-वीर-कटका- सह निश्चितचित्त देवें देश-पथ
अवलंबाया, हो,मुनि- विप्रांला वित्त दे; वदे शपथ. २६
"जैसें मरण सुशर्मा,-तेसें तद्भट अशेष-पथ करिती,-
करितां रणीं पलायन, नरक घडावे;-असे शपथ करिती. २७
"ते समसप्तकसंज्ञ, प्रबळ, सुभट सिद्ध जाहले युद्धा;-
क्रुद्धाशीविष गरुडा-कीं जिंकाया अशक्य-थी शुद्धा! २८

प्र॰ भ॰दिनयु॰ समाप्त



अध्याय २

द्वितीयदिनयुद्ध

"दुसरे दिनीं, सुशर्मा जेव्हां रणमख करावया बाहे,
अर्जुन धर्मासि म्हणे, 'दे आज्ञा; शत्रु बाहती, बा, हे.' १
"धर्म म्हणे, 'मागितला मद्ग्रहवर कीं सुयोधनें अहितें?
गुरु धरिल मला-धरितो लीलेनें पक्षिपति जसा अहितें! २

१ शिवातें,-२ स्वर्गमार्ग,-३ प्राप्तकरून घ्यावयास,-४ क्रुद्ध-आशीविष
कोपलेला सर्प,-५ रणयज्ञ,-६ मत्-ग्रह-वर- माला धरण्याचा वर,-७ शत्रूनें
८ गरुड,-९ सर्पास.

"कृष्णे-सख म्हणे, 'देवा! होऊं द्यावें न भीत चित्त रणीं.—
होइल गुरुशरतिमिरा- प्रति हा पांचाल्य-सत्यजित् तरणी. ३
'रक्षित आला तुमचा धर्म तुम्हाला, पुढेंहि रक्षील.
गुरु तो करुणाब्धि;-कठिनहि काल न कोपें करून लक्षील! ४
'जरि सत्यजित्, कदाचित्, समरीं पावेल मरण, न रहा, हो;
स्वस्थमनें आज्ञा द्या; दैव संसप्तक-तृणांत नर हा हो.' ५
'वत्सा! विजयी हो. ये, संहारुनि शत्रुसैन्य सत्वर तें.'—
"यापरि वदोनि, आज्ञा दिधली सत्त्व-निरतास सत्वरतें. ६
"जे, जे, प्रताप शस्त्रा- स्त्रांचे संसप्तकांकडे होते,
पांडव-चंडांशुपुढें झाले, तत्काळ, कांकडे, हो, ते! ७
"पार्थाचा प्रलय-घना- ऽधिक दारुण देवदत्त दर वाजे;
दरवाजेसे-डोळे झांकिति, आइकति भीतिद-रवा जे. ८
"शर्मा, रथ, धर्मा, धनु, बाहु,-म्हाते-सर्पूर्व-पांच, विती
ज्यां, त्यांसि-पूतनाशी- विजय-विशिख-दृष्टि पळ न वांचवि ती. ९
"नर-हर-शर-दृक्-पातें पडला-सहसा-खचोनि कृपनु-रवी;
धैर्य पर-जनीं अर्जुन,— षड्वर्गांतिलहि जेविं बुध जुरवी.—१०
"सर्व त्रिगर्त्तबल तें, प्रेक्षुनि भेटना-का, द्रवे यश, तें
किति वर्णूं! विपत्तिपुढें ठकावें काय [illegible]? ११

---

१ अर्जुन, २ अंधकार, – ३ वणवा, – ४ सत्व निश्चास, – ५ पांडवरूपसूर्यापुढें, – ६ शंख, – ७ भीति देणाऱ्याशा [illegible]स, – ८ कृहावर्णपूर्वीज्यांच्या, – ९ प्रसवती, – १० अर्जुनरूपशिवाच्या शररूप दृष्टिपातें, – ११ कृधनुरूपसूर्य, – १२ शत्रुजनीं, – १३ कामादिषड्रिपूंतील, – १४ अर्जुनास, – १५ सर्पशतानीं, – + अर्जुनाचीशरदृष्टि

"त्याला म्हणे सुशर्मा, 'सुरवद न हा वासवाहि लेश पथ.—
परता; भीतां तरि कां?-दाउनि भावास वाहिले शपथ. १२
"फिरले ते नारायण गोपालहि-बहु जसे घन रविवर.—
विवर न तच्छर देती वाता; लोपे पराहि नरविवर. १३
"शरतिमिरीं कृष्ण म्हणे, 'मच्चेतोंबु[illegible]! कोसि?—
चित्र, अपक्वाहि फल- प्रकरा पाडी, न वात पक्वासि!' १४
"पार्थ म्हणे, 'स्वस्थ असें.-होती त्वच्चिंतनेंचि नरक रिते.—
नसता आधार तुझा, मज भस्म रणीं कथंचि नर करिते. १५
'देवा! निजप्रसादा म्हणसिल तूं होय, दास मी रणगा
काळा पळविन! काय न होइन परेतापदा समीरण, गा?' १६
"ऐसें वदोनि, योजी त्वष्ट्यानें वोपिल्या [illegible];
जेविं सुकवि सुमतातें, कुकुकें खंडावया [illegible]. १७
"अर्जुन[illegible] शतशः, क्षणमात्रें प्रकट जाहलीं कटकीं;
भुलले ते संसप्तक; केली बहु [illegible]णांत कटकट कीं. १८
"वीर म्हणति, 'हा अर्जुन!-हा केशव!-काय पाहतां, हाणा!
आणा मनीं, कुलज हो! ज्या अग्निसमीप वाहिल्या आणा. १९
'वेष्टा धनंजयाला, आत्मयशें सत्य पांड वेष्टाया;
चेष्टा करूनं घ्याव्या गोपाला-सत्य पांड[illegible]ष्टा या.' २०

---

१ इंद्राला, -२ मत्-चेतस-अंबुज-नव-आतप- हे माझ्या[illegible] मळा ज्यानूतन सूर्य प्रकाशा अर्जुना, -३ क-असि-कोठें आहेस, -४ र[illegible]; -५ शत्रुरूप मेघास, -६ वायु, -७ विश्वकर्म्यानें, -८ वश-अस्त्र-वशी[illegible] रणास्त्रातें, -९ घेरा, -१० सत्य-प-अंड-सत्यलोकपति ब्रम्हदेवाने अंड= ब्रम्हांड, -११ पांडव-इष्ट-पांडवप्रिया.

"पार्थ म्हणोनि परस्पर हाणुनि शस्त्रांचिया महानिकरें,
मेले बहुत, भुलविले त्या अस्त्रें शत्रु,-धामहानिकरें. २१
"समरीं स्वयेंहि वोसवि बहुशत्रूंतें, हरूनि असु, खपवी:—
याचा जेविं शर परा, तेसें देईल काय असुख पवी? २२
"समसप्तकां नर,—जसा नरहरि मारी धिसूरं खळांतें.—
होय असृक्स्रोतःशत; वाहे समराजिरीं खळखळां तें. २३
"अरि-कदन जसें अर्जुन, कुरुगुरुहि तसेंचि वीर-कदन करी.
मिरवी तया पुढें भट— जेविं हरिपुढें बलीहि मदन करी. २४
"धृष्टद्युम्न-द्रुपद- सौभद्रप्रमुख वीर कंपविले
द्रोणें; बहुशूरांचे समर-[illegible] सर्व संपविले. २५
"कौंतेयें गांठिला रण- रंगीं, नरटुनि महा-भट कबंध;—
जैसा जलद समीरें— तैसा विसकटुनियां कटक-बंध. २६
"धीर धरुनि, धर्मज्ञें, धीरें धर्में धनुष्य चढवीलें;
दाखविलें तें गुरुला, जें होतें आपणासि पढवीलें. २७
'गुरुनें नृप धरिला रे, धरिला!-हाणा हयां कशा! हाका!—
हा! काय पाहतां? द्विज वेढा!'-भट मारिती अशा हाका. २८
"तों धांवे वेचाया धर्मार्थ स्वायुधासवित्त रणीं.—
वाटे मुहूर्त तो द्विजे- राज, द्विजराज शत्रुजित्तरणी. २९

१ तेजोहानिकर,-२ अर्जुन,-३ प्राण,-४ शत्रूस,-५ वज्र,-६ निर्बंध,- ७ रक्तनद्यांचे शत,-८ रणांगणीं,-९ गज,-१० धर्मराज-११ शिररहितशरीर,-१२ मेघ,-१३ वायूनें,-१४ चाबूक,-१५ स्वायुधस[illegible] वित्त,-१६ चंद्र,-१७ द्रोण,-१८ शत्रु-जित्-तरणी.

"त्या पांचाल्यातें गुरु- राज स्वर्गासि पाठवी, राजा.
तेव्हां धर्म पलायन धर्म म्हणे — धर्म पाठ वीरा जा! ३०
"धर्म न भांडे गुरुसीं— जैसा सत्पुत्र पाठि दे वडिलां;
त्यासि न म्हणति नर्मीचे, सोडूनि स्तोत्र-पाठ, दे व दिला. ३१
"समरा अजिरासि, राया, सोडुनि जैसा युधिष्ठिर [illegible],
कुरु रु तसेंचि पळवी त्याच्या स्व-निवारणोद्यत बच्चाला. ३२
"झाले गुरुसि पर-जसे पंचाक्षर-मंत्र-जप-परा भूत.—
हतशेष भट पळाले—जेवि असुर विष्णु-बल-पराभूत. ३३
"कुरुपति कर्णासि म्हणे, 'आचार्यें पळविले, पहा, पेरे ते.
झाले सात्यकि, धृष्टद्युम्न, वृकोदर; न एकही परते. ३४
'गुरु [illegible]नि शास्त्रगुण अधिक! धनुर्वेद मूर्त हा सत्य!
हास्य सत्कावधि ये.— झाला मद्रि[illegible]गदास ना[illegible]त्य.' ३५
"राधेय म्हणे; राया! जयहर्षे हासतोसि, परि समज
परम अनर्थ.—परतला भीम; गमें उग्र मृत्युपरिस वज. ३६
'पां[illegible]व वार पळाले, गेले, ऐसें तुवां न मानावें.—
यांचें बल सत्कविंनीं हरि-हर-बलसें, सदैव, [illegible]नावें. ३७
'आतां गुरुवरि धर्म स्वकटक फिरवील; भीम [illegible]रतळ;
परम प्रदीप्त होइल कीं तो नररूप वन्हिवर तेल! ३८
'[illegible] द्रोण रणीं यत्नें आम्ही, तुम्ही, [illegible],

१ धर्मराज, - २ धर्म [illegible], - ३ वडिला, - ४ समर-अजिर-रणांगणाला, - ५ स्व निवारण तत्पर, - ६ स्फूर्तिमान्, - ७ अमर्याद, - ८ मद्र-रिपु-गद - ९ [illegible] परोगास, - ९ अश्विनीकुमार, - १० शत्रु, - ११ हास्य.

म्हणतिल काय अरक्षित-हरिमथन-यशःस्पृहा ससे नाहीं?
“ऐसें कर्ण वदे तों, मागें सहसा फिरे कुरकु,राया:—
प्रलयींचा पाथोनिधि जैसा पृथ्वी,प्रजा,गट कराया. ४०
“द्वंद्व-शतें किति वर्णूं! भीम क्रीडे रणीं समुद्ररसा!
त्या युद्धरसा सेवू लच्छुति-सेवी जसी अर्क रसा. ४१
“भीमासीं युद्ध करी, द्विरदीं बैसोनि,पुत्र नरका :—
टिकला भीमचि;टिकता त्यासीं समरांत काय नर कान्वा?
“मर्दुनि करि-कटकातें, व्याकुळ दुर्योधनासि भीम करी,
तों,प्रेरिला तयावरि अंगें,म्लेंछाधिपें,स्व-भीम-करी. ४३
“एकेचि शरें मस्त भेदुनि,येतांचि नाग लोळविला;
परलोकाप्रति अंगें, छेदुनि मूर्धा,पळांत बोळविला. ४४
“ज्या ऐरावत-कुलजा अर्पुनि,पूर्वी महेंद्र सोम करी,
तो प्रेरिला सकोपें भगदत्तें सुप्रतीक-नाम करी.” ४५
“भीमावरि,न गणुनि शर-वृष्टीची झड,करी करी लगट:—
वाटे जनासि-काळचि तो,त्याला झडकरी करील गट. ४६
“तो क्रोध-मदांध, महा-नागाऽयुत-शक्ति-मूळ-पीठ करी
शुंडा-पादाऽघातें साश्व-रथांतें पळांत पीठ करी. ४७
“भीम गमे मेला,परि त्याच्या पोटातळीं द ला,हो:—
तो चित्तांत म्हणे,‘बहु मदलाभें ताप या ज ला हो.४८

१सागर,-२गिळावयास,-३स-युद्द-हर-हरि ,-५तत्-श्रुति-तुझे कर्ण,-
अर्क,-६पृथ्वी,-७हत्तीवर,-८भगदत्त,-९आपला भयंकर ग ,-१०गज,-११अं
गराजा,-१२मस्तक,-१३सख्य-संधि,-१४मत्-अलाभ-माझे अप्राप्तीनें.

“भ्रमला [1]कुलाल-चक्रा- सम नाग धरावया [illegible];—
जरि तो प्रवर्तला श्रित- नाशीं, [illegible] न भेपा त्याल. ४९
“सत्वर निघोनि पळतां, धरूनि करें कंठ, दे उरीं गुडघे.—
चीत्[4]कार करी, जाणो, 'हा तूं घांटावया'-म्हणे-'गुड घे'. ५०
“बंधापासूनि [illegible] वेगें भीम, भ्रमोनियां उलटा;—
शंडा तसि होय, बळें जसि पडली साधुच्या गळां कुलटा.[5] ५१
“पोटातळीं पुन्हा त्या द्विप-[6]पतिच्या तो पृथा-सुत लपाल;
वाटे जनासि-म्हणती कवि एक बळी वृथा सुतल[7]पाला. ५२
“भीम निघे, दृष्टिपुढें येता निज-गज-घटा, शिरे तींत;
श्रम होय सु[8]प्रतीका-जैसा नट[illegible] नटासि रेतींत. ५३
“जन म्हणति, 'नवल, साहुनि वज्रा[illegible]तासि भीम नग झाला!
कीं या भगदत्तच्या देवगजाचेंहि [9]भी मन गजाला'. ५४
“वेष्टिति भगदत्ताला पां[illegible]व, होऊनि ए[illegible]वट सारे;
तेव्हां सुर म्हणति, 'अहा! गमतो जलधींत एक [10]वटसा, रे!' ५५
“मुनि म्हणति, 'या [11]वेळीं हा गज, त्या सिंधूंत जेविं मंदर तो!—
एवंवि[12]धे रण-यज्ञ त्यागुनि, यज्ञांतरांत मंद रतो'. ५६
“बहु भग्न, चूर्ण केलें बल त्या भगदत्त[13]-सिंधुराऽगानें;—
वाटे-जग बुडवितसे प्रलय-समय-मत्त-सिंधु रागा[illegible]. ५७
“भीम रथीं बैसूनि ये, त्यावरि, 'फूं' करूनि, तो शुंडी उडवी-

---

१ कुंभाराच्या चक्राप्रमाणें,—२ लज्जा,—३ शंडेनें,—४ गजरथ,—५ जारिणी,—६ गजराजाच्या,—७ सुतल पतीजो बलि त्याला,—८ सुप्रती[illegible] गजास,—९ ऐरा[illegible]ताचें,—१० वटवृक्षासारिखा,—११ सैन्यांत,—१२ याप्रकारचा,—१३ भगदत्ताच्या गजरूप अगानें-पर्वतानें.

बुडवी भयांत वाजी; पळवी, थांबुनि सहाय बहु तुडवी. ५८
"गज-गर्जितें धनंजय समजे भगदत्त कृत्य चित्तांत; —
होय बहु विकळ, कीं बुध लुब्ध यशीं; — कृपण जेविं वित्तांत. ५९
"कृष्णानुमतें भंगुनि, भुलवुनि निज विशिख-भव-तमीं परते
मोहूनि सुशर्म्यातें [illegible]-शोकें शरें, विजय परते. ६०
"कुरु-कटका तप्त करी पार्थ — ग्रीष्मीं जसा पतंग जगा,
तों प्रेरिला तयावरि भगदत्तें काळसा मतंगज, गा. ६१
"देव गजासि म्हणे; 'रे, गर्व, अय-स्तंभ-सम-रदा! न व्हो.
हा मत्सख नर सिंहचि — वज्रधराऽसह्य समर — दानव हा! ६२
"होय पुढेंचि, न मागें पार्थ[illegible] हि शतमखसख सरे.
मुनि म्हणति, 'अर्जुनीं तव शक्ति, जसी सागरांत खसखस, रे! ६३
"हाणी वज्र-प्रतिम प्राग्ज्योतिष-वीर-राय तोमर तो; —
भगवत्प्रसाद सुकवच त्याला जो साधु, काय तो मरतो?
"प्रकट करूं दे समरीं — श्रीदेवी जेविं सैरिभीस-कळा
तेविं विजय-चापलता; मग दवडी दूर वैरि-भा सकला. ६५
"विजय विशिखाऽर्त होतां, पूर्वीं दुष्करहि आयकोन, करी
[illegible]चें कथिलें — अधनाचें जेविं बायको — न करी. ६६
"शस्त्रें सरतां, आला पार्थ-[illegible] अंकुश मनाला;

---

१ इथांत, — २ आपल्या [illegible]णरूप भव-अज्ञानांत (अंधकारांत); ३ बंधुशोकानें, — ४ सूर्य, — ५ लोक[illegible]ज्याचे दंत अशा, — ६ धरूनको, — ७ इंद्रासहि असह्य युद्ध ज्याचें, — ८ मदोदक वाहतें ज्याचें ऐसा ९ भगदत्त, — १० देशविशेष, — ११ महिषासुरास, — १२ युद्धकला, — १३ धनुष्यवल्ली, — १४ वैऱ्याची कांती, — ॰ घोडा, — ॰॰ विशिख-आर्त.

विष्णवस्त्रें अभिमंत्रुनि, सोडी – हरि जेविं रंकु-शमनाला. ६७
"प्रभुनें, अनिवार्य म्हणुनि, वक्षस्थळ अंकुशास वोढविलें;
अत्युग्र वैष्णवाऽस्त्रा पासुनि निजमित्र रत्न सोडविलें. ६८
"होऊनि वैजयंती, अवलंबी अस्त्र विष्णुचें उर तें;
त्या अंकुश-प्रहारें न निमेषहि वक्ष विष्णुचें उरतें. ६९
"हें नेणुनि पार्थ म्हणे, 'ओढविलें अंकुशासि कां उर, गा?
क्रूर गाती अनृत मला. – गरुड न खंडील कोणत्या उरगा? ७०
'कां भीसी? भय केंचें मज, असतां वत्सला! पवि-कुवच?
"भक्तः प्रणश्यति न मे"– हें कीं वदलासि तूंचि भविक वच? ७१
'समयीं न आठवूं दे हें वत्सलता गुरु प्रतिज्ञा ते; –
काय व्यास-पराशर- मुख म्हणतिल तुज गुरु प्रति ज्ञाते? ७२
"देव म्हणे, 'भूतें म्यां दिधलें याच्या पित्यास रक्षाया;
तें वैष्णवाऽस्त्र झालें – दायें तसें प्राप्त युद्ध-दक्षा या. ७३
'त्या अस्त्रें अभिमंत्रित भगदत्तांऽकुश तुला न सोसवता, –
अथवा तुझेंचि उर हें; भाव, सख्या! त्वन्मनीं नसो सवता. ७४
'अस्त्र-बल-रहित झाला, जय तुज देतो मरोनि भगदत्त;
होसिल सकल-रिपु-क्षय- कर. तुजहुनि अधिक काय मग दत्त?
'आधीं पट्ट छेदीं, त्या वृद्धाचीं मिळोत, बा, पोतीं. –
दुर्जय सुरासुरांस हि! तुजहीं, जों लागलीं न, बापा, तीं! ७६

१सिंह, -२मृगना शार्थ, -३उर, -४पुढें केलें, -५सपोस, -६वज्रकवच, -७कुशल वाक्य, -८रथीस, -९पितृधनसें, -१०भिन्न, -११दत्तात्रेय, -१२पक्ष्में.

* मे भक्तः न प्रणश्यति – माझा भक्त नाशाप्रत पावत नाहीं.

“मारी [illegible]; खंडुनि तत्पक्ष्म बंधन, कैरीतें;
गुरु-वचन-रत्न डोळस मान्य करी; मान्य अंध न करी तें. ७७
“प्रभुनें-हूं, वध-म्हणतां, वधिला पार्थें महेंद्र-सेख, चुलता;
उलता शोकें, परि गुरु-बोधें बाधों दिली न आकुलता. ७८
“गांधार-रथ खवळले, पाहुनि त्या पार्थ-शर-विपन्नास;
तेही वधिले विजयें—सिंहें गज जेविं तेविं—[illegible]. ७९
“तेव्हां, तुमचे [illegible]— वृषक, अचल, फार तापले रागें;—
नागें [illegible]— ते वधिले एके शरें [illegible]गें. ८०
“झाले सुयोधना जरि शोकद शर-दलित-काय मातुल ते,
तरि धन्यचि! देवांसी सुचिरहि वांचोनि कायमा तुलते? ८१
“यत्न करी शकुनि कपट- शर-दहनीं पार्थ-काय [illegible];
त्याच्या चालों दे[illegible]ल भगव[illegible]रव, पार्थ, काय, हो, माया? ८२
“माया-क्षय-भीत शकुनि सूतासि म्हणे, ‘रथा [illegible]वें.—
जरिहि रण मरण हित, अहित-मर्दन-कामें तथापि टाळावें.’ ८३
“जो नील भूप दावी बल हरिचें मृग[illegible]ळांत शिर[illegible]चें,
ह[illegible]नें, तटकरि तोडी भटतिलक द्रोण-पुत्र शिर त्याचें. ८४
“कर्णानुजेंचि वधिले त्याचे भीमा[illegible]जें तिघे बंधु;—
सिंधु अगस्त्याऽचमना न पुरे, पुरतील काय, मग, अंधु? ८५
“दुसरे दिवशीं गुरु-शर- निकरें बहु धर्म-वाहिनी आटे;

१ गजास,-२ भगदत्त,-३ कृष्णबोधें,-४ व्याकुळला,-५ मृतास,-६ बाणानें विदारिले देह ज्यांचे,-७ कींकाय-हा मालवणाकडील लोकांच्या भाषणांतील फार प्रसिद्ध प्रयोग आहे.-८ कपटाच्या [illegible]लेला,-९ वीरश्रेष्ठ,-१० कूप,-११ सर्पानें.

कुरु कटकासि किरीटी स्पष्ट कटु-कुठोर-पापिसा-वाटे. ८६

"गुरुनें कर्णादि,जग- द्गुरुनें धर्मादि रक्षिले पार्थे ;-

विश्वाच्या यश केलें, कर्पूर-सच्चूर्ण, अक्षि-लेपार्थ. ८७

अध्याय ३

तृतीयदिनयुद्ध

"तिसरे दिवसीं प्रातः- कालीं वंदन करूनियां,राजा

द्रोणासि म्हणे,'गुरुजी! कां आशा-भंग करितसां माजा १

'प्राप्त युधिष्ठिर झाला असतां,धरिला तुम्हीं न कां काल?

झांकाल तपन नयनें, तेजें काळासही न वांकाल! २

'आत्माहि उपेक्षावा, नोपेक्षावाच बोल संतांनीं;

झाला भक्त मनोरथ न गुरुजनीं,कीं न फोल संतांनीं? ३

'सगळी तिकडेचि असे तुमची,इकडे नसे कृपा लेश.-

ऐसें नसतें तरि तो कां मरता शक्र-सखं, नृपालेश?' ४

'द्रोण म्हणे,'त्यजुनि कुमति, सन्मतिसीं करुनि संग,रम,राया!

निंदिसि कां,तुजकरितां जन्हि भजलों,वरुनि संगर, मराया? ५

'त्रिभुवनहि न जिंकिल हरि- सख रक्षित धर्मनंदना सत्य!

हे अजित कृष्ण-सास्रा- न्निजजन-हृद्रोग-कंद नासत्य! ६

१परश[illegible], -२ कृष्णानें, -३ कुंतीपुत्र, -४ माझा, -५ निष्फल, - ६ कल्पवृक्षीं, -७ भगदत्त, -८ युद्ध, -९ प्रत्यक्ष स्वजनाच्या हृद्रोगकंदाविषयीं अश्विनीकुमार.

'जेथें जगदुत्पादक केशव, तन्मित्र विजय सेनानी,
तेथें नर-वीरांच्या साधावा विजय काय सेनांनीं? ७
'एक त्र्यंबक वर्जुनि, इतर सकल पुरुष जरि बलनदीप,
तरि दीन हरिपुढें ते;-दारवविंतिल रविपुढें बल न दीप. ८
'पाहीन निश्चयें मी कोणा एका महा-रथा आजी;
गातील जिला सत्कवि, ऐसी होईल सर्वथा आजी. ९
'परि हटकुनि दूर तुम्ही त्या पार्था, वीरसत्तमा, न्या, हो.-
योग कथासी घवला धरिलय कथा हेहि दत्तमान्या हो.' १०
"ऐसें वदोनि, चक्र-व्यूह, सुदुर्भेद्य, युक्तिनें रचिला,-
जो धीर-वीर-हीर- प्रवर-प्रकरें करोनियां खचिला. ११
"[illegible] म्हणे भरार्त्ता भू-ज्यातें करुनि बोध वळवा, जी,
संसप्त[illegible] माराया जाय, हटकितांचि, तो धवलवाजी. १२
"चक्र व्यूहामध्यें भूप-पुढें द्रोणगुरु-महातेजा;-
अटळ, सदाश्रय, म्हणउनि मेरु अस[illegible] ति कवि पहाते ज्या.
'व्यूहातें [illegible] धर्म झटे, करुनि यत्न सा[illegible] जनीं;
परि लोपवि प्रतापा गुरु-तपना जेविं रत्नसानु जनीं. १४
"धर्म म्हणे, 'सौभद्रा, दुर्भेद्य व्यूह, यत्न चाले[illegible];
[illegible] स्थित अस्मत्- गुरु, कुरुकट[illegible], लेश हालेना. १५
'गुरुनें सकल पळविले गज, जेविं [illegible] गेंडवरें, समन्यूनें;

१ सेनापती,-२ सैन्यांनीं,-३ बलसागर,-४ संग्राम,-५ धीरवीरश्रेष्ठ हे त्याच्या समुदायानें,-६ भारपीडित,-७ अर्जुन,-८ भावांस,-९ सूर्यास,-१० मेरुपर्वत,-११ हे अभिमन्यो,-१२ सक्रोधें,-[illegible] बलवान्[illegible] चानारा.

पूर्ण [illegible]या नव्हतां, व्हावें कैसें तयासम न्यूनें? १६
'तत्काल मातुलें, कीं भेदावा व्यूह हा तुझ्या तातें;–
पांडित्य जें तयांचें, तुज पाठ असेचि, बा, सुजाता! तें. १७
'म्हणतिल म्हणोत पर, परि म्हणे [illegible] मज ससरेव यदुप हा–'साधू'
म्हणुनि व्यूह विभेदुनि, बा, स्वयशें तूंचि मंदुपहासा धू.' १८
''अभिमन्यु म्हणे,'चिंता करितां हे व्यर्थ काय, हो तात?
या वाक्यें बहु लज्जित कीं हे तुमचेचि पाय [illegible]? १९
'तातें कथिला आहे दुर्भेद्य-व्यूह-भेदनोपा[illegible];
शिरतों, भय काय मनीं? आहेत सहाय, राय, हे पाय. २०
'व्यूहीं शिरेन [illegible]रसा, मागें परतेन एक पदही न;
यु[illegible]त्पद-प्रसादें होतिल युष्मत्सपत्न मदहीन.' २१
''धर्म म्हणे,'त्वदन्वित- द्वारें आम्ही समस्तही मागें
येतों रक्षाया तुज;–यावें स्वस्थैर्य, धैर्य, [illegible]गें.' २२
''मारुति म्हणे,'शिरे अहि- रदरचितें, जेविं, तद्विष द्वारें,–
त्वन्निर्मितें शिरेन व्यूहीं; टिकिजेल न द्विष[illegible]रें.' २३
''सौभ[illegible] म्हणे,'[illegible]िरतां व्यूहीं-डोहीं जसा मतंग[illegible]–वो,
हरि-पोत दंति-यूथीं–कीं, दहनीं करुनियां पतंग जवो. २४
'जें करिन आजि, होइल पितृ-मा[illegible]ल-सच्चरिता[illegible]रूपचि तें;

१ शत्रु, २ मित्रांसहित,-३ कृष्ण,-४ मत्-उपहास,-५ दूर कर,-६ [illegible],–
७ युष्मत्-सपत्न-तुमचे शत्रु,-८ हेम-अंग-मेरुप[illegible]त,-९ मरुत्पुत्र-भीम,
१० त्वत्-निर्मित्-त्वां [illegible],-११ द्विषत्-वार-शत्रुसमुदायें,-१२ अथवा,-
१३ सिंह-शाव,-१४ गजसमुदायांत,-१५ वेगा.

क्रव्यादांला[1] खाया देइन उथळुनि बळें कुरूपचितें. २५
"ज्येष्ठपित्याला देउनि अभय, म्हणे तो सुवीर सूतातें,
'हूं, हांक रथ;' म्हणावी माय, सुभद्रा, सुवीरसू[2]-तातें. २६
"तो सूत, सुमित्र, म्हणे, 'भो आयुष्मन्! कुमार आपण कीं?
हाकिन हेरि[3] अरिवरि, परि कुरु गुरुशीं गांठि कठिन हापण कीं?'
"हासुनि सौभद्र म्हणे, 'हरकी[4] न हटें रणास भीमातें!
शक्राऽर्जुन-कृष्णाशीं करितां समर, न शिवेल भी मातें! २८
'द्रोणानीका[5] मानू जन सागर, मजहि सत्वरा[6] मकर[7];—
घे काय न्याय[8] पर- स्वच्छात्र-नदीज-सत्व राम-कर[9]?' २९
"तन्निर्बंधें[10] नीटचि चालविला रथ-[illegible]-सूतें;—
देती मम्भूक्तितें भित- मति-कुळजा जेविं मान सासूतें. ३०
"भीमादि सबळ सर्वहि तेउठले व्यूह[11]-कोट फाडाया;
इकडुनि कौरव-कटकहि होय पुढें शत्रु-सैन्य मोडाया. ३१
"रथ थडकले, भडकले हय, शस्त्र जवन्हि धडकले वरते;
अन्योन्य, द्व्यंगुलेंही[12], राहों देती न धड [illegible] ते! ३२
"पावत असतां दोन्ही, करुनि सुतुमुलाहवास[13], वृध सेना,
व्यूहीं शिरे गुरु पुढें,- चित्तींहि जयांत[14] वोसेव घसेना[15]! ३३
"व्यूहीं गमे सुभद्रा- सुत— गज-यूथांत जेविं बाल हरी[16].

१ मांसभक्षकांस,- २ वीरपुत्रप्रसवणारी,- ३ घोडा,- ४ महादेवास, भीमास वा,- ५ द्रोण-अनीक-द्रोणसैन्याला,- ६ त्वरायुक्त,- ७ याह,- ८ न्याय निष्ठस्वशिष्यभीष्मजीवात्र्वें सत्व,- ९ परशुरामाचा हात,- १० तत्-निर्बंध-त्याच्या अति आग्रहानें,- ११ व्यूहरूपकिल्ला,- १२ दोन अंगुळें भर,- १३ सु तुमुल-आहव-अतितुमुलयु[illegible]स,- १४ इं द्र,- १५ सरसाऊन जाईना,- १६ [illegible].

त्यावरि पडल्या सेना—त्या मंथाद्रिवरि[*] जेविं, बा, लेहरी[१]; ३४
"बहुनाशीं एकाकी सौभद्र कलह करी समुत्सा[२]; 'हें—
असकृत् सूतासि म्हणे, 'स्यशस्कर समर, हो, समुत् साहें'. ३५
"तच्चापलतेसि दुजी—दावील श्रीस काय मद नारी?
वाटे—करितो कौरव-संहार मनुष्य-काय [illegible][४]! ३६
"मूर्त वसंत गमे तो, गमति रिपु विपन्न ते करीराग[६]!
कुरु-कटकीं—पश्च-निकरीं श्रीरुद्र तसाचि—तो करी राग. ३७
"समरीं बालासि म्हणे रक्तप[७], 'गगनींच, करुनि आ, वर्त्ते.'—
किंबहुना—हय, रथ, गज, गिळिले शोणित-नदींत आवर्ते. ३८
"तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत शुष्क रसें;
शोभे विजयोत्साहें अभिमन्यु-मुख प्रफुल्ल-पुष्करसें. ३९
"दुर्योधन स्वयें मग सौभ[illegible]-वधार्थ धांव[illegible] कोपें;—
कलभ[१०]-मथन हरिसि तसें—त्याला तें कर्म वाटलें सोपें. ४०
"तें, द्रोण म्हणे, 'भट हो! रक्षिनि स्वर जेविं तारका स्वरेंसा,
रक्षा; अभिमन्यु न हो गुहेंसा[१२], कुरुराज तारकासुरसा[१३]. ४१
"भूरिश्रवा, शकुनि, कृप, [illegible], कर्ण, शल्य, यांसहित
धांवे सस्वत गुरु; कसें होऊं देईल सम[illegible] तो अहित? ४२
"सोडविला नृप जेव्हां, होय, नृपा, शस्त्रमय नभ क्षण, हो!

१ लाटा, -२ हर्षयुक्तसा, -३ मानवशरीरी, -४ सदाशिव, -५ धायाळ, -६ करीरवृक्ष. -७ राक्षस, -८ [illegible]वऱ्यानें, -९ विकसित, -१० करिशावक, -११ अमृतातें, -१२ षडाननसा, -१३ दैत्यविशेष, -* समुद्र मंथन करावयास [illegible]तलेल्या मेरुपर्वतावर.

करितेचि त्या स्मरोचें तत्तेजोरुद्र-नयन भक्षण, हो! ४३

"आठवला जो मारुति- पासुनि सुटोनि वांचला तरणी;
बसती कुरूप-शिरीं पर- शर-शनिची तेधवांच लात रणीं. ४४

"स्तोत्थित हरिसा—तो उघडी, होउनि विमोह, दृशीतें;
स्व-विशिख-निकर-समीरें उडवी बहु शत्रु-शस्त्र-वृष्टीतें. ४५

"नृप न दिसतां म्हणे; हा! गेलों खाया, करूनि आ, जवळ,
तों कवळे पळविला कीं;-पावेलचि आज लाज आजेवळ. ४६

"सौभद्र बहु क्षोभे; गर्जे, पाहूनि कवळ हरित्यातें;—
जाणों अपराधी गज हटकी, दापूनि, जवळ हरित्यातें.

"त्यां सिंह-नाद होय— व्याळां पुच्छीं जसा पद-न्यास;
वेष्टुनि हाणिति सर्वहि, देखवतें ही न तें [illegible]! ४८

"प्रभुंचा मर्मी हाणी, [illegible] हे, तीन तीन शर भोंचा.—
वाटे—बहु [illegible] समर करी कुपित[11]-पोत शरभाचा. ४९

"द्रोण-द्रौणि-कृपादि प्रबल बहु भटांसही न तो औटे;
फाटे न हरि पुढें चळे; जलदीं[14] [illegible] वाटे. ५०

"होय पुढें अश्मक-पति, कीं तत्तेजें न वीर करपोत;
खंडी तद्धय[15], सूत[16], ध्वज, धनु, भुज, शिर, मंडील[17] नर[18]-पोत.

"पडतांचि अश्मकेश्वर कर्ण-द्रोणादि करिति शर-वृष्टी,
फुल्ल-पला[illegible]श्री तो निववी, भिववी, सुराधि[19]-पति-दृष्टी. ५२

१मदनाचें-२सूर्य-३दुर्योधन,-४आपल्याबाणसमु[illegible]नें, ५प्रास, ६आजोळ,-७सर्पाला,-८पायठेवणें-९तत्-इतर-ह्या अभिमन्यूवांचून सर्वास,-१०प्रभुचाम्ना अभिमन्यु,-११रागावलेलाबाल-,-१२आटोपे,-१३सैन्य-१४मेघाच्याठायीं,१५तत्-हय-त्याचे घोडे,-१६सारथी-१७कीडेनें,-१८अर्जुनपुत्र,-१९इंद्र.

“भेदुनि शरें उरस्थळ, चळचळ बल-जलधि कर्ण कंपविला;
मूर्च्छित करुनि मद्रप, सौभद्रें तत्प्रताप संपविला. ५३
“एकें क्षुरेण वधिला, बाणें एकेंचि दीर्घ-लोचन, हो;
एकेंचि कुंड भेदी, गमले ते घूक-तो विरोचन, हो! ५४
“मानी वीर पळाले, गुरुनें हि निवारितां तडक, राया.
स्यंदन शीघ्रहि पिटितां, सांगति सूतांसि तांतड कराया. ५५
“झाला पुढें महाबल, शल्यानुज जो, तयासि तो खपवी.—
होय जयापरि पावुनि पर्वत-पाटन-जयास तौरव पवी[5]. ५६
“मर्दी मद्रप-कटका—असुर बळा जेविं तार[6][illegible]राती;
रोधिल काय परचमू त्या? तो पूर्णावतार! कारा ती! ५७
“सप्रेम पार्थ-पुत्रा- प्रति पाहुनि, तत्पराक्रमें डोले;
कुरुपति परिसत असतां, द्रोण कृपाशीं कृपा-भरें बोले. ५८
“हर्षवितो मज पुत्रा- हूनि, नव्हे हा [illegible]मार सामान्य;
धन्या सती सुभद्रा! नंदन जीचा [illegible]मारसा मान्य. ५९
‘मारावें सकळहि बल, परि, सुज्ञा! तत्व[9] वद, न कां मारी?
वाटे-धृत-रण-[illegible]का [illegible]च्छादित-बहु-बाहु-वदन कौमारी! ६०
“कुरुराज म्हणे, ‘कर्णा, कुरुगुरु पळवील अं[illegible]. —
गरुडा[illegible]दें यमौ[11]घहि काय न [illegible]वल अंत [12][illegible]? ६१
‘परि झाला त्या शिष्य- स्नेहानें मूढ हा न[13][illegible]ी.

१घुवड,-२सूर्य-३ मारी,-४ हर्ष,-५ वज्र,-६तारक-अराति- तारकासुरशत्रु-कार्तिकस्वामी,-७बंदिशाळा,-८ कार्तिकस्वामी,-९सत्यवद,-१० शिव, -११ यमासारिखाउग्र,-१२ कालसर्प,-१३ द्रोण.

स्तवितो भाट तसा कीं, वाटे जोडील हात पोराशी. ६२

'बाला दिलें बल जसें, घावें दहनाचिया लवा वातें;—
हें पाळावें पदरें, दीपहि जेणेंचि माळवावा तें? ६३

'गुरुनें, करुनि उपेक्षा, केला दुःसह, असाध्य-आमें सा-
पसरिल न जग गिळाया रुद्राप्रियभूत कोण आ मयसा? ६४

"दुःशासन बोले जड- काय मदन हा [illegible] उग्रोस;—
महाहुराहुच्या शशा- धरसा शिशु हा निका, मउ ग्रास! ६५

'आहे [illegible]नेकरा अचगत पांडित्य, जें अजगरा, तें;
या असुत्द दपत्यातें गिळिल-ग्रासी जसा अज गरातें. ६६

'मरतिल स[illegible] [illegible] धीरहि ते सोडितील आवास;
आवास अंतकाचा प्रिय-शोक-हरिस म्हणेल, 'आ वास. ६७

'एक-क्षयें [illegible]- क्षय होय-असें, पहा, कसें करितों;
सौभद्र-[illegible], आतां, निजकटक-संकटा हरितों. ६८

"ऐसें बोलुनि धांवे- विधुसि [illegible]सि जेविं राहु निघे.
कार्ष्णि म्हणे, 'ये, देतों स[illegible] पळे समोर राहुनि घे.

'सर्वंसहेसही बहु देतो खल-काय-भार ताप सदा.—
ताना भीमाचें हें नोहे बल काय, भार[illegible] ? ७०

'माझे न पावतिल तव हननें साधूंत ह्रीमति ज्ञाती.—
जरि खल म्हणतिल भपा, आम्ही साधूं तरी प्रतिज्ञा ती. ७१

१कुणगीला,-२रोगसा,-३शिवास्र-४चंद्रासारखा,-५चांगला,-६पत्-शरा[illegible]र.-७अ-सुत्द-अपत्य,-८शिव,-९ बिवातें,-१०सह अर्जुन,-११धैर्यास,-१२स्थान,-१३चंद्रास,-१४अभिमन्यु,-१५ सत्-छल-फल-साधुच्छलाचें फल,-१६पळभर,-१७पृथ्वीस,-१८ भारत-अपसद-भारतांतदुष्टा,-१९ लज्जेमति.

आत्मा पुत्र असें हें   श्रुतिचें मत भीम तात हा तनय
श्रुतिकिंकरासि देवां-   धर्मासह जोडितात हात नय   ७२
परिसुनि धिक्कार रणीं   मानी रथ चाप कां न नीट करी
गमले सजले क्रुद्ध-   द्विप[1] माराया[2]सि काननीं टकेरी   ७३
सक्षत नव सुत गमला   पुष्पांनीं दाटला पळस साच
मूर्च्छित म्हणुनि पळवितां   सूतानें वाटला पळ ससाच   ७४
धर्मादि सर्व झाले   दुःशासनपरिभवें परम हर्षी
ज्ञानें मोहपराभव   होतां जैसे तपःपर[3] महर्षी[4]   ७५
धांवति सहाय व्हाया   सौभद्रा द्रोणसैन्य फोडूनी
रोडुनि विशिख दृष्टिंसि   सारूं[5] पाहति परांसि मोडूनी   ७६
भूप म्हणे कर्णा शिरू   झटले जरि भट समस्त न निवारे
स्वभुजांसि म्हणे सुरिंचे   आलिंगुनि घटसम स्तन निवा रे   ७७
तूं या धनंजया[6]च्या   शर-वर्षे शमविशील कुणगीतें
घेशील चितावरि तरि   भुलविशील सुर स्व-कीर्ति-गुण-गीतें
शस्त्रास्त्रवृष्टि करितां   घन कर्ण गमे सुवर्ण-नग[7] बाळ
किंबहुना व्यासेंतर[8]-   रचित सयिरत्नर सुवर्णन गर्बाळ   ७९
शस्त्रें अस्त्रें छत्र   ध्वज धनु खंडुनि वधूनि अनुजातें
राधेयातें पळवी   सौभद्र कुमार[9] जेविं दनुजातें   ८०
व्यूहीं शिरतां पांडव-   वारण केलें जयद्रथें वा तें

१ गज, २ टकरा, ३ तपोनिष्ठ, ४ महाऋषि, ५ मागेंसरे, ६ अर्जुन (हेंच अग्नीचें नांव आहे म्हणून उपमेकरितां अग्नि.) ७ मेरु, ८ व्यास-इतर-व्यासाहूनइतरानें रचिलेला, ९ रद्दी, १० स्वामिकार्तिक.

हर वरकृत्य जलधितें   करिल प्रभु येंव जलधि येंबातें ८१
वसुषेणसूत नरेजें   वधितां झाले रणीं चपळ वाजी
जाणों परस्पर म्हणति   जाऊंद्या यश धणीच पळवा जी ८२
वधितां वशात्य राजा   तद्रूट काळें मुखांत लपवीले
शल्यज रुक्मरथसहित   नरसखशत-राजपुत्र खपवीले ८३
हरिशिशुवरि यूथ-वध-   प्रकुपित-मदमत्त-यूथपाळेकसा
धांवे कुरुप परि पुन्हा   त्यासि न पळवील पार्थबाळ कसा
अंध म्हणे रे संजय   हें त्या पौत्रांस वर्ष सोळावें
लोळावें मांडीवरि   तेणें द्रोणादिकांसि घोळावें ८५
न[5] पवे सुनीति[6]चें पर-   मार्थाची वाट लेंकरूं काय
सत्यचि कथिशी परि हें   मज लटिकें वाटलें करूं-काय ८६
संजय म्हणे म्हण अनृत   भीष्माचा एकला पणतु मुलगा
करिता झाला गुहसा   बहुतांनीं वेढिला रण तुमुल गा ८७
कुरुसैन्यांत गमे ज्या-   परि रंभाकाननांत वारा हो
त्या विजयश्री देउनि   परिरंभा[10] कां न नातवा राहो ८८
समरीं स्मरोनि वदलों   मी धन्य अधन्य विनयेंना[11] तूतें
काय कथूं कुरुगुरुसहि   पळवि पळ त्यक्तविनय[12] नातू तें ८९
लक्ष्मण धांवे जेव्हां   द्रोणा धरिलहि सुयोध नावरती
घननाद[13] दशमुखावरि   जी स्थिति घाली रुयोधनावरती ९०

१ अर्जुनपुत्रें, २ सिंहपोतावर, ३ गजपतिसा, ४ नातु अभिमन्यूस, ५ न पावे काय, ६ ध्रुवमाता, ७ खोटें, ८ युद्ध, ९ कदळीवनीं, १० आलिंगना, ११ चक्षुहीना, १२ अमर्यादा करणारा, १३ इंद्रजित, + दुर्योधन.

हननचि बहुमत झालें पहिलें तुमच्या न नातवा नातें
वदनें न वानवे[1] तरि शौर्य शिशूचें मनांत वाना तें ११
कार्ष्णि म्हणे ये शोकद हो ताता साधु-गंजन कुशीला
आलें भानुमतीच्या मळवाया वंश अंजन कुशीला १२
तूं त्या योग्य सुमित्रा- सुत धरि खलदुर्मिला सुनामा ज्या
काकी म्हणत्ये तुच्छा करुत यशें उर्मिला सुना माज्या १३
लक्ष्मण हें योग्य मला योग्य तुला मेघनाद हें नाम
रावणसा बाप तुझा बा माझा शुचियशा जसा राम १४
धिक् प्रथम मग करुनि रण वधिला लक्ष्मण किरीटितनयानें
हें पुत्रशोकविषफल दिधलें दुर्योधनासि अनयानें १५
सुत मरतां भूप म्हणे होईल अधर्म म्हणुनि न चपापा
सारे मिळोनि मारा राहोंद्या एक पळहि नच पापा १६
द्रोण द्रौणि बृहद्बळ[10] कृतवर्मा कर्ण कृप असे सा+ हे
वळले घनसे त्यांतें कार्ष्णि महावातसा न तो साहे १७
कोंडुनि म्हणत-होते विझवूं मारूं दिवा जसा सांजे
तो त्यांसि भंगुनि जय- श्रीयोगें श्रीनिवाससा[11] साजे १८
क्राथसुत[10] मथुनि केला विरथ कृपाचार्य बा तुज्या नातें[12]
करुं कीर्तिद-वृंदारक वधितां स्मरलें न जातु[13] ज्या नातें १९
वधितां बृहद्बळातें म्हणती क्रूर सर्व कांपवीना कीं

---

१ स्तुती करवे, २ साधुछलका, ३ सुयोधनस्त्रीच्या, ४ काजळ, ५ पोटाला, ६ लक्ष्मणदाशरथि, ७ खलांलादुष्प्राप, ८ अर्जुनपुत्रानें, ९ भ्या, १० जयद्रथ, ११ कृष्णासारिखा, १२ नातवानें, १३ कदापि- + साहा-

वज्रशताधिक याचे शर मिरवी गर्व कां पवी नाकीं १००
कर्णासमक्ष मारी त्याचे निधि यक्षवत् सचिव सो हो
त्यांसि म्हणे होउनि चिर वीर-सुगति-सुरभि-वत्सचि वसा हो १
कर्णाचा भंग करुनि मागधसुत अश्वकेतुला खरेची
प्रतिकूळ विधि तसा तो परबळनाशार्थ हेतु सारव रची २
कालियसा दोःशासनि करिन म्हणे त्या परास धीटांचा
प्रभु तन्मर्मीं हाणी इषु जैसा तो परो सुधी टांचा ३
त्यासि म्हणे सुत याचा कीं तूं नरकाय पापवनिं रीस
जो झोंबला सतीच्या सोडाया सत्क्रियेसह निरीस ४
मज जिंकाया कैंचें बल खलजन्मा तुला निरीहातें
सोडुनि अजितत्व जगीं एका मन्मातुला निरी हातें ५
जैसा बाप पळाला तूंही तैसाचि पाप पळशील
मळशील अपर्णो कीं आतांचि पतंगसाचे जळशील ६
ऐसें बोलुनि सोडी दुःशासनसुतवधार्थ नाराच[9]
छेदी शरत्रयें कुरु गुरु त्या मित्रा सुदर्शना[10]राच्या ७
ती शरहानि तया जशि हरिच्या[11] नाकांत घातली काडी
द्रोणध्वज सौभद्र छेदुनि तत्काल भूतळीं पाडी ८
शल्य पुढें होय तया तत्काळ उरीं शरत्रयें ताडी
मद्रपशर नव नवें नव- नीत-मृदु-कुमारे[12]दारणा धाडी ९

१ साहा, २ मारी, ३ दैव, ४ मृत, ५ श्रीकृष्ण, ६ कालियास, ७ आखल, ८ द्रोपदीच्या, ९ बाण, १० सुदर्शनधारेच्या, ११ सिंहाच्या, १२ अभिमन्यु हननार्थ, + नऊ.

विरथ करूनि पळविला   शल्य जसा तारकासुर कुमारें
शत्रुंजयादि-पंच-   प्रबळ-रथी मारिले मग कुमारें १०
शकुनि म्हणे कुरुनाथा   हा सर्वांहीं मिळोनि मारावा
भ्याले यास भट जसे   भीती गज शिशुमृगोत्तमारावा ११
मारिल एकेकानें   शर गोचर शूर कोण न खपविला
मृदु पूर्व परि न कंपद   काय नृहरि-रक्तशोणनख पविला १२
द्रोणासि कर्णहि म्हणे   गुरुजी मज तों नसेचि आवांका
आवांका युक्ति म्हणो   न तुम्हास हि हा करूनि आ वांका १३
गुरुहि म्हणे कर्णा हा   तक्षकचि गरल करूनि-आ वमला
आहे संकोचें परि   सोडुनि गेला मर्यांचि आव मला १४
मज भंगुनि हि रुखवितो   बा हा सामान्य काय गा बाळ
उतरूनि सांडावा या-   वरुनी सर्वस्व कांय गावाळ १५
याचा धन्य गुरु जसे   धन्य प्रद्युम्न गुह कुशीलवांचे
न दिसे आज मज रणीं   जो सौभद्रापुढें कुशल वांचे १६
स्पष्ट अभेद्य-कवच हा   बीभत्सकुमार अंगिंपा त्याला
कीं अग्निवाहि याचें   भ्यावें स्फुकुमार अंग पाल्याला १७
म्यां विजयासि पढविली   विजयानें कवचधारणा तनया
भेदुनि कवच करिल स्मर-   प हि तिळ-तुल्य व्यथा रणांत न या
जरि इच्छिसि हतें सुत- कुरु- पति-शोक-प्रशम कार्ष्णि-च्या पातें

१ कार्तिकस्वामीनें, २ बालसिंहध्वनीस, ३ हृदयास [illegible] आलेला, ४ रक्तानें आरक्तनख, ५ वज्राला, ६ धैर्य, ७ बोजा, ८ अभिमन्यु, ९ विष, १० देह, ११ रामपुत्रांचे, १२ अर्जुनपुत्र, १३ कर्णा, १४ इंद्र, १५ मृतपुत्रजोकुरुपतिस्या [illegible] नें, १६ अभिमन्युच्या.

तरि पाहूं पाड कसा आधीं तोडोनि कार्ष्णिचीपातें १९
कार्मुक गुण हय सारथि खंडन इतुकें अशक्य बापा हें
जें यांत घडेल तुला तें तरि करि करुनि यत्न बा पाहें २०
अ[2]क्षतधनु तोंवरि हें वी[3]रशिरोरत्न नाऽवरायाचें[4]
यास्तव सर्वहि रसूं आजि करुनि यत्न नांव रायाचें २१
परंतु हत्रशिरासि जसा खंडी भयदायकास नाकाचा
तैसाचि कर्ण करिता होय तया साय[6]कासना काचा २२
मारी हरीस सहसा कृतवर्मा सारथीस गौतम ही
परि न गडबडे तो पितृ- मातुल-सम रूढकीर्ति धौतमही
सौभद्र विरथ होतां धर्मज्ञ हि करिति शस्त्रवृष्टीतें
तें निष्कृपत्व पाहुनि झांकिति बहु-सदय-साधु दृष्टीतें २४
म्हणती हाणा मारा पाडा ह्या काय पाहतां तोंडा
कोंडा प्राण व्यसनीं बाळ बुडो कर्दमीं जसा धोंडा २५
तों खड्ग चर्म घेउनि अवलंबी वीरनायक विहाय
संकट पडतां सोडुनि धैर्यासि म्हणेल काय कवि हाय २६
पाहुनि गरुडा गगनीं धैर्य जसें काय काद्रवेयांचें
तैसेंचि भगव[13]दनुजा- तनुजा कु ंनायका द्रवे यांचें २७
केवळ हृदयीं भ्याले जे जे ह्या प[14]विपरीस गाढाला
शिरले रथातळीं मग घेतील शिरीं न काय गा ढाला २८

१अभिमन्यूच्या धनुतें, २अ-क्षत-धनु-धनुष्यभंग न होई तों, ३ वीरांचें शिरोरत्न अभिमन्यु, ४ दुर्योधनाचें, ५ इंद्र, ६धनुष्यास, ७ कृप, ८निर्दयत्व, ९ चिखलीं, १०आश्रयकारी, ११आकाश, १२सर्पांनें, १३ भगवत्-अनुजा-तनु-ज-सुभद्रापुत्राला, १४ वज्रापेक्षां

खड्ग क्षितिवरि पाडी   द्रोणें छेदूनियां नव [1]खरूप
चित्तीं म्हणे न मज तुज   धन्य त्रिभुवन म्हणो न वत्स रूपें २९
कर्ण करी चर्मांचे   श्रितविघ्नांचे जसे गणप तुकडे
तरि पाहों हि न शकले   वीर विशस्त्राहि त्या रणपटुकडे ३०
कार्ष्णि म्हणे पळ इकडे   पाहुत सज्जन न पत्रिकेतुकडे
चर्मोपरि लिहिले कां   [6]वसुचे मज्जननपत्रिकें तुकडे   ३१
शत्रुमुखींचें क्षितिवरि   उतरुनि घेऊनि चक्र पाणि हरी
भासे साक्षात् शिरला   असुरसमूहांत चक्रपाणि हरी ३२
वारिति जसें प्रयत्नें   एकमतें सर्व संत परचक्र
कर्ण द्रोणादि तसें   खंडिति बहु तें स्वअंत [10]परं चक्र ३३
मग भेकमूषकां जें   क्षुधित-क्रोधी-महाभुजग दे तें
दुःसह भय आम्हा दे   धरुनि करीं तो महाभुज गदेतें ३४
तेणें हय सूत वधुनि   अश्वत्थाम्याप्रति प्रभावातें
दावुनि हरिली कौरव-   दीप्ति जशी दीपकप्रभा वातें   ३५
पाहूनि स्फुमुख जेव्हां   धांवे सौभद्र सिंहसा रागें
त्यजुनि रथोपस्थ सरे   [11]गुरुनंदन तीन पाउलें मागें   ३६
रवा माते दॆवि गदे   [12]धर्माहितमाहिषकालिके यातें
ऐसें म्हणोनि मारी   तो स्फुबलतनूज कालिकेयातें   ३७
गांधार [illegible]ते   बाह्यवसातीय रथ दहा मथिले

---

१ परज, २ नरूप-रूपूंनको, ३ ढाल, ४ युद्धकुशलाकडे, ५ कृष्णाकडें, ६ शरीराचे, ७ मत-जनन-पत्रिका, ८ खालींउतरूनचक्र घेऊनशत्रूंचेमुखावरचें पाणि हरणकरी, ९ पळवी, १० परंतु, ११ अश्वत्थामा, १२ धर्माचा अहितरूपजोहा महिषासुर यालातूं कालिकादेवी.

कैकेय वीर सप्त द्विप दश हे मुख्य मुख्य मीं कथिले ३८
केला चूर्ण सहय-रथ दुःशासन सूनुचा गदाघातें
साहे न परबलातें जेरी हरिनामममनु गदाघा तें ३९
बाहुप्रतापचरितें दावी तो पार्थकोयज गदीशें
याटे वर्णियला यम- सा यमकोपार्थ काय जगदीशें ४०
त्या सौभद्रावरि स्वल- सा गरगरगर गदेसि फिरवीत
दुःशासनसुत धांवे निज भुज [illegible] ताप मिरवीत ४१
युद्धचमत्कार रुचिर सुचिर प्रकटुनि महागद भ्राते
अन्योन्यकृता घातें बा मूर्छा पावले अदभ्रा ते ४२
आधीं उठोनि उठतां सौभद्रशिरीं प्रभो गदा घाली
विवश करी ती दुर्धरि- हार्या जेविं [illegible] ४३
पटुली जसी कराया प्रेक्षकसुर विरस मस्तको परि ती
भूवरि सौभद्रतनुहि ओकुनि सरुधिरसमस्तकाय रिती
आधीं श्रम बहु झाला होता तो त्यांतही असावध हो
केला दौःशासनिनें धर्म नय त्यजुनियां असा वध हो ४५
प्रेक्षक सुर मुनि सज्जन बहु हळहळले किरीटिर् तपातें
रडला पाहुनि सत्य- [illegible] ह नारदादि [illegible] तें ४६
ज्यांचा संकल्प प्रिय- कृतशोकें जिष्णुचे अरिकं खपावे
ते नव युत्रचि झाले मुदित इतर अहितेंही असुख पावे ४७

१ मंत्र, २ रोगरूपण, ३ अभिमन्यु, ४ शंकडो, ५ बहुत, ६ परिहारकरण्यास अशक्य, ७ [illegible] पानक पंक्ती, ८ पहाणारे जे देव त्यांला विरस करण्यासाठीं, ९ रिक्त, १० प्राण, ११ शत्रुही, + नारदादितापस, ✱ आनंदित.

34722

धर्म वधटांसि म्हणे दत्ति परमदुर्लभा अरी मरणीं
कां रडतां सौभद्रें वत्सें यश जोडिलें अंसीम रणीं ४८
चित्तींच पळांत म्हणे शतदा बाहेर न बहुवस हाये
समजाउनि कटकांतें धैर्यें शिबिरासि जाय सरसहाय ४९
कवच विकळ होउं न दे धर्मासि जसा तुरंगमा तंग
स्फुतशोका वश शिबिरीं जैसा सिंहा कुरंग मातंग ५०

अध्याय ४
चतुर्थदिनयुद्ध.

धर्म म्हणे हा हा म्यां मंदें दाटुनि कुमार मारविला
बहुवीरसूत दिसल्या अधिक सुभद्रा उमा रमा रविला १
अर्जुन-कृष्णा-सुभद्रा- कृष्णा-कुंतीस काय समजावुं
काळ न भेटे कैसा तद्द्दनीं पुत्रकार्यसम जावुं २
अद्यापि उत्तरेचें मुख पीत असेल वहेळ हळदीनें
म्यां जीविं लब्धसन्निध- नाशें करिजेल न हळहळ दीनें ३
तुज उत्तरे मुलि दिल्हा म्यां कापायास मान विश्वास
कलिकाल काय बुडविल मज बहु-पापासमान विश्वास ४

१ अपार, २ बहुदां, ३ चित्तामध्यें पळांत शंकडोवेळां हाय हाय म्हणे परंतु बाहेर न म्हणे, ४ डेरा-राहुटी, ५ मृग-हरण, ६ वीरमाता, ७ द्रौपदी, ८ पुत्र अभिमन्यु त्याचे देहाप्रमाणें, ९ पिंवळें, १० प्राप्तसमीप नाश ज्याचा अशानें, ११ जगताला, + पुष्कळ.

कथिलें कसें असें मज - धर्मा करवाल काढ कलह्यातें
मृत्युमुखीं कुलकर-गुण- शर्मा-कर-बालका ढकल ह्यातें ५
धर्माच्या सुतशोका शमवाया ये महातपा व्यास
ज्या जोडिले त्रिभुवनें प्रभुचा जेसे च हात पाव्योस ६
तो मुनि म्हणे श्रुतिस्मृति- शास्त्रज्ञा पांडवा नकोचि रडूं
शोकभरें प्राकृतसा बा कृतसाफल्य तूं नको चिरडूं ७
गेला उत्तमगतिला पुरुषोत्तम तो जगीं असामान्य
शोच्य नव्हे बा धर्मा पुत्र असावा कुलीं असा मान्य ८
मृत्यु हरितसे समयीं अमरांसहि कवण मृत्युला चुकवी
ऐसें जाणुनि तत्त्व व्यसनांत न मोह पावती सुकवी ९
धर्म म्हणे हो गुरुजी मजला मृत्युस्वरूप कळवा हो
या तमावरि तुमची सूक्तिसुधा-सिंधु एक पळ वाहो १०
व्यास म्हणे मी कथितों इतिहास पवित्र तुज पवित्रास
बाधों न दे बुधा जो शोक महेंद्रा जसा पविं त्रास ११
होता कृतीं अकंपन नृप तो हरि गांठिजे जसा हरिनीं
तन्नंदन हरिसमबल हरिनामा मारिला रणीं अरिनीं १२
शोकार्त तूं जसा मज पुससि अकंपनहि नारदा नमुनी
मृत्युस्वरूप सांगुनि करि त्यातें मोहपार-दान मुनी १३
जें तूं मज पुससि पुसे तेंचि अकंपनहि नारदा नमुनी
मृत्युस्वरूप यनें त्यासि करी मोहपार दान मुनी १४

१तरवार, २मुरल., ३सु-उक्ति-सुधा-सद्वचनामृत, ४वज्र, ५कृतयुगीं, ६सिंह;
७अकंपनाचापुत्र, ८इंद्रासारखाबलवान्.

पूर्वीं बहुभारार्ता ऐसें चतुराननासि धरा विनवी
वाढे भय दाटे नच आटे किति म्यां प्रजा धरावि नवी १५
न सुचे युक्ति चतुर्विध- भूतग्रामासि संहरायातें
कोपे ब्रम्हा जाणों त्या भूतांचेंचि अहे राया तें १६
तेव्हां विधिच्या रोम- च्छिद्र-वदन-नयन-कर्ण-नासानीं
वमिला वन्हि अशा या आइकतों कोपवर्णना कानीं १७
वनवन्हि तृणासि तसा भूतग्रामासि वन्हि तो कवळी
रुद्र जगत्क्षयसमर्थी धांवुनि ये पद्मयोनिच्या जवळी १८
रुद्र प्रभुला प्रार्थुनि लोकक्षयकारि तेज आवरवी
इतर किती विनवाया तेजस्वीही धरी न आव रवी १९
प्रार्थुनियां आवरवी जेव्हां कोपानलासि मदनारी
प्रकटे रक्ताकृष्णा- पिंगाक्रूरदृष्टिविभ्रमद नारी २०
तो प्रभु सांगे देवुनि मृत्यु असें नाम तोंचि काम तिला
त्या उग्रनामकार्य- श्रवणें होइल न खेद कां मतिला २१
मृत्यु म्हणे प्रभुजी हें काय बरें तोंचि कार्य करवा जी
योजावा जन सुपथीं धीरें वीरेंहि कार्यकर वाजी २२
ऐसें म्हणुनि रडे कीं गुरुहि करुणेलासि सोडवी पाणी
प्रभु अश्रुबिंदु तीचे न गळोंदे क्षिप्र ओढवी पाणी २३
द्रुहिण म्हणे मृत्यो तूं माझ्या होतील मान्य उक्तीतें
कीं जन्मलीस योजित असतां संहार-हेतुयुक्तीतें २४

१भारपीडितपृथ्वी, २पातक, ३वडवाग्नि, ४ब्रम्हा, ५शिव, ६घोडा, ७हात, ८ब्रम्हदेव.

लघु गुरु असें न म्हणतां ओढुनि घे सर्व जीव सरसकट
जैसा गंध गजाचा मोहुनि हरितो अलीस सरस कट २५
माझ्या वरें तुला अघ कोणींहि न लावितील अनेघेनें
ऐसें बहु समजावी परि न तिचें क्रूरकार्य मन घे तें २६
करितें आज्ञा ऐसें स्पष्ट न वदतांहि देवे हर्षविला
तो पूर्वदग्धजीवां- वरि वरुणामृतपयोद वर्षविला २७
एकें चरणींचि उभी धेनुकनामाऽश्रमीं नृपा होती
तप एकवीस-पद्में तपली गमली खरी कृपा हो ती २८
त्यावरि चवदा वर्षें पुण्याऽरण्यांत ही सती तपली
मग अ[4]युत पद्म मृगस[5]ह- चर्या करितां पितामहा जपली २९
जीचें अतिशीतोदक त्या नंदेमाजि जी उभी हर्षें
होती निजनियमातें संरक्षुनियां अ[6]शीतिशतवर्षें ३०
तितुकेंचि कौशिकीच्या तीरांत तसेंचि पंचगंगांत
वेतसकांतहि तपली जों ये केवल कुशत्व अंगांत ३१
तपली तुहिननगीं सुर- य[9]जनस्थानीं हि खर्व-वत्सर ती
त[11]च्चित्तरति तपीं बहु जशि जननीच्या स्तनींच वत्स रती ३२
गंगातट-मेरु-मलय- पुष्कर-गोकर्ण-नैमिष-वनांत
तपली धरिलें तेजें उग्रत्व हि वाटलें प्रिय मनांत ३३
भेटे प्रसन्न होउनि विधि आचरतां अनंत तप तीस
स्मित करुनि म्हणे मृत्यो कां दुर्धर नियम धरुनि तपतीस ३४

१ गंड, २ निष्पाप, ३ ब्रम्हदेव, ४ दशसहस्र, ५ मृगांसह वर्तमानसंचार, ६ आठ हजार, ७ विश्वामित्रिनदी, ८ हिमाचल पर्वतीं, ९ देवांचीयज्ञभूमी, १० वर्षें, ११ तिच्याचित्ताचीप्रीति.

मृत्यु म्हणे कांपवितो प्राणिवधाऽधर्म म्हणुनि तप वरिलें
जगदीशा आमय मज द्यावे त्वां सर्व विनेतभय हरिलें ३५
द्रुहिण म्हणे न अधर्म स्पर्शेल मृषा नसेचि विधिवाणी
सति सद्गुरुपदेशा न बुडवी कोणाहि अमृतनिधिवाणी ३६
मृत्यु म्हणे जरि आग्रह तरि भूतांची अशीच ही हानी
भेदावे प्राणिवपु द्रोह-ईर्ष्या-क्रोध-लोभ-मोहानीं ३७
कर्माऽनुरूप दुर्गुण रोग प्राण्यांसि नित्य खातील
तुज काम कोप सोडुनि करितां संहार साधु गातील ३८
तव अश्रुबिंदु धरिले रोगांचा तोचि होय हा निकर
प्राण्याऽयुर्हानिकर ग्रीष्मीं रवि जेविं तोयहानिकर ३९
संहारनिमित्त अशी मृत्यु विधिकृता अकंपना आहे
रडतोसि पुत्रमरणें कां मृत्युग्रास सर्वही बा हे ४०
करुणानीरद नारद मुनिच्या वर्षोनि उक्ति गारा या
देती अकंपनाला तापापासूनि मुक्ति गा राया ४१
सांगे शोक शमाया ऐसा इतिहास हा ऋषभ व्यास
याच्या श्रवणें श्रोते निवती पावोनि आशु भव्यांस ४२
धर्म म्हणे पुनरपि मज निववाया कीर्तिसत्सुधा भरितें
चरितें राजर्षीचीं सांगा मज याचि हृद्दरा वरितें ४३
व्यास म्हणे जरि म्हणसी श्रवणीं राजर्षिचरितरस ओता
तरि एक श्वित्यनृपति - सूत सृंजय पांडुनंदना होता ४४

१ रोग, २ जन्माचें भय, ३ अम्हा, ४ मिथ्या, ५ अमृतनिधीसारिखी, ६ ग्रीष्मऋतुमध्यें जलशोषण रवी करितो तसा, ७ दयामेघनारद, ८ वर्षोपल, ९ तत्काल, १० कल्याण, ११ कीर्तिरूप अमृत १२ कर्णी, १३ हे धर्मा.

सरव्येंकरूनि पर्वत नारद आले तया पहायाला
सृंजय पूजी प्रेमें प्रार्थी सर्वस्व ही वहायाला ४५
तों तत्सुता तयाप्रति येउनि वंदुनि पदें उभी राहे
पर्वत म्हणे नृपा रवि- भा कीं श्री कीर्ति कोण हे आहे ४६
भूप म्हणे आली वरें- वर मागायासि पर्वता तनया
हे कन्या कृतिचिंता- ह्रदिनीशांत तरति सर्व तात नया ४७
नारद म्हणे नृपा मज योग्य जरि तुझें म्हणेल मन दे हें
कन्यारत्न न केवळ अर्थिकरीं देति साधु जन देहें ४८
भूप म्हणे योग्य सुता- रत्ना तूं जेविं आनना रदन
कोण सुबुद्धि म्हणेल स्वप्रियकर योग्य आन नारद न ४९
स्तव्यांचि पित्रांचसरवा झाली जाणुनि सुपर्वता वरती
स्तविते न ठेविती जरि मन हारिवरि कीं सुपर्वतावरि ती ५०
पर्वत म्हणे न कोण्हा तूं बहुकळिहेतु वांकशी वरिली
गति तुज नसो मनें म्यां वरिली जी हे तुवां कशी वरिली ५१
वाग्दानादिविधिविना ह्रदयें वरिली म्हणोनि कशि भार्या
तुजहि मजविना स्वर्गति न घडो कीं व्यर्थ दूषिसी आर्या ५२
ऐसे परस्परांतें शापुनि सकलारिकाल बा हो ते
सृंजयसदनीं नारद पर्वत मुनि बहुत काल बा होते ५३
ज्या ब्राम्हणांसि पूजित होता पुत्रार्थ भूप तो भावें

१सृंजयाचीकन्या, २रविप्रभा, ३लक्ष्मी, ४नामकाय, ५श्रेष्ठ, ६कन्यारूपीचिंतानदीचें शांत, ७याचकाच्याहातिं, ८शरीरें, ९दंत, १०अन्य, ११स्तुतिलायोग्य, १२शिवाप्रति, १३सकलअरीचेकालरूपीनारदपर्वत, + वाग्निश्चयादिक्रियेशिवाय.

ते म्हणति नारदा स्मृत- दीपें सृंजयनिशांत शोभावें ५४
त्याशीं देवर्षि जसा प्रियपुत्राशीं सुखें वदे तात
तुज हे सुसंतति जशी सुजनासी जन सुखेंच देतात ५५
बोल जसा तुज व्हावा ऋषिवरवचनें तसाचि स्मृत पाहें
त्या सृंजयासि वदला होउनि बहुसुप्रसन्न स्मृतपा हें ५६
भूप म्हणे विख्यात स्वाऽयुधदहनांत ओहित होसुनि हो
यन्मलमूत्रादि सकल कनक असा पुत्र मैंहित हो मुनिहो ५७
दिधला तसाचि वर सुत- अद्भुत झाला तयासि तो जनक
ठेवी नाम सुवर्ण- ष्ठीवि असें तो हगे मुते कनक ५८
त्याचें कनकचि सारें मल मूत्र स्वेद लाळ सेंबूड
कां न म्हणेल तशांचें मोहीं ताताशि बाळसें बूड ५९
भाग्यभरें बहु भारी भासे सृंजयपुरी जशी अलका
पर ईतचि धन वाटे म्हणउनि दृष्टांत होय हा हलका ६०
किं-बहुना कौंतेया बा अनुपायज्ञ-लुब्ध-घोरांनीं
चोरांनीं हरुनि बळें वधिला कनकार्थ बाळ तो रानीं ६१
नृपति म्हणे हा हा हे होइल मिथ्या शिशो कदा वार्ता
निववील मज कवण तुझ्या कुशलसुधेंकरुनि शोकदावार्ता
नारद त्यासि म्हणे गा तुज उचित नव्हेचि शोक तोकाचा

१ गृह, २ संजयाशीं, ३ क्षेमालिंगन, ४ आयुधाग्नींत, ५ शत्रु, ६ ज्याचे मलमूत्रादि, ७ स्वर्णष्ठीविपुत्राचे, ८ बहुत काय सांगावें, ९ उपाय न जाणणारे लोभी क्रूर, १० कधिं, ११ शोकदावानलानें पीडित जो मी मला, १२ बालकाचा,
x कुबेरपुरी, ** पूज्य, + सुवर्णाकरितां.

तो काचा स्पर्शमणी[+] त्यागुनि जो काय वेंचितो काचा ६३
पणजाला[1] आजाला न रडसि कृतपोषयत्न-बालोंही[2]
श्रेयस्कर ते कीं हा विरहगरद[4] सुगुणरत्न बालाही[3] ६४
कथितों पुण्यतर तुझ्या पुत्राहुनि पुरुष ऐक त्यास रड
कवि म्हणति उगोचि शिरः- कंपसह[6] हि सूक्त ऐकत्या सरड[5] ६५
होता यज्वा[7] दाता शक्राहुनि लब्धरस मरुत्त[8] रणी
ज्याची सदुपायनियति इष्ट स्फुगति तेविं न समरुत्तरणी[9] ६६
यज्ञ कराया प्रार्थी स्वर्गीं त्या स्वकुलगुरुवरा जीवा[10]
चुंबी शिरें[11] पद-युगा जेविं मुखें तृषितमधुप[12] राजीवा[13] ६७
सुरपतिं[14] सोडुनि जाणें नृपयज्ञा उचित हें नव्हे मातें
ऐसें मनांत आणुनि जीव उपेक्षी तया शुचितमातें ६८
भेटे नारद त्याला फिरतां पावोनि फार खेदास
ऐकुनि वृत्त म्हणे हो लेखावे सर्व सारखे दास ६९
सांगे सुरर्षि आहे गुरुबंधु तदीय-वृत्ति पैशाची[15]
संवर्त नाम त्याचें त्यासि यज्ञांची स्पृहा[16] न पैशाची ७०
वाराणसी-शर्वीं शिव- धी[17] तो वळखावयासि हे खुण गा
वळखावा बहुयत्नें अतिकृपणाचा नृपा जसा कुणगा ७१
वाराणशीपुरीच्या द्वारीं मांडूनि कुणप[18] उमगावा
पुसतां दहनीं शिरलों म्हण कविनीं त्वत्ताप धूम गावा[19] ७२

---

१ कळ्या, २ तुझ्या पोषणाचा केला यत्न जाणें, ३ आपलाही, ४ वियोगरूपविष देणारा, ५ बालसर्प, ६ उत्तमभाषणाशिरडोलवीत ऐकणाराला, ७ यज्ञकरणारा, ८ मरुत्तनागा, ९ वायूसहितनौका, १० बृहस्पतीस, ११ शिरानें, १२ भ्रमर, १३ कमला, १४ इंद्राला, १५ पिशाचतुल्य, १६ इच्छा, १७ कल्याणबुद्धि, १८ शव, १९ तडाक्यानें, + परीस.

छळ सोसितां मरुत्तें गुरुमंत्रबळें विशंक[1]मद नमुनि
होय परम इष्टवरद शिष्टवर दयाप्रसन्नवदन मुनि ७३
भक्ता अभयप्रद जो इतरां लोकांस काय संवर्त
घालील न शरणागत कार्या तो कास काय संवर्त ७४
करितां मरुत्त मख ये शतमख उचलूनि वज्र माराया
कांहीं चालों न दिला संवर्ते नदभिमान बा राया ७५
ज्याच्या मखीं सभासद सुर सर्व मरुत्समूह परिवेष्टा
म्हणति परस्पर शुक्र- द्विज जरि पद न धरि पोट[6] परि वेष्टा ७६
शक्रा धनदा देऊं उधळुनि बहु कनक तो तपो दास
म्हणउनि गुरु दे ज्याला कांचनमय तुहिनगोत्रपादास ७७
केली सफला ज्याची संवर्तें सर्वपावनसवेहा
ज्याच्या राज्यांत म्हणे तस्कर[9] दारिद्र्य दुःख नसंवे[10] हा ७८
राहे पर्थीच खलिग विप्रजना बहुत दक्षणा[11] विटवी
त्या सुगुणसागराचा पावेल न अंत रंकविधी-टिटवी ७९
कां रडसि सुताकरितां यज्वा[*] दाता असा मरुत्त मरे
होता बहुप्रकारें त्वत्तनयापरिस परम उत्तम रे ८०
देवर्षि म्हणे सृंजय- राजा दुसरा सुहोत्रनृप होता
न तसा दुजा प्रतापी औहित-महीपति-महाहुती-होता[12] ८१
त्याच्याराज्या-मध्यें वर्षति घन बहुत वारिपरि सोनीं

१ शंकामदरहित, २ प्रलय, ३ यज्ञ, ४ इंद्र, ५ वाटपी, ६ लज्जा, ७ हिमाचलपाद, ८ यज्ञाचिकीर्षा, ९ चोर, १० नसावे, ११ कवीची बुद्धिरूपटिटवी समुद्रतीरींचा पक्षी, १२ शत्रुरूपीराजांचा आहुतीचा हवनकर्ता, १३ सुवर्णे, + नामविशेष, ∴ यज्ञकर्ता.

चित्तीं मिथ्या न म्हणे हें परमाऽश्चर्यकारि परिसोनी ८२
ज्या नद्याज्यांत नद्या वापी जे कूप काय कांसारे
तत्तोय पंक शेवाल कनकचि तें मनुजनायका सारें ८३
त्यांतील स्वर्णमय पूर्व दर्दुर मकर मीन कांसव हो
ऐसा सभाग्य न करिल होउनि गुरुचरणलीन कां सर्व हो
जें हेमयाद पडलें मेघा-तुनि तोंहि हेमयादा वी
अद्भुत दाखविल्या अति- अद्भुत नृपभाग्य हें मया दावी ८५
यज्ञांत सर्व सोनें दे छत्र पित्या न देववे दानें
त्या यादांचींहि दिलीं यजिले जे उक्त देव वेदानें ८६
जो हयमेध-सहस्त्रें [10]सविधि यजी वीर राजसूयशतें
परवीरसू न जें तिल [11]मिरवि बहु सुहोत्रराजसू यज्ञा तें ८७
मेला असा हि कोणि हि जन न मृतिस करुनि पुण्य तरतो कीं
वद आपणांत अथवा गुण ऐसा कवण पुण्यतर [12]तोकीं ८८
हयमेधसहस्त्रांचे जेणें केले [13]सहस्त्र सन्मत रे
ऐसाहि [14]अंगं मेला काळाला कोण वरुनि जन्म तरे ८९
जो शतसहस्त्र देता- झाला यज्ञांत दक्षिणा कन्या
मग उत्तरोत्तर अधिक वर्णाव्या दानजाति किति अन्या ९०
[illegible]ख तें ऐकुनि हि दिलें नृपा सुख न कानें

१ त्याच्या राज्यांत, २ मोठीविहीर ३ नळीं, ४ शेवाळ, ५ पानकोंबडी ६ यज्ञ, ७ सुवर्णजळजंतु, ८ मयासुरास, ९ बापाला जें न देववे तें दिलें, १० यथाविधि यजन करी, ११ सुहोत्रराजाची माता जें यज्ञ[illegible]वीरसून, १२ बालकाचें गयीं, १३ अश्वमेधसहस्त्रांचे सहस्त्र केले, १४ श्रेष्ठ, अंगनामक.

अंगें मरवक्रिया मरु- मार्गीं केली कृपा रूरवनकानें ९१
तुजहुनि चतुर्गुण बरा खस्तुआपरिस पुण्यतर अंग
तोही मेला राया का रडसी सोड शोककरसंग ९२
देवर्षि म्हणे राया श्रवण तुवां तो नसेल शिबि केला
ज्याच्या कीर्तिहुनि उणी म्हणति सुकवि अमृतवर्षि शिबिकेला
युद्धहताऽहितनृपहृत- वित्तें विष्ण्वादि-सर्वदेव यजी
गो-ब्राम्हण-प्रजाऽवन निजधर्मकरीं च सर्व देवयजी ९४
श्रीगणपतिजवळ गणक सिद्धांत-रहस्य जो सुधी सिकता
तो त्याबळें न मोजिल कां गंगासिंधुजंतुसह सिकता ९५
मोजील वर्षधारा तारांगण ही सुमेरु पारवांण
शिबिदत्तधेनु वर्णिल जरि वरदेश्वर म्हणेल वारवाण ९६
रथ हयचतुष्टय जसें प्रेरित अस्तो कवि प्रतोदानें
वपु बोधें प्रेरी बहु रूरववी अरत्तोक विप्र तो दानें ९७
बहु अश्वमेध केले बहु गो-कन्यादि-दक्षिणा दिधल्या
कवि म्हणति कंठकर्णीं सन्मुक्तावृंद यशोभिध त्या ९८
ज्या शिव म्हणे शिवेचा धनपत्वें अपर मित्र देवेरही
अक्षय्य धर्मश्रद्धा रूयश असे बहुत चित्र देवर ही ९९
धर्मा देवर्षि म्हणे गेला मेला असाहि शिबि राजा

१रू-रवनक-उत्तमप्रतीचा रवणणारा, २शोकमदसंग, ३पालकीला, ४युद्ध-हत-अहित-नृप-हृत-वित्त-युद्धीं मारलेल्या शत्रुराजांपासून हरण केलेल्या द्रव्यानें, ५गोब्राम्हणप्रजांचें पालन हा जो स्वधर्म त्याच्या हातींच, ६शिकणारा, ७गंगा-सिंधुनदींतील प्राण्यासहित, ८वालुका, ९जलधारा, १०पाषाण, ११चाबुक, १२शरीर, १३अनल्प, १४उत्तम मौक्तिक घोंस, १५यत्-यशस्-अभिध-ज्याची कीर्तिनामक मुक्ता, १६पार्वतीचा, १७कुबेराप्रमाणे धनपति आहे म्हणून, १८दुसरा, १९दीर-र चंद्रयान.

यास्तव नको रडों म्हण[1]   या सोश्रु-जनांस हि स्वशिबिरा[2] जा १००
देवर्षि म्हणे होता   दशरथनृपपुत्र-रामराजा गा[3]
जेणें साधूनि दिला   लोकां सुरसिद्ध-पामरा जागो १०१
वधिला जेणें राक्षस-   वर विश्वविनाशकर दशानन गा
आली द्याया यत्पद-   यश देवांच्या हि वरदशा न नगा[4] १०२
यच्चरणाच्या घेती   मस्तक मळवूनि देव धूलीला
तीर्थाधिक हे गौतम-   मुनिची कळवूनि दे वधू[5] लीला १०३
कीं पाहे शापतमीं   चिंतुनि चित्तांत जें[7] विभात शिळा
यत्पदयशें सुधारस   विरस[8] सुरसकासि जेविं भात शिळा १०४
द्रवुनि अजडा केली   यत्पादरजोलवानिलें[9] कुशिला[10]
यज्जननीच्या होउनि   दुग्धधिनें लोल वीनिलें[11] कुशिला[12] १०५
यत्तेजें जलनिधिच्या   तरले न दगड विशाल-नगैहि[13] वर
ज्याच्या सुयशें आला   स्पष्ट दशमुखवासमात्र न गहिवर १०६
न तुला शतांत पहिल्या   मधिल्या अंत्या हि तुरगमेधा त्या
गुरुकुलसुख श्रुतीचें   साक्षात् साकेतपुर[14] गमे धात्या[15] १०७
युवव्रत असो चाविति   सर्व पिसांच्या हि न वपु ढेंकुण गा
रक्षू प्रेमें पोषी   कृपण जसा नित्य नव पुढें कुणगा १०८
करिते झाले ज्याच्या   कीर्तिसुखें शांपुरोचि[16] कपि लास्य[17]

---

१ रडण्या[illegible], २ आपुल्यारावटींतजा, ३ स्वर्गवास, ४ कल्पवृक्षास, ५ अहिल्या, ६ चरण, ७ प्रभात, ८ अमृतहीअरसिक, ९ ज्याच्यापादरजाच्यालेशवायूनें, १० कुसितशिळा, ११ स्नाविलें, १२ कुसव्याला, १३ पर्वत, १४ अयोध्यानगर, १५ ब्रह्मदेवास, १६ वानर, १७ नृत्य.

यद्दर्शनेंचि सर्व हि तत्वज्ञ न पाहतां हि कपिलाऽस्य[1] १०९
रुद्रसहस्राब्द[2] करुनि रंजन दे शर्वरीं सुपद विश्वा
किं बहुना पाववला जेणें यतिपतिमता सुपदवि श्वो[3] ११०
गेला ऐसाहि प्रभु बा करिसी शोक काय तोकाचा
सोनें हगे मुते जो स्वजना दे शोक काय तो काचा १११
भूप भगीरथ होता जो शत्रुंतें हि सुगति दे वधुनी
ज्यासि म्हणे त्वत्पुत्री[4] मी ऐसें नमुनि सुगति देवधुनी[5] ११२
उगमापासुनि सागर संगमपर्यंत इष्टकामहिता[6]
गंगाचयनें रचिली कनकाच्या करुनि इष्टका महिता ११३
यज्ञांत दक्षिणा, दे विप्राला भूप भूपकृतकन्या
अन्या न घडायाचें घडलें हें दान त्याचि अतिधन्या ११४
विप्रांसि सहस्रांचें कन्याच्या दे सहस्र तो भूप
आच्छादिलें जयांचें दिव्यांऽबररत्नभूषणें रूप ११५
प्रतिकन्याकनकरथीं जोडियले चार नव चतुर गमनीं
कैंची कशा[7] प्रतोदहि साहति हूं होहि न वच तुरग मनीं ११६
एका एका रत्न – ध्वज-भूषित-कन्यका-रथामागें
शत शत स्रुमणि-सुवर्ण स्वंबर-धर[9] गज दिले महाभागें ११७
नागानीं गामागें [illegible]ाला सहस्र दे वाजी[11]
तें हरिहरां म्हणति कवि तुमचें देणें अनंत देवा जी ११८

१कपिल-आस्य-कपिलऋषीचेंमुख, २अकरा, ३कुत्रा, ४तुझीकन्यामी, ५भागीरथी, ६मनोरथहितकर्त्री, ७चाबूक, ८आरी, ९स्रु-अंबर-धर-चित्रवस्त्रेंधारण करणारा, १०एकागज मागेंस्रुवर्णमालायुक्तसहस्रअश्व, ११अश्व, +विटा.

वाजीवाजीमागें शत समवत्सा यथोक्त[1] दे गाई
विप्रसती म्हणति शिवे ऐसेंचि सदा कथोक्त दे ऽ गा ऽ ई ११९
गाईगाईमागें जें वर्णूं काय किति अजोविक तें
हें साधुभाग्य येइल विश्वसृष्ट्या हि त्या अजा[+] विकतें १२०
ऐसाहि भूरिदक्षिण यज्वा राजा भगीरथ न राहे
राहेल करा त्वरत कवणा न स्पर्शली गति नरा हे १२१
देवर्षि म्हणे होता सत्पालक विष्णुचा दिलीप गडी
जेणें अर्पणतांच्या न शिरीं शाश्वत उरों दिली पगडी १२२
यत्सुपदासीं हरिच्या मैत्री संपादिली पदानें हो
सुरनिलय[6] रत्नसानुहि पावे कंपा दिलीपदानें हो १२३
यज्ञांत दक्षिणा वसु- पर्णा वसुधा दिली पदा नमुनि
ऐसें हें अत्यद्भुत गाती प्रेमें दिलीपदान मुनि १२४
शतमन्यूपें जो प्रभु मान्य जसा व्यजनवायु वायूपें
ज्याच्या लाजविला विधु सुदृगाहृतभुज[9] नवा युवा यूपें
असति कनकमय वेदी मंडप यूपहि परंतु हेमाचे
यद्यज्ञवाटवाट[11] हि ज्यांत निजुनि नृप हि म्हणति हे माचे १२६
सुर शिवसें देखति ज्या करित्या सुखदृष्टिच्या दिली पातें
दूरुनि विलोकित्यांहि स्वर्गति यद्दृष्टिच्या दिली पातें १२७

१ यथा-उक्त- जशासांगितल्याकपिलादि, २ शेव्यामेढ्याचाकळप, ३ बहुत, ४ उद्द
त, ५ पागोटें, ६ देवांचास्थानभूतरत्नशिखरमेरु, ७ इंद्रापेक्षां, ८ महांवायूपेक्षां,
९ सु-दृक्-आहृत-भुज सुलोचनास्त्रि यांहीं आदरिलाभुजज्याचाअसाविधु-चंद्र,
१० यज्ञस्तंभानें, ११ ज्याच्यायज्ञशालेचीवाट, + बकरेयास.

ज्याचें रथचक्र जळीं न बुडे आत्मजमन जसें भवनीं
कृपण जसा वित्ताच्या सत्याच्या अति निविष्ट जो अवनीं
कवि वदले नेत्रांहीं कर्णाहीं लोकहो दिलीपा प्यो
पुण्यश्लोकें रामें सद्गति जेणें तसी दिली पाप्या १२९
स्वाध्यायज चापगुणज खा जेवा प्या असे जसे शब्द
तैसे उदार ज्याच्या सदनीं हे पांच न जिरती शब्द १३०
मेला असाहि ज्याचें अरिला लिहिलेंहि दे वपु-त्रास
कां आठवूनि शोचिसि रे सृंजय मनुजदेव पुत्रास १३१
नारद म्हणे वियोगें पुत्राच्या पावलासि कष्ट महा
तरि परिस सांगतों तुज शोक सराया समर्थ अष्टम हा १३२
नृपति युवनाश्व होता गेला मृगयार्थ तो वनीं दूर
तेणें श्रांतें तृषितें ऋषिसत्रींचा विलोकिला धूर १३३
सत्रीं शिरोनि न पुसे देउनि एकाहि हाक विप्राशी
भाविबळें स्वार्थचि मुनि साधितपृषदाज्य हा कवि प्राशी
तत्काळ गर्भवान् नृप होउनियां होय सभय सत्रप हा
पृषदाज्यपानसंकट जाणुनि वदले समस्त सत्रप ही १३५
भेटुनि युवनाश्वाला हांसोनि म्हणे सदैव वासव हो
हें संकट हरितों परि सांगुनि पुत्रासि देववा सर्व हो १३६
वैद्याकरवीं तदुदर व्हाया गर्भासि वाट तो चिरवी

१ ज्याच्या, २ रसणीं, ३ भाशनकरा, ४ वेट[illegible]पासूनउत्पन्न, ५ धनुष्कोटीपासूनझाले ला, ६ शत्रुलामेला हा असें जरिलिहिलें तरिशरीरासत्रासदे, ७ नरपति, ८ दधिमिश्रितआज्य, ९ सलज्ज, १० ऋत्विज, ११ हाहाकष्टे, १२ यज्ञ.

याकर्में बहुकरही   द्विकेरसुतन्यून वाटतोचि रवी १३७
काढुनि उदरांतुनि शिशु   मोहांतुनि नृपहि तूर्ण बाहेर
शक्रासि दस्र म्हणती   केला आदेश पूर्ण बा हेर. १३८
शक्र म्हणे युवनाश्वा   करिताहे उर्वशी हि बा लास्य
ऊठ सख्या नेत्रांहीं   प्याया पीयूषपूर बालास्य १३९
अमर म्हणति कंध्यास्यति   तों मां धाता असें म्हणे शक्र
घाली अंगुलि वदनीं   तीहि अमृत जेविं गोपिका तक्र १४०
मांधाता शक्र म्हणे   झालें तन्नाम तेंचि गा राजा
तत्कीर्ति सुख देती   पीतां तप्ता जनासि गारा ज्या १४१
झाला श्रुतिशास्त्रनिपुण   तरुण स्फटिकहि भरतां दिवस तीस-
दिवसांतचि हो विजयी   जिंकुनि देवासुरादि वसेनीस १४२
विबर्धी प्रथम शिरावें   जैसें पावोनि यौवना श्वानें
ऐशी जंतुस्थिति परि   वरिलें कीर्तिचि शील यौवनाश्वानें
गमला मूर्त घटजकर   परनृपबल सिंधुपतित मांधाता
ज्यातें निर्मुनि पावे   कीर्ति त्रिजगांत अतिरमां धाता १४४
यद्राजसूय हयमख   शत म्हणति अपूर्व अमरही राजा
भंगा ज्या न शकले   परनृपमणि करुनि समर हीरा ज्या १४५
विश्व हि शतदा पावुनि   ज्याचें तें [illegible] पर्व तरे

१ बहुतकिरण-हस्त ज्याचे, २ होणारा जो द्विकरपुत्र त्याहून न्यून रवी, ३ त्वरित, ४ अश्विनी कुमार, ५ नृत्य, ६ अमृतपूर, ७ शुभमुख, ८ कं-ध्यास्यति- कोणाने ध्यान करितो, ९ मां-धाता- मातें ध्यान करितो, १० ताक, ११ त्याचें नाम, १२ योद्धा, १३ स्थानें, १४ कुत्रानें, १५ प्रौढ, १६ शत्रुसेनासागरामध्यें पडलेला, १७ अतिशायित, १८ अश्वमेध, १९ हिऱ्याला. २ [illegible] चीरीति, ∗ ब्रम्हा, + अगस्तीचा हात.

घृत-मधु-दुग्ध-नदीशत ज्यांत ब्रहुन ते सदन्नपर्वत[1] रे ४६
जो जोगेयादि[2] होता समरीं जिंकी पराक्रमांधा[3] त्या
आलेंचि मरण बापा सृंजय राया अशाहि मांधात्या ४७
भाग्यें शौर्यें ज्ञानें जो विश्वाऽधिक असा-हि तो मेला
ऐकसि-कीं कां शिशुच्या शोकें खमुंख[4] वशशोक कोमेला ४८
होता असाचि हरिच्या जो सुगणें उतरला ययाति तुर्की[5]
वदले कवि सत्कर्में सुयशें जो तीं वशें जया तितुकीं ४९
वज्रधरासहि[6] बहुभय- दायक यत्पाणिवार्त[7]-कुश नाकीं
तो ज्याचा श्वशुर असुर- पति-वृषपर्व्या-समेत उशना[8] कीं ५०
ज्याच्या अंबूस[10] परिसुनि धन्य म्हणे देवराज[11] यश तें
कीं तो यजिता झाला हयमेधशतें सराजसूयशतें ५१
बहुधा घडलें नुरवी निल जें अघ[12] वाजपेयशत गा या
काय असें बहु हरिहर- नामें मघवा[13] जपे यश तगाया ५२
अरि येसमरीं[14] हरिच्या जेविं शिरें[15] पुंडरीकद शश तरे
दशशत अग्निरात्र[16] करी जो विधिनें पुंडरीक दशशत रे ५३
सत्रें चातुर्मास्यें त्यांची संख्या बरी कथावि किती
स्वल्पचि रसिकमत वदति बहुत लिहुनि काय कवि कथा विकिती
भूमंडल विप्रकरीं करुनि ब्रह्मस्व[17] वेगळें दे हा
आधीं राज्यश्री मग वरुनि तपस्या म्हणे गळें देहा ५५

१उत्तमान्नगिरी, २नामविशेष, ३पराक्रमपदानेंअंध, ४ [illegible], ५कजनी, ६इंद्रास, ७ज्याच्या हातांतील दर्भ, ८स्वर्गी, ९शुक्र, १०ऐस, ११देवराजमाना, १२पाप, १३इंद्र, १४ज्याच्या यानीच्या आयुष्यांत, १५शिरकमल देणारे, १६यज्ञविशेष, १७ब्राह्मणास दिलेलें धन.

जें हिमे-हेममहीधरिं   क्रीडे बैसोनि देवयानीं तें
नृपरत्न क्षण रडवी   करुनि विरक्तीस देवयानीतें ५६
ऐसाहि प्रभु मेला   बरवा तुजपरिस जो चतुर्गुण गा
गुण गाउनि पुत्राचे   काय रडसि रुद्र शंभुचे गुण गा ५७
नृप अंबरीष होता   यत्पितृसंबंधि नाम नाभाग
जो नित्य म्हणे न विषय-   भजनें हरिनेतिविना मना भाग ५८
क्षितिस प्रजा प्रजेस   क्षिति हि म्हणे [illegible]-नाभागा
आम्हांकरितां करितो   जो सदय तयाचि प[illegible] नाभा गा ५९
परिपालिल्या प्रजा बहु   जैशा भगिनी सुता रुना भाच्या
जेणें ओंशीराशी   वरिल्या मर्दूनि खल रुनाभाच्या ६०
अरिराजसहस्रांचें   जिंकूनि सहस्र जो सदय न वधी
शरणागताभयव्रत   सोडुनि रुकुलज कशी करिल नव धी ६१
न रुधेशीं ज्याच्या मख-   विप्रोच्छिष्टाऽन्न-नव-सुवास वदे
हा एकहि सर्वांतें   हयमेधशतीं हि न वसु वासव दे ६२
यैज्वे वदान्य राजे   सपरिच्छद लक्षसंख्य विप्रकरीं
दिधलें यज्ञांत जसे   पशु द्यावे ख्यात हे कवि-प्रकरीं ६३
येथें सर्वहि पहिला   संपन्न गणेश-देव दोदानें
बा अन्नदान एकचि   ज्याचें दुसरीं न दे वदों दानें ६४

---

१ हिमालय वमेरुपर्वत ह्यावर, २ ईश्वरनमनाशिवाय, ३ करणारा, ४ ब्रम्हेदेव, ५ आशीर्वादाच्याराशी, ६ शरण्यासअभयदेणारा, ७ उत्तमकुलोत्पन्न, ८ यज्ञांतीलब्राम्हणांच्याउच्छिष्टान्नाचानूतनसुवास, ९ खेदोद्गार, १० द्रव्य, ११ इंद्र, १२ उदार, १३ चामरयुक्त, + देवाच्याविमानी, ∗ यज्ञकरणारे. १३ मंडपायुपकर्णपटअसाहीअर्थनिघतो.

मूर्धाभिषिक्तदानें तो दे तैशीं सदानगजदानें
किति सांगों दिधली हय- गोदानें त्यासदानगजदानें ६५
प्रमुदित विप्र पहाय यज्ञचमत्कार अंबरीख रची
द्रुतरीं धन नग्नजनीं निज-अंबर जेविं अंबरीं खरची ६६
हा पुत्रा काय म्हणसि काय रडसि जो असा अरिसे-भारी
मेला तुजपरिस चतु- र्गुण गुणवान् सुकृतापरिस भारी ६७
देवर्षि म्हणे राजा परिसावा नृपजनेंद्र शशबिंदु
यद्दृष्टिपुढें अरिनृप- सिंह तयांचा बलाब्धि शश बिंदु ६८
त्या शतसहस्र होत्या सुगुणाऽमृतसिंधु-बायका राज्या
लिहिति रतिस्तुति-पूर्वीं मात्रा देऊनि बा यकारा ज्या ६९
पुत्र सहस्र-सहस्र स्वसमगुण दिले स्वदारलक्षातें
जेणें कथिलें देणें हें धर्माचें स्वसार लक्षा तें ७०
सुरुचिर सुशील सुचरित साऽध्वर ते सर्वही अयुत-याजी
देह प्राणांसि तसे जे येतां ब्राम्हणा म्हणति या जी ७१
तितुके हि अश्वमेधीं दिधले देताहि सुत नवे दानीं
कथिला एकहि भावी ऐसा कवि लोकतुत न वेदांनीं ७२
एकेकसु भागें शत शत कन्या दिल्या महाभागें

१ पट्टाभिषिक्तराजदानें, २ मदोन्मत्तगजदानें, ३ रचयता, ४ वस्त्रदान, ५ शत्रुसमेचाशत्रु, ६ राजशिरोमणी, ७ नामविशेष, ८ शत्रूंचा, ९ ससा, १० ज्यापुढे शत्रूसिंह ससे आणि त्यांचा बलसमुद्र, येंव असा अर्थ) १० यया वर्णास. (रतिस्तुतिपूर्वीयेलिहिवीम्हणजे येरतिस्तुति, तीरतीचीस्तुतियेर "निष्फळ") ११ बायका, १२ दहालक्ष, १३ आपल्यालक्षास्त्रियांस, १४ लोकस्तुत्य, + सदा-नगज-द- निरंतरगजदेणारानें, ※ तपी, * यज्ञकर्ते.

कन्येप्रति शत शत गज बा आइकतां न या मेहा भोगें ७३
एकैकगजामागें शत शत रथ दे रथारथामागें
शत शत हरि दे हरिला श्रद्धा परिस वचा कथा मागें ७४
एकैकाहरिमागें दशशत ज्या भरिति घटे स्रुधेनु तिथें
ज्यांच्या पयें म्हणावें करुनि अवज्ञाचि ते सुधे नुति घे ७५
एकैकधेनुमागें बहु दे जो दानपति अजावि-हि रे
ज्यासि नसे विषय जसे क्षीरस-द्रालया-अजा विहिरे ७६
हयमेधांतीं उरले कोशोन्नत अन्नराशि तेरा हो
कांचन पाद्य ऽद्भुत साहित्याचि कथा न्वि ते राहो ७७
ऐसा शशबिंदु न जो करितां अरि[११]कायहोम घामेला
तो ही वृद्धमुनि म्हणति बहु पुसतां काय हो मघा मेला ७८
देवर्षि म्हणे भूपा परिस बरें हें स्रुवर्णन गयाचें
प्रतिहयमेधीं धरि भय अधिकाधिक मण[१२][illegible] याचें ७९
मेळविलें [illegible] न्याया-चरणें अनं[१३]तरायें हो
केलें शतवर्षे हुत- शिष्टान्नाऽशन अनंत-रायें हो ८०
गय स्रुप्रसन्न होतां- अग्नि म्हणे त्यासि पावका मातें
जरि वर देसी पावसि या पुरवायासि पाव कामातें ८१
वरदा [illegible]दक कांहीं जरिं नाऽठवे द्यावेगा
तरि सद्गुरुप्रसादें [१५]यमनियमें पाठ वेद यावे गा ८२

१उत्सवास, २शिर्णें, ३सिंह, ४विश्वास, ५तीनप्रागरी, ६स्तवन, ७क्षीरसिंधुवासी, ८विहीर, ९कोसभरउंच, १०स्रुवर्णयज्ञस्तंभादि, ११शत्रुदेहाचाहोम, १२मेरु, १३निर्विघ्नपणें, १४अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, परिग्रह, अशापांचनित्यकर्माच्यानियमानें.

मज अक्षय्य मिळावीं धर्में न करूनि अन्यहानि धनें
या सुवरें धन्य जरि न करिशिल हा दास धन्य हा निधनें ८३
देतां सर्वस्व सदा श्रद्धा ब्राम्हणपदांवरि असावी
शिवमूर्ते नाशाया सर्व क्रूरदुर्मदा वर असावी ८४
भार्या भल्या सुवर्णा थोडयाचि बहुत नको बहु कुशीला
पुत्रत्वें साध्वीच्या यावें म्यां घ्यावया यश कुशीला ८५
श्रद्धा बहु दे आले असतां अशना वराक राजे या
सम विनवावें कीं या सूदाशयना वरा करा जेवा ८६
वा जेविं पिशुनमन पर- मर्मीं धर्मींच मन्मन रमो जी
धर्मरतिविना वानर जन्मांतचि कां न जन्म नर मोजी ८७
माझ्या विहिताऽचरणीं हक्पांत नसो चि अं[illegible]याचा
व्हावा या-निजधर्मा- चरणीं तनुसहित अंत रायाचा ८८
अग्नि म्हणे अप्रतिम- प्रभु सत्तम तूं नृपा इलेवैरे हो
जे मागितले ते त्या- रूपें जगदीश्वरें दिले वर हो ८९
नित्य प्रातःकाळीं शतवर्षें जो प्रभु [illegible]मोदानें
अयुत वर तुरगदानें दे निष्कहि लक्ष लक्ष गोदानें ९०
मणि वालुकाऽन्वित कनक- मय करुनि क्षोणिवलय दे हातें
करि गय हयमेध-यज्ञ- श्चंदनशतनिलय-मलय देहातें ९१

१ रुचिर; २ मरणें, ३ कल्याणमूर्ते, ४ कल्पवृक्षाच्याआगर्वास, ५ भिकारी; ६ स्वयंपाक्यास, ७ रहा उरवोराचेंमन, ८ धर्मप्रीतिशिवाय, ९ कर्तव्याचरणांत, १० दृष्टिपात, ११ विघ्नाचा, १२ पृथ्वीपति, १३ अग्निस्वरूपें, १४ भूमंडल, १५ अश्वमेधयज्ञरूप-१६ चंदनवृक्षांनासस्थान भूत[illegible]गिरी, + घ्या १ स्वयंपाकीघ्या जेवा निद्राकरा असाभावार्थ.

सद्वीस[+]गांवें जीची रुंदी जी लांब तीस-गावें गा
असि गय-[1]हयमख-वेदी काशीस तसें-च तीस गावें गा १२
ती विप्रजना गयनृप-[2] वाक् हय-मेधक्रिया[3]खनि वेदी
मणिकनकमयी जीस तनु साध्वी छाया प्रिया सुख निवेदी[4]
द्विज[*]दत्तशेष बहु मणि[+]- कांचनमय-यूप इक्षुसे[5] वेची[6]
ज्यास रुचि अर्थि[7]रतिची जेवि मुमुक्षूस भिक्षु[8]सेवेची १४
जे तृप्तिप्रति भूत- ग्रामातें मख हि सिंधुनिलयातें
गय हय मखीं रणीं ही विशिखें[9] मर्मांच विंधुनि लयातें १५
परमपवित्रान्नाचे पृथ्वीपाताळ-तृप्तिला पुरले
पुर-लेखां[10]चें धालें परिपर्वत पंचवीस कीं उरले १६
वाहत होत्या पुष्कळ पूत[11]पयःप्रमुख-सर्व-रसकुल्या
तैशाचि बहुत उरल्या वस्त्रालंकारराशि गिरितुल्या १७
वर्णू अक्षय्यकरण[12] वट कीं तें ब्रम्हसर-हि न गयाचें
यश वर्णवे कविशता देणें बहु म्हणति अमरनग[13] याचें १८
बा लागलाचि समयीं पुरवावा अंतकाळ[14]काम गया
राजा त्वां [illegible] कां हें ऐकोनि बालका मग या १९

---

१ गयाचीअश्वमेधभूमी, २ गयराजाचीवाणी, ३ अश्वमेधकर्माचीखाण, ४ देई, ५ उंसासारिखे, ६ खची, ७ द्रव्येच्छूची, ८ भि[illegible] (संन्यासी) सेवेची, ९ बाणानें, १० देवांचे, ११ पवित्रदुग्धप्रमुखसर्वरसांच्या नद्या, १२ स्थिरकरणारा, १३ कल्पवृक्ष, १४ यमाचीइच्छा, + सद्वीसयोजने, * [illegible]म्हणास दे[illegible] उराहलेलें शेष; ✶ रत्न आणि सुवर्णयांनीं मंडित असा यज्ञस्तंभ.

अध्याय ६

नारद पुन्हा म्हणे गा राया सोडुनि रवंति दे वाची-
मंजु हरिहरस्तोत्रां- परि चरितें नित्य रंतिदेवाचीं १
अभ्यागता- तिथींतें ज्याचे सूद द्विलक्ष ओगरिते
कीं अन्य रंतिदेवा गमले याहूनि सर्व योग रिते २
ज्याचे स्वयेंचिवरिती स्वर्गार्थ सुसत्रपशु [illegible] जनांचें
न धरिति हें वर्णिति यश्[illegible] शत[3][illegible] शुभयजनांचें
पशुचर्मराशिपासुनि झाली चर्मण्वती- नदी नांदे
[5]कृमि यत्यानें[6] स्वर्गीं जी भलत्या अर्थ तीन[7] दीना दे ४
सा[8]ऽष्टशतसुवर्णात्मक निष्क-शत-सहस्रदान ओपावें
जेणें द्विजां म्हणावें अ[9]णु वितरण[10]पाणिनें न कोपावें ५
जो एकदिवसमात्र द्विज राहे निष्ककोटि तो लाहे
किति व[11]नद-धनद[12]-कीर्ति प्रभुकीर्तिसवेंचि कीर्ति तोला हे ६
देउनि कोटि म्हणे हे वाहिलि जोडूनि हात [illegible]गळा[13]
तंतुपटें काय हरिल दिग्गिभाच्या घनहिमा[14]ऽतपा कोळी[15] ७
अभय न देवू माझ्या तुमचा वदतां मृषा कुला पाणी
आवडतें मज याचें- दर्शन जैसें तृषा[16]ऽकुला पाणी ८
प्राणविरह सुसह पळ हि बहु दुःसहविप्रपाणिविरह मला

१ नामविशेष, २ वाढपि, ३ इंद्रप्रमुखयज्ञभुक्, देव, ४ [illegible]ल्याणदायकहृ[illegible]नाचें. ५ कीटक, ६ ज्यान दीतीलरक्तपानाने, ७ धर्म-अर्थ-काम, असे तीन अर्थ, ८ एकशेंआठ. ९ किंचित्, १० दानशूरहाताने. ८हा[illegible]र्थ) ११ मेघ, कुबेर, १२ परमेश्वराच्याकीर्तिबरोबर, १३ पाकळी, (फूलफुलाचीपाकळीअशीम्हण) १४ पाऊसथंडीआणिउष्ण, १५ कीटकविशेष, १६ तृषित.

वमला जो विष वारुकि ऐसा-तापद नसेल तो गमला ९
मी मीनसाचि माझ्या द्विजवृंद घरीं जसेचि आप सेरीं
पाहुनि मेघांशि जसा चातक मी ब्राम्हणांशि आ पसरीं १०
जो रंतिदेव ऐसें बोले विप्रांसि कनक दे हातें
द्विजबहुमानासि जपे साधु जसा वृद्धजनक देहातें ११
कांचनमय-गोशत-युत कांचनमय-वृष सहस्रशः पूर्ण
शतवर्षें नित्य दिलें कीं हें जाणार सर्व ही तूर्ण १२
श्रीरंतिदेवसदनीं अतिथि द्विज एकरात्रिं जो राहे
तो एकवीससहस्त्र प्रातः काळीं च धेनुधन लाहे १३
जें अग्निहोत्र हयमखे- सुखयज्ञ-गृहो-पकरण सर्वहि तें
विप्रांसि दिलें भूपें सर्वजनांचीं करूनि सर्व हितें १४
कव्यास पितर घेती प्रत्यक्ष तसेचि देव हव्यास
हव्यास धरुनि करि बहु यज्ञाचा जन सुखावह व्यास १५
श्रीस न आली वेंचुनि बहुमणिकार्तस्वरा जरा ज्याच्य
लाजवि समृद्धिला जो न हरुनि ऑर्तस्व राजराज्याच्या १६
मेला असाहि करितां जो हयमेधादि सर्व सव स्कृती
न रडति अनित्य जाणुनि जाना स्कृत दार वपु हि सवसु कृती
नारद म्हणे प्रसवली ज्या कण्वस्कृता शकुंतला गावा
परिसावा भरत तुज न सुते-शोक-हुताशकुंत लागा । १८

---

१ द्विजवियोगासारिखाताप देणारा, २ उदक, ३ सरोवरांत, ४ लौकर, ५ अश्वमेधप्रमुखयज्ञगृहांतील, साहित्यें, ६ पितृभाग, ७ देवभाग, ८ विस्तार, ९ रत्नें आणि सुवर्णास, ११ दुःखिवाचें धन, ११ कुबेराच्या, १२ पुण्यशील, १३ सद्द्व्य, १४ सुत्त, १५ पुत्रशोकाग्निरूप भाला, + वृद्धदशा.

म्हणसी शकुंतलासुत रत्नाचा सुमहिमा वदा तरि तें
पाडी गहन हरुनि हरि- शतमखीरफगाहिमाऽवदात रितें १९
व्याघ्र वराह महिष गज मद तुरवी मूर्ति सुरुचिराशि शुची
हरिशत दमुनि वनीं जो बहु जो वर्धिष्णु सुरुचिरा शिशुची २०
ऋतपोवनांत लावी हरिहरितोकांस दामनीला जो
तेणें न कण्व हरिसह हरिहरि तो कां सदा मनीं लाजो २१
सिंहादि सर्व सत्वें सोडी तो सर्व वीरवर दमुनी
य[illegible]व सर्व-दमन हें ठेविति भरतासि नाम वरद मुनी २२
शत यमुनेच्या तीरीं दोनशत सरस्वतीतटीं भरतें
गंगातटीं चतुःशत केले हयमेध धर्मलाभरतें २३
पुनरपि हयमख केले दशशत शत राजसूय साधूनी
स्तविला रिपुनींहि भरत केवळ वाखाणिला न साधूनीं २४
तैसाचि विश्वजित्[11]सव अग्निष्टोमा[10]ऽतिरात्र[11]सन्मख गा
इतरां भरतयश गरुड- यश दुर्लभ जेविं नीड[12]जन्म-खगा २५
वा वाजपेय[11] म्हणति ब्राम्हण पुण्यर्धिच्या अगारा[13] ज्या
त्या यज्ञसहस्त्रांचीं तीन सहस्त्रें करी अगा राजा २६
हंसतसा आरब्धा-[14] खिल मख कर्माऽब्धिला भरभर तरे
शुचिसचिवशिरीं ठेवी राज्याचा सर्व ही भार भरत रे २७
अर्पुनि शुचि जांबूनद-[15] पद्मसहस्त्र ऋतूंत पद नमुनी

१ हिमवत् अवदात् (स्वच्छ) जें शेंकडो सिंहरूपजायीचें फुल, २ तेजःपुंज, ३ रुद्र, ४ अजी, ५ वाढणारी, ६ सिंहबालकांस, ७ दांव्याला, ८ इंद्रासह, ९ खेदोद्गार, १० आणि, ११ यज्ञविशेष, १२ घरोट्यांतल्या पक्ष्यांस, १३ गृहा, १४ आरंभित यज्ञसागर, १५ सुवर्णकमळें.

जेणें केला कण्वचि न सकल ही सुप्रसन्न-वदन-मुनी २८
शंभर बांधे तीसर कनकाचा यूप रुद्रत्नानें
यज्ञांत घडविला तो होय उभा सोऽमरेंद्र-यत्नानें २९
धन-धान्य-गृह-क्षेत्र- याग-रथ-द्विरद-धेनु-हय-दानें
दिधलीं नकोनको तों त्या भरतानें कुबेर-भयदानें ३०
दासी बहुकोटि दिल्या पात्र करुनि बहु-रुवस्त्र-मणि-कनका
ज्या म्हणती भूषणभार दुर्वह इतुकाचि फार अणिक नको ३१
बहु कोटि दिले भूषित- तनु कार्य-समर्थ-भुज नवे दास
स्वामीस आदरें जे भजणारे जेविं सुजन वेदास ३२
ऐसाहि भरत मेला मग संसारांत कां न इतर मरे
म्हणुनि रुतशोक सदा जाणुनि भगवत्पदींच हित रमे ३३
देवर्षि म्हणे बहुधा त्वां आइकला नसेल पृथु कानें
तरिच भरोनि तुझें मन मोहीं केलें निमग्न पृथुकानें ३४
पृथुचा पृथु प्रताप प्रेक्षुनि झाली भयें इला दुहिता
गाईस गोपसा जो राजा झाला स्वयें इलें दुहिता ३५
पृथ्वी अकृष्टपच्या सर्व[illegible]स्पर्श-दर्भ कनकाचे
झाले कोणालाहि ज्याच्या राज्यांत अर्भक न काचे ३६
वत्सें प्यावें धावें गाईनीं दुग्ध भरुनि घागर गा
कुंकुम-रस-मिश्रिता-मृत- कल्योऽदक पूरपूर्ण-सागरगा ३७

१ केला, २ भरीव यज्ञस्तंभ असा भावार्थ. ३ देव-इंद्र-यांच्या यत्नानें, ३ गज, ४ कुबेरास भय देणाऱ्या भरतानें, ५ अलंकाराचा भार, ६ बालकानें, ७ मोठा, ८ पृथ्वी, ९ मुलगी, १० भूमीला, ११ दोहनकर्ता, १२ कष्टाशिवाय पिकणारी, १३ बालक, १४ नद्या.

वृक्षाच्या वल्लीच्या　पुटकीं[1] पुटकीं प्रभूत मधुरस रे
वा ज्यापुढें न अमृतहि　म्हणवाया आपणाशि मधुर सरे ३८
जन तुष्ट पुष्ट अकुं[2]नी- र्भय नयमय सर्वही अगदवार्त[3]
पृथु राज्य करित असतां　नव्हते च वनांतही अग दैवार्त[4] ३९
बहुतचि जन रंजिविला　लावुनि निजगुणरसीं पृथु-कथांनीं
जननींनीं जेविं करुनि　तप परम चरमवयीं[5] पृथुक थानीं ४०
स्तंभितजल[6] होय जलधि　देती ज्या प्रभुसि मार्ग पर्वत रे
जन ज्याचें यश गाउनि　पाउनि काशींत जेविं पर्व तरे ४१
सर्वदैवत[7]मात्रांस न　दे विश्वास प्रमोद तो यजनीं
मखमंडपीं न तितुकें　दानजल बहु प्रमोदतोय[8] जनीं ४२
क्षितिवरि होते पार्थिव　जे जे ते करुनि हेममय सारे
दे दान हयमखीं पृथु　परिस गमे अर्थिलोकें[9] अयसा रे ४३
पृथु सांगे गज ओतां　पाहुनि हरिचा करी लपो कळतो[10]
श्रम मज किति घेत्याचें　देत्याचें हित करील[11] पोकळ तो ४४
ओतविले कनकरसें　साठसहस्त्र भव्य दंती हो
विप्रांसि दिल्हे तेव्हां　मी होतों हे न कींवदंती[12] हो ४५
मणिरत्नभूषिता हे　कनकाची करुनि दान दे वसुधा
पृथुकीर्तिरत विसरले　रंभा विसरतिल कां न देव सुधा ४६
एवंविध चरित-सुधा-　निधि-हि निधनें[13] पावलाचि पृथु कवि रे

१ गुच्छास, २ निर्भय, ३ रोगवार्ता, ४ वृक्ष दैवानें पीडित, ५ प्रफुल्लीत असा भावार्थ ५ म्हातारपणीं, ६ स्थीरोदक, ७ यज्ञदेवतांस, ८ आनंदाश्रु. ९ भिक्षुकरूपलोहास, १० पोकळ हत्ती, ११ हत्ती, १२ गप्पा, १३ मरण.

ज्या कालाच्या वदनीं मेरु विरे त्यांत कां न पृथुक विरे ४७
देवर्षि म्हणे भार्गव- रामाची सृंजया कथा परिस
अतुलप्रताप दुःसह- शूर जो विश्वास मन्मथापेरिस ४८
रणपंडितकोटिपुढें ज्याचा मागें न परशु कवि सरला
जो आपणा समरपर जैसा हरिकीर्तिपर शुक विसरला ४९
भीववी ज्याची श्रीमत्- दत्ता-प्त-सहस्र-बाहुता शमना
जे अर्जुन-अर्जुनेंना दे अरिच्या होय बा हुताश मना ५०
त्या जलधीस शरकरें भृगुवंश[9]घटज महातपा प्याला
नप्ताऽयः[10]पिंड तसा जो लावूं दे न हात पाप्याला ५१
जो प्रभु म्हणे दिले क्षिति-[11] वर्ति क्षत्रिय सुखें कुठारें[12] खा
उठला कबंध हो यश राखाया बहु बरें उठा राखा ५२
राय चतुःषष्टिअयुत बाहुज[13] मर्दी धरूनि कोदंड
कोण म्हणेल पितृवध[14]- क्रुद्ध प्रभुला करूं नको दंड ५३
खडें सहस्रहैहय[15] ताडी पाडी सहस्र तो मुसळें
खळ-रक्तासि म्हणे जा भेटें मित्रा कुजों[16] कुजां[17] उसळें ५४
अत्यंतोऽत्कंठित जो ओतु[18] तसा मत्त पर-शुकांऽ[19]पाया
लागों दे अयुतातें पळहि न हरदत्त-परशु कापाया ५५
उद्बंधनेंहि[20] वधिले प्रबळ ब्रम्हघ्न[21] पाप दशशत रे

---

१ पोहा, २ मदनापेक्षां, ३ युद्धपंडितसमुदायापुढें, ४ यमास, ५ सहस्रार्जुन, ६ तृणता, ७ अग्नि, ८ सहस्रार्जुनास, ९ भृगुकुलोत्पन्नपरशुरामरूपअगस्ति, १० नप्तलोहाच्या पुतळा, ११ पृथ्वीवरराहाणारे, १२ परशूला, १३ क्षत्रिय, १४ तातवधामुळेंतापलेला, १५ कार्तवीर्य, १६ मंगळास, १७ कुत्सितरक्ता, १८ माजर, १९ शत्रुराज्यास, २० गळफांसानें, २१ ब्रम्हवधी.

क्षत्रिय एकहि न जसा लावुनि मृग[1]भूमिपा पद शश तरे ५६
देखिलि रामें केली निःक्षत्रा एकवीसदा महि म्यां
या गाती जे हरिहर- चरित रसिक ते कवी सदा महिम्या ५७
रक्तें भरी प्रतापी प्रभु तो रक्तप-चमू-सुख-कर तळीं
स्थापी स्वयश कविमुखीं सर्व-क्षत्रिय-वधू-मुख करतळीं ५८
निष्कंटक सद्वीप- क्षितिमंडल सर्व वश्य पाहून
राम म्हणे या दाना- पात्र नसे अन्य कश्यपाहून ५९
संपादुनि सर्वहि सव करुनि सकलरत्नहेममंडित हो
कन्यारत्न तसें दे भूमंडळ युद्धयज्ञपंडित हो ६०
कश्यप रामासि म्हणे माझ्या राहों नकोचि विषयांत
कीं यश आयुःक्षय कर दत्तें पुनर्ग्रहण-रूप-विष यांत ६१
राम म्हणे बहु उत्तम मागे स्थल तो नदीनदेशाला
प्रभुनें प्रभुला द्यावें देइल दीना न दीन दे शाला ६२
उत्तरहि याचकास न जेसें बहु भाग्य मत्तमानव दे
तेसेंचि तोहि जलधी कांहीं त्या वीरसत्तमा न वदे ६३
बहुधा घटजापारकुनि पूर्वीं जें काय होय तें विसरे
शर स्फुटतां मागें खल- बल जेविं समुद्रतोय तेविं सरे ६४
त्या इषुपातक्षेत्रीं पाहोनि महेंद्रनाम- नग रमला
राम म्हणे करिन रुचिर रुचिर तप कशास देश नगर मला

१ मृगराजास, २ तळहातीं (शंखवाद्यकरितात असा भावार्थ) ३ देशांत, ४ दिल्हें, ५ नदि-नद-ईश-समुद्राला, ६ बाण पडलेल्या स्थळीं, ७ नामविशेषपर्वत- (परशुराम म्हणून क्षेत्र आहे तेथें)

ऐसाहि राम अंतीं मरणार यथार्थ जाण सन्मत[3] रे
संसृतिनदींत[1] काळ- चक्रीं[2] पावोनि कोण जन्म तरे ६६
व्यास म्हणे हें षोडश– राजिक आख्यान सर्व सन्मोहित
धर्मा याच्या श्रवणें एकीं जन्मींच कोटि-जन्म-हित ६७
हा सोळाराजांचा महिमा पूर्णायु करि लर्वायू[4] तें
या परि जें मंद-दहन- तेज सबळ काय करिल वायू तें ६८
सांगुनि आख्यान असें देवर्षि म्हणे नृपा असे तोकीं[5]
होते गुण सांग खरें गेला तच्छोकपर असे तो कीं ६९
भूप म्हणे बा चातक- चित्ताला सुंदिर[6] हर्ष दे वर्षे
परि अत्यधिक तो म्यां तुज सांगावा काय हर्ष देवर्षे ७०
जो अस्मदादिजनन प्राकृत होईल तो कसा मान्य
ज्यासि रडत होतों मीं बहु मानुनि तोंहि तोक सामान्य ७१
त्वद्दृष्टिपुढें प्रबळ हि नतमोह[7] ज्ञानिनायका सरतो
देवीसमक्ष उरला त्रिभुवनदुर्जय हि काय कासर[8] तो ७२
देवर्षि म्हणे परिसुनि सूक्ति[9] न घे पक्ष भला भला मागें
उपदेशासि न वळतां कोणीहि न श्रम लाभला मागें
वंदुनि तो भूप म्हणे जे झाला सुप्रसन्न हाच वर
श्रीकर माथां असतां बहु काय छत्र काय बा चवर ७४
नारद म्हणे कृपेची त्वत्साधुत्वें न आवरे उंकळी[10]

1 संसारनदींत, 2 काळचक्रांत, 3 सज्जनांसपूज्य, 4 अल्पायुष्याला, 5 पुत्रांत, 6 मेघ, 7 नम्रांचामोह, 8 गवा, रेडा, 9 सु-उक्ति-उत्तमभाषण, 10 हुंदका.

हो पूर्णकाम स्वर्भी- पोषक जन ताक काय गा उकळी ७५
पेटो स्वसुत तुज जो गेला होउनि परासु नरकास
घालूंत साधु भजनें पावाया गति परा सुनर कास ७६
या वाग्वसानीं तो अर्की च प्रकट होय जनकाच्या
सनकाच्या बंधुपुढें अमृतकथा म्हणति सुज्ञ जन काच्या
धरिला पुत्र स्वर्ण- ष्ठीवी हृदईं द्रवोनि मग नमुनी
प्रथम प्राज्यप्रेमें नित्य नवदयामृताभ्रगमन मुनी ७८
हयमेधादिमखांच्या ठेवी सप्रेम चित्त तो यजनीं
वर्षे सृंजय धारा- धरसा सर्वस्ववित्ततोय जनीं ७९
शिशु अनपत्य अर्यज्या रणयज्ञांत हि न पावला मरण
म्हणुनि उठविला मुनिनें कराया सुगतिकर सदाचरण ८०
अभिमन्युसि धन्य म्हणति गेला करुनि सुकृतें सुगतिला जो
ज्यास स्वर्गति घडली या मर्त्यगतीस ते सुगति लाजो ८१
निवविनसे जो विरचुनि सुखकर करनिकर इंदु नित्य जगा
तोचि अभिमन्यु धर्मा धरित्या शोकासि निंदुनि त्यज गा ८२
उरले शोच्य नतीला गेल्याचा शोक कां करावा हो
कर्पूर कुशळ वाहो नेत्रीं जड लोक कां करा वाहो ८३
जोडावा स्वर्ग तुम्हीं सोडावा सर्व मोह माजा तो
हा भाव शोक सारा सरला कीं राजसत्तमा जातो ८४

१ कामधेनूपाळ, २ वीवरच्या (मोक्ष) ३ भाषणांनीं, ४ दयामृतमेघ, ५ मेघसा, ६ वित्तरूपजल, ७ निपुत्री, ८ यज्ञनकेलेला, ९ मृत्युलोकींच्यावर्तीस, १० शोकप्रद, ११ रडा, + किरणसमुदाय.

स्पर्श न मोहाचा हो   तुज अंतः[1]र्हित-परा शराचा हो
ऐसें बोलुनि झाला   रूत अंतर्हित[2] पराशराचा हो ८५
नृप आपणा मनिं म्हणे   कोठें तो वत्स उत्सवं[3]द-शील
हें पुसतां विजया तूं   काय कसें पार्थ[4]-कुत्स वदशील ८६



अध्याय ७

समसप्तक वधुनि विजय   सांजे शिबिराशिं यावया परतें
प्रभुसि म्हणे कां कंपें   मन कांपविलें जरि स्वयें पर तें १
कंठ गहिवरें भरला   शिरली हृदयांत केशवा धडकी
येतें रडें वृथा कां   बा माजी प्रकृति काय गा रडकी २
स्फुरणें[5] हि अनिष्ट भिवविति   उत्पात हि सांग काय बापा हें
कुशल असे कीं माझा   राजा ध्यानांत नीट बा पाहें ३
देव म्हणे कुशल असे   प्रभु ऐसें मन्मनास वाटतसे
कीं थोडे जन जगती-   वरि धरिते धर्मनीति वाट तसे ४
झालें असेल आणिक-   कांहीं वर्धिक्रिया नव्हे वंध्या
यद्वा-[8]तद्वाऽस्तु करीं   आधी न गणूनि ओधिला संध्या ५
संध्या करवुनि नेतां   सेनेंत मनीं म्हणे परस्वामी[10]

---

१ अंतःकरणपूर्वक हितकरण्याविषयीं तत्पर अशा तुला, २ अंतरधान, ३ आनंददायक, ४ निंद्य, ५ वामनेत्रादिक स्फुरण, ६ वाईट, ७ तुला होणारीं चिन्हें, ८ कसेंतरीं असो, ९ शोकाला, १० श्रेष्ठाधीश, परपुरुष.

स्वधना न जपों कैसा काय रथीं वाहतों परस्वा मी ६
अर्जुन अस्वस्थहृदय जाय गतेंश्वीक शिबिर पाहून
प्रभुसि म्हणे महद्‌प्रिय- सूचक बहु चिन्ह काय याहून ७
मी नायकें सुवार्थें स्तुति-गीत-रवासि तूंहि नायकसी
मजपाहुनि आप्तअधो- मुख होती गति असेल हाय कसी ८
अतुलप्रताप लोकीं ज्या खलबलजलधिवाडवाभाचा
तो कृष्णा आज तुझा मज आला कां न आडवा भाचा ९
आकुळ होय महाजन भाजेन होउनि जसा महा घातें
लोक तसाहा दिसतो व्हावें विकलत्व हें महाघातें १०
शिबिरीं शिरोनि विजयें धर्मादिक देखिले अधोवदन
तें पुत्ररत्न एकचि न निरखिलें सद्गुणाद्रिचें सदन ११
मृदुलप्रकृति न साहे सुतशोका जेविं न रविला पाला
शिबिरीं करी परोपरि नारायणमित्र नर विलापाला १२
मज आडवा न आला तरि या पांचांत पृथुनय नसावा
कीं नीरंजनाभाचा भाचा सुगुणाब्धे पृथुनयन सावा
बोले कृष्णमुखींचा वेणु तसा परम लाडिका-वाणी
जो स्पर्शे शिरकाहि न घें गुरुसन्निध पर मला डिकोवाणी १४
जो बहु पर-पृतनासीं गोपींसीं बाळकृष्णासा रमला
दावा हो सत्वर तो स्वगुरुवचनगीतकृष्णेसार मला १५

१ परद्रव्य, २ हननेज, ३ महत्-अप्रिय-सूचक- मोठें अनिष्टदर्शक, ४ खलसैन्यरूपसमुद्रासवडवानलतेजी, त्याचा, ५ पात्र, ६ महा-अघातें, ७ मोठ्याघातानें, ८ सद्गुण आदिचें (हाड्डिचें) स्थान, ९ कोमलप्रकृति-अर्जुन, १० नीतिमान्, ११ पद्मनाभाचा, १२ आकर्णनेत्र, १३ डिकासारिखा. १४ शत्रुसैन्यासीं, १५ नानाहारूपगीतासजोहारिण-असा-

बाळहि जो खड्ग परशु चक्र गदा चाप तोमरा वाहे
संकल्प दुर्जनांचे झाले कीं सफल तो[1] मरावा हे १६
ज्याचा शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत्समज
काय तुम्ही केला हो आणुनि तो भेटवाचि वत्स मज
बहुधा तुम्हीं धरुनि गुरु- कृत-चक्रव्यूह-भेदकामातें
केलाचि पुढें नाहीं- तरि कशिना स्पर्श खेद कां मातें १८
न तुम्हीं न कौरवहि मी न ह्रुतक कीं तया रिघायाचा
कथिला उपाय चपला आधीं म्यां न कथिला निघायाचा
इतुक्यांसि एक बालक संरक्षण कठिन कां नवल यांचें
भुजसौकुमार्य रुचलें अपनयनहि सेवकां न वळयांचें २०
तुमच्या भुजशस्त्रांतें धिक् हा निःसार हो खटाटोप
शिर ज्या न रक्षवे तो कार्याचा काय ओखटा टोप २१
वदला असेल कृष्णा आल्हेरिसि बाळनमन कां पावें
अथवा त्यातें ज्याचें समयीं अणुमात्र न मन कांपावें २२
हरहर जाणों चुरिला तो बाळ-करेणुनीं चरणपातें
शिवशिव भरतां कीं हो तो बालक रेणुनीच रणपातें २३
कुंतीस काय सांगूं कृष्णेला दावूं कसें वदन
दुष्कर मला सुभद्रा सांत्वन दुर्दर्श उत्तरासदन २४
जावूं दिला मजविना परलोका काय एकला भाचा

१ तो अभिमन्यू, २ वासुदेववत्-समज-कृष्णासारखें ज्ञान, ३ द्रोणरचितचक्रव्यूहाचा भेद करण्याचीइच्छा, ४ तत्-घातक-त्याचा घात करणारा, ,५ शिरायाचा, ६ मृदुस-(अशाकोमलभुजांतून कडीं कां काढलीं नाहींत असा भाव), ७ काढणें, ८ कडयांचे, ९ बालहस्तीनीं, १० रण-प-योध्यानें.

होता उपाय हातीं कृपशाच्या हेंहि एक लाभाचा २५
खाताच अद्वितीय सु-[1] दर्शन[2] परबळ पळांत चाटून
परि बुडविल निज यश तें कर्म करिल कवि कशास दाटून २६
याचें स्वरूप कळतें तरि पळ न विसंबतोंचि बाळा हो
शिवशिव म्हणेल मरणा-[+] वधि वैधव्यांऽधिमग्न बाळा हो २७
समयीं कोठें गेल्या बा तुज सोडुनि गुरुजनवराशी
वाहेल आधिच्या किति ती मृदुलप्रकृति नित्य नव राशी २८
स्वार्थपर अकृप निर्लज्ज आम्ही म्हणउनि मनांत विटेशील
परि उत्तरा सती पर-[10] गतिकामा तुज म्हणोक विटेशील २९
न म्हणे अमृतरस अधिक करि ज्याच्या बाप लालना कवि तो
काय पितृपरिष्वंगज जें सुख त्या बा पळाल नाक वितो ३०
कां माझें उर न उलें कवि पवि कीं म्हणति तोक-शोकाला
लोकां लाजे मन कीं जावें यश हारुनि ओकाला ३१
न तुतें पार्थ कदाचित् कृपणहि वांचेल सोडुनि धनातें
चुकविल न चकोराच्या विधुवांचुनि सर्व सोडु निधनातें
हा वत्सा रक्ताक्षा झाले त्वत्सुगुण आजि घातकसे
बा वाहिले परांचे तुजला हाणावयासि हात कसे ३३
अभिमुख परप्रहारें पडला कीं धर्मराज सांगावें
प्रभुजी न जें यशस्कर तें स्वगुरुसमक्ष तोक कां गावें ३४

---

१ हा, बालक, २ एकटा-अनुपम्य, ३ दर्शनसंतुष्ट, ४ शत्रुनाशनाचा निश्चय, ५ विधवत्वरूपव्याधींतनिमग्ना, ६ उत्तरा, ७ गुरुजनांचे वर आणि आशी (आशीर्वाद) अथवा गुरुजनवराच्या आशी, ८ निर्लज्ज, ९ कंटाळशील, १० मोक्षाची इच्छा करणाऱ्या, ११ विरस्वभाव, १२ बालक, १३ पित्याच्या आलिंगनापासून झालेलें, १४ तृणप्राय, १५ स्वर्ग, १६ देतो, १७ वज्र, १८ स्थानाला, १९ रुडु, नक्षत्रासह, २० मरणांतें, २१ तुझे सुगुण, २२ रणांत समोर, + मरणपर्यंत.

संरक्षिलें न असतां शस्त्र नयन बाहुही विपुल याला
निष्फल भार वहातां को सोडा जों नव्हे रिपु लयाला
भगवान् म्हणे बुडाला कीं हा मोहांत रक्षे भो-गीतें
जीवाला विषय तसे संमोहाया न दक्ष भोंगी ते ३६
प्रभु पार्थासि म्हणे भो बुध वीरशिरोमणे सखे दमन
केलें तुझेंहि शोकें माझें येणेंचि बहु सखेद मन ३७
गलेंबंधन कीं पुत्र- प्रेमें विवेकेंचि नोंड बापा हें
सुखकर नव्हेचि उघडुनि विषरलाचा न तो डबो पाहें ३८
सोत्साह युद्धधर्मी होता नव्हताचि तो असावध हो
गेला उत्तमगतिला त्याचा कां शोक हा असा वध हो ३९
धर्म म्हणे जें झालें तें कथितों सर्व ऐक बा ज्ञात्या
भ्यां व्यूहीं द्वार करीं ऐशी केली स्वयेंचि आज्ञा त्यां ४०
द्वार करी शिरतां भी न व्यूहा जेविं सागरा मगर
तुरवी कुमार परमद लवहि जसा धरुनि शग रामकर
होय जयद्रथ आम्हा हेतु कुमारास अंतरायास
त्यास न निवारवे बा जेविं प्रबलास अंतरायास ४२
आम्हां त्या क्रूदैवरें रुद्रवरें करुनि वारिलें वाटे
प्रेंपुनें सौभद्रासि न [illegible]हि आजि मारिलें वाटे ४३
कृतवर्मा द्रोण कृप द्रोणज कौशल्य कर्ण रथ सा हे

१जोशस्त्रादिकांचाभार, २ रक्षणाकर, ३ हेभगवद्गीते, ४ सर्प, ५ गळफांस, ६ करंडा, ७स-उत्साह-उत्सुक, ८ रणांगणींमरणोंअसा, ९अभिमन्यूस, १० रुसर, ११ परशुरामाचाहात, १२ हेतूस, १३ यमास, १४ नीचाशिरोमणीनें, १५ शंकरानें.

शर वर्षले जलदसे परि धैर्यें[2] करुनि धर्मपथ साहे ४४
केला विरथ अधर्में दूपुनियां शकुद्धुद्रसव सोनीं
दौःशासनिनें वधिला स्वगदेनें कंठमळांत अवसानीं[5] ४५
अष्टसहस्र रथ द्विप- पति नवशत राजपुत्र रणदक्ष
द्विसहस्र मर्दिले वा सौभद्रें अश्वपति बहुत लक्ष ४६
गुरुला न सांपडावें म्हणउनि ऐसें करावया गेलों
तों शोका सांपडलों पुत्रा-आधींच मी न कां मेलों ४७
पाडी विजयास म्हणे तुजही मी शोक-वेग मोहीन
हो अधिक स्वेद करी मूर्छित तरि ओकवे गमो हीन
धर्मसुखें वृत्तांत स्वसुताचा ऐकतांचि तो कानें
पडला मूर्च्छित अर्जुन हा वत्स अरे म्हणोनि शोकानें ४९
सर्वाप्त वीरमंडल झालें अत्यंत घाबरें हो तें
धर्म म्हणे दाखवितें न तपोवन[10] या अंधा बरें होतें ५०
सावध होउनि अर्जुन सोडी बहु दीर्घ उष्ण निःश्वास
कोपें पेटे वाटे जाळील स[11]धार्तराष्ट्र विश्वास ५१
विजय म्हणे सत्य उद्यां मारीन जयद्रथासि आपण हो
म्यां केला होइल जरि मिथ्या शरणागतींच[12] हा पण हो
वांचेल कराया तप जरि जाइल काय तो अरण्यातें
अथवा म्हणेल शरणा- गत मी या केशवा शरण्यातें[13] ५३

१ वर्षले हें क्रियापद-कर्तरी आहे म्हणून हे सहारथीअसाकर्ता, २ धर्ममार्गी, ३ साह्यजणांनीं, ४ मूर्छेंत, ५ सेवटीं, ६ हा पुत्रशोक, ७ विष, ८ हा पहाय, ९ वनांतच असतों तर बरें असा भाव, १० या कुकर्मास, ११ धृतराष्ट्रपुत्रांसह, १२ शरणागतांचे ठायीं मात्र मिथ्या होवो, १३ शरणागताचें रक्षण करण्याविषयीं समर्थ अशातें.

किंवा युधिष्ठिराच्या आश्रय तो जरि करील पायाला
गेला शिवा हरिप्रियें प्रभुमार्गें तरि करी लपायाला ५४
अथवा भीम नकुल सह- देवासि म्हणेल वांचवा दास
तरि खोट्यासहि राखिति साधु जसे काय लांच वादास
ज्या जीवदान दिधलें तो हा कीं कां अजी वदाना तें
कळलें पात्र दुखविला अहिंसा वैरी न जीवदानातें ५६
वधिलाचि रणांत उद्यां म्यां बालकघातहेतु सिंधुप हा
या गरुडें धरिला तो अहि उडउनि शत्रु-सैन्य-सिंधु महा
मारिन जयद्रथाला कोंडिन दोघे गुरूहि शर-भवनीं
श्रमतिल कौरव माझ्या इषुपटलीं जेविं सिंह शरभ वनीं
न वधिन जयद्रथा तरि पावेन असत्यसंध नरका मी
ज्या ज्या पावे क्रोधी लोभी बहु संपदंध नर कामी ५९
मारिन जयद्रथ करिन यश भुवनीं विशिखजाल वितत रणीं
हें न घडतां जळेन ज्वलनीं होतांचि अस्तमित तरणी ६०
करितां अशी प्रतिज्ञा जगदीशें पांचजन्य वाजविला
लाजविला प्रलय-जलद नादें ब्रम्हांड गोल गाजविला ६१
वाजउनि शंख झाला कौरवहृदयासि देव दत्तेदर
तैसाचि सखा त्याचा अर्जुन फुंकोनि देवदत्तदर ६२
देतां दुर्जनहृदया स्वदररवें करुनि कंप दैवांचें

१ जयद्रथ, २ कल्याणाकरितां, ३ तो करी म्हणजे हा तो जर शंकराप्रत गेला पण तर कल्याण होईल असा भाव ।३ बालकघाताविषयीं कारणीभूत, ४ कृष्णप्रतिज्ञा, ५ नरकास, ६ संपत्-अंध-श्रीमदांध, ७ विस्तृत, ८ अस्तम-इत-अस्तमानपावलेला, ९ भयदेणारा, १० कृष्णानें.

प्रकटिति कटकीं भेरि- प्रमुखें बहु नादसंपदें वाद्यें ६३
वारकथित प्रतिज्ञा परिसुनि बहु सिंधुराज तो भ्याला
भिववी धननाशाची वार्ता अत्यंत जेविं लोभ्याला ६४
राजसभेप्रति जाउनि पार्थाची श्रुत करी प्रतिज्ञा ती
पळतों म्हणे न रक्षिति पळ हरि-भागा-करी-प्रति ज्ञाती
जाच म्हणा न उगे तुम्हि धरुनि असा ध्यान हा निरोपाला
पावो रिपुची त्यांच्या लेश असाध्या न हानि रोपाला ६६
कुरुप म्हणे पतनावधि निजधर्मीं काय हा निभावो जी
स्फुरद्र यशो-हानि-परिस बहु वपुची काय हानि भावोजी
दुःशासनादि आम्ही आहों तुज सर्व वज्रकोट रहा
कर्ण भुजाश्रितजीवा न म्हणो दे कीं स्फुरद्रुकोटर हा ६८
आहेत कृप द्रोण द्रौणि शुचियशासि सर्वथारा जे
रक्षितिल तुला यत्नें हे कालिंगादि सर्वथा राजे ६९
आहेस शूर तूंही सोडूं धृति धर्म नय नको पावे
कोपुनि काय करिल पर न महेशाचेंचि नयन कोपावे ७०
बोलुनि ऐसें येउनि वंदुनि गुरुच्या पदा प्रतिज्ञातें
कुरु सिंधुराज कथिती पार्थकृता तापदा प्रतिज्ञा ते ७१
सिंधुपति म्हणे गुरुजी लाघव दृढ दूरलक्ष्यवेध रणीं
बहु जाणें मीं कीं तो रविलाचि अशेष[12] लक्षावे[13] धरणी ७२

---

१ नाद बाहुल्यें, २ सिंहाचाभागजोहत्तीत्याप्रति, ३ रहा, ४ मौन, ५ अर्जुनाच्या, ६ बाणाला, ७ पतन-अवधि-मरणपर्यंत, ८ अभेद्यकोट, ९ स्फुर-द्रु-कोटर-कल्पतरूचीढोल, १० चापल्य, ११ लांबचें निशाणमारणें, १२ सर्व, १३ पहावे.

द्रोण म्हणे सिंधुपते ठावे हें तुजहि त्याहि सख्यास
परि तुजहुनि विजय अधिक त्याचा चापीं अखंड अभ्यास
बहु खवळला धनंजय वनवासें त्यांत आजि कृत-पातें
तत्तप[1] बहुमत त्यां जे तपले पंचाग्निमाजि सु-तपानें ७५
परि तूं भिवोंनकोंचि त्यजुनि मरणभय सुखें करीं समर
न शकतिल मद्[2]आश्रित मर्त्य विलंघन करावया अमर
रक्षीन असंशय मी तूं वदन करूं नकोंचि अवनत रे
कांसेसि लागल्याचें क्षुद्र अलाबुहि करूनि अवन तरे ७६
करिन असा व्यूह जया तो न शके वासवहि तरायातें
प्रिय हित सत्य वदावें मज भूदेवास विहित रायातें ७७
अनुभाविलें साध्वी-सुत- रत्न परिष्वंग-कुरस-दामहि त्यां
गाती यशोरसाच्या अमृतरसाच्या न सुर सदा महिम्या
पुरवी प्रयागसा कीं हा धीरांचा समस्त काम रण
नाचवि अमरस्तका हें कां नाचविना समस्तका मरण
कौरव पांडव यादव अन्यजन तसाच ससुत मीहि मह्या
अध्रुव[11] सर्वहि सुखी काल जगीं स्थिति जसा तमीं हिमहा[12]
नरवर्या पर्यायें[13] आम्हीं हरिलों असोंचि कालवलें
कृगतिद रण-मरण उप- स्थित होतां केवि चित्त कालवलें[14]
गुरुच्या अभयें बोधें कोंळेंही[15] सिंधुपालक वळविला

१ तत्-तप-अर्जुनाचें तप, २ मत्-भुज-आश्रित, ३ खालनें, ४ भोपळाहि, ५ रक्षण, ६ अर्जुनहि, ७ साध्वीपुत्राचें आलिंगनरूप-हार, ८ यश-रसाच्या, ९ कबंधातें, १० मस्तकअसणारास, ११ अशाश्वत, १२ हिम-हा-हिमनाशकसूर्य, १३ मकारांतरानें, १४ कालवलें येथें भासाकरितां "ब", १५ यमानेंही म्हणजे याचें मरण आलें असा भाव.

हा काय मृत्युकरवीं दैवें प्रभु-मित्र-बोल कवळेविला ८२
सैंधव म्हणे विस्मय मी झालों कीं गुरु नव्हे अलीकवचा
गुरुवचना कीर्ति जशी केंची पविच्या तशी भली कवचा ८३
सस्मित सचिंत होउनि गुरु शिष्याच्या गुरु-प्रतिज्ञानीं
प्रार्थिति अपकीर्ति न हो ऐसें त्रिजगद्गुरुप्रति ज्ञानी ८४
ऐकुनि गुरु-प्रतिज्ञा कुरुकटकीं वाद्यमात्र वाजविलें
बहु नरसिंहध्वनिनीं घटिकाभरि सर्व गगन गाजविलें ८५



अध्याय. ८

देव म्हणे सखया मज धर्मा भीमाहि न पुसतां स्वमतें
कशि दुर्घट प्रतिज्ञा केली बा परम कठिन हें गमतें १
जाणों वेडे ते जे स्व गुरुजना सुमति-दायका पुसते
बा तूं सत्य धनंजय काय द्रोणादि काय कापुस ते २
हे चार म्हणति ह्याला सैंधव परिरक्षुनि गुरु-प्रतिज्ञा ती
कथिते झाले त्यासहि पायधरुनि हे गुरुप्रति ज्ञाती ३
तद्‌-क्षणार्थ केली स्वमुखें गुरुनें तुझ्या प्रतिज्ञा ते

---

१ जयद्रथ. २ अभिमन्यु, ३ घासविला, ४ मिथ्यावादी (सकारांत पुरुषवाचक आणि बहुव्रीहि समासांत जें नाम येईल त्याची प्रथमा संस्कृताप्रमाणेंच केल्याचा मोरोपंतीं नियम आढळतो.) ५ हर्षयुक्त, ६ सखेद (द्रोणप्रतिज्ञेनें सस्मित आणि अर्जुनप्रतिज्ञेनें सखेद.) ७ कृष्णाप्रती.

की हे सत्या गांतिल त्याच्या कीं नव भुजा-भ्रमि ज्ञाते ४
शकट-व्यूहीं पद्म- व्यूह तयाच्याहि कर्णिके-माजीं
राहेल जयद्रथ कीं बहु चिंता बुद्धि पावली मांजी[+] ५
कर्ण वृषसेन गुरुसुत मद्रप भूरिश्रवा कृपाचार्य
सिंधुपतिपुढें षड्रथ हे तेव्हां साधतें कसें कार्य ६
हे दुर्जय जिंकावे त्वां आधीं मग स्कदुर्जय द्रोण
तेव्हां कीं सैंधव वध हें शक्य म्हणेल तुज-विना कोण ७
मंत्रज्ञ सचिव सात्यकि भीमादिक धर्मराज हे आर्य
साध्याऽसाध्य विचारुत कीं व्हावें सिद्ध योजिलें कार्य ८
अर्जुन म्हणे मुकुंदा मानिशि ज्या सा रथांसि अधिक बळ
ते मद्बलार्ध-सम बल न जसें नवनीत केवळ दधि कवल ९
कृष्णा असोत मदधिक बल ते कर्णादि सा रथ केवा-न
कोदंड-वेद-पंडित मी त्यांसि हरूनि सार थकवीन १०
सैंधव शिर हरिन करिन रण सगणा द्रोणगुरु-समस्त महा
चिंता करूं नको बा गुरु माहात्म्येंचि गुरु-सम क्षम हा ११
किं बहुना जरि तिकडे होइल जिंकीन तूर्ण विश्वांस
माझ्या शस्त्राऽस्त्रांचा मजला आहेचि पूर्ण विश्वास १२
मजसीं करील गुरु त्या पापा रक्षावयास कटकट कीं
एकहि अभग्न राहो देईन न मी तया-सकट कटकीं १३

---

१ मध्यभागीं, २ हे सहामहारथी, ३ वळ (बळ) पासाकरितां, ४ ग्रास, ५ कवि-इन-कविश्रेष्ठ, ६ धनुर्वेद, ७ बळ, ८ गणासह वर्तमान, ९ मी अर्जुन, १० जगास, ११ भरंवसा, १२ जयद्रथा, + मांझी.

गांडीव यशस्वी जय- श्रीचें लोकीं अगार मानिल यो
दुर्योधनहि उद्यां अभि- मानी तो कीं अगा रमा-निलया १४
गांडीव चापयोद्धा मी सारथि तूं श्रित-स्वरंग काय
मग जिंकिला न मागें कोण पुढेंही न मत्करग-काय १५
सर्वार्थ-दर्शक म्हणों तुझिया भास्वच्-छवि प्रसादास
या-स्वार्थ-पात्र सु-गृह- स्था अतिथि स्वच्छ विप्रसा दास १६
मद्र्थ सिद्ध असों दे उदया-पूर्वींचि हेंच कर जा गा
आहेचि तुझा स्वीकृत सर्व-समर्वनीं सदैव कर जागा १७
त्या रात्रींत श्रांतहि गज मन निद्रा-करीं न दे वाजी
जो तोहि म्हणे सैंधव मेल्या निद्रा करीन देवा जी १८
विजय म्हणे माधवजी दावाया वदन न स्वसे लाजा
शोकोंऽग्नि तिचा विझवा भिजवा पुसुनि नयन स्वसेली जा
सु-विवेक सुभद्रेच्या या-परिदेवन-परा सुनेला हो
बहुधा देह शिवांनीं त्याचा होतां परीसु नेला हो २०
अंतःपुरांत जाउनि देव सुभद्रेसि बोध युक्त करी
त्या-सकरुणासि हें किति केला जेणें क्षणांत मुक्त करी २१
तूं वीरजा सुभद्रे बाइ उगी वीरबांधवा-कन्या
झालीस वीर-पत्नी वत्से नेशीचवीरसू धन्या २२

---

१ स्थान, २ गांडिवा, ३ हेरमावासा-श्रीकृष्णा, ४ श्रित-स्व-अग-श्रितकल्पतरु, ५ सर्वपुरुषार्थ देणारा, ६ भास्वत्-छवि-प्रसाद-देदीप्यमानआहेशोभाज्याचीअशाप्रसादास, ७ स्व-अर्थ-याप्रसादरूपद्रव्यासाठींदासपात्रम्हणोंअसाअर्थ, ८ सम्यक्-भवन-उत्तमप्रकारेंरक्षणाविषयीं, ९ भगिनीस, १० शोकरूपअग्नि, ११ आपल्याशेला, १२ विलाप १३ कोल्ह्यांनीं, १४ मृत, १५ गजेंद्र.

सु-यशें पितृ-मातुल-कुल उज्वल करिता असा असावा गे
बाई वदले सुर गिरि- जा-सुत तारक बली असा वागे २३
त्यजुनि अमृत मधुर म्हणुनि जेविं न मधुखंड-पायसा गावें
तव सुत-यश इतर यशोऽधिक ऐसें बहुत काय सांगावें २४
वत्से आम्हांशि असी गति देवू वरद-नायक पिनाकी[2]
रण-मरण अमरताऽधिक झाले नाहींत काय कपि नाकीं २५
उडविल उद्यां स्वसुत-वध- हेतु-जयद्रथ-शिरासि सितवाजी
आण तुझी होईल प्राप्त दशा योग्य होय कितवा[6] जी २६
ऐकुनि म्हणे सुभद्रा हा वत्सा काल काय हा निर्धना
झाली कशी अकस्मात् धन-लुब्धाच्या समूळ हानि धना २७
शोकीं कसे बुडविले माझे असु उत्तराऽसु-सह सारे
झालाऽसि रत्नभींचा निधिसा[9] तूं दृष्ट-नष्ट सहसाऽरे २८
धिक् पांडु-यदु-बळातें रक्षाया न शकलें मुलाला जें
स्व पति-पराक्रम-वर्णन- शीलत्वें मीहि बा तुला लाजें २९
झालें व्यर्थ वृकोदर- भावोजीचें बलाढ्य-पण आजी
वाटे मरेल शोकें नातू आहेत फार पण आंजी ३०
हा वत्सा धैर्य-निधे हा वत्सा जन-मनोहराऽकारा
हा वत्सा कुलतिलका हा वत्सा सर्व सद्गुणाऽधारा ३१
जी शूर-साधु-धार्मिक- पितृ-सुर-गुरु विप्र-भक्त परम गती

---

१ शर्करा , २ शिव, ३ वानर, ४ स्वर्गवासी, ५ कृष्णवाह अर्जुन, ६ दुष्टाला, ७ मरणा, ८ ह्यासारिखा, ९ दिसूनअदृश्य, १० कुंती,

प्राप्त असो तुज वत्सा विरह न देवू कदापि पर मग ती ३२
इतुक्यांत उत्तरे-सह कृष्णा ये होय भैर विलापाला
शोकीं आप्त-समागम विष-तरुचा जविं भरविला पाला ३३
मूर्छित पडे सुभद्रा शीघ्र तिला सांवरी कमले-पाणी
वारा घाली लावी नेत्रांला शीतसें अमल पाणी ३४
कृष्णा म्हणे कृष्णे दे पुण्य असावीच उत्तरा सांसू
हा हें किती वदवितो परि किमपि न देचि उत्तरा-सासू ३५
प्रभुला हाय म्हणाया लावी मोहीं बुडोनि घटिका हो
स्नेह असाचि असो जरि लटिका करितील साधु लटिका हो
उठउनि अनुजेसि म्हणे हें तुजला योग्य काय गा बाळा
त्यजिति हित स्र यश जोडुनि कवि पल भुग्भोग्य-काय-गाबाळा
जें नव उदार देता झाला सर्वां-परा स्रत रणीं तें
मुनि-दुर्लभ कीं भेदुनि गेला तत्कृत परास्र तरणीतें ३८
सत्य करिल प्रतिज्ञा हा न कधीं विजयि बाहु टळला गे
न उडेल अरि-शिर-स्तृण कां ज्या विजयेषु वाहुटळ लागे ३९
कृष्णो-त्तरा-स्रुभद्रा- धेनूंच्या मथुनि मोह- यवनातें
भवनातें येउनि तो प्रभु विजयाच्या करी समवनातें ४०
प्रक्षालुनि कर-चरण प्रभु विमल जलें करूनि आचमनें
शुचि शयन रची मानी मित्रा मणिं आपणास काच मनें ४१

---

१ अतिशय, २ चारला, ३ कमलासारिखे आहेत ज्याचे हात असा कृष्ण, ४ स- असु-जिवंत, ५ प्रीति. ६ "साधु सर्व मायावी असें मानतात म्हणून." ६ श्वापद भोग्य शरिर गाबाळाला, ७ यश, ८ विजय-इषु, ९ वावटळ, १० रल.

लिप्त-स्थंडिल-शयनीं एकहि सोसेल शक्र दर्भ कसा
देवाला भक्त नवा- नवसाचा गतवयास[1] अर्भकसा ४२
शयना-समीप मांडी गांडीव प्रमुख सर्व हातेरें
ततेज वाढवी निज तेजाचें घे करूनि मातेरें ४३
निजतां रात्रौ त्र्यंबक- बलि-विधि[2] हा शिष्ट-पथ सदा साचा
त्या महदस्वास्थ्यांतहि[3] लोपो दे लोकं-गुरु न दासाचा ४४
अर्पावें गंध कुसुम उपहार त्र्यंबकासि जें कांहीं
कृष्णासि[4] अर्पिलें तें पार्थें कीं स्वास्थ्य मानसीं नाहीं ४५
स्मित करुनि मनिं म्हणे प्रभु गेलें सोडूनि भान निज यातें
स्मित-दर्शन[5] होतां स्व- स्खलित[6] समजलें मनांत विजयातें
यज्ञापरतें खचलें पावुनि अहिता-समेत कांप हुडे[7]
तो पार्थ स्वापार्थ[8] प्रभुनें संप्रार्थिला न कां पहुडे[9] ४७
समजुनि शरण्य-वर्य स्वर्गीं स्तवितो जयाशि शिबि राजा
अर्जुन म्हणे तयाला श्रम लागे निजावयासि शिबिरा जा
निधि रक्षणार्थ जैसा अति-सादर राजराज[10] यक्षांतें
पार्थाऽवनार्थ तैसा स्थापी शिबिरीं मुकुंद दक्षांतें[11] ४९
शयनीं निजोनि पाहे परमेश्वर परि न पळहि निज लागे
चित्तीं चिंतेसि म्हणे त्वां वरिला कोण जडहि निजला गे ५०

१ हृद्रास, २ शंकर पूजाविधि, ३ महत्-अस्वास्थ्य-मोठ्याचिंतेंतही, ४ श्रीकृष्ण, ५ हास्य मुद्राऽवलोकन, ६ आपली चुकी, ७ बुरुज, ८ निद्रार्थ, ९ निजे, १० कुबेर, ११ चतुरवीरांतें, + सारविलेल्या यज्ञशाळेंतील शयनाचे ठायीं- या आर्येचा संबंध वरचे आर्येंत आहे म्हणजे तींच शयनरची हा-

देव निशीथीं[1] शयनीं बैसे मग दारुकासि आणउनी
त्यासी वदे प्रतिज्ञा पार्थाची प्रथम सर्व जाणउनी ५१
भक्तीं जसा महात्मा देहींहि तसा न दारुका रमला
या विजय[2]-वेद-वचना द्यावा लागे सदा रुकार मला ५२
निज रक्षणाऽधिक ध्वज- रक्षण राजासि दारुका पडतें
मोलें राज शिराहुनि बहु असतें काय दोरु[3] कापड तें ५३
मद्रथ सिद्ध असों दे जाणोनि व्यसन कां गळां[4] ठावें
पतिच्या भिन्न-प्रतिज्ञा बुडतां पडती स्त्रिया गळां ठावें ५४
विश्वासहि कुरु-गुरुचें आप्त-विपत्[5]सरिदलाबु धनु ठावें
कोण म्हणेल व्यसनीं स्वजन समऽवना मला बुध नुठावें[6]
तूं पांच-जन्य-नाद श्रवणीं शिरतांचि शीघ्र यावं कसा
पेटेन बसोनि रथीं मी कुरुकटकीं तृणांत पावकसा[7] ५६
साची करिन सख्याची मारुनि सर्वहि अरि प्रतिज्ञा ते
जोडिनिल उद्यां बहू कर या शार्ङ्ग[8]-प्रति अरि[9]-प्रति ज्ञाते
प्राकृतहि लुब्ध जातां पदरींचा एकदा रुकांहि[10] मरे
सर्वहि पदार्थ नापद मज भक्तचि एक दारुका हिमें[11] रे ५८
दारुक म्हणे अवश्य स्यंदन आहेचि सिद्ध अजि तरणी
तेज न मिरविल तुमचा प्रभुजी सेवकहि सर्व अजित रणीं

---

१ मध्यरात्रीं, २ अर्जुनरूपवेद वाणीस, ३ ध्वजाचीकाठी, ४ दुर्दशापावावें, ५ आप्त-विपत्-सरित्-अलाबु आप्तविपत्तीरूपनदीतभोपळ्यासारिखें, ६ न-उठावें, ७ अग्निसारिखा, ८ धनुष्यानें, ९ चक्रानें, १० पैशाच्यातिसराभाग, ११ थंड. (शांतिदायक असाभाव.)

मोहें प्रिय सुत-शोकें करुनि पणहि दुःशला-विलापार्थ[1]
स्वप्नीं दर्शन दे प्रभु कीं तो कांसेस लाविला पार्थ ६०
श्रीपति म्हणे सख्या कां म्लान वदन चित्त काळजी वाहे
चिंता चतुर न वरिती नाशी धृति[2]-वित्त काळ जीवा हे ६१
स्वप्नींहि प्रेमें दें प्रत्यु+-त्थानाऽसनादि वासवि त्या
जोडी कर तेजस्वी तेजस्वीशा[3] जसा दिवा सवित्या ६२
भीती न काल[4]-काल- प्रभुचे कालाहिच्या[5] विषा दास[6]
सांग स्पष्ट सख्या तूं कां सांपडलासि या विषादास ६३
पार्थ म्हणे देवा कशि होइल केली खरी प्रतिज्ञा ती
रक्षितिल सकल सैन्यें व्यूहा-मागें अरि-प्रति ज्ञाती ६४
मज दुर्घट न सकळ कुरु वीर-कटक-कदन-कर्म परि सविता
द्रुतगति[7] कृत-प्रतिज्ञ द्रोण गुरुहि सर्व धर्म परिसविता ६५
सैंधव-शिर न उडवितां जरि जाइल काय भानु अस्त[8]-नगा
तरि जीवित अयश-स्कर व्यर्थ स्त्री रत्न जेविं अस्तन[9] गा ६६
दुसरी तरि प्रतिज्ञा रक्षिन दहनांत कांय[10] होमीन[11]
नाकहि नरक तुज-विना वांचे अन्यत्र[12] काय हो मीन ६७
स्पर्शमणे संगा क्षण विघ्नें धरिला विषाद या लोहें
मित्र तुझें पात्र न हो विरहाऽपयशो-विषा दयालो हें ६८
प्रभु करुनि जल-स्पर्शा प्राङ्मुख बैसे उगाचि पळ आधी

१जयद्रथस्त्री-आविलापार्थ, २धैर्यरूपद्रव्य, ३तेजस्वी-ईशा, ४कालाचाकाळअशा, ५कालसर्पाच्या, ६खेदास, ७त्वरितचालणारा, ८अस्ताचलास, ९स्तनरहित, १०देह, ११हवन करीन, १२जलावांचूनइतराठिकाणीं, + प्रति-उत्थान-आसनादि-अभ्यु त्थानादिआसनः

मग विजयास म्हणे मी सांगेन तसेंचि कार्य तूं साधीं ६९
परमाऽस्त्र सनातन जें ज्ञाते म्हणताति पाशुपत ज्याला
जेणें देव महेश्वर समरीं असुरांसि मारिता जाला[1] ७०
तें जरि असेल अवगत मारिसिल उद्यां जयद्रथास रणीं
अवगत नसेल तरि मन लावीं त्या-श्रित[2]-सुर-द्रुच्या चरणीं
करिल प्रसाद देइल अस्त्र सु-निश्चय करीं असा ध्यो[3] तें
शिव-पद सु-साध्य करितें ध्यातां मोक्षाहि कीं असाध्यातें ७२
बैस स्वस्थ ध्यानीं पात्यासीं पातयासि लाव कसा
हो श्येनसा सख्या तूं शत्रु जयद्रथाहि शीघ्र लावकसा ७३
उदक-स्पर्श करुनि नर बैसे दर्भाऽसनीं असा ध्याया
कीं नारायणाहि म्हणे परमा सिद्धिहि नसे असाध्या या ७४
धरितां समाधि पार्थ ब्राह्म-मुहूर्तींच तो असें पाहे
जातों स्वयें उदीची[5]- प्रति गगन-पथें सवें हरिहि आहे ७५
चालविला दक्षिण-भुज धरुनि नभीं पार्थ जलेज[6]-नाभानें
त्याच्या तेजःश्रवणीं सोडुनि जावेंचि खलजना भानें[7] ७६
पाहे हिम-नग मणिमान् श्वेताऽद्रि धनाधिप[8]-प्रिया नलिनी[9]
कविनीं शिव-लीलासी जी साऽदर सेविली सदा अलिनीं ७७
स्वर्गासि सुरवें जीच्या स्नानें पानें सुरांप[10] गेला हो
अवलोकी नारायण- सख बहु मानें सुराऽपगेला[11] हो ७८

---

१ झाला, २ आश्रितकल्पतरूच्या, ३ ध्यानकर, ४ पाहांटच्यारात्रीं, ५ उत्तरदिशेस, ६ कमलनाभकृष्णानें, ७ स्तुतीनें, ८ कुबेरप्रिया, ९ कमलयुक्तसरोवर-नदी, १० मद्यपी, ११ सुर-आपगा- देवनदीला-

प्रेक्षी मंदार-द्रुम- भूषित-मंदर-गिरि-प्रदेश तदा
पाहुनि काल-नगातें दृष्टि न लागो असें वदे शतदा ७९
जो ब्रम्हतुंग-पर्वत तैसाचि स्रुतुंग आणि शतशृंग
शर्याति-वनीं तापस कमल-वनीं जेविं हंस-खग भृंग ८०
अश्व-शिरःस्थान सकल सिद्धीचें जें सभाग्य माहेर
आथर्वणाऽश्रमहि ज्या त्यजुनि पलहि न मुनि निघति बाहेर
वृषदंशास ह्मा मंदर पूर्वीं हृदयांत रेखिले होते
जे परम रम्य तापस- सुर-सिद्धि-निवास देखिले हो ते ८२
श्रीराम-बाण-सम गति देउनि दावी सख्यासि नवल हरी
देव-दया दासा दे सुख न तसें अमृत-सिंधु-नव-लहरी
तो श्री-नारायण-सख नर तेजःपुंज-पर्वता पाहे
चित्तीं म्हणे निवाले डोळे सोडूनि सर्व तापा हे ८४
त्या शैलाच्या अग्रीं झाले सुर चित्रसे पहाते ज्या
अवलोकिला भवानी सह भगवान् भूत-पति महा-तेजा
ज्याच्या शुद्ध तपा-सम कोठेंही किमपि तप न भास्वर गा
कृष्ण नमस्कारी-त्या दासाच्या कोटि-तपन-भा स्वरंगा ८६
अजित तसा विजय नमी क्षिति-वरि ठेऊनि सुचिर शिर गुडघे
बहु नमन-लाभ-लोभी जाणो दुष्काळ-सुक्षुधित गुडें घे
ईश्वर म्हणे उठा बहु साधु तुम्ही मुनि कवि-प्रवर दास

---

१ नामविशेष पर्वत, २ हयग्रीवस्थान, ३ देदीप्यमान, ४ कोटिसूर्यप्रभा, अशा, ५ कल्पतरूला, ६ गुळ.

मज आशु[1]तोष म्हणती   सर्वज्ञ अनेक-विप्र- वर-दास ८८
झालों प्रसन्न मागा   ऐसें ऐकोनि अभय-दा नमुनी[2]
स्तविती प्रेमें सात्विक-   भावांत बुडोनि अभय-दान मुनी ८९
वत्सेवा-सुरभीच्या   कासेला भक्त वत्स लागावा
कविनीं तुझा प्रसादचि   अनु-दिन वा भक्त-वत्सला गावा ९०
सर्वाऽर्थ संप्रदर्शक   अर्क[3] तुझे पाय अंधकाऽराते
याचे आश्रित जे जे   भीति भवाऽरव्या[4] न अंधकारा ते ९१
नमनें स्तवनें अर्जुन   होय स्नात प्रसाद-वृष्टीतें
आलें धैर्य मनांत   प्रभु-दर्शन-योग्य-तेज दृष्टीतें ९२
जें आपण कृष्णासि   त्र्यक्ष[5]-बलि-द्रव्य वाहिलें होतें
प्रभुच्या पाया पाशीं   पार्थें पुष्पादि पाहिलें हो तें ९३
[6]पार्थिव-मूर्ति-समर्पित-   माल्य किरातीं नरेंचि हें वाटे
हरि-हर-रूपाऽ[7]भेद-   ज्ञानाऽनंदाऽप्तिनें गळा दाटे ९४
मागे मग प्रतिज्ञा   सिध्यऽर्थ प्रभुसि पाशुपत नमुनी
कीं म्हणति न हो अयशीं   हो मृत्यु सुखांत आशुपतन मुनी
स्मित करुनि महेश म्हणे   यदु[8]-कुरु-वरहो पुरेल हा हेत
जा चाप बाण आणा   त्या अमृत-सरोवरांत आहेत ९६
[9]कृष्णा प्रभुसि नमुनि जों   गेले रवि-मंडळ-प्रभा सु-सरा

१ अल्पसंतोषी, २ नरनारायण. ३ अंधकासुररिपो, ४ भव-आरव्य-संसारनासका, ५ त्रि-अक्ष-बलिद्रव्य शंकराचें पूजासाहित्य, ६ पार्थिवलिंगास अर्पण केलेलें पुष्पज सें किरातस्वरूपधारण केल्यावेळीं प्रभुच्या ठायीं पाहिलें तसें आतांही पाहिलें असा अर्थ, ७ अद्वैतज्ञानाच्या आनंदप्राप्तीनें, ८ यादव कौरव श्रेष्ठ कृष्णार्जुन, ९ कृष्णार्जुन.

तों एक नाग आहे घोर सहस्त्राऽस्य[1] घोरतर दुसरा ९७
पहिल्याहुनि बहु दुसरा दुष्प्रेक्ष्य विषाऽग्नि-संपदे वसुनी
ज्यातें पाहुनि पावति दूर-स्थित नतहि कंप देव मुनी ९८
वंदुनि भावें म्हणतां शत रुद्रिय-पाठ हात जोडून
झाले धनुष्य शर ते नाग स्व-महोग्र[2]-रूप सोडून ९९
कृष्णा-स्कंधीं घेती चाप गमे हेल विशाल शरें भाला
प्रभुला नमुनि निवेदुनि नमिति पुन्हा सिंह जेविं शरभाला
गुण शर जोडुनि जेव्हां प्रभु[3] मांडुनि ठाण चाप आकर्षी
तें ध्यान पाहुनि जितं[4] कृष्णाचि न म्हणति समस्त नाकर्षी १०१
श्रीमूर्ति राज-मुद्रा नर कागद त्यांत सम ठसा हो तो
तो ध्यान-योग बुडतां सर्वांहि जडांसि कमठसा[5] होतो १०२
हृदयांत ध्यान तसें धरिलें सरहस्य[6] पाशुपत गा तें
जें काळातें जिंकी जेविं गरुड-तेज आशु पतंगातें[+] १०३
प्रभु दावुनि निज विजय-द सँदरिघ्न[7] ध्यान चाप चढऊनी
शर त्या सरींच टाकी कार्मुकहि महाऽस्त्र-मंत्र पढवूनी
विजयी व्हा जा ऐशी आज्ञा होतां महेश-पद नमुनी
होउनि कृतार्थ आले शिबिरासि पुन्हां प्रसन्न-वदन मुँनी[8]
प्रभुनें स्वप्नीं केला कृत-कृत्य सखा न लेश भागविला
इकडे दारुक गोष्टी सांगोनि प्रातरवधि[9] जागविला १०६

---

१ सहस्त्रमुख, २ नागर, ३ शिव, ४ जयजय, ५ कूर्मासारखा (उद्धारकर्ताअसा भाव) ६ मंत्ररहस्यसहवर्तमान, ७ सत्-अरि-घ्न, ८ नरनारायण, ९ प्रातःकालपर्यंत, + पक्ष्यातें.

प्रथम करी जप होम   ब्राम्हण पूजादि विहित जें कर्म
मग विश्वकर्म-निर्मित   भास्कर-भद्रासनीं बसे धर्म १०७
शुभ्रांऽवर मुक्ता धर   सित-चामर वीज्यमान शोभे तें
बहु राज-रत्न ओढुनि   घे शारद-पूर्ण-चंद्र-शोभेतें १०८
चंद्र कितिजसा धर्मा   न तसा कवि मानवे शतक्रतुला
मग तद्यशोऽमृताची   धरिल कसें मानवेश तत्क्र तुला १०९
ज्याचा प्रताप-रवि मधु-   कैटभ-तिमिरीं लव प्रभा वमला
तो प्रभु ज्याच्या द्वारीं   वाच्य न त्यांचा लव प्रभाव मला ११०
तों भूप-प्रभु कवची   खड्गी मणि-कुंडली युवा वंदी
द्वास्थ म्हणे प्रभु येतो   तो वेद स्तविति ज्या जसे बंदी १११
धर्म म्हणे त्यजिति जया   नमुनि कुल-धनादि भव-मदा ज्ञाते
प्रभु चरण दर्शन मला   द्याया इच्छिति कसे मदाऽज्ञा ते ११२
तिमिर-हत गर्तीच्छु कवण   रविच्या घालील आण वाजीतें
आणाहीं द्वास्थ तया   पूजा साहित्य आणवा जी तें ११३
येतां प्रभुचें धर्म   स्वकरें लागे सभाजन करूं ।
धन्य म्हणे यांजसि रघु-   पति बहुमाना सभाजनकराया १४
भक्तापुढें न मिरवी   तेज श्रीमूर्ति रवि सभाजी जी
दावी बहु विनय म्हणे   जरिहि ब्रम्हाऽदि कवि सभा जी जी
द्रुपद विराट वृकोदर   सात्यकि-इत्यादि सर्वही आले

१ तत्-यश-अमृताची-धर्मयशोमृताची, २ मानवश्रेष्ठ, ३ वजन करण्याची तुला, ४ धर्माचा, ५ द्वारपाल, ६ कुल-धन-तारुण्य आणि विद्या-यांपासून भव म्हणजे निर्माण होणारा जो मद त्यानें, ७ अंधकारामुळें आडलेला, ८ गमन करण्याविषयीं इच्छा करणारा, ९ पूजन-१० धर्माला, ११ रामचंद्रास बहुमानी अशा, १२ सत्कारी.

झाले कृतार्थ हरिला पाहुनि चंद्रा चकोरसे धाले ११६
धर्म म्हणे माधवजी भ्यालें मन करुनि बोध वळवा जी
व्यसनीं तरेल मंदर- सा जरि नाराल तो धवळ-वाजी ११७
कृष्ण म्हणे राजाजी कां भ्यालां विजय हा अ सामान्य
एका पुरा[2]ऽरि वांचुनि नाहींच जगत्त्रयीं असा मान्य ११८
ज्या पाहुनि स्मरहि म्हणति कृष्णाचि कृष्णोऽनुजा धव[3]लवाजी
तो धर्माला सर्वा- मार्गुनि येउनि नमी[4] धवल वाजी ११९
आलिंगुनि धर्म म्हणे वत्सा विजयो[5]ऽस्तका महा बाहो
मारिन जयद्रथ म्हणसि तरि सत्य तुझा स्त-काम हा बा हो
आश्चय मेधाविजया विजया होतोसि तूं करुनि आं[6]जी
कीं हा प्रसन्न बहु तव मुख-वर्ण असाहि अच्युताहि आजी
धर्मासि विजय सांगे स्वर्मीच्या अद्भुता अनुभवातें
नमिती क्षितिवरि ठेउनि शिर सर्व स-दे[7]वकी-जनु भवातें
किति म्हणति काय स्मरभी पुरवी आस्था पिनाकि-लीला हो
किति म्हणति एक हरि हर इतरीं हा स्थापिना कि[8]लीला हो १२३
धर्म म्हणे हूं अद्भुत करुनि मला आजि सम[9]र-सव दावा
काय इतर रस योगचि एक मला आजि-सम[10]ररस व दावा १२४
धर्म प्रेरित गेले ते भीमाऽदिक स्तो[11]पम रणाला
राम-प्रहित जसे दश- मुख-कटकाच्या स्[12]रोप मरणाला १२५

१श्वेताश्वअर्जुन, २शिव, ३ कृष्णा-अनुज्या-धव(पति)अर्जुन ४ नमा, ५ विजय-उत्कका, ६ युद्ध, ७ देवकीनंदनासह, ८ युक्तिला, ९ युद्धयज्ञ, १० युद्धतुल्यरस, ११ दवेतुल्य, १२ शर.

अध्याय. १

आश्रित[1]-वत्सलें मुकुंदें त्यजिला स्व-स्वामि[2]-भाव-सार थिता[3] १
प्रेमें श्रीहि न वरिली तैसी जैसी स्व[4]-दास-सारथिना १
सिद्ध करिति यन्नामें[5] ब्रम्हाऽदि सकल मनोरथास जुनीं[6]
तो प्रभु म्हणे पटु न मी दे पंचाऽक्षर[7] मनो-रथा सजुनी २
देव म्हणे अर्जुनजी व्हा सिद्ध रथस्थ तपन-कोपाऽर्थ[8]
तें कां न म्हणेल मनीं ब्रम्ह-पदाद्यऽर्थ तप नको पार्थ ३
करुनि प्रदक्षिण द्विज- वृंदासि रथासि तो कवि नयानें[9]
मग वेंघोनि[10] अधिष्ठी[11] जनकाऽकीं जेविं तोक विनयानें[12] ४
काय उणें त्यां[13] करि स- श्रीकृष्णा[14] ज्या निवास[15] विप्राऽशी[16]
कर्णांहीं[17] स्व स्तुतिस श्रीकृष्णाजानि[18] वासवि[19] प्राशी ५
झाला निज दासाचा ज्या स्तविति सुधीर विप्र तो दास
श्रीनलिनीचा[20] चक्र त्यजुनि धरि सुधी[21] रवि प्रतोदास[22] ६
पांसु[23]-निकरहि प्रभुच्या हेतु बहु प्रीतिचा बुकासाच
वाटे न को[illegible] जपला जगदीश चाबुका साच ७
अनुभवती रूपाची एक स्थिति एक हानि पट[24] सूत
तैसे हे कृष्ण सरवे एक रथी एक हा निपट[25] सूतें[26] ८
कृष्ण रथीं चढले मग तोहि चढे पुत्र सत्यकाचा[27] हो

१ आश्रिताविषयीं कृपालु अशा, २ धनीपणा, ३ तोकडा, ४ स्व-दासाचें सारथ्यपण, ५ यन्-नामें, ६ पुराणीं, ७ हे पंचाक्षरमंत्र, ८ सूर्यकोपार्थ, ९ नीतीनें, १० चढोनि, ११ बसे, १२ नम्रतेनें, १३ अर्जुनास, १४ कृष्णासह, १५ स्थान, १६ ब्राम्हणाच्या आशीर्वाद, १७ कानानीं १८ द्रौपदीपति, १९ अर्जुन, २० लक्ष्मीरूप कमलिनीचा, २१ चांगला बुद्धिमान्, २२ चाबुकास, २३ धूळी-समूह. २४ वस्त्र, २५ अत्यंत, २६ सारथी, २७ सात्यकी.

जेविं हर-रथीं विधि हरि दुसरा दृष्टांत सत्य कोंचा हो ९
अवलोकुनि सात्यकिला पार्थ म्हणे धर्मराज रक्षावा
सैंधव-वधाहुनि उणा न तुवां हा कार्यभाग लक्षावा १०
चिंता करूं नको तो कुरु-गुरु तेजें असो अनल सर हो
एक मजपुढें माधव तूं जा धर्मापुढें अनलस रहा ११
गेला तो धर्माला रक्षाया जेविं सत्यक-पित्याला
स्मरलोक्त राम-सेवा स्मरला पाहोनि सत्य-कपि त्याला १२
द्रोणें रचिला सैंधव- रक्षाऽर्थ व्यूहनायक-व्यूह
परमाऽर्थ रक्षण-क्षम अपराजित जेविं काय कव्यूह १३
चोविस कोस लांब व्यूह दहा कोस रुंद तो मागें
जेणें भिता न बाधों धावा पर[१०]काल जेविं सोमों[११]ऽगें १४
जिंकीसा कोणींहि न शास्त्रें शस्त्रें तपोनि धीरा जा
तो जपला अमृतरसा [१२]बहु शक्र तसा [१३]तपोनिधी राजा १५
सैंधव मागें दूर स्थापूनि व्यूह-गूढ-गर्भांत
होय पुढें पर कळकीं जाया दैव जेविं शक्र-दर्भांत १६
व्यूहापुढें स्वयें गुरु दुर्मर्षण त्यापुढें उभा राहे
मृग जैसा वाराया हरि[१५]ची तो वाट जिष्णुची पाहे १७
सेनाग्रीं वाजविती नर-नारायण सरवे दर[१६]-वरा जे
ते[१७] मोरसे भुजगसे ऐकोनि होउनि सखेद रव राजे १८

१कच्चा, २ जयद्रथ, ३अग्नि, ४ ससैवर, ५अर्जुन, ६ आलस्यरहित, ७ सावध, ७ कमीपानेंमागितलेली, ८ व्यूहश्रेष्ठव्यूह, ९ कवि-ऊह- कवितर्क, १० शत्रुरूपकाळ, ११ सोम-अग-अमृतचखानें, १२ द्रोण, १३ जयद्रथास, १४ दावानळ, १५ सिंहाची. १६ शंखश्रेष्ठा, १७ नरनारायण.

रोमांच-कंचुकाला कडकडतां कृष्ण-कंबु केपिल्याला.
पर सोडी भानाला सिंह-रवें जेविं जंबुक पिल्याला १९
बहु गज हय हगति मुतति दे शंख-स्फुरण तें विपत्तीतें
श्री-नृहरि-नाम-गर्जन भूतातें होय तेविं पत्तीतें २०
ज्याचे निवात-कवचा घोऽरूर बला निपट म्हणति शार दृश्य
त्या दुर्मर्षण-बल किति गर्जुनि पिववील वायु शरदऽभ्र २१
अर्जुन-बाण-समूहें दुर्मर्षण-कटक सर्व भंगे तें
जरि विजय-शक्तितें पर रोधिल सेकेंतहि सेतु गंगेतें २२
दुःशासन होय पुढें दुर्मर्षण त्याचि भग्नहि रणांत
खद्योत-तेज उरतें कांहींतरि काय अर्क-किरणांत २३
दुःशासन शीघ्र पळे जाणों गिरिवरुनि दगड तो घसरे
गुरुवरि जाय कपि-ध्वज जेविं पुढें मथुनि सेतु ओघ सरे २४
कृष्णाऽनुमतें अंजलि जोडुनि अर्जुन म्हणे अहो गुरुजी
स्वस्त्यऽस्तु म्हणा या मज शिष्या आशी जयप्रदा गुरु जी २५
पांडुसम युधिष्ठिरसम [illegible] तुम्ही त्रिनेत्रसम[10] मंडित[11]
करिल प्रसाद तुमचा जेविं तसें नाकनाथ[12] न मम हित २६
प्रेम असा मान्य करी गुरुराज दयालु जनक-सामान्य
तें न स्मरेल जो तो होईल कृतघ्न जन कसा मान्य २७
या दुर्भेद्य-व्यूहीं इच्छितसें आजि मी शिरायास

१ मारुति, २ पायदळास, ३ तुच्छ, ४ शरत्-अभ्र- शरदृतूंतील अभ्र- मेघ, ५ वाळू
चा, ६ बांध, ७ ज्याचे ध्वजीं मारुति आहे असा अर्जुन, ८ [illegible], ९ मोठी, १० शंकरा
समान, ११ पूज्य, १२ इंद्र.

तुमच्या प्रसाद नसतां होइल माझा वृथा चिराऽयास २८
अश्वत्थामा तैसा सैंधव वध पणहि हाहि राखावा
कीं भंगतां प्रतिज्ञा मान-धनें अग्नि वीं हिरा खावा २९
हांसोनि द्रोण म्हणे पार्था मजला न जिंकितां आजी
जिंकावया जयद्रथ शक्य नव्हे मज-सवें करीं आजी ३०
ऐसें वदोनि मार्गण-वृष्टि तयावरि महातपा[3] सोडी
जैशी-आटोपाया मत्त-गज-शिरीं महान[4] पासोडी ३१
तो अर्जुन गुरु-कार्मुक खंडाया बाण निज गुणीं जोडी
तें जाणोनि गुरु प्रभु गांडीवाच्याचि त्या गुणा तोडी ३२
जोडुनि गुण पार्थ करी कुरु-सेना-पाल-विप्र[+]-कट कांऽता
कीं गुरु-पराभवेंही कुरुसेना पालवि[5] प्रकट कांता ३३
त्या दोहीं कृष्णावरि गुरु खवळे जेविं देव कीनाश[6]
बहुधा म्हणे दृथेसह शोकें पावोचि देवकी नाश ३४
द्रोण करी नाराचें क्षत वक्षीं जेविं तक्षक रदानें[7]
कांपे क्षण जो[8] भीता रक्षाया परम दक्ष करदानें[9] ३५
धैर्य धरुनि गुरुवरि शर सोडी श्वेताऽश्व जेविं कुपितांही[10]
हर्षे द्रोण न कोपे पुत्रो-त्कर्षे कुंटे[11]-न कु-पिताही ३६
जो योजिला गुरुनें सर्वहि तो कृष्ण-रक्त सायक पी
ज्याच्या वैजीं[12] प्रसादें खाती ब्रम्हाऽद्यऽलभ्य साय कपी ३७

---

१ किंवा, २ युद्ध, ३ मोठें आहे न तप ज्याचें असा द्रोण, ४ शापडी, ५ हाकामारी, ६ यम, ७ दंतानें, ८ कृष्ण, ९ हानदेण्यानें, १० क्रुद्धसर्प, ११ दुःखनमानी, १२ गो कुळीं, + द्रोणाच्यासैन्याचाअंत (नाश)

गुरु-शर पडति नर-रथीं नव जलजीं[1] जेविं भृंग सु-रसोऽर्थ[2]
कीं त्या सु-यज्ञ[3]-वाटीं शिरला घ्याया स्वभाग सुर-सार्थ[4] ३८
केशव म्हणे सख्या हा गुरु सोडुनि मुख्य कार्य साधावें
सैंधव वधार्थ सत्वर नियत शिवाऽर्चोऽर्थ[5] आर्यसा धावें ३९
पार्थ म्हणे सूचविलें समयीं हित उचित काय तुज वाहूं
चाल सख्या लवकरि हा कुरुसेना-पाल घाल उजवा हूं ४०
गुरुतें प्रदक्षिणा करुनि रथ काढी वासुदेव वेगानें
नच म्हणितलें जयाच्या किमपि यशाच्या न देववे गानें ४१
जातां गुरुवरि सोडी शर नर होऊनियां परावृत्त[6]
असुरा अमृत तसें बहु दुर्लभ ज्या-साधुचें[7] परा वृत्त ४२
द्रोण म्हणे रे अर्जुन कोठें जातोसि कां निसरलास
शत्रुस न जिंकितां तूं निघसी कीं या पणा विसरलास ४३
पार्थ म्हणे शत्रु न तूं माझा गुरुराज बा दयालो कीं
जोडील कोण समरीं तुज जिंकुनि साधुवाद[8] या लोकीं ४४
ऐसें बोलोनि निघे अति सत्वर सिंधुराज-वध-कर्मा[9]
त्या अयुत-बळें रोधिति जय कांबोज श्रुतायु कृतवर्मा ४५
त्या कटकातें मथितां गांठी कुरु-गुरु पुन्हाहि परि त्यांतें[10]
सोडी पार्थ महा-मति कालः[11]विलंबाऽर्थ युद्ध करित्यानें ४६
कृतवर्म्यासीं झटतां देव म्हणे चाल करुनि मथना नें

१ नूतनकमलावर, २ उत्तमरसाकरतां, ३ उत्तमयज्ञमंडपीं, ४ देवतासमूह, ५ शिवपूजाऽर्थ, ६ पराभूत, ७ द्रोणाचें, ८ शाबासकी, ९ जयद्रथाचा वधकरण्याचें च आहे कर्म ज्याचें असा अर्जुन, १० द्रोणातें, ११ कालक्षेपकरण्याकरितां.

आणू नकोचि चित्तीं त्याही हें त्यजुनि धर्म-पथ नातें ४७
मोहुनि भोज निघे कीं प्रभु वरिच्या वरि म्हणे सख्या निघ रे
शिरतां नर द्रवे पर- बल ऐकें घनहि घृत जसें विघरे ४८
पांचाल उत्तमौजा चक्रत्राता दुजा युधामन्यु
त्यां गांठी भोज जसा गत-सत्संगा[2] तपीं बुधा मन्यु[3] ४९
व्याली ज्याला वरुणा- पासूनि नदी प्रसिद्ध पर्णाशा[4]
जेणें पूर्ण न केली स्व परि भवें शत्रुचीच कर्णाशा[5] ५०
पर्णाशा प्रार्थी बहु ज्या अमर करा वरें असें वरुणा
ज्याला मंत्रपुरस्कृत[6] सु-गदा देउनि पिता करी करुणा ५१
ज्यासि म्हणे वरुण तरणि[7] होउनि अरि-[illegible]ंत तारील
युद्ध न करि त्यावरि जरि सोडिसिल गदा तुलाचि मारील ५२
तो धावला श्रुतायुध- राजा भीमाऽनुजासि वाराया
होउनि विरथ स्व गदा सोडी नारायणासि माराया ५३
जें भक्ष्य[8]-भ्रांत्याऽगत- मूषीतें भय महा भुजग देतें
त्या वरुण-सुत-नृपाच्या देता झाला महाभुज गदेतें ५४
जसि योजितां अविषयीं कृत्या तसि ती महागदा परते
मारी श्रुतायुधाला सर्व भयें भंगले तदा पर ते ५५
मग कांबोज-सुदक्षिण नृप वधिला जेविं सिंह शरभानें
हरिति शिरें बहुतांचीं जैसीं तैसींच पार्थ[9]-शर भानें ५६

१ सूर्यतेजें, २ गत-सत्-संग= गेला आहे साधुसंग ज्यापासून अशा, ३ कोप, ४ नामविशेष नदी, ५ श्रवणेच्छा, ६ मंत्रपूर्वक, ७ नौका, ८ भक्ष्य- भ्रांति- आगत-मूषी= भक्षणाच्या आशेनें आल्याउंदरीस, ९ अर्जुन.

हाणी श्रुतायुराजा समरीं रक्तप्रपाऽर्थ[1] तोमर तो
मोहे प्रभुही जाणों वदला नवदोनि पार्थ[2] तो मरतो ५७
तद्बंधु अच्युतायुहि हाणी शूलें करूनि सितवाहा
देव म्हणे बा सावध हो देइल हर्ष मोह कितवा[3] हा ५८
उठतां वाटे आला जाऊनि प्रेत-राज-सदनातें[4]
वारा घालूनि पुसी प्रभु वारंवार मित्र-वदनातें ५९
गमले स्व काळिजा अहि डसले शर शौरिच्या शरीरा जे
विजया निज नयन-युगीं कण[5] दोघे बंधु ते शरी[6] राजे ६०
दावी विकलत्व प्रभु जो कांहीं कौतुकेंचि कोपाऽर्थ
ऐंद्राऽस्त्रें कटकासह करि दोघांचेंहि भस्म तो पार्थ ६१
नियुतायु एक दुसरा दीर्घायु कुमार वीर जे त्यांचे
तेही वधिले विजयें राहों न दिलेचि धीर जेत्यांचे[7] ६२
वेष्टिति अंग कलिंग प्राच्य[8] असे बहुत भूप कोपानें
ते दंडिले नरानें जेविं स्व-पशु प्रमत्त गोपानें ६३
पार्थ प्रवर्तवी पर- बल मर्दुनि शोणितोऽपगेला[9] हो
जैसा वर्षा कालीं तैसाचि क्षोणिताप गेला हो ६४
प्रभुसि गदेनें हाणी तो अंबष्ठ-श्रुतायु[10] जगदीशा
हृदयीं धन्य म्हणे त्या विजय ध्वज-निलय वायुज[11] गदीशा
नरें[12] त्या गदेशि खंडी जों तो धांवे धरूनि दुसरीतें

१ रक्ताचीपोईहोण्याकारितां, २ अर्जुना, ३ कपट्यास, ४ यमगृहातें, ५ रजःकण ६ बाण धरणारे, ७ जयशीलांचे, ८ पूर्वदेशाचेराजे, ९ शोणित-आपगा-रक्तनदीला, १० अंबष्ठदेशाचाराजाश्रुतायु, ११ वायुपुत्रमारुति, १२ अर्जुन.

आला गमे नदीचा लोंटाचि पुढें करूनि सुसरीतें ६६
ताडी आधीं प्रभुला मग पार्थाला पुनः पुन्हा रागें
अद्भुत तें चावावें गरुड-गुह-शिखी बळें जसे नागें ६७
जसि गति घटकेर्णाची करि पुरवाया स्व काम राम रणीं
झाली प्राप्त तसिच त्या पार्थापासूनि पामरा मरणीं ६८
शिरतां विजय बहु करी दुर्योधन कटक तें विकळ-पातें
शिववील न प्रवेशें हरिणाच्या हरिहि तेवि कळपातें ६९
व्यूहीं शिरतां अर्जुन दुर्योधन निज मनीं म्हणे हाय
जाय द्रोणा-पासीं नमुनि म्हणे त्यासि हें बरें काय ७०
तो तुज-समक्ष कैसा शिरला व्यूहीं शिरो नये वातें
तेजें अलंघ्य कीं तूं आचार्या वासवादि-देवातें ७१
भ्याले सर्वहि योद्धे पार्था हरि जेविं वध-परा शरभा
आम्हां न सोसवे नर- रथ-भा जसि राक्षसा पराशर-भा
दिधलें जयद्रथाला अभय व्यूहीं सिता ऽश्व शिर कावेला
रक्षोचित प्रतिज्ञा- वच न तसें धन कलत्र शिर कविला
विश्वास-घातकी हा लावियला लांचि पाप डाग मला
अभयद जयद्रथा तव- कर माथां जेविं पायडा गमला ७४
मद्धि-प्रिय-रत धर्म- प्रिय-रत तूं स्पष्ट आजि कळलास
मज पोषित्या विष-फळें अमृत-फळें मदहितार्थ फळलास ७५
तूं मधुनें सारविला केवळ वरि मात्र गोडवा खरची

१ मगरीतें, २ कुंभकर्णाची, ३ मूर्छित, ४ पराशराचें तेज, ५ ज्ञात्याला,
+ "अमृत-फळें मदहितास फळलास." असाही एक पाठ आहे.

जो गुण करी तयाचें अरि-वश होउनि अनिष्ट वाख रची ७६
खेदें प्रलाप केला गुरुजी चित्तीं धरूं नका पावा
रक्षा सैंधव आपण लाउनि पोषुनि तरू न कापावा ७७
द्रोण म्हणे तूं अश्व- त्थामासा हें न अन्यथा नातें
सेवीं गुरु मातेच्या विद्या-रूपा न अन्य थानातें ७८
कोप नसेचि तुझा मज सांगतसें सत्य मी न वंचकसा
माझा धनंजयाचा होइल तुल्य प्रताप-संच कसा ७९
मी वृद्ध रथी सारथि नर नारायण सखे तरुण भाते
अक्षय लक्षयशोधन- जनसंस्तुत रथ तुरंग धनु या ते ८०
बा सोडिले शर पुढें जे जे त्या अर्जुनें महाभागें
वेगाऽतिशयें पडती ते एक क्रोश तद्रथामागें ८१
हय-बल बहु कृष्णाचें निपुणपणाहि बहु न सांगवे गा तें
न तसा संचहि सोसिल- हि प्रवयाचें न आंग वेगातें ८२
व्यूहाचें सुख सोडुनि त्यामागें म्यां वृथा न लागावें
वदलों धर्म धरिनि तें करिनि मग तुम्हीं न कां मला गावें
करि ां युद्ध धनंजय उजवें घालूनि हात जोडूनी
गेला न जिंकितां मज बहु होकरितांहि शीघ्र सोडूनी ८४
अर्जुन शिरला व्यूहीं त्या मागें धर्म सांपडेल मला

१ ठकाप्रमाणें, २ जोडा, ३ यश च आहे धन ज्यांचें अशा लक्ष जनांनीं उत्तम प्रकारें करून स्तुत असा (त्याचें विशेषण.) ४ तत्-रथ-अर्जुनाच्या रथामागें (त्याच्या रथाचा वेग बाणापेक्षांही अधिक होता म्हणून तो बाणाच्या पुढें जाई असा भाव) ५ व्यूहाचें, ६ हटकितांही.

सुख[1] साध्य यक्षे[2]राज-त्यक्त निधि जसा तसाचि तो गमला ८५
मी जातों धर्मावरि तूं जा त्या पांडवास[3] वाराया
हाय सु दुःसह जीवित[4]-निस्पृह-जन-कांड वासवा[5] राया[6] ८६
भूप म्हणे इच्छावा बाळें घ्याया सुधांशु[7] उडुनि करें
तैसें हे गुरुजि कसा जिंकावा चंडभानु[8] उडुनिकरें[9] ८७
हें न घडेल न म्हणावे धरिता झाला धरेसि दर्भ कसा
रक्षावें यश आपण हा शिष्य करिल गुरूक्त[10] अर्भकसा
द्रोण म्हणे कुरुराजा पार्थ दुराधर्ष[11] सत्य परि त्यातें
तूं रोधिशील माझ्या सामर्थ्यें सैंधवांत[12] करित्यातें ८९
होशील त्या प्रवाहा पर्वत तूं मी नव्हे अलीकवचा[13]
तुज लेववितों तें ज्या दृढता वज्राहुनी भली कवचा ९०
घे कवच अ-भेद्य सुरा ऽसुर-नर-सर्वाऽस्त्र-शस्त्र-वृष्टीनें
श्रीशुक वैराग्य जसें रंभादि स्त्रीप्रकांड[14]-दृष्टीनें ९१
श्रीगुरुनें लेवविलें नव कनक-कवच जपोनि मंत्रास
जें अरिचा हारि[15] सत्पद-रज मृतिचा[16] जेविं सर्व संत्रास ९२
द्रोण म्हणे वृत्रासुर या-सामर्थ्येंचि जिष्णुनें[17] मथिला
साक्षाद्रुद्रेंचि[18] कवच-धारण-मंत्र-प्रयोग हा कथिला ९३

१ सुखानें साध्य (सहजी मिळण्यासारखा.) २ कुबेरानें टाकलेला. ३ अर्जुनास, ४ जीविताविषयीं निस्पृह जो जन त्याचा शर (जीवावर उदार झालेल्याचा बाण असा भाव.) ५ इंद्रास, ६ दुर्योधना, ७ चंद्र, ८ सूर्य, ९ नक्षत्रसमूहें, १० गुरु, उक्त-वडिलांचें भाषण, ११ दुर्-आधर्ष-निवारण्यास अशक्य, १२ जयद्रथाचा अंत, १३ मिथ्यावादी (सकारांत शब्द) १४ रंभादिक रूपउत्तम स्त्रियांच्या नजरेनें, १५ हरणकरी, १६ मृत्यूचा, १७ इंद्रानें, १८ साक्षात् रुद्रेंचि.

हरिपासुनि जोडुनि दे हें विद्या सु-धन अंगिरा[1] जीवा[2]
तो अग्निवेश्य[3]-गुरूला ह्रद[4] जीवन जेविं सगिरा[5]जीवा १४
लेवविलें तुज म्यां हें कौतुक दाविल अभेद्य कव[6]च रणीं
ऐसें ऐकुनि गुरुच्या घाली निघतां नृपाल कव चरणीं १५
जाय सुयोधन वारुनि पार्थातें सिंधुराज रारवाया
स्पर्शे युधिष्ठिर-चमू व्यूहा जसि सिंधुरा[7] जरा खाया १६

अध्याय. १०

मारुति सात्यकि धृष्ट- द्युम्न तसे कुरु-बळासि तुडवीती
कुरु-पति-राष्ट्रासि जसे दुष्काळ व्याधि चोर बुडवीती १
द्रोण न थांरे[9] क्षण पर- कटकांत जसा न रुद्र थारावा
तच्चाप-रवा पांडव भीति जसे अहि गरुडध्थारावा[10] २
द्रोण क्षत्रिय-हृदया बहु जैसी भीति रामें[11] दे वधुनी
करि पूर्ण सेवित्यांचे रक्त-नदी जेविं काम देवें-धुनी[12] ३
शत-संख्य नाचले त्या अद्भुत-समरोत्सवीं[13] भट कबंध
वातें घनसा द्रोणें धर्माचा भेदिला कटकबंध ४
रक्त-नदींत बुडाले गज मग गेले न कोण वाहोन

१ बृहस्पतीचा बाप, २ बृहस्पतीला, ३ द्रोणाचे गुरुला, ४ डोह , ५ संगकर्त्याकमलास, ६ मिठी, ७ गजास, ८ हृद्दशा, ९ टिके (स्थिर न होय) १० गरुडध्थ-आराव-गरुडाच्या शब्दास, ११ परशुराम, १२ देव-नदी; भागीरथी, १३ व्यूहरचना; + बृहस्पती.

गमला गोवर्धन-नग- वर्षि-घन-समूह शोण-वाहोन ५
द्रोण-रण विलोकुनि स्मर सिद्ध स्मरती तदा पिनाकि-रणा
म्हणती दापिल काळा हा रविच्या काय दीपिना किरणा
गांठी धृष्टद्युम्न द्रोणाला राहु जेंवि रविला हो
सिकताऽद्रि नदेसा तो वाटे त्या बाहुजें विरविला हो ७
भिडवूनि हयांसीं हय घेउनि तेजस्वि चर्म करवाली
तो स्व रथा-वरुनि उडे जैसा समरोग्रकर्मकर वाली ८
द्रोणावरि झड घाली तो जेंवि श्येन आमिषा नेयां
कौरव म्हणती बहुधा काळचि हरणार या मिषानें यां ९
चढतां युगीं हयांच्या पृष्ठींहि क्षिप्र सर्व विभ्रम या
पाहुनि पर पृथ्वी-पति झाले परि पावला न विप्र भया १०
खंडुनि असि चर्म रथहि मर्मीं सर्वत्र विंधुनि करानें
घेउनि खर शर जोडी चापीं तो शक्तिसिंधु निकरानें ११
प्राण हरावेचि म्हणुनि जो प्रखरतरोऽशुगासि गुरु सोडी
तो तात्काळ चतुर्दश- बाणांहीं त्यांसि सात्यकी तोडी १२
सात्यकिला षड्विंशति शर हाणी द्रोण तो महा कोपी
तो माधव तितुकेचि प्रखर शर गुरुस्तनांऽतरीं वोपी १३
तों वीरांला राजा- धर्म म्हणे सैन्यपाल पळवा हो
सात्यकि-रण-प्रवाहीं पडला गुरु हा असाचि पळ वाहो १४

१ शोण-वाह-ऊन- रक्ताइकजोद्रोणाच्याहूनकमी, २ शिवाच्यायुद्धास, ३ दिव्याविना, ४ वाळूच्या पर्वत, ५ क्षत्रियें (धृष्टद्युम्नानें) ६ ढाल, ७ तरवार, ८ समर-उग्र-कर्म-कर-रणांगणींउग्रकर्मकरणाराअसा, ९ नामविशेष, १० नेण्याकरितां, ११ द्रोणास, १२ बलसमुद्र असाजोद्रोण, १३ मोठ्याकठीनबाणास, १४ बाणास, १५ सात्यकी, १६ सेनापतिसात्यकी, १७ पळभर.

बळेंप पळविला तें गुरु दावी भृगुवीरेसा समर सरणी
किति म्हणति देखिलाचि न यामागें या-रसांसम रस रणीं १५
शैनेय म्हणे सूता द्रोणावरि नीट वोह हाक रणीं
करित नसे विप्राची धृत-पर-धर्म-प्रवाह हा करणी १६
षट्कर्मींच असावें नित्य रत ब्राम्हणें अ-घात-रतें
क्षत्रें स्व धर्म-युद्धा ऽनुष्ठानें सर्वथा अघा तरतें १७
सात्यकिसीं द्रोणासीं होय महा युद्ध तेधवां कविला
वाटे तद्बाण-निहत- कटक शव-भरें अहींद्र वांकविला १८
इषुनीं झांकुनि घेती ते करुनि च्छत्र केत विध्वस्त
तो अ-प्रेकाश त्यांचा आप्त-कुमुद-खेद हेतु विध्वस्त १९
सात्यकिनें कुरु-गुरुचीं[11] कोदंडें खंडिलीं रणीं सोळा
त्या समर-चमत्कारें केले ब्रम्हाऽदि-सुर नभीं गोळा २०
शिष्यांच्या[12] शिष्योला[13] तो गुरु-वर बहु मनांत मानवला
का नवलास नव्हे घट- कर्ण-गलीं[14] जरि बसेल कानवला[15] २१
गुरु-योजित सर्वाऽस्त्र प्रत्यस्त्रें सात्यकि स्वयें शमवी
रमवी सत्सुर-दृष्टिसि वमवी मद अहित-दृष्टिसी भ्रमवी
करितां गुरु शर-पटलें दिन-कर-तेजोविनाश-तम खवळे[16]
सात्यकिकडे मनें विज- याऽर्थ विनविल्याविना शतमख[17] वळे
गुरु सात्यकि रक्षाया धरुनि स्फुधैर्याऽयुधा बहुतरा जे

१ सेनापति सात्यकी, २ भार्गवरामसा, ३ युद्धरीति, ४ युद्धरूपरसासारखा, ५ घोडे, ६ पदातिस, ७ अहि-इंद्र-शेष, ८ मग्न, ९ अदर्शन, १० विधु-अस्त-चंद्रास्त, ११ द्रोणाचीं, १२ अर्जुनाच्या, १३ सात्यकिला, १४ कुंभकर्णाच्या गळ्यांत, १५ पक्वान्नविशेष, १६ वाढे, १७ इंद्र.

भिडले झाले शस्त्र- ज्वलनीं न करुनि विलंब हुत[1] राजे २४
हरिनें जेविं नराचा अरुणें रथ पळविला न तपनाचा[2]
मुनि म्हणति परस्पर हें पाहुनि झालेंचि सफळ तप नाचा
अरि एक क्रोश पुढें लक्षुनि ज्या ज्या शरा विजय सोडी
क्रोश पुढें गेल्यावरि मागें तो तो तदीय शिर तोडी २६
तो कीं सूत मिरविला निळ-भरहि जयापुढें न वेग मनें
रविचे उणे गुणें हय जिंकितिल कवण तयां नवे गमनें २७
विंदाऽनुविंद ताडिति पार्थासि जसे तसेचि गोविंदा
विरथ करुनि अनुविंदा मारी लोकैकवीर[4] तो विंदा २८
ताडी भाळीं त्यातें कोपें अनुविंद तो गदा घातें
ज्याचें चरण- स्मरणचि नाशी बहु नरक-भोग-दाऽघातें
अनुविंद-बाहु-मस्तक खंडन केलें पळें सिताऽश्वानें
नर-कीर्ति नर बळें जरि हरितिल हरिंची[+] बळें सिता[10] श्वानें[11]
श्वश्रू[12]-करजेविं शिरें गेहीं जरि न म्हणती स्नुना सीर
व्यूहीं तेविं कुरु-चमू धिक्कारुनि तो धरा-स्नुनासीर[13] ३१
श्रमला जयद्रथाच्या जायासि न शक्त हीं निकट कांहीं
हें योजुनि वेढियला पार्थ करायासि हानि कटकांहीं ३२
त्या समयीं पार्थ म्हणे देवा संश्रित-शफ़ोंऽ[15] करा वाजी
श्रमले कीं श्रम-शमना घडि भरि तरि रथ उभा करावा जी

१ दग्ध, २ सूर्याचा, ३ शत्रूंचें, ४ लोक-एक-वीर-वीरश्रेष्ठ अर्जुन, ५ कपाळीं, ६ कृष्णानें, ७ नरकभोग देणाऱ्या पातकातें, ८ अर्जुनानें, ९ अर्जुनाची कीर्ती, १० स्त्री, ११ कुतरीं, १२ सासू वाहात, १३ पृथ्वींद्र, अर्जुन, १४ अर्जुन, १५ संश्रितांच्या कल्याणाची खाण जो तूं, (संबोधनार्थीं) + सिंहाची.

कृष्णा म्हणे माझ्याही हेंचि मनीं लोळवीन हे वाजी
लोळिव तूंहि कुरु-चमू बा करितें तुजसवेंहि हेवा जी ३४
उतरे रथावरुनि नर पळवी कुरु-कटक कृत-पराभव तें
करि निर्मनुष्य मंडळ तो एक क्रोश आपणा-भवतें ३५
स्वस्थ-स्यांतें क्रीडे कुरु-बळ-पंकज-वनांत पार्थ-करी
मंत्र-बळें सु-सरोवर निर्मुनि शर-गृह अनातपाऽर्थ करी ३६
शर जेविं किरण भवते जें कौरव-कटक तेंचि परिवेष
रविच कवि-मतें अर्जुन तेजें सूर्योंहि भिन्न परि वेष ३७
निःशंक कुरु-बळीं नर जेविं हरि-शताऽवृतींहि शरभ वनीं
पर्वीं शिवाऽलयींसा शिरला देवर्षि शीघ्र शर-भवनीं ३८
प्रभुनें मुक्त करुनि हय चुचकारुनियां हळूच कौशल्यें
निज-बोधें श्रित-हृद्गत दुःखेंसीं सकळ काढिलीं शल्यें ३९
अश्व पर-शरांहीं भव तापांहीं जेविं दास पोळविले
ते देवें भक्ति-रसें जायों स्व-चरण-रजांत लोळविले ४०
देवर्षि मुखीं घालुनि बोट म्हणे हां सुयोधना कुटिला
भक्ति-बळेंचि पहा हा परमेश्वर आजि अर्जुनें लुटिला ४१
ज्याचें पद-नख दासां जें सुख दे तापल्या न तें विधु तो
भगवान् स्वयें अहा या विजय-हयां सत्पदास तेंवि धुतो
आम्ही दत्ततेसे गुण गुरु लघु हो वर्जुना नरा बावा

१स्पर्धा, २ पराभूत केलेलें (कौरवसैन्य) ३ स्वस्थमनानें, ४ कौरवसैन्यरूपकमलवनामध्यें, ५अर्जुनरूपहस्ती ६ अन-आतप-अर्थ-छायार्थ, ७ परिधि, ८ निराळा, वेगळा, ९ पर्वकाळांत, १० नारद, ११ शरगृहीं, १२ आत्मबोधें, १३ आश्रितांच्याहृदयांतलीं, १४ उद्गार, १५ दत्तात्रेयासारखे.

तूं धन्य योध[*] नातरि यापरि हा अर्जुना न राबावा[1] ४३

ज्याच्या श्री पद-दास्यें पावे तोखे[2] सदा रमा जाया
हरि[4] तो मना नराचा होउनि तो खासदार मोजा या ४४

पुरुषाऽर्थद ते केले दास-हय-हितोदया-कर खरारे
झालासि दास-दास प्रभुही तूं बा दयाकर खरा रे ४५

सुखद स्पर्श श्रीच्या बहुधा न हयसम स्तनाचा या
हें यश गाउनि शिवसा लागेल सुधी समस्त नाचाया ४६

प्रेमें माता बाळा न्हाणी कीं भक्त शंभुच्या लिंगा
तैसाचि नर-हयां हरि कवि हो याचेंचि पाय आलिंगा ४७

ओषध सु-चणक[5] कल्पी पीत-पट पसाहि तोबरा माप
श्रित-साहित्य कराया न बरा मंदार[6] तो बरा मा-प[7] ४८

हरि हरित-तृणीं[8] चारी तो प्रभु ज्याचा प्रताप दुर्वार[9]
हरि हरि तईं करिति पद देउनि गणपति-शिरींहि दुर्वा रें[10]

तोक-तृषा[+] शमना कीं क्षाळाया तात[11] तोक-मल पाणी[12]
प्यायाचेंही वेची करि न पिउनि तोंवि तो कमल-पाणी ५०

उच्चैःश्रवा[13] म्हणावा पार्थाच्या का न नीच तुरगानीं
त्या पूजी तो[14] ज्याचें यश नंदन-काननीं चतुर-गानीं[15] ५१

योजुनि तुरग-वर रथीं आपण कुरु-बल पहात देव रिघे
मग विजयातें मर्दुनि रडवाया खलप[16] हात दे वरि घे ५२

---

१ खपावा, २ संतोषानें, ३ माझ्या, ४ श्रीकृष्णास, ५ चांगले हरभरे, ६ कल्पतरु, ७ लक्ष्मीपती, ८ हिरव्यागवतांत, ९ दुर्धर्ष, १० रुदन, ११ बाप, १२ उदक, १३ इंद्राचाघोडा, १४ कृष्ण, १५ चतुरांच्यागाण्यांत, १६ खळपति, + अपत्याचीतहान, ✳ योद्धा.

चालवितां प्रभुनें तो गरुडें त्नाविला तसाचि रथ वातें
फाटे पर-बल वाटे तमचि कनक-कशिपु-वक्ष[1] अथवा तें ५३
वेदासि नास्तिक तसे गेले पार्थासि भिरु[2] सोडुनी
मोडुनि धर्म-सन्नेय-[3] मर्यादा प्राज्य[4] पाप जोडुनी ५४
नद सिंधुपासुनि नरा- पासुनि पर परतले न माघारे
सुर म्हणति भला क्रीडा करिसी शात्रव-[5]शशांत बाघा रे
कुरु-कटक-राहु-वदना- आंतुनि ते कृष्ण[6] रवि शशी सुटले
कीं ते मकर-व्यूहचि जाळ[7]सु-भट-तंतु तटतटां तुटले ५६
कृष्ण जयद्रथ पाहुनि होति सुखी जेविं यज्ञ-वाट[8] सुर
मरु-धन्व-देश-मार्गीं[9] जैसे प्राशूनि तोय वाटसुर ५७
गज गांठिला हरींनीं[11] तुडउनि गेला मदांऽध पुच्छातें
तुच्छातें बहु मानिति तृषित मधुप[12] जेविं कुटज-गुच्छा[13] तें ५८
श्वेताऽश्व म्हणे न शकुन झाले या आजि सा[14]-रथा बरवे
प्रभुजी म्हणा सुदृष्टी तरिहि पहा आजि-सार[15] थांब रवे ५९
म्यां वाहिला प्रभु-पदीं तो जिंकिल आजि सा रथा बेल
जरि भानु बहु-द्रष्टा देखाया आजि-सार थांबेल ६०
देशिल जयद्रथा तूं मरुनि अयश आजि सा रथा नीचा
देवीच्या[16] पदराला टाकिल हा आजि-सार थानींच्या[17] ६१
विजय असा हर्षे तों दुर्योधन होय आडवा राया

१ हिरण्यकशिपूचें हृदय, २ भित्रे, ३ धर्मआणिसुनीतीचीमर्यादा, ४ बहु, ५ शत्रुरूप सशांत, ६ कृष्णार्जुन, ७ जाळें, ८ यज्ञमंडप, ९ मारवाडदेशाचेमार्गांत, १० पांथ, ११ सिंहांनीं, १२ भ्रमर, १३ कुड्याच्याफुलांच्याघसुबक्यास, १४ सहारथ्यांस, १५ युद्धसामर्थ्य, १६ देवांऽगनाच्या, १७ स्तनावरच्या, + हे सूर्या, ⁂ सर्वपहाणारा, ✳ सुनयन.

विघ्नेहरा[१] विघ्न जसा किंवा उदधीस ओड[२] वाराया ६२
कृष्ण म्हणे कौंतेया श्रीमद्रुद्रापुढें[३] जसा मार[४]
आला पुरुष-व्याघ्रा[५] दुर्योधन मूढ हा ससा मार ६३
तुज हा वराक[६] बाहे[७] तरि हरि मरणाऽर्थ कां न बाहु रुरु[८]
घालुनि गांठि अधर्महि धर्माची करिल कां न बा हुरुरु+ ६४
मरणार्थ बाहतो हा तुज नर-सिंहास मस्त बकरा गा
करितील मराळाचें[९] काय धरुनिही समस्त बक[१०] रागा ६५
झाला धनंजयाला मान्य अभिप्राय हाटक-पटाचा[११]
त्या वाटे सोडावा खल रू-नृपा जेविं हाट[१२] कपटाचा ६६
कुरु-पति-रथाऽभिमुख रथ चालवितां नीट लोक-नाथानें
कटकें न रोधिति जसीं रंभेचीं रुक-विलोकना थानें ६७
पार्थावरि नृप उठतां कुरु-सेना वि-प्रभा[१३] वदे हा हा
होसी पतंग दीपीं तुमजुनि तेज-प्रभाव देहा हा ६८
भूप म्हणे कां भ्याला भट हो माझा प्रताप हात पहा
पर-जीवन निःशेष प्राशील प्रलय-भास्वदा[१४]ऽतप हा ६९
जाणा म्यां कृष्ण सख्या पार्थासह आजि हरुनि मूढ वधिला
पावेल भुज-बळें नर न जलधिच्या तेविं तरुनि मदवधिला[१५]
पार्थाहि म्हणे जरि तूं वीर्यें झालासि पांडुच्या पाहूं
शस्त्राऽस्त्र-बळ तुझें दे यश शारद-चंद्र[१६]-पांडु चापा हूं ७१

१ विनायकास, २ कूप, ३ श्रीमत्-रुद्र-श्रीमत्शंकर, ४ मदन, ५ पुरुषश्रेष्ठा, ६ नीच, ७ बलावी, ८ रोही-हरिण, ९ हंसाचें, १० पक्षिविशेष,बगळे, ११ रुवर्णासारिखा पीतपट,ज्याचा अशा कृष्णाचा, १२ बाजार, १३ कांतिहीन, १४ प्रलयकालचे सूर्यापेक्षा(?), १५ मत्-अवधि-माझ्यापाराला, १६ शरत्कालीनचंद्रासारिखे, + हुरहुरेवडी, हुर्यो हुर्यो-

ह्राणी तीन शर नरा   चार हयां नवघन[1]प्रभास दहा
तोडी मनोदहि म्हणे   तें पाहुनि जिष्णुचा सभासद हा ७२
पार्थे शर पाठविले   भेदाया मर्म वातसे चवदा
कृपण गृहीं अतिथि जसे   नृप देहीं तेवि बा तसेच वदा ७३
तितुकेचि पुन्हा झाले   विफल जसे दुर्जनीं सदुपदेश
तेव्हां सख्या तुझें बळ   कोठें गेलें म्हणे यदुपदेश[2] ७४
पार्थ म्हणे कवच दिलें   गुरुनें वात्सल्य[3] देवविले याला
नेतील न शस्त्राऽस्त्रें   शक्राऽदि समस्त देव विलयाला ७५
परि मी तुझ्या प्रसादें   ऐसेंहि अभेद्य कवच खंडीन
दंडीन अरिशि माझी   शक्ति तसी कांपवील थंडी न ७६
ऐसें वदोनि मंत्रुनि   शर कवच-विदारणाऽर्थ जों सोडी
सर्वाऽस्त्र घातकाऽस्त्रें   अश्वत्थामा तयासि तों तोडी ७७
विस्मित होउनि पार्थ   प्रभुसि म्हणे गुरु सुतें प्रभाव मला
हित अहितहि जेविं तमीं   वाटेत फणी मणि-प्रभा वमला ७८
योजीन जरि पुन्हा तरि   मजवरिच फिरेल अस्त्र बापा हें
साहें क्षण जिंकितसे   लीलेनें अरिस दास हा पाहें ७९
वश करिल रसिकसा शिर   बहु तुकुनि[6]हि काय गा शठ कविला
काय इतर नरसा हर   ह्राणुनि हृदयीं स्मरें शर ठकविला ८०
हय सूत पार्ष्णि सारथि   मारुनि खंडुनि समस्त हातेरें

१ नवीन मेघासारिखी कांती ज्याची अशा कृष्णाला, २ कृष्ण, ३ कृपाळूपणा, ४ नाशाला, ५ अश्वत्थाम्याचें सामर्थ्य, ६ डोलवून, ७ सरडा, ८ मदनानें.

फोडुनि कवच पळें करि पार्थ खळाचें पळांत मीतेरें ८१
श्येनाशी धृष्टेपणें गांठि बळें घालितां जसा चटक[3]
व्यसनीं पडे सुयोधन तें पाहुनि सर्व धांवलें कटक ८२
पार्थाचा रथ झांकुनि नाना शस्त्रांचिया समूहानीं
चुकविति सुयोधनाच्या प्राणाची सर्व कुरुचमू हानी ८३
त्याकाळीं जगदीशें पर-धृति-हर पां[6]चजन्य वाजविला
तन्नादें गजवर-मद- नाशक केसरि-निनाद लाजविला ८४
प्रभु-शंख-रवें कौरव जेविं गरुड-गर्जनें महासर्प
केले भग्न तुरविला गांडीवें तिलहि पर-बळीं दर्प ८५
कुरु बळ-विमुक्त नररथ जंगम जन मुक्त माध्वसा साजे
गर्जति जयद्रथाच्या हरणारे मृत्यु-साध्वसा सो जे ८६
कृष्णांही[10] निज दर वर वाजउनि बहु स्वशत्रु कोपविले
कर्ण कृपाऽश्वत्थाम- प्रभृतींचे सिंहनाद लोपविले ८७
बहुतां कर्णाऽदि महा- वीरांसी एक विजय युद्ध करी
बहुनाहि करितिल काय क्रुद्धा कंठी खवासि[11] रुद्ध करी ८८
भूरिश्रवा प्रभूच्या खंडी करगत नव प्रतोदास[13]
तेणें काळहि कांपवि केवळ न सुमेरु[14]वप्र तो दास ८९

---

१ दुर्दशा, २ दांडगेपणानें, ३ चिमणा, ४ शत्रूचें धैर्य हरणाराऽसा, ५ नामविशेष (शंख) ६ सिंहाचाशब्द, ७ मध्वमतानुसारी ब्राम्हणसा, ८ मृत्युभयास, ९ साहा १० उभयकृष्णानीं, ११ सिंहास, १२ गज, १३ चाबुकास, १४ मेरुचापाया

अध्याय ११

येरीकडे वृकोदर सात्यकि पांचाळ मत्स्य हे भारी
भांडति कुरुवीरांसीं जेविं महेभासवें[1] मेहेभारी[2] १
खंडी युधिष्ठिराच्या आधीं खरतर शरव्रजें धनुला
हनुला[3] धरुनि विनविला वात्सल्यें म्हणुनि हळुचि मग तनुला
करुनि प्रसाद गुरुनें दिधली ती गुरुसि दारवी शक्ती[4]
भक्तिमदुत्तम[5] धर्म प्रेषी द्रोणाकडे महाशक्ती ३
द्रोणासि स्वस्ति असो ऐसीं तें सर्व बोलिलीं भूतें
शक्ति महाकृत्यासी चळचळ तत्काळ कांपवी भूतें[6] ४
शक्ति ब्रम्हज्ञानें ब्रम्हज्ञातें जसीच काळाची
तेविं द्रोणें हरिली ब्रम्हाऽस्त्रें तीं[7] मनुष्यपाळाची[8] ५
भस्म करुनि शक्तीतें ब्रम्हाऽस्त्र क्षुब्ध[9] होय तच्छमना[10]
ब्रम्हाऽस्त्रानेंचि करी गुरुवत्सल-धर्मराज अच्छमैना[11] ६
शर-पंचकें विदारुनि कार्य[12] क्रूर क्षुरेंसि[13] सोडूनी
गुरुचें धनु मनुजेंद्र[14] क्षितिवरि पाडी पळांत तोडूनी ७
सोडी द्रोण गदेतें तीवरि धर्महि महा-गदेतें हो
सच्चरित सर्वंग[15] कुतुक दे नंदन बहु महाग देतें हो ८

१ महा-इभ-मोठ्यागजाशीं, २ महा-इभ-अरि सिंह, ३ हनुवटीला, ४ सामर्थ्य, ५ भक्तिमंतांमध्यें श्रेष्ठ, ६ पृथ्वीतें, ७ महाशक्ति, ८ धर्मराजाची, ९ संतप्त, १० तत्-शमन त्या ब्रम्हास्त्राचे शांतीस, ११ शुद्ध अंतःकरण ज्याचें असा १२ देह, १३ शर, १४ मनुज-इंद्र, धर्म, १५ साधूंचें चरित्र, कौतुक सर्वंग (स्वल्प कीमतीनें देतें आणि नंदनवन म्हणजे (इंद्रवन) महाग देतें)

पडल्या भंगुनि पावुनि सद्वीर सुखें सुवर्णन गदा त्या
गुरुशिष्य रणा वर्णिति कवि जेविं अधन सुवर्ण-नग-दात्या[1] ९
च्यार्‍ही वाजी वधुनि च्छेदुनि धनु केतु भूमिवरि पाडी
भारद्वाज[2] महात्मा धर्मासि शर त्रयें उरीं ताडी १०
विरथ व्यायुध होउनि सहदेव-रथीं चढे पळे धर्म
कर्म असें घडतां त्या कविचा न स्वल्पही मळे धर्म ११
भूप पळाल्यावरि बहु नाश रणीं प्राप्त होय राजास
वध्यचि अहिंसा अभिमुख येतां गुरु बंधु सोयरा ज्यास[6] १२
धृष्टद्युम्न घटोत्कच सात्यकि भीमाऽदि वीर धर्माचे
मथिती कुरु-कटकातें जैसे दुःसह विपाक कर्माचे १३
दूरूनि पांचजन्य-ध्वनि परिसूनि बहुत भय धरी धर्म
सात्यकिसि म्हणे बापा धांव करा हो धनंजया वर्म १४
व्यसनीं सहाय होउनि आम्हाला होय जो परोस कुंती
शक्राऽदि लोकपालां- मध्यें बहुमान्य तो बरा सुकृती[11] १५
समयीं सहाय होता पुरुष श्रीविष्णुरीच तोलावा
प्रियसख माधव[12] दोघे असतां न बुडो नटासि तो लावा १६
धांवा शीघ्र असोंद्या स्नेहरसाचा मनांत ओलावा
माधवजी आजि तुम्ही मित्र थडीला म्हणोनि ओ लावा १७
आहेत भीम धृष्ट- द्युम्नाऽदिक मज समीप भय नाहीं
बा त्वद्भुजाऽश्रितें म्यां विदूर[14] पाहों नयेचि नयनांहीं १८

१ सुवर्णाचा पर्वत देणाऱ्यास, २ द्रोण, ३ रथहीन, ४ आयुधहीन, ५ क्षात्रधर्म, ६ ज्याला, ७ परिणाम, ८ कवच, ९ मृत, १० कुशल, ११ धन्य, १२ कृष्णसात्यकी, १३ अर्जुन, १४ अनिष्ट.

सात्यकि बोले प्रभुजी चित्तीं चिंता करूं नका कांहीं
हंस[१]-ध्वंस कधींतरि केला संगर[२] करून कौ[३]कांहीं १९
गुरु कराचि शिरोरक्षक भारावह काय ओखटा[४] टोप
गुरु वर सहाय असतां व्हावा काशास हो खटाटोप २०
असतां सहाय साक्षात् प्रभु काय धनंजयास[५] मी राजा
कृष्णा नरा क्रिया त्या सुकरा न धनंजया समीरा[६] ज्यां[७] २१
मी जातांचि करिल कीं तुझिया तो द्रोण विप्र हरणातें
बा सांपडतां सोडिल सप्रहरण[८] कोण विप्रहरणातें २२
सांगावें धन-पतिनें[९] निधिचें रक्षण जसेंचि यक्षातें
कथिलें तेसेंचि तुझें विजयें मज आजि आजि-दक्षातें[१०] २३
गुरु तूंहि अर्जुनाहि म्यां आज्ञा तुमची कधीं न मोडावी
सोडावी प्राणाची प्रभुचीच प्रीति पूर्ण जोडावी २४
वदुनि असें मान्य करी धर्म-वचन सबहु-मान सत्वर तें
गुरु-कार्यासचि कविचें निज कार्या न बहु मानस त्वरतें[११] २५
तो वीर वीरपान द्विज-पूजन करूनि सत्व-राशि कवी
शीघ्र निघे ज्याला बहु गुरु-भक्ति समर-रस त्वरा शिकवी २६
व्यूहीं सहसा सात्यकि शिरला जैसा दवाऽग्नि शुष्क वनां
खंडन करी प्रतिपदीं कटकीं दोषज्ञ जेविं दु[१२][illegible]ां २७
सुर म्हणति अहा शिरला हा या जलधींत काय हो मकर[१४]
बा दुसरा जिष्णुचि तूं हूं धर्माऽरातिकाय[१५] होम कर २८

१ हंसाचा भंग, २ युद्ध, ३ कावळ्यांनी, ४ वाईट, व्यर्थ, ५ अर्जुनास, ६ वाऱ्यास, ७ सशस्त्र, ८ विप्र स्त्रातें, ९ कुबेरानें, १० रणदक्षातें (मज) ११ त्वरा करतें, १२ सुरापान, १३ दुष्टकाव्यांत (वाईटकवनांत) १४ नक्र, ग्राह, १५ धर्मशत्रूंचे देह।

व्यूहीं शिरे महाबल करि-हरिण-कुळीं जसाचि हरि[1] शिरतो
कमल जसा लीलेनें द्विरद अरीचें तसाचि हरि[2] शिर तो २९
द्रोण तयाला गांठी रोधी जैसा महाऽचल नदास
गुरुसा समर-प्रेक्षक पक्ष्मीं[4] तुरवीच तो चलन दास ३०
सात्यकिला द्रोण म्हणे त्वद्गुरु शस्त्राऽश्व हात जोडुनी
करुनि प्रदक्षिणा मज गेला केल्या पणासि सोडुनी ३१
म्हणशिल यशोर्थ वंचिन सर्वस्वा मी सदास मरशील
तरि तूं पावोनि मला सगुरु स्वामी सदा समर-शील ३२
सात्यकि म्हणे गुरुगुरो स्वस्ति असो तुज सदैव आर्यास
कालेक्षेप[6] नसावा विजय-परामर्श-धर्म-कार्यास ३३
ज्यावाटेनें गेले गुरु धरिती छात्र त्याचि वाटेतें
आचार्यें पार्थें जें केलें मजहि प्रशस्त वाटे तें ३४
एवं वदोनि वंदुनि घालुनि कुरुगुरु रणांऽगणीं उजवा
सात्यकि निघे म्हणे गुरु- भट हो हूं शंख करुनि सुख रुजवा
कर्णाचें बळ भंगुनि कृतवर्म्यातेंहि संगरीं उडवी
नलिन-वनासि गज जसा त्या कुरुकटकासि तो तसा तुडवी ३६
मागुनि उठले पांडव सात्यकिच्या रक्षणाऽर्थ जे त्यांतें
भग्न करी कृतवर्मा ध्यावें ज्यां पविकरेंहि[7] जेत्यांतें[8] ३७
सुरडे सात्यकि सर्पचि जाणों बल-पुच्छ तुडविलें मागें
भोजातें विरथ करी मर्दी तत्काल तच्चमू रागें ३८

१ सिंह, २ हरणकरी, ३ मोठापर्वत, ४ डोळ्यांचेपापण्यांत, ५ शस्त्रआहेतअश्वज्याचे असाअर्जुन, ६ कालविलंब, ७ इंद्रानेंहि, ८ जिंकणारांस.

पुनरपि परते मार्गी माधव हरिसा शिरे गजोऽनीकीं
अजितचि तो वरिला नर- नारायण-पादुका-रजानीं कीं ३९
मथुनि गज घटा मारी शक्र-प्रतिम-प्रभाहि जलसंधा
कीं सर्वदाहि सत्या सत्संधा निष्फलाचि खलसंधा ४०
गांठी गुरु सात्यकिला तो दुःशासन सुयोधनाहि राया
जैसे वनांत सधना बहु तस्कर वेढिती धन हिराया ४१
युयुधानें दुर्योधन करूनि विरथ पळविला पळांत रणीं
शोषी बळा शरांनीं जेविं कैरांनीं नदीजळां तरणी ४२
हांसति धृतराष्ट्र सुता शीघ्र-पलायन-परा सुर विमानीं
हा मंदा तेजस्वी स्वाऽधिक होतां परासु रवि मानी ४३
गुरु-सात्यकि-मुक्ताऽशुग- पटल न दे लेश मार्ग वातातें
त्यां विउनि मिळविलें यश जें भीष्मा आणि भार्गवा तातें ४४
समरीं सारथि मरतां द्रोणासि स्वैर पळविती घोडे
मोडे सैन्य स्वामि- व्यसनीं स्थिर वीर राहते थोडे ४५
द्रोण व्यूह-द्वारीं राहे मग शीघ्र सात्यकि निघाला
घन-पटलांत पवनसा पर-कटकीं तो सुदुर्धर रिघाला ४६
काय इतर गज देता जंभाऽरातीभ वाट वीरा या
त्या सुज्ञा सेना बहु- संभारा ती भवाटवी राया ४७
सात्यकि जातां मथिलें द्रोणें पांचाल कटक बहु तरणी

१ सिंहसा, २ गजसमुदायांत, ३ साधूंचीप्रतिज्ञा, ४ खलांचीप्रतिज्ञा, ५ लुटाया, ६ सात्यकिनें, ७ किरणांनीं, ८ सूर्य, ९ द्रोणआणिसात्यकीह्यानींसोडिलेलेबाणाचेंआवरण, १० परशुरामास ११ स्वच्छंद, १२ शिरला, १३ जंभ-अराति-इभ-इंद्राचागज, १४ संसाररूपअटवी म्हणजे वन

धृष्टद्युम्नें केला तों नव्हता समय म्हणुनि न हुत रणीं ४८
चढला होता धावुनि ईषेवरि नग्न करुनि तरवारी
परि गुरु विनेत्विमित शर हाणुनियां त्यासि शीघ्रतर वारी ४९
तें पाहुनि कवि वदले झड घाली लावकीं असि ससाणा
गुरु-शिक्षा उग्रत्वाचि देती उग्रा जशा असिस साणा ५०
अर्जुन-सात्यकि चिंता ऽकुल धर्म असें वृकोदरासि वदे
आम्हां उत्साह तुझा दे अभय जसें सुरांसि वासव दे ५१
वधिले शिशुपाळ जरा- संधाऽत्मज वीर संगरीं बहुत
गुरुनें पुढें न झाला जों केला तोंचि रण मखीं न हुत ५२
भीमा धनंजयाचा घ्याया क्षम तूं मरुत् समाचार
तत्कुशल-वृत्त मौक्तिक- सम तें मज सितगरुत्समा चार ५३
सात्यकि बळेंचि म्यां कुरु- कटक महा संकटांत शिरकविला
गेला शरसम समयीं बा घावें लागतोंचि शिर कविला ५४
कां पाठवितों कळतें जरि करिल व्यूह नद गंडप यातें
तूं सेतु तरेल इतर न कुरुबळा जेविं न दगड पयींतें ५५
तों पांचजन्य ऐकुनि धर्म म्हणे हा अभाग्य बहुधा मी
कृष्णा पृथा सुभद्रा उत्पात विलोकितील बहु धामीं ५६
बा स्पष्ट पावलाचि क्रूराऽरिगणांत वत्स मरणातें
सख्य स्मरोनि करितो अभिमानी कृष्ण तत्सम पातें ५७

---

१ द्रोण, २ धुरेवर, ३ वीतभर लांबीन्चे असे, ४ पक्षिविशेष, ५ खड्गास, ६ सहाणा, ७ वायु, ८ हंसासारिखा जो मी त्या मला, ९ ज्ञाला, १० नाहींसा, ११ उदकानें, + अग्नीचा, अर्जुनाचा,

भीम म्हणे आहे प्रभु- वर सारथि अर्जुनासि भय नाहीं
तूं त्या कृत-प्रतिज्ञा- प्रति शीघ्र विलोकिसील नयनांहीं ५८
आज्ञा धरुनि शिरीं हा मी जातों सर्व शत्रु पळवीन
मळवीन सुयोधनयश शंखरवें कृष्णे कुशल कळवीन ५९
धर्मा देवींच गमे केली भीमें असी प्रतिज्ञा ती
द्विज म्हणति तुझे होउत अहित वश तुझ्या असीप्रति ज्ञाती
पूजुनि नमुनि द्विज-गुरु- चरण निघे पिउनियां नव स्फुरेतें
हा तो ईशचि न परा भी जो जन्मे स्फुमानव-स्फुरेतें ६१
बल जलधि गमे शिरतां जो भीमहि मत्त तो खरा मकर
वर्षे शर पर निकरीं जेविं सुहृद्दत्त-तोरेव राम-कर ६२
तों भीमातें वारुनि गुरुनें नाराच हाणिला अळिकीं
तो अमृत-कनककलशीं भासे कृष्णाहि नीरजीं अलि कीं[8]
द्रोणमनीं कीं वश हा मज गुरुतें जेविं हरि लगामातें
नमिल म्हणोन स्फुरवें जा त्वद्भुज परतेज हरिल गा मातें ६४
गुरु हांसूनि म्हणे या व्यूहीं भीमा तुला न शिरवेल
शिरसिल जरि तरि घालुनि वांचेल दवाऽनळांत शिर वेलें[10]
मज वंदुनि मदऽनुमतें शिरला व्यूहांत कृष्ण-[11]सारथि रे
शरभापुढें टिकेना सिंहहि मग काय कृष्णसार[12] थिरे ६६
अक्षत जरि मी शिरणें तुज या व्यूहीं अशक्य मद्रचितीं
जाणे करावयाजीं कर्मे भलतींच एक मद्रचि तीं ६७

१अर्जुनाप्रति, २कृष्णार्जुनाचें कुशल, ३स्फुमानवाच्या वीर्ये, ४ग्राह, ५संतोष, ६ललाटीं, ७कमलीं, ८किंवा, ९अश्व, १०वल्ली, ११अर्जुन, १२मृग, १३मत्-रचित-म्यां रचलेल्यांत.

रक्तेक्षण भीम म्हणे झालासि ब्रम्हेबंधु चळलास
कळलास अधम कीं तूं खळसंग धनुष्य धरुनि पळलास ६८
योग्य नव्हे घ्याया तव अनुमत तो वासवि प्रवेशाला
कुतुकें सभ्य प्रभुहि न बहु मानिति काय विप्र-वेशाला ६९
हें किति तुच्छ मद ऽनुज स्वबळेंचि धसेल शक्र कटकांत
वचकेल काय शिरतां हंसाऽद्येऽनिरुद्ध गरुड चटकांत ७०
मी भीम त्वंदरि मव्हें त्वत्पूजक सदय तो धवळवाजी
मज म[illegible]णतसे तेजेंचि खलाऽरि योध वळवा जी ७१
आपण पुत्र पिता तूं म्हणतों द्रव परि न हें तुला लव दे
पद-पतित-रजा देउनि पात्रत्व गुण स्वयें कुलाल वदे ७२
म्हणतों नित्य निज मना कीं या द्विजनायका पिता मान
परि तूं निर्दय इतर- प्रणताची काय कापिता मान ७३
तूं काय गा स्व धर्मचि सर्वांची पुरविणार आळ पिता
किंति नाग-कालपाश स्वाऽन्यायचि करकरूनि आंळपिता
जरि आपणाशि मानुनि शत्रु असा पातलासि कलहातें
तरि या कर्माचें घे देतों मी भी[illegible] फल हातें ७५
ऐसें बोलुनि सोडी तो द्रोणरथीं उडी गदा घाली
अनिर्वार्याचि खवळली जसि पाडाया कुंडी गदा घालो
तों स्व रथावरुनि उडी टाकुनियां त्या गदेशि गुरु चुकवी

१ रक्त-ईक्षण-आरक्तनेत्र, २ ब्राम्हणाधम, ३ हंसादिकानीं रोधलेलानाही असा, ४ त्वत्-अरि-तुझाशत्रु, ५ मत्-गदा-माझीगदा, ६ द्रोणा, ७ बांधणारा, ८ युद्धातें, ९ निवारण करण्यास शक्यान्हवे अशी, १० शरीर, ११ रोगवपापयांचीपंक्ती,

अभिमान त्यजुनि जसा काळगतिस आत्मयोगपटु सुकवी ७७
पडतां रथीं गदा तो वरसा+ एक वीर विप्र भारेना
कौरव वेष्टिति भीमा तो त्या पळवी रविप्रभा सेना ७८
भंगी भीमगदाऽशनि सतुरग सूत ध्वजा रथनगा ती
रुद्रचि वृकोदर गमे त्या त्रिपुराचेंचि ते मथन गाती ७९
सुखवध्यें त्वदऽपत्यें भीम शरां जेविं हरिनखां बकरीं
म्हणुनि तुज म्हणत होतों कीं खल कुल-मंडपा न खांब करीं
भीमें एकैक शरें दृढबाहु सुषेण दीर्घनेत्र असे
वधिले सुदर्शनाऽदि त्वत्सुत दश मृगवरें जसेचि ससे ८१
द्रोणें पुनरऽपि केलें दारुण शर-वर्ष धरुनि वाटेतें
वर्षे व्रजीं प्रलय-घन- वृंद तसें गुरु-धनुष्य वाटे तें ८२
भीम रथावरुनि उडी टांकुनि गुरु-यश करावया गोळा
धांवे यं[illegible]पासुन वेगानें जेविं [illegible] गोळा ८३
शरवृष्टीनें वृकोदर लेशहि न धरूनि साध्वस रिघे तो
वाटे डोळे झांकुनि वृषे त्या लीले[illegible]ने सेरि घेतो ८४
द्रोण रथातें कवळुनि तो नित्य नवा युवा [illegible]
दूर झुगारी म्हणवी शतवार सवायु-वासवा होतें ८५
गुरु मनिं म्हणे विलोकुनि हें गरुडहि चित्रसा उगा राहो
ऐसेचि [illegible]ज हो दूर समस्ताऽरि-मद झुगारा हो ८६

१ भीमाची गदारूप अशनि (वज्र) २ रथरूप पर्वतातें, ३ तोफेपासून, ४ भय, ५ बईल, ६ पावसाची सर, ७ अश्वसहितातें, ८ वायुसह इंद्रातें, ९ हाशा द्रातें, + अग्निसा.

स्वरथीं भीम बसविला शीघ्र विशोकें जसा तपेन अरुणें
नवयानीं गुरुहि बसे ज्या वृद्ध असें म्हणो नये तरुणें ८७
द्रोण द्वारीं राहे मागें सोडुनि पद विरोध सरे
मारुति म्हणे विशोका हूं व्यूहीं शत्रुमद विरो घुसे रे ८८
भीम करी वीरांचें वृक्षांचें मथन वातसा वाटे
निर्मावा जेविं वनीं दहनें तो पथ नवा तसा वाटे ८९
कल्पांतीं कदन जसें रुद्र तसें तो गेंदीन भीम करी
तीहि गदा कुरुकटकीं शिरतां जैसी नदीं न भी मकरी ९०
पर-सेना लीलेनें शिरतां तत्काल तो विदारी ती
राम-शरांची बहुधा आली त्या युद्ध-कोविदा रीती ९१
दूरुनि सात्यकि अर्जुन पाहुनि दे भीम योध हाकेला
धर्माला कळवी कीं आहेत स्वस्ति शोध हा केला ९२
तें परिसुनि कृष्ण-सखे सात्यकि-सह गर्जले सुखें फुगले
असतिल मयूर परम- प्रिय-घननादोदयीं कसे उगले ९३
भीम धनंजय माधव सात्यकि हे वीर गर्जतां चवघे
धर्म म्हणे शीतल हो कर्ण-युगा या सुधोर्मिंची चव घे ९४
वत्सा जेविं निवविती इंदु-कर चकोर-दृष्टिला गोरें
तेविं रुदन्नयना नव भुज यांसि न पापदृष्टि लागो रे ९५
बा चिंता-तटिनीच्या गिळिले बहु देव दैत्य नर डोहें

१ विशोकनामकसारथ्यानें, २ सूर्य, ३ रथ, ४ गदी-इन-गदाधरांतश्रेष्ठ, ५ मगरी, ६ युद्धपंडिता, ७ उगेच, ८ दोन्हीकानास, ९ सुधा-ऊर्मि- अमृतलाटेची, १० गौरवर्ण, ११ रुदत्-नयन- आसांच्यानेत्रांस, + वाटेला.

श्रीगुरुनेंचि म्हणावें कीं वा स्वाऽश्रित कदापि न रडो हें ९६
श्रीकृष्ण कृष्ण सात्यकि कुशली आहेत धन्य मी आजी
आजि-केतूंत गिळिती रिपु काळीसी करूनियां आजी ९७
बा तूं ज्यांचा द्वेष्टा कैसे जय पावतील ते जन गा
शत्रा-पुढें टिकावें ऐसें कैचें प्रचंड तेज नगा ९८
आजीसी बहु मान्या गांडीव-लता पराऽयुध-ग्रामा
विजया जय देउ जसी कोदंड-लता पराऽयुधग्रामा ९९
रवि अस्तासि न जातां मारूनि जयद्रथासि धवल-हरी
उठविल काय स्वखाच्या जेविं पयोधींत रात्रि-धव लहरी १००
सैंधव मेल्यावरि तरि कौरव-पति करिल काय सामातें
तो दुःख-प्रदहि प्रिय सर्वस्वा वरिल कायसा मातें १०१
अंध म्हणे हा भीमो- त्कर्ष मला संजया परिसवेना
गमला नसेल दुःसह मुनि-धिक्कृति-गंज यापरिस वेनो[11]
कांपविला कीं व्यूह व्याघ्रानें जेविं कातरोऽस्र[12] ससा
स्वत शेष राहिले जे त्यांचाही करिल घात राक्षससा १०३
चुकवावें हरिणाच्या कैसें क्षुब्धा[13] हरीस कळपानें
वधिल मुलें तो तरुंचीं जेविं महाऽनिळ हरी सकळ पानें
कुरु-कटकीं भीम करी कर्म कसें काय तें कळीव मला
उग्राहि सूर्य न जिरे बा कर्कोटाऽहिविष कळी वमला १०५

१ अर्जुन, २ रणयज्ञांत, ३ शत्रु, ४ गांडीवगुण, ५ शत्रूंच्याशस्त्रसमूहा, ६ पर-आयु-धक्-राम- शत्रूचें आयुजाळणाराजोराम त्याला, ७ श्वेताश्व अर्जुन, ८ रात्रिपती (चंद्र) ९ ऐकवेना, १० धिक्काररूपदाग, ११ वेनराजाला, १२ भयानें चंचलनेत्रअसा, १३ क्षोभपावलेल्या, + कळी.

सूत म्हणे श्रवण करीं कथितों मी भीम-कर्ण-समरा ज्या
पाहुनि सुर मुनि वदले रण-पंडित भीम कर्ण सम राजा
केला तें रोमांऽचित भीमानें कर्णवासवें काय
गमले प्रळयीं भिडतो तो अर्णव अर्णवा-सवें काय १०७
नरहरिचे लाजविती जेसे बालाऽर्क-वर्ण नख पविला
भीम-शर तसेचि तिहीं केला परिभूत कर्ण न खपविला १०८
होउनि विरथ पळाला कर्ण तया घे रूथेण निज-यानीं
भीम-भुजांनीं केलें त्रस्त सकल सैन्य लब्ध-विजयानीं १०९
भीमाच्या सिंहरवें भ्याले बहु एकही न परे परते
जे शूर मदांऽध द्विप हगले बलधैर्यहीन परपर ते ११०
कळला कर्ण-पराभव झाला हें भीमसेन-सिंहरवें
धर्म म्हणे जोडावें वत्सा ऐसेंचि यश तुवां बरवें १११
कर्ण-पराभव-हर्षें वाजविले शंख बहु अनीकांहीं
त्या आनंदा मोया नाहीं अवकाश जन-मनीं कांहीं ११२
परिसूनि परदरव बहु वाजविती शंख तांवकहि मानी
तो प्रभुशंख तव चमू- भा जेविं प्रलय-पावक हिमानी ११३
गांडीव-पांचजन्य- ध्वनिही लीलेंकरूनि लोपविले
भीम-रवें मग योगी पळतरि नसतील काय कोपविले ११४

---

१ देह, २ वज्राला, ३ निजरथीं, ४ भयशील, ५ शत्रु, ६ मावया, ७ तुझ्याकडील, ८ घट्ट बर्फ, ९ पळभरतरि.

अध्याय. १२

शिरतां अर्जुन सात्यकि भीम व्यूहीं गज-व्रजीं हरिसे[1]
धांवत जाय गुरुकडे दुर्योधन वसति षडरि[2] ज्यासरिसे[3] १
द्रोणासि म्हणे गुरुजी शिरले व्यूहीं कसे तिघे अरि[4] ते
तुमच्या प्रताप-तपनें केले तुच्छ प्रवाह कां न रिते २
गेले अर्जुन सात्यकि भीम महाबळ जयद्रथाजवळ[5]
सासाद् कालाऽतक यम जाणों त्यांचा करावया कवळ[6] ३
तुज जिंकिलें तिहीं हें अद्भुत लोकां न काय वाटावें
ग्रीष्में[7] जेविं तडागें तेविं समुद्रेंहि काय आटावें ४
हतभाग्य मीच बहुधा आहे माझा विनाश या कलहें[8]
कीं जें तुझें त्रिलोका लंघ्य तिघांनींचि लंघिलें बल हें ५
आतां काय करावें कैसी होईल सिंधु-राज-गती[9]
झाली त्या पार्थ-मयी[10] सिंह-मयी जेविं सिंधुरा[11] जगती ६
द्रोण म्हणे सर्वाऽधिक भीताऽभय-दान सत्य जा वेंचें[12]
शिर शिरतिल पर यास्तव स्यां व्यूह-द्वार न त्यजावेंच ७
उत्साहि त्याविषयीं आहें मी नित्य अनलस मराया
जा सैंधव रक्षाया पर-दुःसह तूंहि अनलें[13]-सम राया ८
दिव्य-कुरुक्षेत्र-पट ग्लैह[14] सैंधव दळति अक्ष हे बाण

---

१ सिंहसे, २ षट्-अरि-कामादिसाहाशत्रु, ३ ज्याच्याबरोबर, ४ रिकामे, ५ जयद्रथाचा, ६ ग्रास, ७ नळ्याने, ८ युद्धानें, ९ जयद्रथाचीगती, १० अर्जुनप्रचुरा (सर्वत्र अर्जुन[illegible]) ११ गजाला, १२ खर्च, १३ अग्नितुल्य, १४ पणद्रव्य.

या युद्ध-द्यूतींचे जय परिभव सत्य ते मृषा जाण ९
मी द्वारीं नसतां गज सरेसीसी पर चमू दवळतील
शत्रु-करांते सैनिक- पति दत्ताऽभय अमूद वळतील १०
जाणें युक्ति बळाचा जीस्तव कुरु-नायका पुरोवा ती
शिवतांचि पराभूति स्वच्छ यशा खाय कापुरा वाती ११
मानुनि शासन गुरुचें व्यूहाबाहेरुनि क्षितिप तूर्ण
जाय कराया जीवन- काम-जयद्रथ-मनोरथा पूर्ण १२
तों वीर उत्तमोजा तद्बंधुहि देखिला युधामन्यु
तत्काल तिघां-करवीं धरवी युद्धाऽर्थ आयुधा मन्यु १३
होऊनि उत्तमोजा विरथ युधामन्युच्या रथीं चढला
रथ भंगितां तिहीं बहु कुरु-पति कोपें करूनियां कढला १४
भूप गदा पडतांळुनि सिंह गजावरि जसा तसा तूर्ण
धांवे दोघे त्यांते वीर कराया रथा-सकट चूर्ण १५
आयु म्हणे त्यांसि मरण आलें हें टाकुनी उडी दवडा
वधिलचि हा शूलीऽन्नीं वाटुनि केला जसा उडीद वडा १६
ते भू-पृष्ठीं पहिली मग घाली तद्रथीं उडी दरदी
तो झाला पीठ जसा सांपडला चर्वणीं उडीद रदीं १७
परिभूतिनें तळमळे जेविं नरवीं विद्ध मानव स्नयानीं
भूप चढे शल्यरथीं तेही राजोत्तमा नव-स्नयानीं १८

१पूर्वींच्याद्यूतांतले, २सरोवरासारिखी, ३पूर्ति, ४पराभव, ५आज्ञा, ६दुर्योधन, ७क्रोध ८उत्तमोजावयुधामन्युयांहीं ९ज्याप्रकारेंधारणकरावयाचीत्याप्रकारेंधारणकरून, १०आयुष्य, ११शूलरोगपीडितास, १२भयदेणारी, १३दांताळा, १४पराभवानें, १५टोंचलेला, १६नव्यारथीं-

पार्थाकडेचि गेले   ते त्याचे चक्र-रक्षक रथानें[1]
राया मग दुर्योधन-   राजाही युक्त होय वर[2]-यानें   १९
पुनरपि गाठूनि करी   भीमाला कर्ण कौरवा रण गा
सर्वाऽसुर-राज बली   जेविं चतुर्दंत-गौर-वारणगां[4]   २०
द्रुद्रु म्हणे भग्न करी   भीम बळें करुनि संगरा ज्याला
त्यावरि जाया झाला   कैसा उत्साह अंग-राजाला   २१
ज्याचा भयें न लागे   धर्माचें पळहि पातया पोतें[6]
तो कर्ण भग्न झाला   केला लघु नहुष-पात यांपातें   २२
भीष्म-द्रोण-भयाऽधिक   ज्याचें भय मानितो अर्जानारी
त्या भीम-शांके भंगी   हरि-भीत गजा न कां अजा तारी २३
जो उपजला स-कुंडल-   कवच नव-चमत्कृतिमति प्रसवे
रस-वेत्ता दाता ज्यां   ब्राम्हण-पद-पूजना-विना न सेवे २४
देते पर-घूकांनें   स्फुर्द[10]ऽब्जाचे प्रभाकर दरीं[11] जे
ते सर्वहि ज्या एकें   केले हरुनि प्रभा केरद[12] राजे   २५
त्या वीर-वरा कर्णा   सर्व-स्वविद्या-दया-कळाऽवासा
भीम कसा विक्रम-गति   रोधक झाला हया कळोवासा[13] २६
पुत्रास सरवा आश्रय   सर्वस्व अपेक्ष कर्ण तो कवच
यश बहु रुचे जयाचें   जेसें अस्पष्ट-वर्ण तोक*-वच   २७
तुरविल शेष परांच्या   मथुनि सकल सित-हयां[14]-सकट कटकीं

१ वेगानें, २ उत्तमरथानें, ३ हे धृतराष्ट्रा, ४ इंद्राला, ५ कर्णाला, ६ डोळ्याचेंपातें, ७ कर्पपतनानें, ८ धर्म, ९ संवय, १० स्फुटन्-अब्ज-आमांच्याहृदयकमलाचे, ११ भीतीला, १२ करभारदेणारे, १३ पायखुंटा, १४ अर्जुनासहित, + शत्रुरूपघुबडांस, ⁂ कर्णास, * बाल.

ज्याच्या भरंवसियानें केली न धरुनि भयास कटकट कीं २८
त्या कर्णासीं केसा पुनरपि तो भीमसेन समर करी
[2]अत्यद्भुत हें प्रतिभट मर्त्य-करी एक एक अमर[3]-करी २९
[*]आधींच सदय कळलें बंधुत्व-कथी स्वयें पृथा ना तें
मग केलें युद्ध कसें न करावें साधुनें वृथा नातें ३०
दोघांत कोण विजयी झाला तें सांग आयकों दे गा
कांहीं काल सुखें कीं दुःखें संसारि-काय कोंदे गा ३१
सूत[4] म्हणे भीम निघे बंधुकडे जावयासि वात[5]-गती
त्याच्या दृष्टि-पुढें पर- शक्ति न हरिच्या जशा शिवा[6] नगती ३२
धांवुनि कर्ण म्हणे रे दावुं नये पृष्ठ संगरोपरतें[7]
पर तें रणींच मरणा ऽवधि जरि खातील अंग रोंप[8] रतें ३३
तुजसीं युद्ध घडो हें स्वप्नींहि न चिंतिलें परानीं[9] कीं
तो तूं भीमा मजला पृष्ठ कसें दाविसी पराऽनीकीं[10] ३४
सर्व स्वजीविताऽधिक यशाचि रुखाऽस्पद न भाउ परते रे
रण-निज-धर्मापासुनि न मळाया वदनभा उपरंते रे ३५
शत्रूसि पाठ दाविसि हें तुज कुंतीसुतासि अनुचित रे
क्षत्रिय लब्धजयाचि कीं खरतर-परशार-विशीर्ण[11] तनुचि तरे ३६
भीम प्राणहराया अपकारें ताप-तापसा परते
विनविनि गमे करुनि त्या आत्रेया[12] तापसा परसा परते ३७

---

१ कलह, २ अति-अद्भुत-मोठें आश्चर्य, ३ देवांचा गज, (ऐरावत) ४ संजय, ५ वायूसारिखें गमन ज्याचें असा (भीम) ६ कोल्ह्या, ७ संगर-उपरत- समरपराङ्मुखानें, ८ बाण, ९ शत्रुसमुदायांनं, १० पराङ्मुखनहो, ११ विकळ, १२ दुर्वासास.

✻ आधींच सदय कळवी. असाही पाठ आहे.

मृदुपूर्व युद्ध रविसुत   भीम करी क्रोधपूर्व गा राजा
कांपविती इषु त्याच्या   बहु थोडें त्या शुचींत गारा जा ३८
भीमातें आच्छादिति   वृषेशर जे पत्रिपतिसम रयज्ञ
या दोघांचा बहु दे   नारदनयनांसि रतिं समरयज्ञ ३९
कर्ण करी स्मित तेणें   भीमाला बहुत राग ये रचितें
हास्यचि बहु ताप न विष   मानधन न साहतात येरचि तें ४०
जरि होय भीम जैसा   बहु पुष्पित पळस लालभडक वनीं
कठिणींहि रणीं न पडे   त्यागुरुभक्तासि जेविं जड कवनीं ४१
तें भीमवपु विनाशर   शल्यवपु जसें विनां-शलल नाहीं
केला इषुनीं त्याचा   न शकाचा जेविं नाश ललनाहीं ४२
भीमें आठविला स्त्री-   वस्त्रहरण हा निकार भारी हो
कर्णहि मुख्यत्वें जो   करणारा हानि कारभारी हो ४३
केला पुन्हा मथुनि धनु   हय सारथि तो रणस्थ विरथ कवी
वाटे घनरव समरीं   कपि रोधुनि तोरणें स्थविर थकवी ४४
अन्य-रथीं क्षिप्र चढे   मोह प्रकट न करूनि आधिरथी
कीं होवूत न विकल   स्वेच्छामोहें धरूनि आधि रथी ४५
कर्णाचि धन्य न होता   अन्य तसा मानव क्षम रणातें
देतें कां न क्षतशात- चित तितेंउसमान वश्य मरणातें ४६
कर्ण पराभव म्हणवी   येउनि कानास हाय हा निधेंरा

---

१ आषाढमासांत. २ कर्णाचे बाण, ३ गरुडतुल्य, ४ वेगजाणणारे, ५ प्रीति, ६ करितें, ७ अन्य, ८ शरावांचून, ९ साळूचें देह, १० कंटकावांचूनजसें, ११ स्त्रियांनीं, १२ अपकार, १३ मेघनाद, १४ मारुती, १५ बहिर्द्वार, १६ कर्ण, १७ आपल्यामूर्च्छेनें, १८ मनोव्यथा, १९ क्षतशानानें व्याप्त, २० चाळणीसारखें, २१ म्हानाऱ्याधृतराष्ट्रास, + इद.

रोदन वृथा खरें परि साहेल कसी सहायहानि बरा ४७
मोहें वाहुनि हृदयीं चिंतेतें वृद्ध जेविं सांगे तें
पुनरपि नहून पुसे परिसा संजय तयासि सांगे तें ४८
कर्ण पुन्हा क्रोधानें धावे तें देखतां असें बहुत
वदले नावेक पावक- वदनीं झालाचि भीमसेन हुत ४९
हय वृषे हयांत मिसळी जे वर्णे स्पष्ट ओंसविल याला
देखुनि नव विजयाची पावे सारीच ओस विलयाला ५०
अपकार तुम्हीं केले जे जे त्यांतें स्मरोनि तो खवळे
कर्णदवीं घनचि गमे द्याया श्रितचातकांसि तोंरव वळे ५१
एकें मुखें किति करूं अत्यद्भुत युद्धयज्ञवर्णन गा
वाटे प्रवर्तला तो भेदाया मूर्तवज्र कर्णनगा ५२
तोडुनि धनु कर्णाची शक्तिहि भंगी जशीच मूढ कवी
कीं जेविं मथुनि मन मुनि विघ्नाची दारुणा चमू ठकवी ५३
भेदी भीम शरांनीं बहु शीघ्र परा शरासनादानीं
भिववि नि वृषा न तें निशि- चर जेविं पराशरास नादानीं ५४
करिती ते वृषभ गज व्याघ्र हरि शरभ रूरारूरसम रणा
ब्रम्हरस तसा न गणूं हे वीररसचि सुरां रूरस मरणा ५५
भीमें पुनरपि कार्मुक तोडुनि वधिले रू-शंख-धवल-हरी
नवल और करी प्रसवे बहुत नदानंद-सिंधु-नव लहरी ५६

---

१ शस्त्रविशेष (बर्ची.) २ वत्सस्वीय, ३ कर्ण, ४ आस्वलासारखे काळे, ५ आशा, ६ भीम, ७ कर्णरूपदवानळीं, ८ आनंद, ९ अति-अद्भुत, १० कर्णरूपपर्वतास, ११ कर्णास, १२ भीमशर, १३ भीमकर्ण, १४ रू-शंख-धवल-हरी - शंखासारिखे पांढरे घोडे, + मंत्रशास्त्रज्ञ, * राक्षस, ‡ कर्ण (नवलकरी म्हणजे आश्चर्यकरी.)

भ्राल्यासि म्हणे कुरुपति तूं वरके पिटोनि दूर लाव कसा
दुर्जय धांवे व्हाया श्येनापासूनि चूर लावकसा ५७
शरपातदेश सोडुनि सेना होती उगीच बाहेरी
जरि जाय एकला अरि- वरि दुर्जय तरि उगीच वा हेरी ५८
लागे स्वर्ग-फलद शर भीम-क्षेत्रीं सुधीट पेराया
यश साधाया घालुनि अंजन नेत्रीं रुधी टपे राया ५९
सातानीं मग आधीं भीम उरीं ताडिला नवशरानीं
नाराकेश उपडितां गज होय हरीस कां न वश रानीं ६०
तो साश्वसूत दुर्जय वधिला तत्काल न करितां गलबा
जाणों भीम म्हणे घे स्वर्ग त्यागुनि कुसंग हा चल बा ६१
रडतचि दुर्जय कर्णे त्यासमरमरवांत घातला उजवा
मौनें म्हणे कुमार व्यर्थ नयन रुजवितां सुखें रुजवा ६२
कर्णे गणिले न विशिख भीमाचे लागले कचाकच ते
नच तेजेंस्विज नसता पचते तदवयव खळखळां खचते ६३
स्थविर म्हणे हा कर्णा बळ बहु परि पांडवां पुढें न चले
अंगार सर्व-दुर्धर तदपि चकोरांसि ते सुखें पचले ६४
सूत म्हणे होय पुन्हा कर्ण कलह-रत चढोनि नवयानीं
आश्चर्यचि तें कीं रणे- सव दाखविला रूरांसि नवयानीं ६५
कर्णाचे हय चारी मारी खवळोनि तो [illegible]

१नीच, २दुर्योधनभ्राता, ३पक्षिविशेष, ४पाहि, ५दुर्जय, ६सूर्यपुत्र, ७गळते, ८धृतराष्ट्र, ९निखारे, १०रणयज्ञ, ११नव्यानीं, +बाण, ‡चकोरपक्ष्यास (चकोराचें भक्ष्य निखारे आहेत असा भाव.

भीमबळानें वारूं न शके तों जेविं भोगदो[2]घानें ६६
केतु च्छेदुनि सूतहि वधिला अत्युग्र तेज रायानें
वृष मंदोत्साह गमे आली पर स्फूर्ति न जरा यानें ६७
राहे कोदंडबळें तो दंड-बळें उभा जसा जीनें
तेजस्वी नच वांके स्वीकारिल केसरी कसा जीन ६८
भूप म्हणे रे दुर्मुख घ्याया कर्णासि अभय बा धावें
आपण देखत असतां अरिचें स्वसख्यासि अभय बाधावें
केला कीं कर्ण विरथ चापीं गुण आधिरथिं रथीं चढवी
तों शर जसा मनापें त्यों याजलधीस तूंहि जा कढवी ७०
गेला वाराया जो दुर्मुख देखुनि समक्ष याला हो
प्रेषी शर भीम म्हणे सत्वर हाही यमक्षया लाहो ७१
वाराया गेला तो आपणचि न लागताहि पळ वारे
जाणों शरां म्हणे धनु कार्य पुढें नीट हात वळवारे ७२
दुर्मुखरथ सांपडला विरथा कर्णासि आयता राया
दैवत्यक्तासि शकें न सखा न पिता न माय ताराया ७३
राधेयाला नधेरे होतां दुर्मुख परोक्ष रोदन हो
स्नेहगुण असाचि कसा मोहद मज्जनपरा सुरोद[12] न हो ७४
नांदे स्फुरवें सदोदित संसारीं तोचि जो अनय[13] न करी
न निघे इतर जन बुडे व्यसनीं पंकीं जसा अनयन[14] करी ७५

१ कर्ण, २ कर्मफळाच्या भोगदेणाऱ्या अघातें, ३ म्हातारा, ४ खोगीर, ५ रामशर, ६ प्रसिद्ध सागरास, ७ भीमास, ८ यमसदनास, ९ मरे, १० नाटोपे, ११ गतप्राण, १२ स्फुरासमुद्र, १३ अन्याय, १४ अंध, + सिंह, * गज.

करि साऽश्रु दुर्मुखाच्या तो कर्ण कवि प्रदक्षिणा देहा
समरीं भीम गमे श्रुति-गो-तेर्णक विप्र दक्षिणा दे हा ७६
रडतां प्रहार केले होते ते सर्व उगविले निपट
निपट प्रखरशरांहीं वाटे चित्तांत पाडिले विपट ७७
सव्यभुजीं भीमाच्या कर्णे नाराच अर्पिले चवदा
चव दाखउनि वदौन्यें स्वैरेसें ते अतिथि तर्पिले च वदा ७८
भीम न चळला जन्हि हत खळ खळखळ विपुल भुज वमे रुधिर
गमले त्यजिना शिरनां रविसुतनाराच रक्तव मेरु धिर ७९
भेदी भीम तिहींचि क्रोधभरें त्या वृषास रोपांनीं
जाणों म्हणती ते हय त्याडोहीं द्रुते तृषा सरो पानीं ८०
करिती तर्डेर्यातें ते काम-क्रोध-लोभसे नाहीं
वृष निरखिला हरि-नख- क्षत-गजसा नष्ट-शोभ सेनाहीं ८१
ते सत्य सर्प न विशिख कर्णहि न तदीय-सदन-वारुळ तो
कीं माणिक्यसर जय- श्रीवरणीं शर गळां नवा रुळतो ८२
बहु रक्त दिसे खेळुनि होय जसा काय बा गुलालातें
पळतां कर्ण स्मरले भिडनि पळे बाळ बागुलाला तें ८३
उच्चैःश्रवःस्वसेसीं भी सागुनि न रमते जेवन वाजी
प्रकटिति कशा प्रतोदा वांचूनचि परम ते जव नवा जी ८४
तृप्ति वरि सदुत्कर्षे विहित-जय-स्वान नारद नविच कीं

१ गोवत्स, २ विपर्यास, ३ स्वरूपें, ४ ओके, ५ बाणानीं, ६ लवकर, ७ शोभा हीन, ८ शोभतो, ९ चपल, + कर्ण, ✱ दात्यानें (कर्णानें) ✱ त्यासर्पाचेंगृहरूपवारूळ (सोम)

ब्रम्हरसहि म्हणतो हरि जन सुयशा स्वानना रद[+] न विचकीं ८५
कर्ण पळे भीमभयें जैसा राक्षस पराशर[⁂]-भयानें
तें आपणा हरि करुनि दाखविले बा परा शरभ यानें ८६
भासे भीम भयंकर बहु जैसा देव अंधकाराती
जे भीत भंग[‡]वेळा जीं कीं ते स्पष्ट अंध कोरा ती ८७
द्रष्टा म्हणे बहु देतो दुर्योधन परममंद राग मला
सांगे नित्य स्वयशो- हर कर्ण असेल मंदरा गमला ८८
दिधलें देइलहि यशो- मृत परबळ जलधि मथुनि अनिबल हा
कलहा करितां मजसीं भंगचि पावेल सार्मर्[६]हि बलें हा ८९
लज्जाहानि न झाली त्या मुग्धा मजहि मुग्धतोता कीं
म्यां कल्पिली प्रबलता अल्पबळीं जेविं दुग्धता ताकीं ९०
जय भीमवधाविषयीं कर्ण सुयोधन करीत बकबक रे
कैसे करितील तिमि[९]- ग्रास दहनमेषभंग बक बकरे ९१
सूत म्हणे धृतराष्ट्रा बा कारण तूंचि या विनाशाला
शून्या होत्या न तुझ्या सच्छल[१०]पर या नयाविना शाला ९२
कपटद्यूतादि कुमत गुरुसुमतसम प्रभावि लेंकांचें
त्वां पक्कहि शांत नव व्यासविदुरवचन भाविलें कांचें ९३
झाले भीष्मद्रोण- व्यास-विदुर-सदुपदेश तुज कुंचले[११]
कर्ण-शकुनि-दुःशासन- दुर्योधन-मंत्र[१२] अमृतसे रुचले ९४
उरलेंही घालिसि बा काळमुखीं स्वकुळ घातलें कांहीं

१ रुद्र, २ बंदिशाळा, ३ कल्पद्रुमास, ४ देवसहवर्तमान, ५ इंद्र, ६ मूर्खपिल्लास, ७ अर्जुन, ८ प्रलाप, ९ तिमिनामक महामत्स्याचा ग्रास, १० साधु छल प्रधान, ११ काजरे, १२ मसलत, + दांत, ⁂ पराशर ऋषीच्या भीतीनें, ‡ पराजयवेला.

का देसी दोष परा त्वां हा केला न घात लेंकांहीं ९५
स्वयशोरक्षणचि करिति बहु न तुझे अंगरक्षण नयेज्ञ
कीं तत्काळचि देतो सद्गतितें संगरक्षण न यज्ञ ९६
भंगे परि न समितितें कर्ण सतीनें जसा न विट लाजे
क्षणभरि म्हणोत याला ते जन म्हणतील राहु विटला जे ९७
कर्णपराभवकोपें भीमावरि धांवले तुझे सुत ते
दुर्धर दुर्दम दुःसह दुर्मर्षण जयहि जे मदें उन्नते ९८
भीमें त्या पांचांचे केले तत्काळ पांच विलय महा
कर्ण म्हणे आयुविना यांचा रिपु कोण वांचविल यम हा ९९
छेदी धनु हय सारथि मारी खंडी पुन्हाहि चापातें
भीम करी कर्णानें विरथ कथूं कर्म काय बापा तें १००
भासे कर्ण क्षितिवरि झाला सोडुनि गगन रवि पत्ती
आल्या नसतां भीतो मग न गणी सखनग-नर विपत्ती १०१
कर्ण गदा भिरकावी क्रोधभरें चावुनी रदनवासा
तीतें वारुनि वर्षे विजयाचा भाउ नीरद नवासा १०२
नुरवि करुनि पर कवचा अंगप निर्नेउ पलेसमय मनिं भोनें
भीमानें शर गणिले अंगेपेतित उपलसम यमनिभानें १०३
कवच शत-च्छिद्र करुनि दक्षिण भुजहि व्रणोत्थ-शतधार

१स्वसक्षीय. द्रोणादिक, २ नीतिज्ञ, ३ युद्धानें, ४ उन्मत्त, ५ पादचारी, ६ ओष्ठांतें, ७ बंधु, ८ मेघ, ९ कर्ण, १० चाळण, ११ पळभर, १२ स्मृतीनें, १३ आंगा ॰ (पडलेले, १४ यमसदृशअन्वया (भीमानें) १५ व्रण-उत्थ-शत-धार-क्षतांनींउत्पन्नझालेल्याशतधाः रक्त । रामसा.

केला कर्ण शिखरिसख भीमें निज विशिखनिकर शतधार
पुनरपि होय पराङ्मुख वृष होतां शक्ति बाहुची शिथिला
भीमाला मानैवली जैनता जसि रामबाहुला मिँथिला १०५
ज्येष्ठाज्ञेनें धांवति रक्षाया कर्ण चित्र उपचित्र
चित्राक्ष चित्रवर्मा चित्रायुध करिति ते रणहि चिँत्र १०६
सर्वहि वधिले भीमें न करुनि बहु युद्ध गलबला कांहीं
आम्हीं विलोकिला तो गरुड जसा रुद्धगल बलाकांहीं १०७
वृष बहु रडे हळहळे होय विदुरसूक्तिचीच आठवण
हेचि चुकाया घेती स्वांगीं सत्प्रणति करुनि आठ वण १०८
बसुनि नवरथीं वृष करि जिंकाया अरिस जो निकर कांहीं
वाटे वर्षे गोव- र्धनगिरिवरि हरि सजोनि कर[11]कांहीं १०९
व्याकुळ करी विदारुनि कर्णा रिपुनाशकोविदा राया
तें प्रभु म्हणे असाचि सु- योधनहृदया शको विदाराया ११०
कृष्णार्जुन सात्यकि बहु मानवले भीमसेनबाहूतें
त्यांचें आम्हा याहूं तेज सहायांहि दे न बाहूं तें १११
प्रेतकुमार विलोकुनि तप्त करी कोप शोक राधेया
तो धात्री[13]से म्हणे कां वाढविलें श्रमकरुनि राधे या ११२
मग आपणा म्हणे धिक् कर्णा त्वामनपहृत-नरवराधे
दाइस म्हणे वृथावत् त्यजितां तुज लागतां न रेंवे राधे ११३

१ पर्वतसखा, २ वज्रतुल्य, ३ मान्य झाली, ४ जनांचासमूह, ५ नामविशेष(नगरी) ६ चमत्कारिक, ७ रोधलेलागळा, ८ बगळ्यांनीं, ९ साधूंसनमस्कार, १० स्नान केल्यावर जें अंगास रेखें चिन्ह राहतें तें, ११ गारांनीं, १२ कुशला, १३ दाईस, १४ त्वां- अनपहृत-नरवर- आधि- नाहींहरणकेलीदुर्योधनाचीमानसव्यथा अश्यातूंतें धिक्- (संबुध्यर्थीआधे) १५ शब्द (लोकांचेंदूषण) + निरर्थक, ॥ द्वंद्व, ‡ साह्यकर्त्यांस-

गांठी स्फुरुचि-वृषविशिख- तति भीमा परमदाऽरुणाऽस्तनगा
घाया श्रीकृष्णाला जेविं बकी परम दारुणा स्तन गा ११४
दुःसह भीम कुरुबळीं होय जसा दहन नरकेंडुन रानीं
गणिलें त्य[illegible]नि हळहळही न बहुतर कुडु नरानीं ११५
रामाची शक्ति जसी बा भीमाचीहि शक्ति चवकळती
वीररसाची श्रवणें थोडी नेत्रें उदंड चव कळती ११६
युयुधान उत्तमौजा जिष्णु युधामन्यु कृष्ण हे तिकडे
वदले कर्ण किति कनक- गिरिचे भेदील भीमहेति कडे ११७
भूरिश्रवा गुरुतनय कृप हे तों सुज्ञ मानवावेंच
कवि म्हणति वाणि वर्णुनि देवाकीं स्फुज्ञमानवा वेंचे ११८
समयीं गुण जाणुनियां शब्देंही स्फयश साधु साधुनि घे
हें चित्र जयद्रथकुरु- पतिवदनांतूनि साधुसाधु निघे ११९
भीमशराच्छादित रवि- स्फुत झाला जेधवां दिसे नासा
भ्याला कुरुपति जाणों त्याचीत्याला न ती दिसे नासा १२०
नृप म्हणे धांवा रे म्हणतां काकासि काय पायस खा
मागें ठेविल माझा नच रक्षाया स्वकाय पाय सखा १२१
गेले अग्रज-वचनें धरुनि मनीं लाज सात बाराया
ते तोयबिंदु झाले तीं तापविला जसा तवा राया १२२
शत्रुंजयादि नव स्फुत झाले यापरिस सोजिरे नाकीं

---

१ कर्णशरांचासमूह, २ शत्रुगर्वरूपसूर्यास, अस्ताचलअशा, ३ पेटून, ४ विषही, ५ पुरुष, ६ भीमाचारवड्ग, ७ मेरुपर्वताचे कडे, ८ हेवाणि, ९ खर्च, १० नासिका, ११ सातबंधु १२ भीम, १३ ॥भायमान, + क्षीर, ※ कर्ण.

जो हरिभाग वृकाला तो भक्ष्यहि परि ससा जिरेना कीं १२३
न विकर्णेतरपानें रणरंगीं भीमसेन गहिवरता
न गदी जगदीश्वरसा गजबजता पडलिया नगींहि वरता १२४
भीम म्हणे अर्पावें सर्वस्व तुला न सायक विकर्णा
कीं वृत्ति तुझी रुचली बहुरसिका जेविं साय कविकर्णा १२५
योग्या नव्हे प्रतिज्ञा गुर्वाज्ञा जेविं भार्गवा त्यागा
असुखद रुची खलसंगति जैसी [illegible] वाल्या गा १२६
सोडावीच कुसंगति सर्वार्थद-काय-पाळणारानीं
स्वर्गपरें पुत्राचा बांधावा काय पाळणा रानीं १२७
साधु विभीषण कीं तूं जरि खळसंसर्ग करुनि मळले शें
स्पष्ट तुम्हा दोघांस स्पर्श न केला कुसंगमळलेशें १२८
होतासि सखा तूं त्या पुण्यश्लोका अजा मिळाल्याला
दोघांसहि लाभ प्रभु देउनि सयश अजामिळा त्याला १२९
ऐसें शोचुनि पुनरपि सिंहापरि होय गर्जना करिता
झाला रणोत्सवीं त्या वृत्रप्रोसादवर्ज नाक रिता १३०
धर्मास कळे नेला भीमें वृषगर्व सकळ विलयाला
तो सिंहनाद कळवी स्वर्गा जय केविं न कळविल याला १३१
इकडेहि द्रुष्ट-धृष्ट- द्युम्नादि व्योम भरिति गजरानीं
जैसे यूथपतींच्या विजयोत्कर्षे करूनि गज रानीं १३२

१ सिंहभाग, २ विकर्ण-इतर-पानें-विकर्णाहून इतरांच्या पातानें, ३ परशुरामास, ४ बाहुदळ, ५ शानशाः, ६ वृत्रप्रासादा वांचून स्वर्गी रिकामा झाला ८ म्हणजे देवादिक युद्ध पहावयास आले).७ स्वर्ग, ८ कर्णगर्व, ९ धर्माला, १० विजय-उत्कर्ष, जयाच्या आनंदें +गडबडता, ∴ पर्वतहि, ≠ समास, ⁎ विभीषणा.

व्यूहद्वारीं देती जिंकाया गुरुसि वीर नरमुंडी
न धरिति निळहि तनुपतन- भय जेविं विरक्त धीरतर मुंडी १३३
जन्हिं दिव्यभोगभोग्या स्वर्गीं पावति कुयोध नव देहा
तन्हि एकोनत्रिंशन्मित - सोदर-मरणें कुयोधन वदे हा १३४
स्मरलें सुयोधनातें जें जें कांहीं कनिष्ठ तात वदे
राया हें फळ तुजला भीम न लोभें कनिष्ठता तव दे १३५
ऐक पुन्हा न पथेला गाय अशी बा कुरुप्रसू नाहीं
जैं झांकिले शरांहीं आधीं मग भासुर-प्रसूनांहीं १३६
मोहें भीमशरांच्या सर्वत्रहि विद्ध काय होय शतें
नाहि विमुख नव्हे गातिल न सकल कुर सिद्ध काय हो यश तें
पडलें क्षितिवरि उडुसें भीमशरें कर्ण कुंडल हरी तें
वृषमुख गमे जळधिच्या सांपडलें अग्निकुंड लहरीतें १३८
पाडुनि एक कुंडल मग दश नाराच हाणिले अलिकीं
ते शोभले सरोजें पाजाया स्वमधु आणिले अलि कीं १३९
होउनि मुहूर्त मूर्छित कर्ण उठे तन्मनांतही राग
तो पद्मरागनगसा गमला रक्तार्द्र कठिण हीरांग १४०
केले रोमांचित कुर- नर कर्णें अमित बाण संधानें
न गणुनि तें तत्कार्मुक केलेंचि छिन्न सत्यसंधानें १४१
वृष घे अन्यधनु म्हणे शावपूर्णा करिल बंधु समुदि रसा

१मुसांडी, २संन्यासी, ३ एकतीस, ४ खेदोद्गार, ५ विदुर, ६देवांसप्रसविणा
री, ७ पृथापुत्र, ८ शोभायुक्त, ९पुष्पांहीं, १० नक्षत्रसें, ११ ललाटीं, १२ कमळानें,
१३ भ्रमर १४ हिऱ्याचापर्वत, १५ सत्यप्रतिज्ञजो भीमत्यानें, १६ पृथ्वी.

क्रोधें वर्षोनि भरू पाहे भीमास अंधुसे सुदिरसा १४२
मोठें संकट आलें होतें परि म्हणति जों नरेप टळतें
तों जलदपटलसें त्या वातसुतें उडविलें शरपटळ तें १४३
त्याचे तूण उघडले जाणों उग्राहिगर्भपेटारे
नारद म्हणे भले हो जाळा दृग्दोषदर्भ पेटा रे १४४
पवनेतपनसुत गमले- शक्र प्रन्हाद राम रावण वा
वाटे गगनीं नच्छर- संघर्षजदहन पामरा वणवा १४५
शरपट असे प्रकटिती कीं रवि न दिसे न वा पवन वाहे
एकाहुनि एक अधिक करिति चमत्कार बा नव नवा हे १४६
त्या वृषवृकोदरांवरि दिव्यकुसुमवर्ष लेख रचिती जीं
मुनि आशी बहु थोडी श्रीपुत्रीं हर्षले खरचिती जी १४७
पल न चाले म्हणुनि प्रकट करी कर्ण अस्त्रमायेतें
भीमपराभव इच्छी चित्तीं पसरूनि वस्त्र मायेतें १४८
चुरिले वृषविशिखानीं वायु-सुताचे धनुष्यशरभाते
झाले महाशरभ जन्हि पहिले हरि त्या मनुष्यशरभा तें १४९
हय मारुनि नसूतही मर्मीं हाणूनि बाण पांच कसा
उतरे म्हणुनि म्हणे वृष जाणों त्या जा पळोनि वांच कसा १५०
सूत युधामन्युरथीं चढला सोडुनि पवनतनयातें
जन्हि होय विरथ विक्षत होऊं दे धैर्य अवनत न यातें १५१

१कूपास, २मेघसा, ३ राजे, ४ भीमें ५भीमआणिकर्ण, ६ बाणाच्याघर्षणापासूनउत्पन्नझालेलाअग्नी, ७ देव, ८ अर्जी, ९ ममतेतें, १० सिंह, ११ भीमा, १२ शर भाते, १३कसोटीस, १४ नम्र, + अथवा.

भीमें झुगारिली रथ   शक्ति प्रकटावया ठळक लीला
अशनीच मानिली बहु   जन-नयनाहीं नभीं झळकलीला १५२
खंडी तिला नव्हे तो   वृष नागीला जसा वश शिखंडी
कीं रतिपतिच्या इषुला   लीलेनें जेविं देव शशिखंडी १५३
तों खड्गचर्म घेउनि   युद्धासि खत्कुमार काळ जसे
ते धन्य पुरुष धर्मीं   नेणति आयास भीति आळस जे १५४
तोडुनि चर्म शरगणा-   करवीं तों प्रबळबाहु घेरविला
वाटे तेव्हां जैसा   गांठूनि मुखांत राहु घे रविला   १५५
छेदी वृषचापातें   भिरकावुनि परम भीम करवाळा
राया रविच्याहि म्हणे   ओष्ठांला विजयि भीमकर वाळा १५६
हास्य करी कर्ण बहुत   शरवर्षे कार्मुकें मग नवीनें
आक्रमिलें भीमें विष-   दृगहि धराया जसें गगन वीनें १५७
राधेय रथांतरस्थां   भीम नभीं देखतां दडाला जी
हे नीच भीति गरुडा-   पासूनि त्या कालिया जडाला जी १५८
ध्वज तरु भीम शिखी वृष   मूलबिलनिलीन सर्पसा राया
वाटे प्रवर्तला तो   मारुति घननाददर्प सोराया   १५९
कर्ण ध्वजीं विलोकुनि   बहु आशीर्दृष्टि करिति क्रूर भीमीं
सत्पुरुषकथा अद्भुत   रसदा म्हणतों इलाचि कौरवी मी १६०
बा साधु साधु वदले   केवळ तद्रंगकाम जे पर ते

---

१ मयूर, २ मदनाच्या, ३ महादेव, ४ यमतुल्य, ५ ढाल, ६ भीम, ७ खड्ग, ८ स्रुवा, ९ विष-दृग्-अहि-विषदृष्टिसर्प, १० वि-इन-पक्षिश्रेष्ठ गरुडानें, ११ अजी, १२ इंद्रजिताचा गर्व, १३ संपवाया, १४ आशीर्वादरूपविष्टि, १५ क्रमदुघा, + बाणाला, + मोर.


बहुधा स्वानुजभाग- स्मृति वारी म्हणुनि न वधितां परते १६१
क्षितिवरि येतां झांकी शरपटलें कर्ण पुनरपि तयातें
रविनेंहि लोपवी हो सगुणगणें जेविं सनर पितयातें १६२
विरथ विशस्त्र वृकोदर चुकवाया कर्णबाणपात रणीं
विजयहतगजांत शिरे गगनीं जलदांत जेविं बा तरणी १६३
अघटितहि करायाचें जें कपिला जें कळे वराहा तें
वाटे जाणे भीमहि कीं उचली गज-कलेवरा हातें १६४
त्या गजकलेवरातें कर्ण छेदुनि चहूंकडे विखरी
वाटे पविप्रहारें केला विध्वस्त वासवें शिखरी १६५
रोधिति वृषशरपटलें भीमबळा जेविं यामुना गांगें
तरि बा झुगारिलीं जीं विच्छिन्नें काय तींच नागांगें १६६
तेंचि झुगारी जें ये रथचक्र तुरंगगजकुणप हाता
रोमांचित होय अरिहि जो भीमीं सत्ववर गुण पहाता १६७
तें तें कर्णी पावे पाषाणीं जेविं भंग ढेकूळ
वृषमत्तेभ शररदन भीमवपु गमे तयापुढें कूळ १६८
मग भीम क्रोधभरें चावुनियां दांत ओठ मूठ वळी
चित्तांत म्हणे घालूं मत्तवृषीं आजि काळ मूठवळी १६९
तों स्मरला अर्जुनपण आटोपी म्हणुनि भीम हातातें
प्रबळहि कुपितहि सत्पुरुष धर्मातें द्विरद भी महातातें १७०

१ अर्जुनाचा भाग आहे असी आठवण, २ भीमातें, ३ पर्वत, ४ यमुनाबळास, ५ जसींगं गोदकें, ६ गजशरीरें, ७ शव (प्रेत) ८ [illegible]न्मत्तहत्ती, ९ बाणरूपदंत, १० नरीतुल्य, ११ क्रोधयुक्तहि, १२ गज, + पित्यातें, ✱ मारुतिला ∗ यज्ञवराहाला.

कर्णहि कुंतीवचन स्मरला म्हणवुनि वधी न भावातें
त्यजिलें सर्वस्वहि परि न पळहि सत्या बुधें नसा वातें १७१
जवळि भिडोनि कुरुपते ढिंवेची भीमासि कर्ण कोदंडें
सह्योजिस प्रेतोदें कीं केला स्पर्श अहिस तो दंडें १७२
कृष्ण करिंदासि तसा घे त्या चापास भीम हिसकूनी
तेणें कर्णासि शिरीं हाणी न वधी वधासहि सकूनी १७३
वाटे महातरंगें करुनि थडक अर्णवासि अर्णव दे
साहुनि धनुःप्रहार स्मित करुनि वृकोदरासि कर्ण वदे १७४
तूं वर[6]का औदरिका[7] टाकुनि आलासि का महानस रे
भ्याडा अ[illegible]ंत सरे दुसरा वीरांत काम हा न सरे १७५
बहु अन्न-सूदताडन- पंडित तूं रणमखीं न कोविद[11] रे
भीरु जयश्रीस तसे कन्येला वर जसे नको विदरे १७६
मजसीं भिडसी भ्याडा सिंहासीं जेविं वि[12]प्रताप ससा
बाळा तपोवनाश्रित हो तूं रणभीरु विप्र तापससा १७७
किंवा हो अनुजाश्रित तोचि तुझें करिल आजि अ[13]स्वेवन
मूढा मृगें शिरावें मृगराजवनीं त्यजूनि न स्ववन १७८
भीम म्हणे राधेया जरि हि असकृत् भंगिलें तुला आजी
निर्लज्जा तरि म्हणसी मज ठावी काय तुज मुला आ[14]जी १७९
ये रे भुजयुद्द करूं हो जेसा बकहिडिंबकीचकसा

१ टोंची, २ सत्-वाजिस-उत्तम अश्वास, ३ चाबुकानें, ४ शक्त असून, ५ समुद्रास, ६ तुच्छा, ७ पोटभरू, ८ पाकशाळा, ९ भक्षण १० पंडित, ११ विद्रूप १२ पराक्रमहीन, १३ असु-अवन-प्राणरक्षण, १४ संग्राम, + कुवलयापीडनामक गजाच्या दंतास-

असतां अरुप्त त्रिदोषी जेविं बडबड त्यजील नीच कसा १८०
भीमाचें मत जाणुनि राहे राधेय मूक साउगला
कीं भुजयुद्धोत्साहें बहु अकुलज धनमदें तसा फुगला १८१
तों प्रभु म्हणे सख्या हूं कांहीं इकडेहि शर उडीव कसा
विरथीं वृकोदरीं तो घालिनसे वृष झेंपीं उडी बकसा १८२
प्रेरी अनिलवेगें प्रभु पार्थी पार्थही शरसमूहा
कर्णाहि सूता सूताहि अश्वानें तें म्हणे कुरुचमू हा १८३
सात्यकिरथीं वृकोदर चढला राधासुतापसरणीं हो
म्हणति यशस्वी या कीं मथिंन-विराधा सुतापस रणीं हो १८४
जो शक्रें हि पराचा नाशाया मद बलाविला पार्थ
तो नाराच प्रेषी कर्णावरि तदबला-विलापार्थ १८५
शीतें खंडुनि गुरुसुत वारी बाधा जरी आहमरुजा
विकळ करुनि पळवी नें मित्र प्रभुचें महामहिम गुरुजा १८६



अध्याय-१३

सात्यकि आला पाहुनि देव बहु महत्व देत नावांजी
हें किति यांस भुजाधिक जे वाहति कीशकेतना वाजी १
पार्थी सख्या तुझा प्रिय- शिष्य सखा पातला पहा यातें

१ मत्स्यीं, २ येथें ब असोन प्रासाकरितां व घेतला आहे. बकसा = बकासारिखा, ३ राधा-सुत- अपसरणी- कर्ण[illegible]थीं, ४ विरा[illegible]रणाऱ्यारामास, ५ नव-अबला-विलापअर्थ- त्याच्या स्त्रियांस[illegible]ठीं, ६ नाराचांतें, ७ सूर्योद्भवा, ८ वर्णी, ९ देवास, १० अर्जुनरथातें, + अश्वत्थाम्यास.

याकुरुबळवेगानें तूं कीं क्षम एक हो सहायानें २
शिरतो पारावारीं परि केंचा वेग बा असा मकरा
आजि कळेलचि भावि स्वक्षम दुर्योधना असोमकरा ३
श्वेताश्व म्हणे प्रभुजी कांपति चळचळ अरी पहाते ज्या
तो सात्यकिवरि उठला कीं हो भूरिश्रवा महातेजा ४
झाला युयुधान परि- श्रांत न भूरिश्रवा समरयांसीं
समबळसाहित्यांसीं गांठि वरी विषम बा समर यांसीं ५
सिंधु तरुनि न बुडो हा खाउनियां गोष्पदीं गटकलीला
बा बहु करीत आले [illegible] अयें कटकेलीला ६
त्वत्क[illegible]ं सर्वस्ववें प्रणतयाद वागावें
केवळ न सात्यकिमुखा अजित असें म्हणति यादवा गावें
तों तो कौरव्य म्हणे मृग होउनि सिंहदृष्टिविषय मरे
तसि माधवा मदरिगति कीं मामकें तेज बाण विष यम रे ८
तुज पक्षतें कुरुपति दृक्- दुर्गादेवीपुढेंचि कापीन
होईल सुप्रसन्ना कीं तूं आहेसि बहु निको पीन ९
कर जा [illegible]सां अर्पुनि मन्मार्गणा शिर विलास
लाजो रडो युधिष्ठिर जेणें व्यूहांत तूं शिरविलास १०
निःसंशय धर्मार्जुन कृष्णा समर सोडितील शोकानें
स्पष्ट निरुत्साह सकळ होइल हें आयकेल जो कानें ११

१सात्यकि, २सागरांत, ३ सुसरीस, ४सख्य नकरणाराअसा, ५समवेगासी, ६सैन्यक्रीडा, ७मत्स्यरूपजळजंतू, ८भूरिश्रवा, ९सिंहदृष्टीलागोचर, १०हेसात्यके ११माझेंतेज, १२दुर्योधनाचीदृष्टिरूपदुर्गादेवीनिजपुढें, १३चांगला, १४पुष्ट, १५माझ्याबाणास.

हांसुनि शैनेय म्हणे कौरव्या यमहि भय न शिववि ला
न करुनि निरायुध रणीं नेइल न ज्वलन नयन शिव विलया १२
कोणासि भिववितां हो हा यादव अजितदास कळलें कीं
जेव्हां होये भजक दे भाग्य पिता अजि तदा सकळ लेंकीं
मज नव गर्जित शारद- घनगर्जितसेंचि हांसवीनें हो
या गर्जनेंसि होइल फल तरि पय कां न कांसवीनें हो १४
रे कौरवाधमा तुज वधिल्या वांचूनि मी न परतेन
होते जेजे झाले शैनेयेषु बकमीन पर ते न १५
येणें तो नेणें हा बोलुनि बहु तीक्ष्ण वचन कोपविला
साहेल कोण हो अति - कठिणाही तीक्ष्णवच नको पविला
भिडले अत्यावेशें ते सात्यकि सोमदत्ति बहुत रणीं
तच्छरनिकरें केला छिन्न तसा राहुनें न बहु तरणी १७
विरथ निरायुध होउनि शूद्द नियुद्धीं प्रवर्तले मग ते
जरि नसते धर्मज्ञ ब्रम्हज्ञ कुलीन कां न डगमगते १८
कृष्ण म्हणे श्रांत दिसे सात्यकि कौरव्य नागविल याला
पार्था पत्रिपतिपुढें पावेना काय नाग विलयाला १९
रक्षावा व्यसनीं त्वां माधव आला तुझ्याचि कार्याला
स्वजनपरित्राणाहुनि अन्य व्रत मत नसेचि आर्याला २०
अर्जुन म्हणे गमे मज देतो मत्तेभ यूथपा टकरा

---

१ सात्यकि, २ मला, ३ जेव्हांभजक होयतेव्हांपितालेंकीं भाग्यदे असाभावार्थ, ४ शारकालींचे मेघगर्जनेंसारिखें, ५ होवो, ६ शैनेय-इषु- सात्यकीचेबाण, ७ वज्राला, ८ बाहुयुद्धीं (मल्लयुद्धीं) ९ गरुडापुढें, १० यूथपतीस, + सर्प.

प्रभुजी सात्यकिरक्षण संकट मोठें तुम्हीच वारा करा २१
कृष्णार्जुन वदति असें तों त्याचा करुनि बाहु समर गडी
विधुसम मृदु होय तया कौरव्य क्रूरराहुसम रगडी २२
आपटिला भूपृष्ठीं केश धरुनि वोढिला जना गमला
वधिलाचि भूरिदक्षिण नाहीं क्षणा वृष्णिवीर नाग मला २३
ईश्वरवरलाभ जया तो काळावरि करील सत्तेतें
कीं सोमदत्ति हाणी सात्यकिवक्षस्थळींहि लत्तेतें २४
कृष्ण म्हणे मजपासुनि जें शासन होय कालिया हीतें
झालें खन्नाथवरें यापासुनि दैवि कोलि याही तें २५
पाहे असिनें सात्यकि- मस्तक खंडावयासि जों रुकवी
भ्रमवी कुलालचक्रा- परि शिर चिर खड्गपात तो चुकवी २६
तों प्रभु म्हणे अरे रे श्वेताश्वा वीरनायका पावें
बा त्वत्समक्ष अरिनें सात्यकिशिर आजि काय कापावें २७
अर्जुन शार्ङ्गाग्रजातें चिंतुनि चित्तांत मानवे शनदा
तद्दक्षिणभुज खंडी हा म्हणती सर्व मानवेश तदा २८
केवळ जडली होती जरि दृष्टि जयद्रथीं तरि रुजातें
पार्थें प्रिय सोडविला तोडुनि त्या भूरिदक्षिणभुजातें २९
सांगद सखड्ग तो कपि- केतुशरच्छिन्न वीरभुज गमला
सहसा खगपति-खंडित- भोग तदाननविमुक्त भुजग मला ३०
सोडुन सात्यकिस म्हणे कौरव रे पांडु न कपिकेतो

१ भूरिश्रवा, २ सात्यकि. ३ हे कालिदेवि, ४ भूरिश्रव्यातें, ५ स- अंगद- बाहुभूषण सहित, ६ भूरिश्रव्याचा भुज, ७ सर्पाचें शरीर, + गरुड, * राजे.

धर्म कृपादिगुरुकथित हा कीं अन्योक्त जीर्ण न पिके तो ३१
यादवसहवासें तूं झालासि नसाचि कर्म हें स्वमतें
तुजला नसेल रुचलें रुचलें बहुधा कुकार्य कृष्णमतें ३२
अन्यासीं रण करितां माझा भुज खंडिला कसा सहसा
धर्मासि काय कथिसिल शास्त्रें बुडवूनि गुरुयशासह सो ३३
जें श्रितरक्षणदक्ष प्रभुसखनर वीरकर्म निंदीतें
जननीतिनें भजे रुर वल्लीतें त्यजुनि जेविं सिंदीतें ३४
पार्थ म्हणे कौरव्या वृद्धपणीं स्पष्ट बुद्धि मंदावे
कुल जांहीं जीर्ण-पुरुष ते पुण्ययशोर्थ मात्र वंदावे ३५
भगवन्मतासि भगवन्- मननिष्ठा मजहि लाविसी बोल
जो लक्षरुज्ञमान्य श्रितरक्षणधर्म मानिशी फोल ३६
माझा सखा दक्षिण- भुज सात्यकि हा कसा न रक्षावा
समरीं सहाय जो जन तो प्राणाहूनि अधिक लक्षावा ३७
त्वां आत्मा निंदावा कीं जो असमर्थ भुजाहि राखाया
योग्य श्रितावनाक्षम कीं परमाऽसाध्य रुज हिरा खाया ३८
स्वभुजावनं जड ज्याला श्रितरक्षण करिल काय तो काचा
तो धन्य जया आश्रित उत्संगावरिल काय तोकाचा ३९
कौरव्य न दे उत्तर जाणों पार्थोक्त नायके कांहीं
त्याच्या नरोक्तिहीं मद सर्पाचा जेविं जाय केकांहीं ४०
करुनि शरासन मग तो होय प्रायोपविष्ट मौन धरी

१जुना, २फळदेणारानाहीं, ३आश्रितसंरक्षण, ४श्रित-अवन-अक्षम-आश्रितांचेरक्षण करण्याविषयीं असमर्थ, ५रोग, ६बाळाचा, ७नर-उक्ति-अर्जुनाच्याभाषणानीं.
+ साहा (शस्त्रें)

योगबळें विधिलोका- प्रति जाया उपनिषद्विचार करी ४१
कुरुनीं केली कृष्णा ऽर्जुननिंदा फार न कथवे गा ती
ज्यांला देवर्षींचि कामाद्यरिमीनबक-थवे गाती ४२
लेश विषाद न दे कुरु- कृतनिंदासारवर्ष वीरा यो
त्या भूरिश्रवणासा हे न कुरुकृत स्तवन हर्षवी राया ४३
पार्थ म्हणे कौरव्या जें मद्यश लेशही नसे मळलें
सर्वांसि विदित असतां तुज एकासचि कसें नसे कळलें
जो माझ्या शरविषयीं असतां प्रबलहि धरील हननाशा
न शकावाच कधीं तो शत्रु कराया मदीय-जन-नाशा ४५
खड्गें सात्यकिमस्तक खंडन करितां तुझा भुजच्छेद
हा जरि अधर्म म्हणतां या कर्में बहुत पावतां खेद ४६
विरथ विशस्त्र सुभद्रा- सुत तुमचें धर्मतोक सामान्य
केला तुम्हीं नशाचा वध कीं हा धर्म तो कसा मान्य ४७
ऐसें जिष्णु वदे तें ऐकुनि तो स्पर्शला शिरें महितें
उडवी तयाकडे भुज वामभुजें पक्षिपति जसा अहितें ४८
किमपि न वदतां प्रेमें कृष्णासख म्हणे तया अगाधाला
पाहुनि तुला मदात्मा ऐसा न सुराश्रया अंगा धाला ४९
धर्मीं भीमीं नकुळीं सहदेवीं प्रीतिरीति परमा जी
तीच तुझ्या ठाईं बा आहे मति तुज म्हणे न पर माजी ५०
तूं माझ्या कृष्णाच्या आज्ञेनें पुण्यलोक पाव कसा

१उपनिषत्-विचार, २काम-आदि-अरि-मीन-बक, ३अर्जुनास, ४शर-विषय-बाणाच्याप्रदेशांत, ५गंभीराला, ६कल्पवृक्षाला, ७तृप्तझाला, ८माझी.

हो सुगतिपात्र शिबिसा तेजस्वी सूर्यचंद्र पावकसा ५१
प्रभुहि म्हणे कौरव्या घे देतों सुवर वरदेवर गा मी
साधो वैकुंठप्रति जा हो मत्तुल्य पक्षिवरगामी ५२
साधु म्हणति हा घनसा दाता सततोऽग्निहोत्र-याजी यो
निज-लोकीं अवलोकुनि चतुराननही म्हणेल या जी या ५३
इतुक्यामाजी सात्यकि धांवे कापावया शिर तयाचें
ब्रम्हीं गुरुप्रसादें न पुन्हा तापावयासि रत याचें ५४
वारी कृष्ण धनंजय भीम तरी क्रूर तो तयास वधी
सात्यकिधी त्या वीरीं तैशी वृत्री जसीच वासवधी ५५
वारित होते कर्ण द्रौणि जयद्रथ कृपादि हाकांहीं
परि तो त्यजिता झाला न शलाग्रज-वधदुराग्रहा कांहीं ५६
जरि सर्व म्हणत होते रे युयुधाना नको नको परतें
हरिलेंचि भूरिदक्षिण- शिर वीरेण ऐकिलें न कोपरतें ५७
सात्यकि विश्व-मुखें त्या कर्मकलंकें उदंड निंदुनि घे
संकोचांतुनि बाहिर बहुधा तैंपासुनीच इंदु निघे ५८
जो सात्यकि हत यूथप[13] हरिसा अत्युग्र पूर्ण उत्साहें
कुरुवीरांसि म्हणे विष पीतां करितां मदीय-कुत्सा हें ५९
धर्म-कथा धार्मिकसे कथितां न विचारितांहि अन्या या
न वधावा न वधावा म्हणतां आपण करूनि अन्याया ६०

---

१ अग्निसारखा, २ वरश्रेष्ठ, ३ माझ्यासारखा, ४ गरुडावर बसून फिरणारा, ५ निरंतर अग्निहोत्र हवन कर्ता, ६ या भूरिश्रव्यास, ७ वृत्रासुराविषयीं, ८ इंद्रबुद्धी, ९ भूरिश्रव्याचा वधरूप दुराग्रहास, १० हे सात्यके, ११ निवारण, १२ रागीट अज्ञानें, १३ गजपति-

जेव्हां केलें विरथ-वि- शस्त्र-सुभद्रा कुमारवधकर्म
तेव्हां गेला होता सोडुनि कोठें तुह्मांसि हा धर्म ६१
जो मज पाडुनि समरीं हाणिल माझ्या उरांत लात अरी
तन्मथन मत्प्रतिज्ञा ती म्यां केली वधूनि यासि खरी
जें कर्म अमित्राला पीडाकर होय सर्व तें कार्य
रामायणांत वदला ह्मणती कवि आद्य ज्यासि तो आर्य
ऐसें सात्यकि बोले उत्तर इकडील कर्णही न करी
वाटे झाले परिसुनि हरिगर्जित शक्तिवर्णहीन करी ६४
खलदुर्जय बलजलधि च्छलरहिताचार जलदसा दाता
नलसम शुचि शलपूर्वज हलभृदनुजलोक पावला ताता
शिनिनें स्वयंवरीं जैं श्रीवसुदेवार्थ देवकी हरिली
तैं बहुत सोमदत्तें आत्मपरिभवव्यथा मनीं धरिली
बहु वीरमंडळीं यश जिंकुनियां युद्ध सत्वर शिनि घे
श्रीरुद्रासि शरण तो विजयार्थी शुद्धसत्वराशि निघे
विचकूं न देचि इतरा दात्यापरि जो दयालु देव रद
तो आशुतोष दर्शन देउनि वद वर असें वदे वरद ६८
तो सोमदत्त नमुनि स्तउनि प्रेमें परोपरि भवातें
मागे शिनिपुत्राच्या मत्पुत्र रणीं करो परिभवातें ६९
मत्सुत-करें वरावें वरिलें जें काय हो यश शिनि-करें
नासे तव प्रसादें ताप न नाहींच होय शशिनिकरें ७०

१ वाल्मीकि, २ हस्ती, ३ विष्णुलोक – हलभृत्-अनुज-लोक-बलरामाच्या बंधूचा लोक, ४ हे धृतराष्ट्रा, ५ नामविशेष (सात्यकीच्या पित्यानें) ६ चंद्रसमूहें *: तात्काल होतो संतोष ज्यास असा सदाशिव + शक्ति-वर्ण-हीन.

प्रभु एवमस्तु ऐसें बोलुनि दे प्रार्थिला वर प्रणता
हूं किति देता जरि तो बल कालपराभवार्थ द्या ह्मणता ७१
शिनिनें जैसा परिभव केला होता रणीं स्वताताचा
तैसाचि भूरिदक्षिण करि ईशवरें तदंगजाताचा ७२
यास्तव सात्यकि भंगे कीं आया तदरिखेद हर पावे
नातरि तया पुढें तों शत्रूचे सर्व वेद हरपावे ७३
ब्रह्मद्रव्य ज्ञाति- द्रव्य गुरुद्रव्य रक्षिति न हरिती
ब्रह्मण्य सत्यवादी दीनजनीं नातसे दया करिती ७४
बहु शांत दांत दाते अविकत्थन धर्मनीतिनिष्ठ तसे
सत्पुरुष तेचि यादव ज्यांपासीं विजय दैव तिष्ठतसे ७५
अजित पदाश्रित सर्वहि यादव अजितचि सुरासुरजनां कीं
गाती यांसि सजुनि बहु मधुररव नवे नवे मुरज नाकीं
त्यांसीं कैसा लाऊं दिधला त्वां पुत्रवत्सला दावा
काय ह्मणों वृष दुर्वह हस्तिभरें केविं वत्स लादावा

अध्याय १४

अश्वि यूपकेतुची गति होय मग ह्मणे सिताश्व देवा हूं
श्रीरुद्रचरणकमलीं शीघ्र जयद्रथशिरोब्ज दे वाहूं १
थोडा उरला वासर बा सरसिजलोचना तुरग हाकीं

---

१ एवं·अस्तु·असें·असो, २ तत्पुत्राचा, ३ निंदापरस्तुतिनकरणारे, ४ मृदंग, ५ भूरिश्रव्याची, ६ शिरकमल.

माराचाचि खल अनुप- कारक खराखुरा उरग[1] हा कीं २
बा केव्हांही झालें यामागें जें सुधी न दासाचें
तें आजहि प्रतिज्ञा वच होवि दयासुधानदा[16] सोचें ३
तो भक्तवत्सल प्रभु ती पार्थाची मनांत मातलि[5] ही
रथ चालवी त्वरित तें पाहुनि लाजे मनांत मातलिही ४
कुरुवीर धांवले बहु येतां नररथ जयद्रथ जवळ
कुरुपति कर्णासि ह्मणे न परमुखीं सिंधुराज[6] हो कवळ
प्रकट करी बळ चिंतित होतों बहु दिवस या [illegible]
सुकवि ह्मणोत महाद्भुत ठावा नाहींच यासम रस मया[8]
हा पण कीं अस्तासि न रवि जातां सिंधुराज मारावा
अल्पावसिष्ट[9] वासर वेंचे तों मात्र पार्थ वारावा ७
जातां वृथा प्रतिज्ञा पावेल श्वेतवाह विलयाला
ज्वलनीं शिरतां सत्य- त्राणा कवि कोण राहविल याला
होतील बंधु शोकें धर्म पवनपुत्र[10] बुद्धिबळहीन
जलहीन मीनसे ते चवघेही वांचतील पळही न ९
पावेल हरिहि तापा- पासुनि बहु जेविं आज्यप[11] दराला[12]
एवं सुखेंचि येइल निष्कंटक सर्व राज्य पदराला १०
शल्य कृप द्रौणि सहित करिशिल तूं स्पष्ट रत्नसानुजया[13]
सेना तव साहित्या योजिन मी करुनि यत्न सानुज[14] या
कर्ण ह्मणे कुरुराजा मज गमला भीम अहिमकर[15] साच
त्याचे सायक नायक उग्रांचे क्रुद्ध अहि मकर साच १२

१ सर्प, २ खोटी, ३ खरें, ४ उक्ति, ५ इंद्रसारथी, ६ जयद्रथ, ७ वायुद्रसा सारखा, ८ मयासुरास, ९ थोडा राहिलेला, १० भीम, ११ उत्तमघृत अथवा लोणी, १२ भयाला, १३ मेरुजयानें, १४ स-अनुज-बंधूसह, १५ सूर्यसदृश ** दयारूप अमृताच्या

अमरांतेंही मर्म [1]छेदुनि ह्मणतिल करूनि आ वांका
बहु [2]विकल मी असावें ह्मणुनचि आहें धरूनि आवांका
मज बळ न चालवाया निजकर पाद-क्षताऽकुला [3]लेवा
भीमा मी दाखविता विधिसि जसा [4]दक्षता कुलालेश १४
परि समयीं न चुकावें ह्मणुनि यथाशक्ति करिल संगर हो
दैवीं जय प्रतिष्ठित आहे तूं धरुनि धैर्यसंग रहा १५
मी युद्ध करित असतां सैंधव न धनंजयासि [5]गावेल
अभिमुख वात वहातां तरुला व्यापील काय गा वेल १६
ऐसें जों कुरुपतिसीं उत्साह बळें धरूनि कर्ण वदे
नर शर-जालें मथित्यां बहु गरळें जेवि ताप अर्णव दे १७
छेदी पार्थ तडतड द्विरदांचें कुरुबळीं शिरोनि [6]करें
झांकी क्षितिला विखरुनि वीर धनुर्बाणभुजशिरो [7]निकरें
किंबहुना बहु शोणित- पूरीं योधबळ वाहवी राया
तेव्हां सुरर्षि वदले सद्यश यों धवळवी [8]हवीरा या १९
कुरुकटक जलदपटलचि शिरतां अर्जुनसमीर विखुळे तें
ते नृप [9]रक्षतुळे तें पावे तो विक्रमी रवितुळेतें २०
जेविं क्षम लीलेनें सर्व परमदा [10]पिनाक साराया
नरचाप तसाचि परा उग्र परम दापिना कसा राया २१
दुर्योधन दुःशासन कर्ण कृप द्रौणि शल्य हे [11]मानी
पार्थीं बहुशस्त्रांनीं वर्षति [12]पात्रीं जसेंचि हेमानी २२

---

१ अनवरात, २ कुशलता, ३ कुंभार, ४ हाती,कर्ण, ५ सांपडेल, ६ शुंडादंड, ७ समूह, ८ अर्जुनवीराला, ९ राक्षसतुळनेतें, १० शिवचाप, ११ अभिमानी, १२ सत्पात्रीं ब्राह्मणीं, + येवो.

विजयासि बाण ह्मणिति ते सर्वांहि एकदांचि कडकडुनी
गमलें अमृतरसातें केली जिंकावया निकड करुंनी
करिती प्रसन्न व्हाया जो सादर नारदादिभक्त पसें
त्या प्रभुच्याही मर्मी ह्मणिति शर दनुसुतादि रक्तपसे
परशारशातें त्यजि न धृति विजय सुयंति जेविं अंतरायशतें
रामयशासीं तुळितां न धरी तिलमात्र अंतरा यश तें
दुर्योधन दुःशासन शल्य कृप द्रौणि भंगतां क्रुद्ध
कर्ण पुढें होय करी अत्यद्भुत शक्रसूनुसीं युद्ध २६
सात्यकिचे भीमाचे पावुनि वित्रास हाय हात रणीं
ह्मणती वाटे झाला प्रियसुतमित्रा सहाय हा तरणी
पार्थ न साहे जें वृष कृष्णीं क्षत करुनि होय अधिक रणीं
वेदांती परविरचित दूषणपांडित्य जेविं अधिकरणीं २८
शरजाला-सह सहसा पाडी तोडूनि पार्थ तो धनुतें
तों सज्य दुजें केलें निमिषार्धें त्या समस्त-योध-नुतें
कर्णे शरवृष्टि पुन्हा केली तिस विसकटूनि [illegible]
पविसम सायक सोडी रचित-निलिंपार्थ पार्थ बा राया
जो हांसत पार्थ ह्मणे अर्पुनि बाणास अंग पावन हो
छेदुनि दुर्वार शर द्रौणि करी क्षिप्र अंगपावन हो ३१
केला पार्थे वृषें वृष पार्थे शतदा शरीं दीसेनासा
सोंध्वस न धरिति जाणों साश्रा दोघांसही दीसे नासा

१ विषांनीं, २ अंजलि, ३ राक्षससे, ४ उत्तमसंन्यासी, ५ विघ्नशतें, ६ भेदा, ७ सिद्धांतप्रतिपादनांत, ८ रचित.निलिंप.अर्थ.संपादित आहे देवांचा कार्यार्थ जेणें असा, ९ अंग-प-अवन कर्णरक्षण, १० भय. ११ स-अश्रा.

तों स्वभटांसि नृप ह्मणे वृष विजया न वधितां न परतेल
साहित्य करा दीपचि हरि तम त्या पाहिजेचि परे तेल ३३
मग नगेभित्सुत मारुनि हरि सारथि कर्णकीर्तिला मळवी
त्यातें अश्वत्थामा सत्वर वाहोनि निज रथीं पळवी ३४
गुरुसुत कृप मद्रप वृष-सेन झटति पार्थ शर सहात रणीं
इच्छिति सर्व असें कीं अस्तंगत होउ शीघ्र हा तरणी ३५
सिंधुपतीच्या जाऊं नच द्यावा पार्थ हा निकट कांहीं
तुमच्या असाचि निश्चय केला साहोनि हानि कट कांहीं
बहु वर्षतां परांस न नर मानी जेवि न नग [illegible]
भासे धनंजय धनं-जयेंचि सकळ शत्रुजन गमे घांस ३७
गमलें आंगें करितो रतिरमणक्षयकराक्ष समरा या
कीं श्रीमद्रामातें वेढुनि झटतात राक्षस मराया ३८
हय गज भटांसि नरशर अहि द्याया मृत्यु रोकडा डसले
मग हृदयीं हरिरवसा कुरुपमनीं फार तो कडाड सले ३९
गरुडें गांठावा अहि गरुदनिलें जेविं जलधि उडवूनी
बा गांठिला जयद्रथ तेवि नरें बहुत सैन्य बुडवूनी ४०
कपिवरि एक हयावरि वसु हरिवरि[10] तीन अर्जुनावरि सा[+]
शर योजी सैंधवें[11] विग- ताऽयु शरभहंतुकाम तो हरिसो[12] ४१
ते छेदुनि पार्थें क्षत- तनु केला बाण साठ सोडूनी
तत्काळ पाडिले शर- युग्में तत्सूतकेतु तोडूनी ४२

---

१ परंतु, २ अर्जुन, ३ अश्व, ४ श्रमानें कामकरिती ५ अग्निच, ६ गवत, ७ मदनमारकनेत्रज्याचे असा शिव, ८ गरुत्-अनिल पक्षवातानें, ९ आठ, १० कृष्णावर, ११ जयद्रथ, १२ सिंहसा, + सहा.

तों प्रभु ह्मणे सरव्या हा   व्याघ्रीच्या जेविं सार थानीचा
वधिशिल कसा न करितां भग्न रणीं प्रथम सा रथा नीचा
तुज थोड्यातरि व्हाव्या जिंकाया सारथासि. सा घटिका
थोडा उरला वासर सन्मान्या पण तुझा न हो लटिका
सैंधव आजि कसा तरि तुज करवीं पाहिजेच मारविला
यास्तव मी योगें तम निर्मुनियां झांकितोंचि या रविला
वाटेल सैंधवासह सर्वांसहि सूर्य सत्य मावळला
चुकला सुकला अर्जुन भलतें शोकज्वरांत चावळला
चुकलें मरण ह्मणुनि बहु हर्षेल न आपणास रक्षील
हांसेल ह्मणेल भलें झालें पार्थासि वन्हि भक्षील ४७
त्या रंध्रींच अधम-शिर उडवीं शंका धरूं नको कांहीं
करितांहि शोक विरह- ज्वरभय चित्तीं धरून कोकांहीं
पार्थ अवश्य ह्मणे प्रभु झांकीं निर्मुनि महा तमा रवितें
अरिस नरकुंजरीं हरि- तेजचि होउनि महात मारवितें ४९
करुनि तमें तरणीतें पुरवाया श्रितमनोरथा पिहित
यद्यपि दुर्घट होतें प्रभु लीलेनें करी तथापि हित ५१
बहु जोडिलें सुयशधन ऐसा हा भरुनि हाटे कपटाचा
महिमा सहस्रवदना- हि न वदवे दिव्यहाटकपटाचा ५१
तरणि न दिसतां लावी सकळ कटक तोहि दृष्टि गगनींच
त्यों आपणाहुनि बहुत हर्षभरें होय मेरुनग नीच ५२

---

१ चक्रवाक पक्ष्यांनीं. २ आच्छादित, ३ बाजार, ४ दिव्यहाटकाचा पट ज्याचा, ह्मणजे सुवर्णापरी पीत पट ज्याचा असा जो कृष्ण त्याचा, ५ जयद्रथास, + बकला.

देव ह्मणे रि[illegible] [illegible] सिंधुपाल तो खौतें
तन्मस्तक खंडुनि मज बा लक्ष्मणसाचि घाल तोखोतें
[illegible] नर खरतर शरवृष्टि करुनि कुरुसैन्य
मारी सुदूर सारी चापबळें अचळ कुळ जसें वैन्य ५४
आनोभि बुडति चक्रें ऐसें क्षितिवरि पळांत पळे सांचे
वाटे खरे विखरिले रणरंगीं पुष्पराशि पळसांचे ५५
शौरिसख करी सहसा द्रौणि कृपाचार्य गाढ विद्ध रणीं
बहु कांपवी पतद्गज- वृंदभरें पार्थ गाढविद्धरणी ५६
वृषवृषसेन धनुष्यें खंडी भ्रमवी सुयोधनमनातें
[illegible]तासि वधी करिति भयें बहु सुयोध नमनातें
शरवर्षे रथरक्षक सकळ विकळ करुनि पळविले वधिले
कार्यार्थ सुचों न दिलें त्या वध्यजय था मनामधिले५८
मग घे शर जो होता अर्चित दुःसह अरीस भात्यांत
वज्रास्त्रें मंत्रुनि बहु आणी पहिल्या परीस भीं त्यांत५९
देव ह्मणे ऐक अशी झाली हा जन्मतां नभोवाणी
हें सुत-रत्न निज-कुळा वृद्धिप्रद जेविं वारिजा पाणी६०
होईल शूर मानी बहु संपत्ति प्रसिद्ध जोडील
परि समरांत अलक्षित अरि याच्या मस्तकाशि तोडील
सुतशोक जसा न तसा दुःसह संताप भो सखे देव दे
याचा पिता बृहद्रथ ऐसें होऊनि तो सखेद वदे ६२

१अर्जुनास, २आकाशातें, ३हर्षातें, ४ वेनराजाचें, ५ नाभिपर्यंत, ६मांस, ७अर्जुन, ८ दृढ, ९ पतनपावणारा हत्तीचा समूह त्याच्याभारें, १० तेज ११आकाशवाणी, १२ कमलास, १३ अवचित (न पाहतां) १४ वणवा

क्षितिवरि जयद्रथाचें पाहिल मस्तकसरोज जो जन हो
शतधा त्याचेंहि फुटो मस्तक तो श्वापदांसि भोजन हो ६३
जपतो तपतो तप तो कीं निज याचा कधीं न हो वंध्या
संप्रतिस्यमंत पंचक- देशाबाहेर करितसे संध्या ६४
योग्यें मस्तक याच्या जनकोत्संगीं हळूच पाडावें
कंदुकेसें गगनपथीं वरिचेवरि शरकरोंचि तोडावें ६५
अर्जुन म्हणे बहु बरें गांडीव गुणीं स्वबाण तो जोडी
सोडी स[illegible] वध्य जयद्रथशिरोंबु-रुह तोडी ६६
नेलें करें कमळसें शरनिकरें सांवरूनियां शिरतें
अंकींच उतरिलें बा हितचि अहित देव जेधवां फिरतें ६७
बैसोनि करित होता जप तुमचा स्वस्थचित्त तो व्याही
प्रभुयश किति वर्णिल कवि करु आर्या लक्ष कोटि वोव्याही ६८
अंकीं काय गुरु असें म्हणुनि पहावें परंतु मन भुललें
उठतां जप करुनि पडे क्षितिवरि स्वतशीर्ष तच्छिरहि उललें ६९
प्रभुनें यापरि तुमचा जांवाई आणि खपविला व्याही
भगवत्क्षोभें नवकुश शमविल गरुडाहि न पवि लाव्याही ७०
ब्रम्हादि सर्व भूतें तें पाहुनि अतुल विस्मया वरिती
करिती बहु नरहरिस्तुति तद्ध्यानचि भक्त दृढ मनीं धरिती ७१
अक्षौहिणी खपविल्या या युद्धीं श्वेतवाहनें आठ
कार्मुक वेद हरिहर स्तवराजहि राजया जैया पाठ ७२

१होचो, २आतां, ३जयद्रथाचें, ४जनक-उत्संग-बापाच्यामांडीवर, ५चेंडूसारखें, ६कोमलतृणांकुर, ७लावकपक्ष्यासही, ८कृष्णाचिस्तुति, ९धनुर्वेद, १०हेधृतराष्ट्रा, ११श्वेतवाहनास (अर्जुनास), +जड.

मग जगदीश सुहृत्तम पुरुषोत्तम त्या तमासि आटोपी
हा टोपी घालिल जल निधिसहि मशका म्हणेल आटो पी ७३
दिनमणि दिसतां देव- क्यात्मजमाया असें तयां उमजे
कपटें जिंकोनि करित होते वृद्धांसमक्ष ही धुम जे ७४
केलें तव तनयांनीं पाडुनि सैंधव परोक्ष रोदन हो
भ्रमद कविमतें स्नेहचि ऐसा सेवनपरा सुरोद न हो ७५
श्रीकृष्णें प्रथमचि मग श्वेताश्वें शंखराज वाजविला
भीमाच्या सिंहरवें कल्पांत-पयोद नाद लाजविला ७६
त्या नादें धर्माला विजयें अरि मर्दिला असें कळलें
टळलें दुस्तर संकट कृष्णपदध्यान जयफळें फळलें ७७
होऊनि जयोन्मत्त द्रोणासि न वचकतीच भट कांहीं
हर्षें बहुविध वाद्यें वाजविलीं धर्मराज-कटकांहीं ७८
गुरु मारावाचि म्हणति पांचाळप्रमुख सकळ वीरमणी
उत्साह-शक्ति योधा श्रम पत्न्या जेविं न कळवी रमणी ७९
अस्तातें रवि जातां जगदेक यथार्थसंध सिवबाजी
निज विजयश्रीस हरी सांपडली पथ चुकोनि कितवा जी ८०

अध्याय १५

बहु शर वर्षति कृप गुरु- सुत घालुनि शक्रसूनुला मध्यें

---

१ सूर्य, २ देवकी-आत्मज-माया-[illegible], ३ भीष्मादिकांसमक्ष, ४ धुं[illegible], ५ गतप्राण, ६ [illegible]सागर, ७ होवो, ८ मल[illegible]आद९ सत्यप्रतिज्ञ

ज्याच्या धतुला झाली   दैत्यांचीं उद्धृतें बळें वध्यें   १
चित्तीं पार्थ म्हणे कृप   गुरु गुरु-सुत हाहि गुरु असामान्य
निष्ठुर कैसें व्हावें   द्रोणेतर जन नसे असा मान्य   २
शर मंदवेग तो गुरु - वत्सल रक्षावया स्वयश हाणी
परि तन्मति गडबडली   स्त्री बहु कार्यांत जेविं न शहाणी ३
त्या विप्रयुगीं न पडति   जरि पार्थ-प्रहित मंद रोपें रितें
गाववितिं अमृतरुचि शुचि   गुणवश यश मे [illegible]रि ते ४
पार्थ शरार्त कृप कृपण- सम समयज्ञाहि करून आरडला
पडला मूर्च्छित जैसा   बहु बाल व्याल[४]दष्ट आरडला   ५
वाटेल तत्तनुपुढें   बहु कांटे काय काढिले पणो[५]सें
आलें कृपासि पन्नग- पाशीं रघुनायका ढिलेपणासें   ६
मेलाचि असें मानुनि   सूतें रथ तूर्ण काढिला मागें
केला गुरुशोक प्रभु-   पाशीं त्या अर्जुनें महा[६]भागें   ७
गुरु माय बाप ईश्वर   तरले गुरुचीच धरुनि नर कास
मजसम नीच कृतघ्न   प्रभुजी पावेन मरुनि नरकास   ८
स्मरतां कृप-गुरु घालिल   मज बहु अभिमन्युपरिस शोकांत
ज्याला गुरुचा वध म[७]त   अधमतम असा नसेल लोकांत ९
करितां विलाप दाटे   बा[८]ष्पांच्या पार्थकंठ वेगानें
कीं गुरुशोकीं स्वजना   स्वर्गीहि न काल कं[९]ठवे गानें   १०
तोंचि जयद्रथमथन-   व्यथित-हृदय कर्ण धांवला कोपें

---

१ कृप आणि अश्वत्थामा यांचे ठाई, २ बाण, ३ विफल, ४ सर्पदंशित, ५ फणस नामक फळानें, ६ मोठा भाग्यवान् अशा, ७ मान्य, ८ अश्रूंच्या, ९ क्रमवे.

सात्यकि होय पुढें हो पार्थ म्हणे यास हें नव्हे सोपें ११
रथ चालिव वालिवधा-[1] घतुलयशा यादवास राखावें
सुरभी म्हणेल काय व्याघ्रें स्वसमस्त वासेरा खावें १२
देव म्हणे वत्स गमे प्रेमें परि हा निका महर्षभ रे
समयीं गुरुभक्त मनीं दुर्धर-अरि-हानि-काम हर्ष भरे १३
एकचि सात्यकि आहे कर्णाच्या परिभवास पर्याप्त
करिती साहित्य तुझें चक्रत्रातेहि वीरवर्याप्त १४
घालिं न गांठि करूं दे आधीं हरिदत्तशक्तिचा वेंच
व्याघ्री नागी कृत्या तशि हरिला शक्रशक्ति चावेच १५
शक्ति दिली देऊं दे न कृतवधें अयश अर्जु नाकेश
सर्वस्व बुडो न तुझा एकहि हो वक्र अर्जुना केश १६
स्वच्छगुणा तूं ठाउक असती सुरनायका पुरारीस
प्राकृत जाणेल कसा बा जाणों काय कापुरा रीसें १७
घालिन गांठि वृषासीं त्याच्या येतांचि समय मरणाचा
मग चिंता कां घेइल पथकर जरि दाससम यम रणाचा १८
सात्यकिला विरथ करिल यूपध्वज हें भविष्य जाणोनी
प्रभु कल्पविला दे निज रथ दूरिल दर रवेंचि आणोनी १९
त्या अजितरथीं सात्यकि शक्ररथीं रामचंद्रसा वेधे
कर्णाभवते बहु उर- गाभवते जेविं गरुड कावे घे २०

१ वालिवधापासून अनुपम्ययश मिळविलेल्या (कृष्णा) २ वत्सातें, ३ मोठा बैल, ४ पुरेसा, ५ वीरश्रेष्ठ असे सुहृत्, ६ इंद्रदत्तशक्तीचा (वासवीशक्तीच्या) ७ खर्च, ८ संपादूं, ९ नाक-ईश-इंद्र, १० पुर-अरिस-सदाशिवास, ११ आस्वल, १२ कूर्ण, १३ सिद्ध करविलेला १४ रामचंद्रासारिखा, १५ चढे, + सात्यकिला.

रक्तें न्हाले झाले [illegible]रवे पुष्पिता[1] पलाशनगा
गंधर्व म्हणति एका राघव एका म्हणा पलाशन[2] गा २१
[illegible]षसात्याकरणसमयीं प्रेक्षकनिकरीं न देहभान वसे
दानवसेनापतिसे गमले कीं देवसे न मानवसे २२
विरथ करूनि पळों दे वृष न करी नैकबाणविद्धांत[3]
मुख्य धनुर्धर कृष्णा ऽर्जुन सात्यकि हाचि होय सिद्धांत २३
भीमाऽर्जुनभाग म्हणुनि तव-सुत[4] राधेय मारिले नाहीं
लीलेनेंचि निवटिता दुर्घट नव्हतेंचि माधवा कांहीं २४
भूपरथीं जाउनि वृष सोडी अत्युष्ण[+] दीर्घ सुसकारे
हळुचि म्हणे हा देवा कां केला तपनसुतहि फुसका[5] रे २५
कृतवर्मा गुरुनंदन इतर महारथहि भांडले सर्व
परि एकेंचि धनुष्यें त्यांचा साराहि सारिला गर्व २६
सात्यकि कुरुकटकाचा पवन घनाचा तसा करि[6] भणाण
पुसतां कसें श्रुत असे आपणाचि कृपा पुढें तरि म्हणा ण[7] २७
तों दारुका कुजानें सिद्ध करूनि आणिला सुरथ राया
प्रभुनें तो केला त्या योग्य न शक्रादिही सुर थरीया[8] २८
माधव चंदे नवरथीं आज्ञा दे दारुकास मातलिला
जेविं श्रीराम मथुनि खचरचमूला उदंड मातलिला[9] २९
सात्यक्य वनयशाचा पांघुरवी देव दारुका सेला

१ प्रफुल्लितअशापळसाच्याझाडास, २ पल-अशन-मांसभक्षक-राक्षस, ३ न-एक-बाण-विद्ध-अंत-अनेकबाणानेंविद्धजोत्याचा अंत, ४ तुझापुत्र (दुर्योधन), ५ सात्यकीला, ६ जीवळकरीज्यांतअसावीतइहित असा, ७ कृपापुढें ण म्हणजे कृपाण असें म्हणा, ८ टिकाया, ९ फारमाजलीतिला. + अति-उष्ण

प्रभु केविं न तारी जड- ही लावुनि देवदारु कासे ला ३०
तैसाचि कर्णहि चढे विधिवत्कल्पित-रथीं विमान-समीं
झाले विमनस्क सकल तत्वज्ञहि जाहलों विमनेस मी ३१
भीमें वधिले दुर्मुख- मुख तव सुत एकतीस म्यां कथिले
भगदत्त-भीष्ममुख बहु- शत विजयें सात्वतें रणीं मथिले ३२
या बहुलक्षजनाला बा हेतु तुझाचि अपनय मराया
बहु काम कोप लोभचि खर न मळयाग्नि तपन यम राया ३३
अनुजाला भीम म्हणे विरथ करुनि गांजिलें मला कर्णे
तें म्यांचि साहिलें बा आइकता नच दुजा भला कर्णे ३४
तूवरका औदरिका मूढा संग्राम कातरा बाळा
ऐसें पुनः पुन्हा मज वृष वदला अर्जुना असत्काळा ३५
ऐसें म्हणेल त्यातें मारावें तत्क्षणीं न सोसावें
हें त्वांचि मत्प्रतिज्ञा- वच दीनापत्यसेंचि पोसावें ३६
जसि आपुली तसि बुडों दे बुध पंकांत गाय न पराची
गानपटुसखा समयीं सांवरि तो तान गायनपराची ३७
नेला वृषाकडे रथ कथितां अवमान हा निज गदीशें
सोसावी स्वजनाची कैशी नव [illegible]ने जगदीशें ३८
पार्थ म्हणे ऐक वृषा जय अपजय वासवींहि आटळला
नहुष महाराज मदें इंद्रपदाहुनि न काय गा ढळला ३९

१ काष्ठविशेष, २ यथाशास्त्र केलेल्या रथीं, ३ विमानसदृश अशा (रथीं) ४ विरसअंत:करण असे ५ विमनस्क, ६ सात्यकीनें, ७ दुर्नीति, ८ कानानें, ९ उदरपोषका (अधाशी) १० [illegible], ११ दीन-अपत्य-निराश्रित मूलसें, १२ गायन [illegible] मित्र, १३ गायनतत्पराची, १४ गदी-ईश-भीमानें, + संग्रामाविषयींभ्याड.

आतांच कीं न वधितां सात्यकिनें सोडिलासि हा नीचा
सत्वर पावसिल फळा केल्या स्त्कुलज-मान-हानीच्या ४०
बहुदां विरथ करुनि तुज भीम न कांहींच बोलिला खोटें
जो टेंक धरुनि भिडला ज्याचें यश वीरमंडळीं मोटें ४१
करुनि यदृच्छेनें[१] त्या आर्यातें एकदां विरथ अकुळा
उपहासिलें कसें त्वां हांसावें काय बहुलें बकुळा ४२
वधिला सौभद्र तुम्हीं बहुतांहीं मत्तकरिसमानाहीं
कर्मे सुदुर्जरें स्वर- गर[illegible]पानाहि परिस माना हीं ४३
गणिले जेणें वैरी व्याघ्रें विपिनीं विशाळ वृषसेन
तो अभिमन्यु जसा प्रिय मज तुज जो प्रिय तसाचि वृषसेन
कथितों यथार्थ करितों शपथ स्पर्शोनि आयुधा त्यातें
वधिन तुजपुढें दुर्मिळ यश देतां नवहि आयु धात्यातें ४५
आधीं स्तनशोकास्य प्रेक्षीं मग दूर काय कालास्य
करितील शिवा चुंबुनि तुज भवत्या जेविं बायका लास्य
उरकुनि घे कार्य उचित ठेवाया न वृषसेनें[१०] जनका जें
आमरण कष्ट न स्मरति बहु परवश न वृषसे न जन कोजें[११]
प्रकटे महा प्रतिज्ञा सर्वत्रहि कुरुबळांत [illegible]त्कार ती
भट करिती हा हा कीं न करिल तिस देवदैत्यकटक रिती ४८
रवि मावळला वाटे गेला देशांतरीं धरुनि शोक
कोक वरडति न रडतिल [illegible][१२]यलयीं कवण लोक ४९

१ आपलेइच्छेनें, २ भीमातें, ३ कुळहीना, ४ बाळकीनें, ५ नामविशेष (कर्णपुत्र)
६ [illegible]सेनातें, ७ विधीतें, ८ कोल्ह्या, ९ नृत्य, १० हें वृषसेनाच्या पिता (कर्ण)
११ कार्ययोगानें (जेजन बैलासारखे तेपरतंत्र नाहींतअसें नाहीं) १२ तेजस्वी-आश्रय-
लय.

जें सुख सुखमूर्ति बरी देउनि विजयासि सुपरिरंभानें
नच वरिती शत-वत्सर शुकवश झाल्याहि उपरि रंभा तें ५०
भगवान् म्हणे प्रिय-सख्या जीतें तरलासि तूं प्रतिज्ञा ती
इतराला न तरवती झाले गतगर्व संप्रति ज्ञाती ५१
मोठीं मोठींहि बळें लवतिल तुजला न कां [2][illegible]ला
जरि लांबरुंद बळकट होतिल सम काय कांबळे शाला ५२
मज तो तसा दिसेना जो एकाकी धसेल या कटकीं
त्वत्तुल्य त्वदधिकही बहु मेळविले सुयोधनें भट कीं ५३
हें कर्म कराया जरि शक्राचें सैन्य एक कट करितें
होतें भिडतां यासीं सर्पासीं जेविं [4]भेककटक रितें ५४
हें भुजयुग[5]कौतुक करिल अणिकहि पावेल कर्ण विलयाला
भाट करुनि मज याचा जय याहुनि अधिक वर्णविल [6]याला
पार्थ म्हणे न विसरवे पळ तव पदनीरजाप्रति ज्ञात्या
देवी सुफळा करितें +हें करिती धीर ज्या प्रतिज्ञा त्या ५६
केला धन्य त्रिजगीं तुझिया हा [7]वासवि प्रसादानें
[8]संतानें जन्म सुदु गतिचा आवास [9]विप्रसा दानें ५७
तूं ज्याचा नाथ तया जरि जय तरि काय नवल वर्णवेल
याला त्या अरिजीवन किति सागर काय नव लवण व्याला ५८
जे त्वच्चरणाश्रित ते गरुडचि [10]शमन-[11]करवाल कालाही
शिर दूर बळें त्याच्या लाविल यम न कर [12]वालकालाही ५९

---

१ उत्कृष्ट आलिंगनानें, २ बळवंताला, ३ घोंगड्या, ४ मंडूकसेना (बेडुकांचा समुदाय) ५ कौतुक, ६ पार्थाला, ७ अर्जुन, ८ कल्पवृक्षानें, ९ गृह (राहाण्याचें स्थान) १० यमाचा रवड्ग, ११ कृष्णसर्प. १२ केशालाही, + त्वत्पादकमल.

झाले कृतार्थ तरले   अगणित या पादपल्लवध्यानें
व्यर्थ फुगविले नगणुनि   तुजजगदीशासि गेलु[1] वध्यानें[2]   ६०
शतकोटि मिळविले जरि   शतकोटिकेरहि[3] सुयोध नव धरणी
वरिलचि तव प्रसादें   धर्मा होइल सुयोधनवध रणीं   ६१
जयहि प्रभावहि तुझा   प्रष्यां[4]-दीनास मानदा[5] मानें[6]
गोरविसि घेतलें त्वां   बांधुनि दीनासमान दामानें[7]   ६२
प्रभु हास्य करुनि हरुनि   श्रिनतापा परतवी रथा राया
न शकति जयापुढें खल-   संगति पापरत धीर थारा[8]या   ६३
समरांजिरांत[9] हय करि   नर-वर बहु-लक्ष मारिले होते
जेणें त्यासि मुकुंदें   दाखविले सर्व तारिले हो ते   ६४
स्वकरक समीप जाउनि   जगदीशें पांचजन्य वाजविला
आज विलापें राया   त्वां शोक तसाचि हर्ष माजविला   ६५
धर्म धणी[+] [illegible]च्या   बहु घे घालुनि उडी सुखेंवेंची
यज्ज्ञानार्थ[11] महाजन   सर्वस्वासह कुडी[12] सुखें वेंची[13]   ६६
धर्मे दोघे कृष्ण   प्रेमें आलिंगिले जसे तातें
तत्स्पर्शें[14] तन्मनातें   बहु सुखवी जेविं मेघ सेनातें   ६७
आनंदाश्रु-परिप्लुत[15]   होय प्रभुचें पुसी वदन पदरें
जेणें रमाधराहुनि   शबरीचीं मानिलीं मधुर बदरें[16]   ६८
मग तें पुशिलें ज्यातें   देखुनि शतदा वदे अचलकन्या[17]

१ गाल, २ वधार्ह- वधासयोग्यजोत्यानें, ३ क्ष्माधरहि, ४ दासा, ५ मानदेणाऱ्या, ६ मानानें, ७ दोऱ्यानें, ८ स्थिरछाया, ९ समरांगणांत, १० उत्तमआलिंगनाची, ११ यत्-ज्ञान-अर्थ-ज्याच्याज्ञानार्थ, १२ देह, १३ खर्ची, १४ त्य. [illegible] भगवंताचास्पर्श, १५ आनंदा[illegible]नेंभरलेलेंअसें, १६ बोरें, १७ पार्वती, + तृप्ति.

पाहे हें पुत्रमुखीं   स्त्री जी सर्व स्त्रियांत ती धन्या ६९
मधुसिम्हणे वधिला कीं   अधम नराकार पाप रासभ जो
ह्माया कृतघ्न विसरुनि   तुज न स्वप्नींहि हो परास भजो ७०
येणेंचि सिद्धि कळली   जाणति एकेंहि बायका शीतें
सद्यः परमार्थद हे   पाय न लाजविति काय काशीतें ७१
वा बाळमीन येतां   छायेंत सुखें म्हणेल बक राहो
देइल पाय हरिशिरीं   होतां तुमचा प्रसाद बकरा हो ७२
स्वपदीं पांडव बसतिल   करुनि अरीतें परासु वासवसे
शिशुपक्षहित हा लोकीं   पदपद्माचा बरा सुवास वसे ७३
शक्रहि जयद्रथातें   आजि असा पण करूनि न रखविता
वरिली तव दृ[४]र्मातें   वरितें झालेंचि हेंहि नख पविता ७४
कृष्ण म्हणे धर्मा तूं   सिद्ध कपिल साचि करुनि सु[६]तपातें
क्षोभविलासि खळांनीं   स्वांता[+]र्थ प्राणतुल्य[७]कृतपातें ७५
तुझिया वधिला सैंधव   बहु अपराधी म्हणोन कोपानें
सत्पुरुषलंघनें मी   कां गरळाच्वीं म्हणोंनको पानें ७६
तत्क्षोभा साहेसें   कैंचें सामर्थ्य सैंधवीं अल्पीं
क[८]ल्पीं रविसा पडला   इच्छामरणहि नदीज[९] शरतल्पीं ७७
करिल क्षोभ तुझा बा   धर्मा उरल्याहि खळजना भसिंत
हें न चुकेलचि होइल   जन्हि शिव घ[११]नें नील जळें[१२]जनाभ सित ७८

१ गाढव, २ हाती, ३ सिंहशिरीं, ४ दृष्टीनें, ५ वज्रपणा, ६ उत्तम तपातें, ७ अभिमन्युच्यापतनानें, ८ कल्पांती, ९ भीष्म, १० भस्म, ११ मेघासारिखा काळा, १२ विष्णू, + स्वनाशार्थ.

तों नमिति भीम सात्यकि त्या दोघां जेविं नर्मदा[1] यादां[2]
प्रभुची पदयुगली दे कीं जैशी माय शर्म[3] दार्यांदां[4] ७९
तातापरि धर्म प्रभु बहु त्या क्षतविग्रहांसि[5] कुरवाळी
बोले सत्य मनोहर साधु न अमधुर जसा चिकुर[6] वाळी ८०
आले कुरुबलजलधि- स्थयशोमौक्तिक हरूनि हे मकर
शुभ हो वेष्टावें धन रुचिनीं जैसें वदान्य[7]-हेम-कर ८१
ऐसें प्रेमें गद्गद बोलत आलिंगिले सुचिर दोघे
वाटे भुजंग[8] भोगें[+] वेष्टुनि त्या चंदनासि सुख तो घे ८२
यश भीम माधवांचें वर्णी घे धर्म भाटपण साचें
प्रकटी अंग तयांचें तें कंटक जेविं दाट पणसाचें ८३
मुक्त अ[illegible]ुने केला कृष्णेंचि तो जसा नंद
धर्मीहि महाधि[9]पासुनि सोडवितां होय सास[10] सानंद[*] ८४
रडला कुरुराजगळां अभिमानें शोक घोर पडला हो
कोण म्हणेल चतुर नर मकररणीं[11] विजय घोरपड[12] लाहो ८५
हाय म्हणत दुर्योधन जाय द्रोणाकडे म्हणे गुरुजी
पार्थें खरी प्रतिज्ञा केली कीं आजि ती तशी गुरुजी ८६
अक्षौहिणी सित[14] हयें नेल्या कीं सात आठ विलयाला
हे क्षिति जो म्यां केला हा बहुजनघात आठविल याला ८७
सु[15]स्तवभाजन हा जन दुःसह धिक्कार यास हा वेना

१ नर्मदानदी, २ जलजंतूस, ३ सुख, ४ पुत्रांस, ५ ज्यांच्याशरीरावर क्षतें पडलीं आहेत अशांस, ६ अविचारी, ७ दानशूर. ८ सर्प. + देहें. ९ मोठी अंतःकरणास होणारी व्यथा, १० सभास आपुल्या मित्रांसह. * सआनंद हर्षयुक्त. ११ सुसरी च्या युद्धांत, १२ प्राणिविशेष, १३ मोठी, १४ अर्जुनें, १५ उत्तमस्तुतीचें पात्र.

मारी क्षणांत कीं उप- हासा हि कोरया सहावेना ८
केला शरतल्पांगी- कार बळें काळदुर्जयें भीष्में
परिभव वरिला त्वांही परसेनासिंधुजीवनग्रीष्में ९
जरि न करिता उपेक्षा माझी सर्वस्व हानि कां होती
साधूंस मता समता सत्कीर्ति उपेक्षिलीन कां हो ती १०
प्रिय पार्थ न मी देतां परिभव तिंदों कशास हा याला
द्या मरणाज्ञा अनुचित सुकुळजनिंदा कशा सहायाला ११
द्रोण म्हणे वाग्विशिखीं कां मातें पीडितोसि विंधून
वदलों प्रथमचि अर्जुन दुर्जय दुस्तर नव्हेचि सिंधू नं+ १२
करुनि निमित्त शिखंडी भीष्ममहाराज अर्जुनें मथिला
या कर्मे उमजावें कीं पार्थ अजय्य मज खरा कथिला १३
जें देवदनुजदुर्जय- देवव्रत-देव पावला पतन
कळलें सर्व बुडालों न करिल ईश्वरहि आपणा जतन १४
संप्रति झाले पविरवि- सम समरीं पार्थबाण ते फांसे
ज्यां शेवटवरिहि शकुनि- मामा टाळूनि खदखदां हांसे १५
त्वां कां न ऐकिलें जें विदुर वदे सूक्त अनय न करा तें
तो च्युतचि डोळसाच्या जो झिडकारील अनयन कराते १६
भरतसभेंत सती त्वां आणविली करुनि हानि रीतीची
वृद्धांसमक्ष फरफर फेडविलि दुराग्रहा निरी तीची १७

---

१ उचकीचा वेग, २ सत्कीर्ती, ३ तीनदां (सर्वदा) ४ वाक्-इषु-वाक्बाणांनीं, + सिंधु-ऊन-सागराहून उणा, ६ सू-उक्त-चांगलें भाषण, ७ आंधळा.

त्याचें हें फळ केलें न सुटे म्हणती सुरर्षिमुख[1] सुकवी
असतें प्रथम स्फविकेसित[2] परि बहु केला अधर्म सुख स्फेवी
जे नित्य पुत्र-धर्मीं रत त्यांचा द्रोह करिल बा कोण
ब्राम्हण आपण ऐसें बोलोनि दहांत जो नव्हे द्रोण ९९
होता अश्वत्थामा रूप मद्रूप तूं तुझा सखा कर्ण
म्हणसि उडविलें पार्थें शिर वातें जेविं वाळलें[3] पर्ण १००
मानी[4] कीं तूं श्रितवध कथितां आम्हांस कां न लाजशि रे
द्यूतींच कशी द्याया विदुरसदुक्तीस कांन लाज शिरे १०१
असतां सजीव सायुध सन्निध सोत्साह शूर सावध रे
राव धरेश्वर बहु शत केला एकेंचि बा कसा वध रे १०२
ज्यापासुनि[5] कनकध्वज रवि-भीष्माचा न कुरुबळीं झळके
जळके नगसे झालों आम्ही अपकीर्तिकज्जलें मळके १०३
भीष्मामागें न दिसे मज कोण्ही जो तरेल उर्वरिनें[6]
हीं गंधर्वपुरेंसीं दिसती कटकें उगीच उर्वरिनें[7] १०४
कुरुबलकलेवरांचा परिपालक भीष्म तो स्वश जीव
रविदर्शनेंचि पावे तपतांहि ग्रीष्म तोरव[8] राजीव[9] १०५
स्मरतो मज क्षण क्षण धृष्टद्युम्न स्वमृत्युचा हेतु
जलधिविलंघन साधन कपिकृतहि न काय जाहला सेतु १०६
त्यासहि सूचीहि गमे अतिदुःसह न करवाळ वीरा ज्या

१ नारदप्रमुख, २ चांगलें प्रफुल्लित, ३ वाळवी, ४ अभिमानी, ५ जेव्हांपासून, ६ उरु-अरि-महाशत्रूंनें, ७ उरलेलीं, ८ आनंद, ९ कमळ.

जसि वाळवी दवशिखा तसि न तरुप्रकर वाळवी राजा १०७
तूंहि व्याकुळ करिसी मज हृदयीं शब्दबाण हाणोनि
यास्तव नृपा प्रतिज्ञा करितों मी ऐक सत्य जाणोनी १०८
मारुनि पांचाल सकल मी क्रव्यादांसि मांस वाढीन
करिन खरें स्ववच कवच हें आंगांतुनि तरीच काढीन १०९
मज न मत अरिवधें यश अश्वत्थामा न साधु निकरानें
हित म्हणुनि जडाहि दिला अश्वत्था मान साधुनिकरानें ११०
पुत्राला कळवावा त्वां माझा भाव हा निरोपांनीं
कीं सर्व-सोमकांची स्पष्ट करावीच हानि रोपांनीं १११
ब्राम्हण बहु मानावे तुज वारंवार हाचि उपदेश
कीं ब्रम्हक्षोभें अहि झाला जो नहुष नाकंस्पदेश ११२
हा जातों हरिशील प्रकटुनि द्याया परा शशकशील
जा तूंहि कराया जरि पांडुसुतांचा विनाश शकशील ११३
गेला पांडव-सृंजय वीरांचें सर्व तेज हरित रणीं
द्रोण परबलांत गमे मृगकुलतिमिरांत जेविं हरि तरणी ११४

अध्याय १६

कुरुपति कर्णासि असें होउनि सैंधववधें सखेद वदे
देतो ताप परिभव द्विरदा वेदुनि जसा सरवे दैव दे १

१कीरकविशेष, २अरण्याग्नीचीज्वाला, ३राक्षकरी, ५हृदानें, ६समूहानें, ७अभिप्राय, ८पांचाळांची, ९बाणांनी, १० स्वर्गस्थानाधिपतीअसा, ११सिंह, १२सूर्य, 'मृगकुलांतसिंहअथवाअंधकारांतसूर्यसावाटे, १३ गजास, १४ वणवा, + अश्वत्थाम्याला.

केला जयद्रथाचा   कृष्णसहायें बळेंचि घात पहा
झाला दुःसह अर्जुन   शरदर्कांचा प्रताप आतप हा २
हांसतिल सर्व तरि जरि   सोसुनि हा दाह वेचुना कोय
नाकास लाविला तो   मानधना साहवे चुना काय ३
गुरुनेंचि घात केला   व्यूहीं प्रिय शिष्य पार्थ शिरकविला
हें काय बरें असतें   वचन जसें रक्षणार्ह शिर कविला ४
गुरु अभय सैंधवा दे   द्वारव्यूहीं तदंतकालाही
सदनीं शिरल्यावरि कां   रोंविल मर्मीं न दंत कालाही ५
सैंधव पार्था पावुनि   जेविं दनुज पाकशासना शमला
जाऊं देता याचा   तापविता बा कशास नाश मला ६
कर्ण म्हणे न वद असें   करिती आचार्यजनककुत्सा जे
त्यांसचि पशु म्हणति कवि न   जरि पुच्छ विषाण घनकेकुत सा
बापा प्रवर्तलासी   स्वाहित जाणोनि कां गरा खाया
वृद्ध यथाशक्ति समर   करितो नेणोचि आंग राखाया ८
सामर्थ्यें न विलंघिल   कां वृद्धा वाडवा युवा राया
वेगीं टिकेल कैसें   मोठेंही झाड वायु वाराया ९
अत्यद्भुत रथ सारथि   चाप ध्वज तूण कवच अधिकरणी
ज्या साहित्य असे त्या   पार्था न म्हणेल कवण अधिक रणीं १०
वृद्ध द्रोण ब्राम्हण   वाराया अर्जुनासि अक्षम हा

---

१ शरत्-अर्क-शरदृतूंतील सूर्याचा, २ शरीर, ३ संरक्षणकरण्यासयोग्य, ४ तत्-अंत कालाही (अर्जुनास) ५ दैत्य, ६ इंद्रास, ७ देशांतरासजाण्याविषयींजयद्रथासआज्ञा देतातर कशासहासंतापदेताअसाभावार्थ, ८ शिंगें, ९ मोठेंकोळें, १० द्रोणाचार्य, ११ ब्राम्हणास, १२ तरुण, + ऊन. ** निंदा.

आतां कैंचें तें बळ तरुणपणीं जरिहि युद्धदक्ष महा ११
सुकरोन्मूलन होइल पहिल्यापरि काय नग जरा ज्याला
किंबहुना सावरवे पहिल्यापरि काय न गजराजाला १२
झालें अनुकूल परां देतें जय संकटांत वागवितें
भागवितें आम्हांला स्पष्ट प्रतिकूल दैव नागवितें १३
बल भंगे भंगाया पटु जें सर्वांसि वासेविसकट तें
जैसें करिकुल येतां गंधद्विपदानवास विसकटतें १४
अनुकूल दैव असतां न समर्थ करावयासि हानि यम
होतां तें प्रतिकूल प्रबलहि दुर्बलचि होय हा नियम १५
अहि डसविले बुडविला भीम दिलें उग्र विष मरायातें
जतुगृहदाह द्यूतहि झालें दैवेंचि विषम राया तें १६
दृढ चित्त करुनि तूं निज रणधर्मप्रवण हो मरायास
याहुनि दुसरा सुफलद आवश्यक कवण होम रायास १७
मित्रांच्या उपदेशें सोदर सैंधववधें दुरभिमानी
होय मराया सिद्ध स्वासाधुप्रकृतिला सुरभि मानी १८
पांडवसेनेसि मथी कुरुपति सर्व प्रजांसि अंतकसा
अभिमानी आमांचा साहेल असोनि शक्ति अंत कसा १९
भीम घटोत्कच सात्यकि धर्म यम द्रौपदेय ताडून
केले विद्ध सुपुत्र द्रुपद विराटादि वीर झाडून २०

१ सु-कर-उन्मूलन-उपटावयास सुलभ, २ वृक्ष, ३ वृद्धपण, ४ देह, ५ अर्जुनासह वर्तमान, ६ मत्तगजाच्या मदाचा वास, ७ लाक्षागृहांतील दहन, ८ बंधूसारिखा प्रिय जो जयद्रथ त्याच्या वधेंकरून, ९ आपल्या असाधु प्रकृतिला, १० नकुलसहदेव ११ क्षतयुक्त.

कुरुपति बाणत्रासें मोठे मोठेहि वीर कचकरती
सेना कांपे याची धरुनि प्रभुचा जसाच वंचेक रती[4] २१
धांवे धर्म क्रोधें लक्षुनि दुर्योधनासि कुपितातें
घ्याया तुज जें पावे घननादाचा कुलघ्न कुपिता तें + २२
न गणिति सुरासुरांचे भद्रासन-काम इंद्रसे नातें
ध्वज धनु खंडुनि ताडी भाळीं कुरुराज इंद्रसेनातें २३
भीमाग्रज सज्ज करुनि नवचाप हतोसि म्हणुनि शर सोडी
तोडीनें-पटु भुजगसा तोडी कुरुराजकवच उर फोडी २४
मूर्च्छा जसीच सहसा झाली मोठी तसीच हाक रणीं
मेला दुष्ट दुरात्मा करिता झाला असीच हा करणी २५
तों गुरु धांवे परिसुनि पांचाळांच्या रणांत हाकेला
चित्तीं म्हणे वधें तरि नुतं[10] किन्नरचारणांत हा केला २६
येतांचि द्रोण उठे दुर्योधन सुप्तसर्पसा हरिसा
परि सार्थक काय कसें वांचो देतील पोषिले अरि सी २७
तो तिष्ठ तिष्ठ ऐसें म्हणत रणतमीं करावया धावे
पांचाळ सकळ उठले कीं धर्मा शत्रुशर न बाधावे २८
पांचाळांवरि सहसा सरसावे द्रोण कुरुप रखाया
कीं गुरुसमक्ष असतां काळहि न शकेल गुरुपरा[14] रवाया २९
उठली आचार्यावरि सारीही एकदांचि अरिसेना

१ मार्गेसरति, २ शिवाचा, ३ भय, ४ कामपत्नी, ५ रागिदास, ६ देवदैत्यांचेअधिपती, ७ धर्माच्यासारथ्यातें, ८ हतः असि, ९ उड्डाणकरण्याविषयीं कुशलअसा, १० स्तुत, ११ सहा (कामक्रोधादि शत्रु) १२ उभारहा, १३ दुर्योधन, १४ गुरुप्रकास,
+ तें दुःख (इंद्रजिताच्यामरणानें जें दुःख रावणलाझालें तें तुलाप्राप्तव्हावें अयाभावार्थ.

हरिसे नाद करिति ते कोणीहि परस्परोक्त[1] परिसेना ३०
रात्रौ दाटे वाटे लयकालाचाचि[2] अंधकार गडी
बहु पांचाळ-समूहा द्रोण जसा रुद्र अंधका रगडी ३१
भूषामणि शस्त्रद्युति घनतिमिरींही करी लखलखाट
म्हणुनि गमे होउनिगत- मद चिंतेची धरील खल खाटे[3] ३२
द्रोणाच्या सारथिला मारी शरवृष्टि करुनि शिबि राजा
त्यातें आचार्य म्हणे स्वर्गासचि जा पुन्हा न शिबिरा[+] जा ३३
कालिंगभूप-नंदन धांवे कीं भीम होय तातारी[4]
तद्वल तयापुढें[5] किति अशनिपुढें[6] काय कोयता तारी ३४
स्यंदन सोडुनि धांउनि त्या कालिंगासि मुष्टिनेंचि वधी
कर्णानुजही मर्दुनि तो बहु खलकाल तोषवी शिवधी[7] ३५
कर्णे झुगारिली जी शक्ति खरखरें[8] सखीच अशनीची
कीं आगस्कृद्रक्षक[9] तक्षक कन्याच दृष्टिच शनीची ३६
तीच धरुन भीमें त्या कर्णावरि टाकिली महावेगा
फिरली कृत्याच गमे कर्णास न ती कडे पहावे गा ३७
खंडी नयरीतीतें होउनि जो काय वश कुनीतीतें
स्वसहाय वृषहितार्थी तो कां खंडील न शकुनी तीतें ३८
रथीं बैसोनि पुन्हा आम्हावरि भीम धांवला हरिसा
त्यावरि कुमार उठले तेव्हांचें वृत्त सांगतों परिसा ३९

१ एकमेकाचें बोलणें, २ प्रलयकाळाचा, ३ बाज, ४ तात-अरी-पित्याचा शत्रु, ५ भीमापुढें, ६ वज्रापुढें, ७ कल्याणकारक मतिज्याचीअसा, ८ तीक्ष्ण तें, ९ आगः कृत्- अरक्षक-अपराधकरणारांचें रक्षणकरणारीम्हवे, + सैन्यवास स्थानास.

आच्छादित होते शर- पटलें टाकुनि समक्ष यीतें हो
ते पाठविले दुर्मद हय सारथिसह यमक्षयातें हो ४०
दुष्कर्णरथीं दुर्मद बैसे दोघे कुशली परि लवायु
भीम तसेंचि परांचें मथन घनाचें जसें करिल वायु ४१
धरणींत बुडविला रथ त्याचा भीमें गदाप्रहारेंच
ते मुष्टिनेंचि वधिले उतरिल शतमन्युचाहि हारेंच ४२
होते वृष गुरुसुत नृप कृप बाल्हिक सोमदत्त साक्षी बा
सम दिसतो परि तेजें भीम परा असम दत्तसा क्षीबा ४३
पळ काढिलाचि तुमच्या पाहुनि तें कर्म तडक लेंकांहीं
गमला रुद्र वृकोदर धाकें काळीज तडकलें कांहीं ४४
द्रुपद विराट युधिष्ठिर पूजिति होऊनि मुदित भीमातें
त्या अंधकासुरवधीं विधि वासव विष्णुजोवें भीमातें ४५
सद्रोणकुमार पुन्हा वेष्टिति कोपें [illegible] अरिला
जैसे निज [illegible] त [illegible] द्विप वधावया हरिला ४६
सात्यकिस सोमदत्त क्रोधें दाबुनि म्हणे अरे मत्ता
प्रायगता न असिलता त्वां धर्मालाचि मारिली लत्ता ४७
मी आजि तव शिरातें [illegible] तनयहानि कापीन
केला त्वां गृध्रोचित देह करुनि अनय हा निका[10] पीन[11] ४८
जरि [illegible] रक्षिल तुज, मी मारीनचि रणांत अधमातें
त्वत्कृत अधर्म जेसा तापद तैसा न पुत्रवध मातें ४९

---

१ भीमातें, २ यमसदनातें, ३ कुशल, ४ अल्पायु, ५ इंद्राच्या, ६ दत्तात्रेयासारिखा
७ मत्त, ८ शिवातें, ९ नष्ट, १० खरा, ११ पुष्ट,

सात्वत म्हणे यदुकुळीं   अरिपाकनि कोण सांग या भ्याला
यादवशक्ति पराला   कदलीच्या जेविं सांग गाभ्याला[२] ५०
तुजचि सपुत्रास रणीं   दाखवितों आज मी विनाशपथ
अनुचित कृष्ण-पद-शपथ   परि न टसे प्राकृतां[३] विना शपथ ५१
तंडायाचीच[४] तुला   युद्धांत असेल जरि सेवे[५] तंड
परि मज दिसतोसि तसा   कौरव्या जेविं हरिस वेतंड[६] ५२
रक्षिति बहु बल घेउनि   दुर्योधन शकुनि सोमदत्तातें
रक्षी धृष्टद्युम्नहि   सात्यकितें परमयुद्धमत्तातें ५३
प्रथम नवशरांहीं तो   सात्यकिला सोमदत्त बा वेधी
कौरव्याची सात्वत-   नवबाणांहींच मोह पावे धी ५४
तो सोमदत्त मूर्च्छित   पडतांचि पळांत पळविला सूतें
सात्यकिवरि गुरु धांवे   बहु चळचळ कांपवीत रणभूतें ५५
द्रोणावरि धर्म उठे   घेउनि अमित स्वकार्यघटक बळ
तेव्हां गुरु[७]-शरगणघट-   कर्णे गिळिले अनेक-भट[८]-कबळ ५६
पडली दृष्टि जयावरि   त्या कौरव-सर्वसैन्य-पाळाची
पडलीच उडी त्यावरि   तद्बाणगणा-समेत काळाची ५७
केले द्रोणें बहु भट   गरुडानें नेक सर्प[९]स नाहीं
स्वीकारिलें पलायन   धर्माच्या त्यजुनि दर्प सेनांहीं ५८
पार्थ म्हणे पळत्यांतुनि   ने माझा क्षिप्र हा रथ बंकारे[१०]
म्हण करितों गुरुसि तुम्हा   ठेउनि साक्षी प्रहार थवैकारे[११] ५९

१शस्त्रविशेष, २गर्भाला, ३मूर्खास, ४वाग्वादकरण्याची, ५सदय, ६गज, ७द्रोणशरसमूह हाच कुंभकर्णयानें, ८अनेकयोध्यांचेग्रास, ९अनेक सर्परे, १०हेकव्या, ११उभेरहा.

विजयोक्तें[1] विजयाचा रथ चालविला जसा विशोकानें[2]
भीमोक्तें भीमाचा चालविला रथ तसा विशोकानें ६०
सेना सर्व मिळाल्या धांवुनि अत्यंतशीघ्र दोघांतें
जैशा नदींनी गंगा- यमुनांच्या श्रावणांत ओघातें[3] ६१
उत्तर[4]-पार्श्वी भीमें दक्षिणपार्श्वी सुधांशुसित-वाहें[5]
कुरुकटक घेतलें बा दावयुग गजा तसेंचि कितवा हें ६२
कुरुसेनेनें ग्रासिति ते दोघे दाव जेविं अटवीतें[6]
किंवा श्रीमद्गीता- सप्तशती-मंत्र-पाठ सटवीतें ६३
धांवे प्रायगत[7]-वध- प्रकुपित गुरुपुत्र सात्वतावरि तो
त्यावरि उठे घटोत्कच खचर म्हणे यासि आननीं भरितों ६४
अक्षौहिणि[8]मित तद्भट लोपविते प्रलय-नीरद[9]-रवा जे
दरवाजे काळाचे वा अरिचा ज्यापुढें न दर[10] वाजे ६५
लोहमय अष्टचक्र त्रिंशन्नल्व[11]प्रमाण रथ मोटा
जो ऋक्षचर्म[12]-परिवृत ज्यांत नसे शस्त्रसंग्रहीं तोटा ६६
त्यांचे वाहक[13] गजसे परि जातीनें नव्हेत गज वाजी
क्षण ज्यांपुढें गगनमणि- रथ-तुरगांच्या नव्हे तग जवाजी ६७
एवं भयंकर रथीं पाहुनि रात्रीं रणांत उग्रास
भ्याले कौरव गमले ते त्यां काळापुढील रुग्रास ६८

---

१ शोकरहितानें, २ विशोकनामक[illegible]सारथ्यानें, ३ नद्या, ४ डाव्याबाजूस, ५ अर्जुनानें, ६ अरण्यातें, ७ प्रायोपवेशनास बसलेला जो भूरिश्रवा त्याच्या वधानें प्रकुपित, ८ गज २१८७०, रथ २१८७०, घोडे ६५६१०, पायदळ १०९३५०, हीं गजादिसंख्या एकत्र झाली असतां त्यास अक्षौहिणी म्हणतात, ९ प्रळयकाळच्या मेघांच्या ग[र्ज]नांस, १० शंख, ११ चारशें हात लांबीचें प्रमाण, १२ अस्वलचर्मानें वेष्टित, १३ घोडे.

कटकीं होते वाजी वारण जे काय बहु मदें उतले
ते त्यांपुढें न तगले हगले तात्काळ गर्जतां मुतले ६९
द्रौणि घटोत्कच दोघे न धरिति ते युद्धसमरस त्रास
आरंभिति जोडाया यश लोकीं युद्ध समर[1]-सत्रास ७०
संध्याधिक-बळ राक्षस ते जेसे धूमयोनि कर[2]कांहीं
बहु वर्षले शिळांहीं बा वदवेनाचि तो निकर कांहीं ७१
केलें पलायनमनीं धरिला संकोचन तव तन यांहीं
संपादिलें न नाकीं होउनि धर्मासि नत वतन यांहीं ७२
किं बहुना कर्णहि त्या खचर-त्रासें पळायन करी हो
गंधद्विपगंधानें भंगेचि[3] महाबलायन[+] केरी हो ७३
त्या र[illegible]स एक द्रौणि न भी होय रामसा मान्य
केलें घटोत्कच-तनय- मर्दन हें काय काम सामान्य ७४
तो अंज[4][illegible]ध बा अन्य तसा न वीर मायावी
योधीं तद्वधकीर्ति न जेविं समुद्रीं नवी रमा यावी ७५
अंजनपर्वा याचा घननाद जसा दशाननाचा हो
द्रौणिस भीमसुत[5] म्हणे जोडुनि शिशुवध यशा न नाचा हो ७६
झालाचि आजि वृद्धा त्या द्रोणा ब्राम्हणासि शोकद[6] हो
यां गुरुधर्म-हितकरा परि म्हणतिल धन्य धन्य लोक दहा ७७
द्रौणि म्हणे वत्सा[7] जा इतरांसीं अमरविक्रमा भीड
पुत्रें पिता कदापि न पीडावा सोडुनि क्षमा भीड[8] ७८

१ सम[illegible] त्रास, २ मेघ, ३ हस्ती, ४ नामविशेष (घटोत्कचपुत्र) ५ घटोत्कच, ६ शोकदेणारा, ७ अंजनपर्व्यास, ८ गांठघाल, + महाबलांचेंस्थान.॥ गारानी.

न तुझ्या गर्यी माझा रोष असे सर्वदाहि अनुरोग
परि येता तापवितो व्यापुनि बाहेर आंत तनु रोग ७९
न सनो विवेक कांहीं बा घडतो आत्मघातही कुपिता
सुपिताहि क्रोधाच्या आवेशें करुनि होनसे कुपिता ८०
रात्रिचर म्हणे द्रोणे न पृथक्जनसा रणांत कातर हा
भीम[illegible] म्हणायाचा शक्राहि उगीच कीर्ति गात रहा ८१
जे समरीं अनिवर्ती पांडव त्यांचा कुमार हा वदिल
आणिल मनांत तरि यम कासरचर्में स्वदुंदुभी मढिल ८२
असता तरि म्हणता मज पाहुनि रक्षोधिपाशि रावण हा
घटकर्णाच्या करिता निज [illegible]नें शिरा वर्ण हा ८३
कठिण रणश्रद्धा-व्रत हें सत्य मनांत चिंतित उजीव
जाणें आयुष्यातें सलिल शरीरा निजा तितउ जीव ८४
दापी असें दरवडा सार्थाच्या जेविं अश्वमा त्याल्या
सोडी ज्याज्या बाणा छेदीच द्रौणि अश्वमात्रा त्या ८५
होउनि गुप्त घटोत्कच मायेनें होय तो खरा शिरवरी
वाटे निजोक्ति करितो घाया स्वजनासि तोखरोशि खरी ८६
वर्णूं तो कज्जल-सरव शस्त्र-प्रस्रवण काय पर्वत मी
त्या अतिभयंकरानें वीर बुडविले पळांत सर्व तमीं ८७
अतिवर्षी बल्लुवसे बहु आम्हीं आरडों गरल यातें
नमितें नेता कुरुबल घाला तो आरडोंगर ल[illegible]ातें ८८

१ प्रीति, २ क्रोध, ३ दुष्टपिता, ४ पामरलोकांसारिखा, ५ भयचकित, ६ माघारां फिरणारे न्हवत असे, ७ ज्येष्ठ, ८ राक्षसाधिपास, ९ घट्टा, १० चाळण, ११ अशक्त अज्ञा, १२ पर्वत, १३ हर्षातिशय, १४ शस्त्रे[illegible]रा. + रागिट

भ्याला तो मायानग गुरुनंदन-पुंखशर-निकर-पविला
त्या ब्राम्हण-प्रताप- ज्वलनें खलपॅलभुगम करपविला ८९
मग होय नीलतोयद सोडी असि-शूल-शर-गदा-धारा
गेलो शरण गुरुसुता सर्व जसे गोप त्या सदाधारा ९०
तो न ... गुरुसुत- योजितवातास्त्र सा... कें वितुळे
स्मरपीच्या ... यम-महिषीचीहि सायकेविं तुळे ९१
घटेजें सिंधूदेरसें केलें जीवन हरूनि कटक रितें
नातरि घटोत्कचाचें तें बळ आ... पळांत गट करितें ९२
जरि शतस... स्त्र मथिले बहु राक्षस धांवले तरि नवेंच
द्रौणि म्हणे न नृपा भी मी यांचा निश्चयें करिन वेंच ९३
कुरुप म्हणे मिरविन या कंठीं तव कीर्ति-रत्नहारा मी
संप्रति तुझ्या भुजीं बा होता पूर्वीं प्रयत्न हा रामीं ९४
रामीं सीतासी दे राहो धर्मीहि न मति मामा जो
त्या नृप म्हणे तुजपुढें अहितांचा आजि न महिमा माजो ९५
साठस... स्त्र स्यंदन निज लक्ष तुरग मध्यवय अरि घे
रीघेंचि पांडवकटकीं ग्रीष्मीं कक्षांत जेविं दाव रिघे ९६
षट्युतपत्तिसमेत रक्तसाहित्यासि कर्ण पाठवितों
आठविन परांचें अस्त्र- हरण वस्त्रहरण जसेंचि आठवितों ९७

१ खल-पलभुक्-अगम- दुष्टराक्षसरूपीपर्वत (घटोत्कच) २ शस्त्ररूपधारा, ३ सत्-आधार-साधूंसआधारभूत अशा (श्रीकृष्णाला) ४ तुलनापावेल, ५ अगस्तीनें, ६ सिंधू-उदर, ७ खर्व, ८ पृथ्वी, ९ शकुनिमामा, १० प्रवेशकरच, ११ गवतांत, १२ षट्-अयुत-पत्ति-समेत-साठहजारपत्तीनींयुक्त (पत्तिचेंलक्षण
श्लोक- एकोगजोरथश्चैकोनराःपंचपदातयः त्रयश्च... पत्तिरित्यभिधीयते १
अर्थ- १ हत्ती, १ रथ, ५ मनुष्यें, ३ घोडे, मिळोन एक पत्ति जाणावी.

द्रोणि-शरांहीं व्याकुळ करितांचि युधिष्ठिरादि-मदरीं तें
मारुनि घ्यावें सयश मद्धितें-निरतें तुवांचि पदरीं तें ९८
गेला धर्मवधा जो हेतु नृपा या इलादि-लोभाचा
जेणें कुबुद्धि कृत्या जी हे खाया इला दिला भाचा ९९
राक्षेस दश-बाणांनीं विकल करुनि गुरुसुतासि धनु तोडी
द्रोणि नवें धनु घेउनि त्याला जलदासि वातसा झोडी १००
त्रिपुराला रुद्र जसा खचरबळाला तसाचि तो भाजी
जीच सुरांत हराची याची आम्हांत तीच शोभा जी ४ १०१
स्वबल-विनाश-क्षोभें भीमसुतें रुद्रनिर्मिता अशनी
पाठविली द्रोणिप्रति जी कृत्या दर्शितारिच्या अशनीं १०२
उग्रत्वमदें जीसीं करिल क्षणमात्रही न वाद शनी
तें दाहकत्व न दवीं तक्षकभुजगाचिया न वा दशनीं ६ १०३
ऐशीतेंहि धरी बा तो द्विजवर गरुड जेविं भुजगीतें
ख्यात जगीं स्वयशाच्या त्याचे हरबाहु तेविं भुज गीतें १०४
गुरुपुत्रें खचरावरि तीच अशनि योजिली महावेगा
फिरल्या कृत्येसि तसें तीस न त्या राक्षसा पहावे गा १०५
घाली उडी तळीं तो राक्षस जों तों पडे रथावरि ती
झाली सगरसुतगणीं कपिलाची ७ दृक् जसें तसें करिती १०६
देखुनि जाणत होते अशनीची ख्याति लटिक बरि कवि जे
ते वदले न सखी तूं ईची होसील बटिक बरिक विजे ८ १०७

१ मत्-हित-निरत, २ पृथिव्यादिलाभाचा, ३ घटोत्कच, ४ अजी (धृतराष्ट्रा) ५ भक्षणीं, ६ दातांत, ७ कपिलमहामुनीची, ८ हे विद्युल्लते.

अशनी क्षितींत शिरली   सूताश्वासह रथासि जाळून
धृष्टद्युम्नरथीं तो   राक्षस बसला स्व-मृत्यु टाळून १०८
विजयश्री पांचाळा   तैसीच निशाचरा गमे घरची
कीं ते शरवृष्टीतें   तेविं उदक वृष्टितें न मेघ रची १०९
गुरुपुत्रें त्या त्या बहु-   कांपविलें जेविं नीरदा[1] वातें
द्विजबळ परप्रतापा   त्या जैसें होय नीरें दावातें ११०
तेथें बहु बळ घेउनि   स्रुतसाहित्यासि भीम ये राजा
सुरव्या सबळ-त्वत्स्रुत- हानि हर-मरव क्रियाहि येरा ज्यां[4] १११
गुरुस्रुत वधी घटोत्कच-   भीमार्जुन यां समक्ष यांतूंतें
वा तत्वतः स्वपर-बल   जें पाठविलें यमक्षया[6] तूं तें ११२
तो विष्णुजिष्णु-देरवत   रवचरां सकळांहि लोळवि भरवरा
वाटे निपट रववळला   प्रळयाग्नीचाचि लोळ विप्र रवरा ११३
जाणों हराचि म्हणे हूं   घे बहु फटकाळ कूट हा निकर
कीं हें तेविं रवचर-बळ   जेविं निपट काळकूट हानिकर ११४
मारुनि रात्रिचर-कटक   रुधिर-नदी [illegible] वाहविली
चळवळ घटोत्कचाची   मर्मीं वेधुनि मुहूर्त राहविली ११५
नाराचानीं पांडव   धृष्टद्युम्ना-समेत सड[illegible]न
द्रुपदस्रुत शरें केला   भस्म दवें जेविं शलभ धडकून ११६
मारुनि त्या स्रुरथाचे   बहुस्रुत शत्रुंजयादि झाडून
द्रोणात्मजें श्रुतान्वय-   राजा तेंहि क्षणांत पाडून ११७

१मेघास, २पाणी, ३दावानळातें, ४ज्यास (भीमास), ५राक्षसातें, ६यमगृहास, ७अश्वत्थामा, ८पेटून, ९श्रुतनामक.

पुनरपि यमदंडोपम बाणातें परम तूर्ण सोडून
मूर्च्छित रणीं घटोत्कच केला तत्काळ हृदय फोडून ११८
धृष्टद्युम्न पळवि करि पडतां तो शूर पळ विलापाला
वात्येनें दव-दहना - पुढुनि गमे दूर पळविला पाला ११९
होते युधिष्ठिराच्या कटकीं भीमादि वीर्य-सागर जे
त्यांतें भंगुनि गु[illegible] मोडुनि मत्तेभ सिंहसा गरजे १२०

अध्याय. १७

मारुति पार्षत सात्यकि धर्मादिक वीर विप्र-भावातें
मानवले ग्रहवृंदीं बहु जेविं कवी रविप्रभावातें १
जरि सर्वांगीं केले होते गुरुपुत्र-शरशतें विद्ध
तरि धर्म भीम सात्वत पार्षत युद्धासि जाहले सिद्ध २
पुनरपि बहु युद्ध करी सात्यकिला सोमदत्त माराया
कीं फार खवळला सुत- शोकें तो भरतसत्तमा राया ३
मागें पदहि न येतां सात्यकि शर भीमसेन-परिघ सरे
बसतां उरीं शिरीं ते धै[illegible]नि धीर परि घसरे ४
बाल्हीक वृद्ध परि बहु- मानी साहेल कां पतन योचें
कांपे कोपें तोंतों जोंजों धरि देह कांप तनयाचें ५
तो काळवर्षि-घनसा सात्यकिवरि तीव्र विशिख वृष्टि करी

१ [illegible], २ वाहुटळीनें, ३ मुलाचें.

भीमालाहि न मानी जेसा हरिला मदांध-द्दष्टि केरी ६
शक्तीतें भीमाच्या वज्रसमोरींहि होय शिरकविता
ती त्याचें कांपवि जसि आणुनि नेत्रांसि तोये शिर कविता ७
द्दढहि महाप्रतापी बा नव्हता तो मनुष्यदेव ढिला
त्या भीम गदेनेंचि स्वर्गति न धरुनि धनुष्य दे वढिला ८
मस्तक बाल्हीक-महा - राजाचें पांडुसूनु चेंडु करी
न करिल अपत्य-मुख किट - सम पोषुनि पंकिलें कचें डुकरी ९
तंव नागदत्त द्दढरथ इत्यादि तनूज धांवले दश गा
यश गा तूं परि गमले ते त्या भीमा हरीपुढें शश गा १०
मेले ज्या धरुनि खचर- पतिचे त्या नव कुमार दशा लीला
लाजविति पृथापुत्र स्वयशें जेसा उमारद शशीला ११
भीमानें नव दशसुत दश-बाणांनींच जेविं बा वधिले
पांचांनीं पांच शकुनि- बंधुहि जे शत-महारथां मधिले १२
धर्महि बहुकुरुकटक- क्षय करित क्रुद्ध-काळसा स्फुटला
तुटला मर्यादावधि कल्पांतीं नीरनिधि जसा फुटला १३
त्यावरि नृपोक्तिनें गुरु कन्येनें जेविं काशिराजाच्या
धाडविला भीष्मावरि अभय-वर दिला निका शिरा ज्याच्या १४
वायव्य अस्त्र वारुण याम्यहि आग्नेय ऐंद्र गुरु योजी
त्यात्यातें प्रत्यस्त्रें हरुनि म्हणे धर्म अन्यही योजी १५
ब्रम्हास्त्रातें योजी तो ब्रम्हास्त्रेंचि करुनि विभ्रम या

१ गज, २ वज्रासारख्या कठिनउरांतही, ३ उदक, ४ राजा, ५ वडिलाला, ६ किटलेलें, काळें, ७ केशानें, ८ पुत्र, ९ पार्वतीचा दंत, १० समुद्र, ११ येवो, + अगाराया.

गर्जे युधिष्ठिर प्रभु   समरीं न धरीच लेश विप्र-भया   १६
मग सावित्र त्वाष्ट्र   प्राजापत्यप्रयोग जो केला
त्यातेंही प्रत्यस्त्रें   शमवुनि निष्कंप नृप पुढें ठेला   १७
सैनिक-मुख्य स्तविते   झाले गुरुतें तसेचि शिष्यातें
दे ताप तव स्रुतातें   तो धर्मोत्कर्ष[1] जेविं तिष्यातें[2]   १८
गुरु धर्मातें सांडुनि   पांचाळांचेंचि बहुत कदन करी
ते त्यापुढें न मिरविति   गर्व हरिसमक्ष जेविं मद न करी   १९
जैसें पांचाळ-कटक-   कदन कलशसंभवें[4] स्वयें केलें
तैसेंचि कौरवांचें   बळ भीमें अर्जुनें लया नेलें   २०
भीमार्जुन शर-निकरें   तिमिरें निद्राभरेंहि मोहातें
पावे भंगे तव बळ   मरणा-त्रासें म्हणे नमो हातें   २१
गुरु-नृप-वचेंहि कुरु बळ   जेविं पवनन्नुन[6] अभ्र मुरडेना
सेना किति पति-रक्षा-   क्षम होतां काय अभ्रमु[7] रडेना   २२
कुरुपति कर्णासि म्हणे   नाशों देतोसि काय गा यश तें
वेढिलि चमू परबळें   जेविं वृकांच्या वनांत गाय शतें   २३
दुर्लभ यशःप्रद समय   हा न वृथा मित्रवत्सला जावा
सन्मैत्रीच्या कासे   लागलिया स्ररभि-वत्स लाजावा   २४
कर्ण म्हणे शक्ति असे   कृष्णा धरिवला; बला विलापार्थ
जिंकिन रक्षाया जरि   येइल वज्री बलाविला पार्थ   २५
देतों तुज जय मारुनि   विजयास अमोघ-शक्तिनें आजि

---

१ धर्मराजाचा अथवा धर्मकृत्याचा उत्कर्ष, २ कलियुगातें, ३ गज, ४ द्रोणानें, ५ हस्तानें, ६ वातप्रेरित, ७ ऐरावताची स्त्री.

करितों तरीच केली जसि महिष-वधार्थ शक्तिनें आजि २६
अर्जुन मरतां होतिल वश्य तुला दीन होउनि अवश्य
किंवा पुन्हा वनाला जातिल पांडव जटाधर अवश्य २७
असतां कर्ण व्याकुळ कां स्वस्थ त्यजुनि तूं विषाद रहा
पांडव-बळ किति न धरिल पीतांहि हळाहळा विषा दरे हो २८
मज हरिपुढें टिकेल न पळही पांचाळ वाहिनी कुतरी
शिरतां बुडेल मद्बळ- जलधींत समग्र यदु-चमू कुतरी २९
देतां तुलाचि भजतिल पळही पर मानदा न वसुधेतें
बा पावले करुनिही कष्टा परमा न दानव सुधेतें ३०
हसुनि कृप म्हणे कर्णा तूं नाथ म्हणुनि सनाथ हा राजा
तव शब्दचि तेजस्वी तूं यासिच म्हण करा प्रहारा जा ३१
करिसी असें विकत्थन परि न पराक्रम दिसे न फळ कांहीं
तव निटिलीं न विजयलिपि वरिली पांडव-ललाट-फलकांहीं ३२
तेते भंगद झाले पांडु-सुतासीं रणीं समागमें जे
जीभ तुझी नृपतिपुढें करिती बहु नववधूसमा गमजे ३३
गंधर्वें प्रभु धरिला तेव्हां आधींच कीं पळालास
तें पाप क्षालाया तूं दवदहनीं न कां जळालास ३४
कर्णा उगेचि कर्ण- प्रिय बोल वदो नकोच कीरा हे
उचित न वीरास तुझी त्या गोग्रहणीं न कोचकी राहे ३५
जरि कळलें एकाही पार्थाचें तेज नावरोंयाचें

१ संग्राम, २ वशाव्हावयाचेंनव्हतते, ३ मय, ४ कर्ण, ५ भग्ननौका, ६ बडबड, ७ कपाळीं, ८ दुर्योधन, ९ पोपटा, १० नआवरायाचें.

तरि सर्व वधिन म्हणसी बुडवीसिल तेज नांव रायाचें ३६
शूर भुजांनीं क्षत्रिय शब्दानीं विप्र पार्थ चापानें
केवळ मनोरथानीं कर्णा तूं शूर न प्रतापानें ३७
व्यर्थचि गर्जन करितें तव मुख हें जेविं शारदाभ्र[1] महा
वाटे अनर्थक बहुत बडबडसी जें विशारदा[2] क्रम हा ३८
अर्जुन वर्जुन गर्जुन अर्जुन घे क्षण उगेंच थोरपण
जिंकिन बृहस्पति म्हणुनि करिलचि वाचाट[4] चोट पोर पण ३९
तदधिक कवण स्फुरवविला[5] हर जेणें करुनि अति-समर-यज्ञ
केंचा श्रेष्ठ मग खग[6] त्रिजगींहि न पक्षिपति-सम[7] रयज्ञ[8] ४०
त्या कृष्णसारथिपुढें होशिल मूक न[9] जरोक बकशील[10]
कीं गरुडशील तौं[11] तूं सूला केवळ[12] वराक बकशील[13] ४१
कर्ण म्हणे घन गर्जति समयीं तैसेचि सर्व योध रणीं
करणी करूनि दाविति म्हणती ते फलद पर्व यो धरणी ४२
उत्साहें वीरांहीं करुनि विकत्थन[14] यथेष्ट गर्जावें
फल न दिसतां बुधांहीं काय प्रारब्धकर्म वर्जावें ४३
दवतेंचि दैव असतां निश्चय नसतां मनांत निर्वेद[15]
तूं द्विज आम्हांत तसा जैसा वैदिकजनांत निर्वेद[16] ४४
दैवें न पावलें रण- रंगीं बहु-बळहि काय नास तसे
त्यां पांडव वधिले तरि यांत तुझें सांग काय नासतसे ४५

१ शारदतूंतीलमेघ, २ श[illegible], ३ संपादून, ४ वाचाळ, ५ उकविणारें, ६ पक्षी, ७ गरुडतुल्य, ८ वेगवान्, ९ अत्यहि, १० बडबडशील, ११ अर्जुन, १२ नीच, १३ बकपाशिसदृश, १४ जल्पन, १५ कंटाळा, १६ वेदाध्ययनहीन.

न वृथा गर्जति शारद- वारिदसे रणमखांत शूरवर
विभा कृपा पहावें ऐसें दवडूनि दृष्टि दूरवर ४६
गर्जति पंडित निज बळ समजुनि तूं वदसि न समजोनीच
वीरा शयासि वीरचि समजे तुमजेचि न समजो नीच ४७
मी मारिन कृष्णार्जुन ऐसा उत्साह मानसीं धरितों
म्हणुनि द्विपयूथपवध- कामुक हरिसाच गर्जना करितों ४८
सानुग सकृष्ण पांडव मारुनि देइन सुयोधना वसुधा
हें गर्जन-फळ पाहें म्हणतिल माझें सुयोध नांव सुधा ४९
गौतम म्हणे तुझे हे न ग्राह्य मनोरथ-प्रलाप मला
गमला कृष्ण प्राकृत धर्महि ज्या स्पष्ट तो पशु न मला ५०
कृष्णा[illegible]ासि सकळें कल्याणें करुनि देवसे समज
श्रीसी म्हणे जयश्री काय वरिल मरुनि देव सेसे मज ५१
श्रीकृष्णार्जुन जेथें तेथें सादर सदैव जय नांदे
राजर्षिधर्म विस्मय देवर्षि-महर्षि-योगि-नयनां दे ५२
भीम नकुळ सहदेव ख्यात सकळ साधु-शूरजन-महित
यांचे संबंधीही शक्रसम द्रुपद-मत्स्यपति-सहित ५३
त्यांतें जिंकाया तूं बहु हुदहुटलासि योग्य अनय न हा
लावूनि सनयनासीं स्पर्धा न म्हणेल काय अनयन हा ५४
कर्ण म्हणे जरि पांडव दुर्जय तन्हि शक्र-दत्त-शक्तीनें
अर्जुन वधिन न मथिला तो काय तसाहि मत्त शक्तीनें ५५

१ पृथ्वी, २ कूप, ३ कुंकुमाक्षतांचा कपाळीं लेप करितात ती खेस, ४ उत्कंठित झालास, ५ अंध, ६ हायहाय असा शब्द, ७ महिषासुर.

त्याविण कृष्णा युधिष्ठिर तदनुज स्वसमर्थ हि तरि पोकळ तो
न कुरूत्कर्ष तुज रुचे आशय शब्देंचि हितैरिपो कळतो ५६
न रणा तूं योग्य म्हणुनि हा केशवसारथे रडायास
काय भिवविशिल देउनि हाके शवसार थेरडा यास ५७
अप्रिय वदसिल पुनरपि तरि खड्गें करुनि जीभ कापीन
स्वकृतचि हें कीं कोण्ही निंदकसा त्रिभुवनांत पापी न ५८
दैवचि कारण भीष्म- प्रमुख-महावीर-देह-पतनाचें
अधमा कृपा नृपाच्या होउनि अहित-स्तवीं न रत नाचें ५९
अश्वत्थामा धांवे कर्णावरि दिव्य खड्ग उपसून
तक्षक जेविं डसाया मर्मीं दंष्ट्रा समूळ खुपसून ६०
त्यासि म्हणे यो सिंहा बोलावे बोल हे तुवां कोल्या
मारुतिशिं माकडानें दाखविल्या स्वांतहेतु वांकोल्या ६१
वदतां प्रभुपांडवगुण ईश्वरसम वेदसमहि मामातें
निंदिशि सत्पुरुषाचा दुष्टा दूषूनि न महिमा मातें ६२
केला जयद्रथाचा जिंकुनि तुज अर्जुनें वध मघासीं
सन्मान्य तो गणावा दशदर्शी सूत तूं अधम घासीं ६३
युद्ध हरासीं केलें त्वां आयकिलें न काय मत्त तें
तूं मारिशील त्याला न अतिक्रमिलें जयासि मत्तातें ६४
जें जय जागे त्याचा न शतांशहि तुज कळे वराकास
घालिसि भस्म कराया पार्थशरें निज कलेवराकास ६५

१ हितशत्रो, २ जिभेचें छेदन, ३ अश्वत्थाम्याला, ४ स्व-अंत-हेतु आपल्यामरणास कारण अशा, ५ कृपातें, ६ तृणीं, ७ मत्-तात-माझ्यापित्यानें द्रोणानें. ८ अर्जुन, ९ नीचास.
+ कुरु-उत्कर्ष-कौरवांचीवृद्धी,

हित कथिल्या आप्ताची   नीचा म्हणतोसि जीभ कापीन
तरि वधिन तुला देइल   विष-कामा स्मरभिचेंहि ओपीन ६६
हा उडवितों तुझी मी   बकऱ्याची जेविं शीघ्रतर मुंडी
ऐसें बोलुनि देता-   झाला गुरुपुत्र शीघ्र तरमुंडी ६७
हा हां म्हणे सकोप कृप   नृप कृपण जसें धना तसें धरि त्या
कीं गतसारा सरिता   तेविं पडाव्या स्ववाहिनी न रित्या ६८
कर्ण म्हणे सोड नृपा   योग्यचि हा होय शासना सत्य
द्विज-मंद[5]-गद शमवु सखा[6]   जोडुनि या हो यशास नासत्य[7] ६९
द्रौणि म्हणे कुमति तुला   तैसी आम्हासि न क्षमा सोडी
मोडील अर्जुन तुझ्या   दक्षाच्या वीरभद्रसा खोडी ७०
भूप म्हणे गुरुपुत्रा   क्रोध त्यजुनि प्रसन्न हो पावें
सर्वांहीं एकमतें   जोडुनि यश मज तुम्हींच ओपावें ७१
कृपहि विनवितां होउनि   मृदु कर्णाला म्हणे तुझा गर्व
सर्व श्वेताश्व हरिल   त्या खलरति[9]जानिचा जसा शर्व[10] ७२
द्रौणि कृपांतें जोडुनि   कर जों यत्नें नरेंद्र समजावी
तों ये युधिष्ठिर-चमू   जी लंघुनि सिंधु कीर्तिसम जावी ७३
कर्ण पुढें होय तया   पाहुनि ते वीर म्हणति या कलहा
जो हेतु नीच दुर्मति   दुर्जन दुर्योधनाप्त तो खल हो[11] ७४
मारा घ्या कोठें हा   पाडा तोडूनि हूं करा चूर्ण

१ कास, २ मुसांडी, ३ सदय, ४ निर्जला, ५ अश्वत्थाम्याचागर्वरूपरोग, ६ कर्ण, ७ अश्विनीकुमार, ८ नामविशेष (शिवाच्याजटेपासूनउत्पन्नझालेला) ९ दुष्ट मदनाचा, १० शिव, ११ कर्ण,

ऐसें गर्जुनि पांडव   सृंजय पांचाळ धांवले तूर्ण ७५
त्यां सर्वांसहि ताडुनि   भग्न करी जेविं वात …धास
त्या काळमुखीं पडला   पांडवभटसंघ तो गमे घोस ७६
अर्जुन धांवे कोपें   रोपें त्यांच्याहि तो करा ताडी
ताडी करून विकळा   पकधरि गांडीव चापही पाडी ७७
धरि कोप अजितसारथि   वाटे आम्हांच नागविल याला
+गरुडातिक्रम करितां   पावेल कसा न जाग विलयाला ७८
झालें तसेंचि राया   केला विरथ क्षणांत तो मौनी
त्यजिला असतांचि करुनि   तदवेनपण शक्र-सूर्य-सोमानीं ७९
कर्ण कृपरथीं चढला   पार्थापासूनि फार तो भ्याला
कीं त्यासि यशाहुनि बहु-   मत जीवित जेविं वित्त लोभ्याला ८०
धांवे धनंजयावरि   दुर्योधन मित्र-परिभव-क्षोभें
तों कृप भाच्याशि म्हणे   प्रभुला रक्षूनि सद्यशें शोभें ८१
आटोपुनि गुरु-पुत्र   प्रभुसि म्हणे ऐक भविकवचन रहा
विजया पुढें म्हणोलचि   अंगीं घालुनिहि पविकवच नर हा ८२
असतां सजीव मी तुज   योग्य नव्हे अर्जुना-सवें युद्ध
वारुनि किरीटिला यश   द्याया तुजलाचि जोडितों शुद्ध ८३
भूप म्हणे शक्ति असे   परि न म्हणसि अर्जुनासि मारीन
स्नेह मनीं आहे तो   न म्हणों दे म्हणुनि म्हणसि वारीन ८४

---

१ तृण, २ अर्जुन, ३ नाशाला, ४ गर्विष्ठ, ५ तत्-अवन-पण- कर्णरक्षणाचाप ण, ६ अश्वत्थाम्यास, ७ कल्याणदायकभाषण, ८ वज्रकवच, + गरुड-अतिक्रम- गरुडाचा अपराध.

आचार्य पुत्रवत् परि- रक्षण करितो रणांत मद्रींचें
तूंही सांडों देसी पुण्य यशोधन बळेंचि पद्रींचें ८५
नकळे करिसी तूं मम- शत्रूपेक्षा रणांत धर्माच्या
प्रेमें कीं कृष्णेच्या कीं मौघें आमुच्याचि कर्माच्या ८६
करिते प्रवाह मिळतां गंगा मलिनाहि धौते मीना कीं
सत्संगति श्रितां तसि अदिति-सरवी होउ गौतमी नाकीं ८७
द्रौणि म्हणे सत्य वदसि पांडव आम्हास फार आवडती
सन्मति गुरुसि बहुमता जैसी रामेश्वरासि कावड ती ८८
त्यांसि द्रोण बहु प्रिय जैसा तैसाचि मीहि कुरुपा हें
काय प्रेम वदावें, तनु जीवितसे रु शिष्य गुरु पाहें ८९
परि त्यांहीं आम्हीं त्या प्रेमासि रणांत सोडिलें पाणी
करितों तुझेंचि जैसें करिती विधिचेंचि शासन प्राणी ९०
कर्णादि सर्व आम्ही नित्य यथाशक्ति करितसों युद्ध
काय करावें दुर्जय धर्म त्रिजगीं तसा नरे शुद्ध ९१
प्रकृतिकुटिल पापाचल खल तूं मानिसि तसेंचि अन्यासी
पाहे जडरूपचि जड तें सर्व ब्रम्हरूप संन्यासी ९२
शिरतों पांडव-कटकीं शिरला एकार्णवीं जसा कौल
जातों युद्ध कराया शत्रुशर बरे न हे तुझे बोल ९३
सृंजय पांचाळ-कटक आजि स्वरुधिर-नदींत वाहेल
पाहेल धर्म अश्व- त्याममय सकळ सचिंत राहेल ९४

१ निरर्थकपणानें, २ स्वच्छ, ३ आश्रितास, ४ अश्वत्थाम्याचीआई, ५ गंगेचीकावड, ६ आज्ञा, ७ वराह,

ऐसें बोलुनि गुरुसुत   गांठुनि पांचाळ-सोमकांस वदे
हूं वर्षा शस्त्रांहीं   घ्यावें सोडूनि सोम कां सवदे ९५
स्वीकारी घनतेला   पर-निकर द्रोणतनय नगतेला
कीं शोभाया अयशा   भी रुकुलज जेविं जडित नॅग तेला ९
परदलनीं द्रौणि गमे   घन-निकरीं निकर तो मरुत् रचितो
कीं करितो शर-दहनीं   पांचाळ-त्रिपुर-होम रुद्रचि तो ९७
तो धृष्टद्युम्न म्हणे   कथिला तुज धर्म काय हा तातें
दुष्टा दुर्बल-दलनीं   फळ आलें सांग काय हातातें ९८
असशील शूर तरि ये   चापीं शर शीघ्र जोडुनी भीड
कविनें कवि-राजाशीं   सांगावा वाद सोडुनी भीड ९९
ऐसें बोलुनि हाणी   द्रौणिप्रति अतितरोग्ररोपानीं
गुरुसुत म्हणे रहा क्षण   पाठवितों मृत्युमार्ग-सोपानीं १००
खरतर-वर शर-विद्ध   द्रुपदसुत म्हणे तयासि हा मूढा
कशि आयकिली नाहीं   काय मदुत्पत्तिची कथा गूढा १०१
आधीं मी द्रोणाला   मग मारावें तुला असें आहे
हा हेत पित्याचा हे   भुज पुरवितिल न विलंब या साहे १०२
धर्मीं करिसी द्वेष   प्रेमा दुर्योधनीं खळीं अधर्मी
त्यजिलें स्वकर्म ऐशा   क्षत्र्याचा कां करूं नको वध मी १०३
अश्वत्थामा कोपें   लक्षीकृत काम रुद्रसा पाहे

१ मेघपणाला, २ शत्रुसमूह, ३ जडावाचा, ४ अलंकार, ५ वायू, ६ लाज
७ अतितर-उग्र-रोप-अत्यंत कठिनबाणानीं. ८ मत्-उत्पत्ती-माझ्याउत्पत्तीची, ९ धर्मराजाचेठायी
१० मदनावरज्यानेंलक्षधरलें, + पर्वतपणाला.

गमले नसतिल लक्ष्मण घनरवेंसे कां मरुद्गसोपा हे १०४
स्मात क्षनजें झाले आयकिलाही न हा निकर वीरें
पळसें वरिलि वरावी कां न असूनिहीन हानि करेवीरें १०५
त्यां दोघांतें युद्धीं मानवले अर्जुनादि भट सारे
कर वदले दाखवितो रंगांत नटासि नृत्य नटसा रे १०६
एक मुहूर्त महारण झाला मग मोह तो जसा बोधें
क्रोधें केला भग्न द्रोणाचार्यात्मजें महायोधें १०७
केला रथिशतकाचा बाणांच्या एकवेळ विलय शतें
तुमच्या कटकीं ऐसें द्रौणिविना कोण मिळविल यश तें १०८
वधिलें महारथत्रय मग गुरुपुत्रें शरत्रयेंचि रणीं
द्रौणिशरीं तेज अहित- हर रविच्या तिमिरहर जसें किरणीं १०९
केला बहु पांचाळ- क्षय हरिसोरथिसमक्ष खवळून
हतशेष बहु पळाले त्या विरथद्रुपदसूनुजवळून ११०

अध्याय १८

न धरिति भीम धनंजय येतांही द्रोणजवळ लेखा ते
गमले विश्वप्रळयीं काळांतक जेविं खवळले खाते १
गमला शिरतां पांडव- सैन्यसमुद्रांत मत्त मगर मला
सात्यकिशर-दर्शितपथ- सद्गतिशीं सोमदत्त मग रमला २

१ न ध ना से, २ मरुत्-रसा-प-देवांसआणिराजांस, ३ कृष्णेरगुणानें, ४ अर्जुनास मक्ष, ५ खाणारे, + काळ-अंतक.

कुरुवृद्धवधक्रोधें बहु कौरव-योध धांवले शमना
सात्यकि न स्पर्शों दे तदिषु तसा भीरुभाव-लेश मना ३

शक्राचा रुद्र जसा सात्यकिचा धर्म होय कैवारी
विघ्नें विघ्नेश्वरसा कौरव-कटकें पळांत तें वारी ४

कुरुबळ मथितां धांवे धर्मावरि तो स्वशिष्यें-नाकद्रू
प्रसवे तच्चापलता बाणगणा जेविं दुर्जना कद्रू ५

धर्म न साहे समरीं द्रोण स्वध्वजधनुष्य खंडी तें
तो बाण-सहस्रातें योजी देवेश जेविं चंडीतें ६

त्या बाण-सहस्रानें गुरु केला विकळ दोन घटिका हो
सावध होऊनि म्हणे प्रेमा होइल जनांत लटिका हो ७

योजी अजातरिपुवरि वातास्त्रातें शांत तो विप्र
त्याचें स्तंभन धर्म प्रत्यस्त्रें करुनियां करी क्षिप्र ८

तों कृष्ण म्हणे धर्मा गुरुसीं रण तूं करूं नको परत
जपतो नित्य तुला हा त्वद्ग्रहणीं पण करून कोपरत ९

याचा अंतक धृष्ट- द्युम्न उद्यां यासि तोचि मारील
त्यावांचुनि यासि रणीं [illegible] पविपाणिही न वारील १०

राजानें राजासीं भांडावें तदितरांस वरजावें
त्वां हे सेना घेउनि राजा धृतराष्ट्र-सूनुवर जावें ११

भीमार्जुन कौरवबळ वधितिल यांला सहाय मी आहें
परकटक सुखीं भरिलें काळाजगरें करूनियां आहें १२

१ उत्तमशिष्यांस कल्पद्रुमअसा, २ सर्पजना, ३ सर्पमाता ४ देव-ईश-इंद्र, ५ धर्मावर, ६ द्रोण ७ रोध, ८ इंद्रही, ९ तद्- इतर- राजा, नइतरजनांस, १० काळ-अजगर.

ऐसें हित सांगे जो   मधु-कैटभ-संकटीं अजा[1] तारी
देउनि मान प्रभुला   गेला भीमाकडे अजातारी[2]   १३
पूर्वीं जेविं सुरचमू   ख्याली पाहोन अंधकाराती[3]
कौरव-पांडव-सेना   ख्रमली पाहोन अंधकारा ती   १४
दुर्योधनें विनविले   धरिती बहु दीपिका पदात[4] रणीं
गमलें दीप-मिषें स्फुत-   मित्रार्थ प्रगटला तदा तरणी   १५
नारद-पर्वत-वचनें   दिग्देवी अप्सरा भुजग यक्ष
दीप धरिति विद्याधर   गंधर्व सुरर्षिही बहुत लक्ष   १६
पांडव-कटकींहि धरिति   सर्वहि पादात स्फुजन दीपातें
कोण न देइल समयीं   असतां श्रमत्यास भुज नदीपातें १७
दीपक सुगंधतैलें   क्षिति-गगन-तळीं अनंत पेटविले
स्वभर[5] उणा करित्यातें   सुमणि अनंतेंचि[6] काय पेटविले १८
प्रतिगज सप्त प्रतिरथ   दश दीप प्रतिहयास एक रणीं
ऐसी अचाट यांची   लोकीं कोणासही न ये करणी   १९
व्यूह रचुनि बंधूंतें   सांगे व्हायास यश सुयोधन हो
यत्नें गुरु रक्षावा   द्रुपदसुतालाचि वश सुयोध न हो २०
धृष्टद्युम्ना गुरुसुत   कर्ण जँया भस्म करिल रोपांनीं
भीमा मी मर्दिन मग   मारावे शेष-शत्रु गोपानीं[9]   २१
गुरुसचि रक्षा म्हणजे   विजयश्री निश्चयेंचि मज वरिल
रवि-वरिल घन-पटलसें   सर्वहि संकट टळेल मजंवरिल[10] २२

---

१ ब्रह्मदेवास. २ धर्म. ३ सदाशिव, ४ पदाति, ५ आपलाभार, ६ शेषानें, ७ धृष्टद्युम्नाला, ८ अर्जुनास, ९ गुरारव्यांनी, १० माझ्यावरचें.

गुरुचक्रगोप होउनि   कृतवर्मा शल्य यत्न हे मानी
करिती बहु कीं शोभा   सुयशानीं ती न रत्न-हेमानीं २३
धर्महि गुरुलाचि वधा   ऐसी आज्ञा करूनि सैन्यातें
धांवे आपणहि यशीं   जो दे साधारणत्व वैन्यातें २४
कीं तो झाला तुमच्या   तनयाचा विप्र कारभारी हो
केले तुम्ही धरुनि पथ   अनयाचा विप्रकार भारी हो २५
केला धर्म विरथ कृत-   वर्म्यानें खंडिलेंहि कवच रणीं
नें सर्व भस्म करिता   परि त्यांची बहुत भक्ति तव-चरणीं २६
शत्रें बकसा वधिला   सात्यकिनें सोमदत्त-सुत भूरी
त्यांचि करविले स्व परां-   करवीं काळाऽनळांत हुत भूरी २७
सात्यकिवरि गुरुनंदन   धांवे त्यावरि घटोत्कच पलाश
झाले रक्तस्नात   द्विज राक्षस जेविं पुष्पित पलाश २८
मूर्च्छित केला द्रौणि   प्रथम स्वर्णदाचरें दशशरानीं
वदले पर पक्षहि बरा   कीं व्याघ्राच्या शिरे न शश रानीं २९
मग सावधान होउनि   गुरुपुत्रानें धृतोग्रकोपानें
मृतनसाचि पाडिला तो   राक्षस एकाचि तीव्ररोपानें ३०
मूर्च्छित होतां राक्षस   तो मागें शीघ्र काढिला सूतें
कीं पर्वतता घेउनि   देईलचि अशनिता ढिला सूतें ३१
भीमें सुयोधनाचें   ध्वज-कार्मुक-खंडन प्रथम केलें

१ चक्ररक्षक, २ वैन्यराजानें, ३ विपरीताचार, ४ बळात्कारसा, ५ बहुत, ६ मांसभक्षक, ७ पळसवृक्ष, ८ राक्षसें, ९ धृत-उग्र-कोप-धरिलाआहेभयंकरक्रोधज्यानें, १० तीक्ष्णबाणानें, ११ सुयीतें, + धर्माची.

तच्चाप-पंचक लया कुरुपतिनें मग अनुक्रमें नेलें ३२
त्यावरि स्वंडी त्याच्या शक्तीतें भूमिप त्रिधा राजा
पविधाराधिक तीव्रचि गमल्या त्वत्पुत्र-पत्रिधारा[1] ज्या ३३
स्वशिरीं फिरवुनि मिरवुनि रविमंडल भीम तो गदा घाली
कुरुपतिरथीं पडे ती जेविं गळां तीव्रभोगदाघाळी[2] ३४
प्रथम उडी घाली क्षिति- वरि तव सुत मग गदा [illegible]रे ती
नातरि हय-सूत-रथां- सह नृपतनु सगरसुत-पथा[3] वरिती ३५
नंदक-रथीं कुरुपति स्वीकारुनि मान सत्वरा गेला
मेळाचि सर्व वदले कीं रुद्रसमान-सत्व रागेला ३६
कर्णे सहदेव विरथ केला मग खड्ग-चर्मही नाहीं
तद्यत्नांहीं कष्टचि मेळविला जेविं धर्म हीनाहीं ३७
पूर्वीं जी भीमाची सहदेवाचीहि तीच गति केली
जरि तो[4] परनर-कुंजर- निकरीं साक्षात् मृगाधिपति[5] केली ३८
बाळांत विशिष्टासीं कोणीहि कधींहि करुनि युद्ध तरे
झालासि बहु पृथेच्या लाडें भावाचियाहि उद्धत रे ३९
प्राणचि कुंतीचा तूं यास्तव केलासि आजि म्यां मुक्त
विष्णुकडे जावें त्वां अथवा कुंतीकडेचि हें युक्त ४०
ऐसें हांसोनि वदे कुंतीचें वाक्य आठवी न वधी
कीं सत्यसंध[6] दाता तो कर्ण महायशा नव्हे नवधी[7] ४१

---

१ बाणधारा, २ तीव्र-भोगद-अघ-आळी- तीव्रभोगदात्री पातक पंक्ती, ३ सगर राजाच्यापुत्रांच्यामार्गास (स्वर्गपथास) ४ सहदेव, ५ सिंहासारिखाक्रीडाकरणारा, ६ सत्यप्रतिज्ञ . ७ क्षणिकबुद्धि.

कर्ण शिरे परकटकीं   जैसा जलधींत स्फीत हिमाद्रीचा
मग जन्मेजयनामक-   पांचाल्यरथींच स्फुतहि माद्रीचा ४२
सहदेव मनिं म्हणे हा   जन तव स्तुति काय न शिकला पीडा
ऐसी नसो असो मृति   पाव प्रणतासि शशिकेलापीडा ४३
गुरुवरि विराट धांवे   त्यासि रणीं विरथ मद्रपाळ करी
तदनुजनि शतानीकहि   ये हरिवरि जेविं चपळ बाळकरी ४४
त्याहि शतानीकाला   येतांचि रणांत शल्य तो खपवी
दे बहु कुरुपतिस जसा   असुरवधें शतमखास तोख पवी ४५
मृतबंधुरथीं बैसे   वीरवर विराट हाक दे वर्षे
पर्वत म्हणे न दुर्लभ   मोक्षहि या काय नाक देवर्षे ४६
कांपे थरथर स्फुटतां   शल्याचा वज्रसा स्फुरोप मही
बसतांचि उरीं झाला   मूर्च्छित मत्स्येश तो स्फुरोपमही ४७
सारथि तेथुनि मागें   त्यासि म्हणत हायहाय काढी गा
शल्य परबळा उडवी   पवन जसा कापसाचिया ढीगा ४८
शल्याकडेचि रथवर   चालविला सर्वखळविलापार्थ
जेणें स्वसम अजित या   स्फुयशें सर्वत्र कळविला पार्थ ४९
वारील न प्रळयिंचा   पळही येवोनि आड वारा ज्या
त्यास अलंबुष राक्षस   वाराया होय आडवा राजा ५०
विरथ क्षणांत केला   गेला तात्काळ कोपला शरण

१ मेनाकपर्वत, २ चंद्रशेखरशिवा, ३ शल्य, ४ विराटाचा कनिष्ठ बंधु, ५ सिंहावर, ६ गजशिशू, ७ इंद्रास, ८ वज्र, ९ पर्वतनामाऋषी, १० देवासारिखाही, + स्तुति.

रुद्र-अतिवीरांसीं करिल तसा काय हो पलाश[1] रण ५१
पळवुनि पलाश पार्थें पवनें तरुसे उदंड लोळविले
बोळविले परलोकीं बहुतांकरवीं स्वहस्त चोळविले ५२
नकुळसुत-शतानीकें तव नंदन चित्रसेन जो चुलता
केला विरथ न जाता कृतवर्म्या शरण निश्चयें डुलता ५३
पाडी वृषसेन उरीं हाणुनि शर वज्रभास्कर[2] द्रुपदा
पळवी सूत म्हणे हा कृष्णा श्रितवल्लभा सुरेंद्रुपदा[3] ५४
सोमकचमू पळे घन- तिमिरींही गमति हित न दीप तिला
अंधारालाचि भजति जेविं अस्कर शक्रजित नदीपतिला[4] ५५
दुःशासनें विरथ जों केला प्रतिविंध्य तों अनुज अवघे
झाले सहाय कलिजित- धर्मा भुज विष्णुचे जसे चवघे ५६
शकुनि करी नकुळाला मूर्छित मग तो नृपा तव श्येला[5]
पळवी सूत म्हणे हो या काळमुखीं न पात वश्याला ५७
करिती महारण बळी शतमख शंबर[6] तसे कृप शिखंडी
भैरव[7] वैर वहाती ते जेविं महासरीसृप[8] शिखंडी[9] ५८
कार्मुक-कर्तन-कुपितें त्या आचार्यें कृपें नृपेंद्र-हितें
केला मूढ शिखंडी युद्धीं बहु मानलें सुरांसहि तें ५९
तेव्हां इकडिल तिकडिल झाले बहु युद्धभूमिवर कडबा
केलें त्वां मसण कुरु- क्षेत्र असे श्रुद्ध भूमि वरकड बा ६०
धृष्टद्युम्न गुरुवरि द्विरदावरि सिंहसा उठे रागें

१राक्षस, २वज्रप्रतिम, ३सुर-द्रु-पदा-कल्पतरूच्यास्थाना, ४समुद्राला, ५शकुनीला, ६शंबरासुर, ७भयंकर, ८मोठासर्प, ९मयूर.

पांडव पांचाळ सकळ रक्षाया त्यासि धांवले मागें ६१
द्रोणातें रक्षाया सकळ तुझे पुत्र सर्वही जपले
खपले ते खपलेचि प्रभुजि बहु बरेचि शेषही तपले ६२
सेनासमूह गमले अन्योन्य जिगीषु दोन अर्णवसे
धृष्टद्युम्न-समीपचि सात्यकि गुरुच्या समीप कर्ण वसे ६३
प्रथमचि धृष्टद्युम्ना दे सोडुनि बाण विप्र तापातें
कीं खंडी चापातें पापातें जाणवि प्रतापातें ६४
वाटे वधिलचि गुरुला जें कोपें सज्ज तो नव धनु करी
क्षितिसि नरवांही हरि जों करिच्या चितांत येन वध नुकरी ६५
सोडी घोर शरव्रज बहु प्याले कुरुप सुरव-कळा बदले
समरें द्रोणायास्तु स्वस्ति असें देव दानवहि वदले ६६
कर्णे द्वादशधा तों केला जैसा अही नभोगामी
तें पाहुनि रोमांचित झालों राया अहीन [illegible] मी ६७
द्रोण द्रौणि सुयोधन कृतवर्मा शल्य शकुनि हे सारे
युगपत् ताडिति म्हणती हूं मारा दुष्ट सर्प जैसा रे ६८
युगपत् सर्वांचीहि द्रुपदात्मज सकवचें उरें भेदी
आधीं द्रुमसेनाचें मस्तक मग कर्ण कार्मुक च्छेदी ६९
पुच्छाचें हरिस तसें धनुचें कर्तन अस[illegible] कर्णास
ग्राशील त्यास गमतो सिंधूच्या जेविं घटज [illegible] ७०

१ मेलेच, २ जिंकिण्याचीइच्छाकरणारे, ३ सिंह, ४ द्रोणाय-अस्तु-स्वस्ति-द्रोणाकारणें कल्याणअसो, ५ बाणसमूह, ६ आकाशगामी, ७ उत्तम भोग भोगणाऱ्या, ८ एककाळीं, ९ कापणें, १० अगस्ती, ११ उदकास.

सक्रोध योधमणि तो शीघ्र करुनि सज्ज कार्मुका सारा[1]
धृष्टद्युम्ना अरिवरि करि खर शर-वृष्टि वार्मुकासारा+ ७१
तों सात्यकि कर्णावरि वासव[2] बळिवरि जसा तसा आला
झाला दारुण रण सम गमले कोणास कोणहि न ह्याला ७२
अस्त्रें स्वसुत्रांचीं कर्णाचींही निवारिलीं क्रोधें
वृषसेन पाडिला शर हाणोनि उरांत त्या महायोधें ७३
सुतशोक-तप्त होउनि सात्यकिसीं कर्ण करि महायुद्ध
शल्द्दयशा वृषसेनहि झाला तितुक्यांत त्या रणीं बुद्ध ७४
सात्यकिला दारवती ते वृष वृषसेन बाप लेंक बळ
म्हणती काळमुखीं हो रिपुवपु कीं देह आपलें कैवळ[4] ७५
सात्यकिनें सहसा त्या दोघांचेही स्कबाण सोडून
तात्काळ पाडिले हो [illegible]गाव चाप तोडून ७६
ते सात्यकितें म्हणती शर सोडुनि सजुनि चाप नव दोघे
अभिमन्युचा म्हणे मग कां हाय तुझाचि बाप न वदो घे ७७
सात्यकिसीं रण करितां ऐकुनि गांडीवनाद कुरुपातें
कर्ण म्हणे हो[6] येतो जय साधाया स्वकार्य गुरुपातें[7] ७८
त्या सौभद्रापरि हे सात्यकि पांचाळ वेढिले असती
बहु आम्ही देतों या दोघांला आजि यम पुरीं वसती ७९
पार्थास कोंडिलें हे दोघे आम्हीं असें न समजावें
तिकडेचि त्यासि समरीं रोधाया बळ समुद्र-सम जावें ८०

---

१ श्रेष्ठ, २ इंद्र, ३ सावध, ४ ग्रास, ५ ह[illegible]र, ६ अर्जुन, ७ द्रोणाच्यापा-
तानें, + वार्मुक-आसार-घन वृष्टितुल्य.

हें प्रिय हित मित्रवचन परिसकनि नृप शकुनिला म्हणे मामा
नामा अन्वर्थ करा शीघ्र उठा सफळ हो करा कामा ८१
देउनि [illegible] तां अमित्यशकचीसमानहोमामी
जा वासविवर मान्या देवींत शची-समान हो मामी ८२
अयुत गज अयुत रथ घे जे साक्षात् सिंह परमे हेभाचे
दुःशासनादिक दिले तुज समर-सहाय परम हे भाचे ८३
त्या पांडुसुतां असुरां हरिसा सोडोनि उग्र शर भाजीं
तीं सर्वे कवण-यशें ख्याते होतिल वशें न शरभाजीं ८४
या बहुमानें फुगला गेला धांवोनि अर्जुनावरि तो
ज्याचा सुरुती मरणा कीं कुरुती शत्रु अर्जुना वरितो ८५
जाउनि धनंजयावरि झाले भट सर्व शलभसे नाहीं
कैसा तरी करावा सिंहाचा भंग कलभ-सेनाहीं ८६
शकुनि विरथ होय बसे वर्ण जपत चारि पुत्रयानींच
भंगिन म्हणे परास न जिंतुनि मनिच्या रिपु-त्रया नीच ८७

अध्याय.१९

रविचा चढु कडुनि नमें [illegible] न कर वेढिला होतो
सात्यकि तसाचि कौरव- कटकाला न करवे दिला होतो १
अर्जुन तसाचि सात्यकि बहु मारुनि शेष कुरुकटक पळवी

१ अहोमामा, २ मनोरथा, ३ शत्रुरूपगजाचे, ४ इंद्रसा, ५ तृणाला, ६ करिशावकसेनानीं, ७ कायकरूं हे चारवर्ण, ८ किरण.

पळ वीर पुढें नउरे सर्वांचींही मुखें रणीं मळवी २
सात्यकिला माराया खातचि धांवे तुझा तनय दांत
परि होय विरथ याचें प्रागल्भ्य तुम्हां अशा अनर्थदांत ३
होउनि विरथ सुयोधन कृतवर्मरथीं चढे कढे कोपें
सोपें द्यूतचि परिभव वीरांचा कठिण संगरीं रोपें[२] ४
क्रोधाविष्ट सुयोधन वदला राधासुतासि परिसा तें
गुरुतेंहि दोष लावी खापर बा परम जेविं परिसातें ५
वधितां विजय जयद्रथ समर तुम्हींच स्वयें प्रवर्तविला
कदनउगेंचि पहातां कां सोत्साह-प्रवाह पर्तविला ६
शक्त असोनि निरखितां निज-कटक-कदन अशक्तसे परसे[४]
चाळवितांहि न पेटां केलें आर्द्रेंधनें जसे परसे[७] ७
समयीं सोडावें मज ऐसें तुमच्या मनांत जरि होतें
जिंकूं पांडुसुतांतें ऐसें वदलां कशास तरि हो तें ८
जरि भरंवसा न देतां पडती बुद्धीस भूल कशाला
येतें तुम्हासि भाषण बहु नीरस जेविं फूल काशाला ९
जरि ठेवितां कर श्रुति- वरि करितों वैर हें कशाला हो
परिभूति[+] रुचे कवणा बाळहि न म्हणेल वपु कशाला हो १०
करणें नसेल माझा त्याग यशाचि बहु गमेल जरि शुद्ध
तरि ह्रा सिद्ध करा निज- शस्त्रास्त्र-पराक्रमानुगुण युद्ध ११

---

१ अन्यायवर्तिजिस्यांत, २ बाणानें, ३ अर्जुन, ४ शत्रुसे, ५ पेटतनाहीं, ६ आर्द्र-इंधन-ओल्याकाष्ठानें, ७ आगटीं, ८ तृणाला, ९ चाबुक, + पराभव.

मौनचि धरिलें द्यावें उत्तर बा त्यास काय काय तिहीं
न दुरुक्ति मनिं धराव्या सुजनांहीं जेविं बायका येतिही १२
पांडव-कटकीं शिरले क्रोधी गुरु कर्ण करिकुळीं हरिसे
झाले दुःसह सर्वां केवळ ते प्रळय-पावकासरिसे १३
बहु वधिले वीर रणीं बहुत पळविले कुलीन योध रणीं
धर्म म्हणे परतावें जाउ करा पावली न यो धरणी १४
विजय म्हणे श्रीकृष्णा न्याला प्रभु धर्मराज कर्णाला
जेविं महाविष-दृष्टिहि अहि महिवरि देखतां सुपर्णाला[2] १५
मज हा परिभव दुःसह लावियला जेविं पाय सापाला
ने रथ मी यासि वधिन विषतरुचा प्रभुसि कायसा पाला १६
कृष्ण म्हणे बा दीनां[3] माघहि[4] दे कंप न जितका शीतें
तितका देतो यश हा राहों देईल न जितकाशी[5] तें १७
तूं एक कीं घटोत्कच आम्हांत समर्थ कर्णमद[6]-नाशा
विफळा करो पराशा भीम-तनय जेविं रुद्र मदनाशा[7] १८
कीं प्रिय सख्या असे त्या[8]- पाशीं ती दिव्य शक्ति माघवनीं[9]
कर्ण रणीं कांपवितो बहु मज वृषभासि जेविं माघ वनीं १९
ने म्हणसी काय तुला गमला हा वासुदेव वेडासा
वाम[10] अकार्यक्षमही भुज भुजग-मुखीं न देववे डांसा[11] २०
बा जें स्वयें करावें तें सुमहत्कार्य जरि सुतें केलें

१ संन्यास धारण केलेल्यानीं, २ गरुडाला, ३ दरिद्रास, ४ माघमासहि, ५ जयें करून शोभणारा, ६ कर्णाच्या गर्वनाशास, ७ मदनाची इच्छा, ८ कर्णापाशीं, ९ वासवी शक्ति, १० डावा, ११ दंशास.

तरि त्यांत सत्यसंध- त्व स्वयश व्यर्थ काय गा गेलें २१
वत्सा घटोत्कचा ये ऐसें तो पुष्कराक्ष[1] जों बाहे
बाहे नरनारायण- चरणीं मस्तक पुढें उभा राहे २२
हा आलों मज आज्ञा काय असें राक्षसेंद्र बदला हो
कृष्ण म्हणे वत्सा हो कर्णांतक धर्म राज्यपद लाहो २३
शस्त्रास्त्र-राक्षसाऽसुर- माया-बळ-जलधि पुत्र तूं पहिला
कर्णाघरिक्षय करुनि साधुनि दे निज-पित्यासि या महिला २४
जिष्णु म्हणे सत्पुत्रा हो गुहसा[2] सूतपुत्र[3] तारकसा[4]
आम्हा तूं ज्येष्ठ तुझे प्रतिविंध्याद्यनुज पांच तार कसा २५
राक्षस म्हणे बहु बरें मारीन रणांगणांत कर्णातें
रूरवर कवीस म्हणतिल रक्षःकृत[5] कर्ण-कदन वर्णा तें २६
आज्ञा घाल तुम्हीं तरि देईल गुरुलाहि हा निधन[6] दास
रात्रौ मजसीं भिडतां होईल प्राप्त हानि धनदास[7] २७
ऐसें वदतां त्यातें कर्णावरि कृष्ण पाठवी राया
देती भिवोनि कौरव- सेना समरांत पाठ वीरा या २८
त्यावरि अलंबुष खचर कुरुराजें[8] धाडिला जटासुरज[9]
त्यासि घटोत्कच मारी त्या वायुपुढें[10] महाभटा[11] रजें २९
कुरुपति-रथीं अलंबुष शिर ठेवुनि भौमरेणु[12] पाय नमी
विनयें म्हणे पहाया आलों आणूनि हें उपायन[13] मी ३०

१ कमलनयन (कृष्ण) २ कार्तिकेयसा, ३ कर्ण, ४ तार-[illegible], ५ घटोत्कच्यानें केलेलें, ६ मरण, ७ कुबेरास, ८ दुर्योधनें, ९ जटासुरपुत्र. १० घटोत्कचरूप वायूपुढें, ११ महा-भट-असु-महायोध्यांचे प्राण, १२ मृत्तिकाकण, १३ भेट.

वर्षे दुजा अलायुध रात्रिचर महोपलायुध ग्रामा
पीडी भीमासहि घन- नाद जसा खळबळायुधग्रामा ३१
कृष्णें घटोत्कच रणीं रक्षाया भीमसेन आठविला
रामें घननादावरि लक्ष्मणसा तो बलाऽब्धि पाठविला ३२
वैद्युत-पावक तरुला तैसा तोत्या अलायुधा कवळी
लावी बहु कुरु-कटका त्याचें नाशूनि बलायु धाक बळी ३३
त्याचेंहि शिर तसेंचि त्वत्तनयाच्या रथींच तो पाडी
एका कर्णावांचुनि सर्वांचा शौर्य-धैर्य-मद झाडी ३४
प्रकटी बहु शत दुस्तर माया तो वीर्यमत्त मायावी
कुरु म्हणति यापुढें तों न मयश्री देवसत्तमा यावी ३५
शंबर शंभरहि उणे वाटे कांहींच न मय मायावी
अत्युग्रता कधींहि न भीमाच्या सूनुसम यमा यावी ३६
कौरव कर्णासि म्हणति राक्षस हा स्पष्ट कल्पनटशील
किति भुज-बळें तराया दुस्तर-गरसागरासि झटशील ३७
नेणे कांहींच असा माया-शस्त्रास्त्र-बळ-विलास मय
बा शेवटील येणें आम्हां सर्वांसि कळविला समय ३८
बहु मारिले पहा हा मारिल उरल्या बळा समस्तातें
केला अशेषअंधचि आम्हां डोळसहि यासमस्तातें ३९
ती ईश्वरें जशी त्या महिषावरि योजिली महाशक्ती

---

१ महा-उपल-आयुध-ग्राम - म[illegible] आयुधसमूहा, २ मेघनाद(इंद्रजित), ३ खल-बल-आयु-धक्क-राम-शत्रुसैन्याचें आयुष्यजाळणान्यारामास, ४ विद्युत्संबंधी अग्नी, ५ बल आणि आयुध, ६ मयासुरशोभा, ७ शंबरासुर, ८ कल्पांतीनिनंन कल्पांतकरणा-रिरचा, ९ विषसमुद्रास, १० देवी.

त्वां या घटोत्कचावरि योजावी वासवी महाशक्ती ४०
भीम धनंजय करतिल काय न तो मानुषाद[1] मायावी
हा वीर वधिल जो त्या विजयर्था निश्चयेंसि वा यावी ४१
त्या भीताभयदाच्या[2] हे भीत-प्रार्थना मना आली
झाली कल्पलतेची सद्गीतिकरूनि कामना ओली[3] ४२
खचरशतघ्नीनें[4] हय वधिले द्रोणे तशांत रुचवीलें
तें भगवत्संकल्पें कोपेंही तन्मनास रुचवीलें ४३
कर्णे शक्तीस जसा कुरराजें घालितांचि कर पविला
गिरिसा गुरु कठिनहि तो खचर त्रासें मनांत करपविला ४४
क्षिप्र पळे विंध्याकृति द्रोय भरे[5] भीमें[6] खचर[7] तो खांत[8]
तद्धृदयीं शक्ति शिरे कौरव-बल-चित्तवृत्ति तोखांत[9] ४५
राक्षस-वक्ष विदारुनि मागें नाहींच शक्ति ती फिरली
उर्ध्वपथीं परमप्रिय तें स्वामीला[10] कथावया शिरली ४६
मरतांहि पांडवप्रिय अद्भुत केलें घटोत्कचें परिसा
सन्मस्तक डोलेसें पितृ-हित न करील पुत्र तो अरिसा[11] ४७
पितृ-हित किमपि न घडलें धरुनि मनामाजि भाव हाचि रडे
करुनि बृहद्देह[12] पडे तें कुरुकटकैकदेशा चा चिरडे ४८
गुरुशर्वभारें[13] कौरव- सेना अक्षौहिणीच तो खपवी
तेजस्वी कृत जनका दे जेविं हरिस न तेविं तोख पवी[14] ४९

---

१ मनुष्यभक्षणारा (राक्षस) २ भिणाऱ्यास अभय देणाऱ्या अशा कर्णाच्या. ३ सरवी. ४ शक्तीनें, ५ शिरे, ६ भयंकर, ७ घटोत्कच, ८ आकाशांत, ९ हर्षांत, १० इंद्राला, ११ शत्रुतुल्य, १२ बृहत्- देह-विशाल शरीर, १३ विशाळ सेनाऱ्या भाराने, १४ वज्र.

शक्र जसा वृत्रवधीं स्तर-सिद्ध-महर्षि-साध्य-धीरांहीं
स्तविला घटोत्कच-वधीं कर्ण तसा कौरवादि-वीरांहीं ५०

बसऊनि नृपरथीं स्वबळीं गेला कांपविन कर्ण वसुधेतें
साधुनि स्वकीर्ति तें सुर- पति जेविं मथूनि अर्णव सुधेतें ५१

दुंदुभि-पणव-प्रमुखें वाजविती जे प्रवीण ते वाद्यें
श्रित हर्षविले कर्णें जैसे रामें समस्त देवाद्यें ५२

अध्याय-२०

पांडव घटोत्कच-वधें अति-दुस्तर-शोक-सागरीं पडले
अभिमन्यु-वधीं जैसे सोडुनि धृतिला तसेचि ते रडले १

भेटे जयासि हसतां दिसति नभीं जों मयूख दशनांचे
हरिसा गर्जे होउनि आनंदाच्या भरासि वश नाचे २

निर्धन निधिच्या जैसा पावे अत्यंत हर्ष लाभानें
वाटे तसाचि भगवान् त्यजिला अत्यंत हर्षला भानें ३

पार्थ म्हणे गोविंदा कारण या कोण हर्ष-हास्याला
धृतराष्ट्राच्या व्हावा अस्मच्छोकांत हर्ष हा स्याला ४

भगवान् वदे प्रियसख्या शक्ति अमोघा घटोत्कचीं पडली
बा कधिंही न घडावी जी स्वमहत्कार्य-सिद्धि ती घडली ५

वर कवच-कुंडलार्पण करुनि महाशक्ति जोडिली होती

१वाद्यविशेष, २धैर्याला. ३अर्जुनास, ४किरण, ५दंतांचे, ६स्मृतीनें, ७अस्मत्-शोकांत, ८मेहुण्याला (शकुनीला.)

अर्जुन जी न तुम्हावरि अत्याविषयींच सोडिली हो ती ६
याच्या अंगीं असतें कवच झळकतीं स्वकुंडलें कानीं
तरि हरिलें असतें धृत- राष्ट्राच्या अमृत-कुंड लेंकानीं ७
कर्ण निमालाचि असें जाण सख्या निश्चयेंचि तूं जरि हा
असता शक्तिकर दुजा अरि हा स्वामीच म्हणविना तरि हा ८
शक्र यम वरुण धनपति जिंकुनि तत्कीर्ति कर्ण विरिता हो
केला शिवप्रसादें हा घटजें जेंवि अर्णव रिता हो ९
असता स्वकवच-कुंडल तरि कर्ण सख्या जगत्त्रयीं अमर
तूं गांडीवें मीहि न चक्रें शकतों करावया समर १०
हत-कवच-कुंडलासहि पाहुनि समरीं श्रमेल वासवधी
सत्य शपथ करितों तो नत्वदितर जो स्ववीर यास वधी ११
जेव्हां चक्र बुडेल श्वभ्रीं बहु संकटीं वृष पडेल
होइल अनावध तुला याचा तेव्हांचि बा वध घडेल १२
मागध चैद्यहि वधिला म्यां योगें कीं न हो तुज विषाद
व्यंगुष्ठ करविला म्यां गुरुकर कीं एकलव्यहि निषाद १३
योगबळें म्यांचि सख्या आजि अलायुध घटोत्कचहि वधिले
पूर्वी हिडिंब-बक-मुख बहु हे गर शरचि काळिजा मधिले १४
दुर्योधनासि मिळते मगधपति-प्रमुख वीर-वर जरि ते
धरितें बळ रण करिते अरितेज समस्त सर्वथा हरिते १५
काळें राहु गिळाया योजावा वीर सप्तमा रविला

१ अगस्तीनें, २ त्वत्-इतर, ३ भूरंध्रीं, ४ युक्तीनें, ५ अंगुष्ठहीन, ६ नामविशेष, ७ सहस.

नेविं वृषावरि योजुनि म्यां राक्षस वीर मत्त मारविला १६
कर्ण न वधिता तरि मज मारावा लागताचि हा चक्रें
कीं अ[illegible]मरव-द्वेष्टा वधिला जाता न संगरीं शक्रें १७
आजिवरि तुम्हांकरितां म्यां हा राक्षस उपेक्षिला होता
हो तारक या तुमचें दास्य रणमरवींहि जाहला होता १८
धर्मद्वेषि-वधाची रक्षिलि नाहीं जरि प्रतिज्ञा ते
ध्यातिल गातिल नमतिल शामितिलेक न मज हरिप्रति ज्ञाते
न धरिं विषादा वसविन नाकीं मेले रूयोध नव-धामीं
कथिन उपाय वृष-वधा तुज भीमासहि सुयोधन-वधा मी २
परलक्ष लब्ध झाले हे हरिसे गर्जताति रिर्तवाहा
हीं पळताति स्वबळें चाल म्हणायास लाव कितवा हो २१
धृतराष्ट्र म्हणे कोण्ही पुत्राला हित नसेचि सांगाया
पार्थीं शक्ति-प्रेरण कथिलें नाहीं तुवांहि कां गा यों २२
पाचारितां रण-मरवीं जावें हें व्रत नव्हे वृथा ज्याचें
प्रथमचि हटकुनि केळें कां न वृषें भस्म त्या प[illegible]जाचें २३
साधाया [illegible]र्या तें करितो मानूनि जन कपट हितसें
ईश्वर होउनि लोकीं आचरतो केविं कनकेपटहि नसें २४
श्वबरा-हरणीं जैसा श्वपचांला लाभ निश्चयें आहे
कृष्ण तसा स्वार्थातें राक्षस-राधेय- संगरीं पाहे २५
संजय म्हणे वृषेच्या वृष करिता भस्म आज त[illegible]ळा

१हवनकर्ता, २मुनिश्रेष्ठ, ३नव्यागृहीं, ४हेअर्जुना, ५दु[illegible]ला, ६हायहाय, ७कर्णास, ८अर्जुनाचें, ९कृष्णाही, १०अंत्यजाला.

लोभी निधिला तैसा प्रभु करितो बहुत बा जतन याला २६
पार्थी शक्ति-विमोक्षण कथिलें नाहीं तुवांहि कां गा या
म्हणतां तरि कर्णाला चुकलों नाहींच मीहि सांगाया २७
कर्णासि रात्रिं शिबिरीं दुःशासन शकुनि नृपहि विनवीती
जी जयवेध-प्रतिज्ञा सांगावी काय नित्यहि नवी ती २८
कर्ण म्हणे वर देउनि मग मागें काय मी कवि सरेन
शक्ति उद्यां पार्थावरि टाकीनचि निश्चयें न विसरेन २९
जय न वधावा कृष्णचि त्याविण ते सर्व काय पांगूळ
हेंचि बहु सरस अमृत त्यजुनि रसिक वरिल काय पां गूळ ३०
चवघांत करिल अजितचि त्यास सखित्वें जयास वरिल हरी
तोचि अमर अमृताचा निधि सोडिल ज्या परार्कवारि लहरी ३१
तस्मात् प्रातःकाळीं कृष्णचि सोडुनि शक्ति मारावा
यूथप वधितां हरिच्या कैसें साहेल यूंथ आरोवा ३२
ऐसा दृढतरनिश्चय शिबिरींव्हावाजसापदींसवड
नरणींराहेपाहे पारावारातसापदींसवड ३३
वध-बुद्धि युद्ध-काळीं मोहेंचि न सावधान राहे ती
कृष्ण हृषीकेश धरू देईल कसा वधा नरा हेती ३४
योजी इतर म्हणे जय अरि-दृष्टिपुढें न सर्वथा राहो
ऐसें सख्यास रक्षी प्रभुवर होऊनि सर्व थारा हो ३५
ऐसा श्रित-रक्षण-पटु जो म्हणतो सेंद्रनाक थारा ज्या

१ अर्जुनवधाचीप्रतिज्ञा, २ अर्जिक, ३ समुद्र, ४ मृतावारि, ५ गजसमुदाय, ६ गर्जनेला, ७ कृष्ण, ८ अर्जुन, ९ आश्रय, १० स-इंद्र-नाक- इंद्रासहवर्तमानजोस्वर्गतो.

त्या चक्रधर-प्रभुच्या हननाची काय गा कथा राजा ३६
सात्यकि कृष्णासि म्हणे प्रभुला विज्ञापना असी मोजी
पार्थी न टाकिली कां शक्ति वृषें धरि बळा असीमा जी ३७
कृष्ण म्हणे शैनेया म्यां कर्ण भ्रमविला वृकासुरसा
भक्ता मी बहु जपतों जपतो शत[2]मख जसा सुधा-सुरसा ३८
पथ्थ केरिलें चालविलें आपण हें वचन या न राखावें
त्या उग्र-शक्तिनें या कुंतीच्या न तनया नेरा खावें ३९
वसुदेव देवकी बल- देवादि तुम्ही समस्त मत्प्राण
जाण प्रिय पार्थ जसा न तसा कोणही खरें तुझी आण ४०
व्यसनीं रक्षिन बुडतां आधीं पार्था तसा न भवेना मीं
या मित्रीं सप्रेमा निश्चळ उपमन्यु जेविं भव नामीं ४१
झाला सजीव हा व्यसु होउनि लाभासि या नसे जोडा
मज वाटे प्रद्युम्न- प्रत्यागमन-प्रहर्ष तो थोडा ४२
अर्जुन मूर्[9]धा याच्या नाशें होईल आपुला घात
बा तत्काल घटोत्कच हा म्यां केला परापुढें हात ४३
यापरि सात्यकि-केशव- संवाद श्रवण करुनि स[10]सुंदा या
सू[11]तासि बोल लावी नृ[12]पे निंदी सुतमुखा ऽ स-समुदाया ४४
होतों कृतार्थ जरि ती गोविंदीं शक्ति सोडली असती
गेली कीं हातींची सर्वस्वें जेविं जोडिली अ[13]सती ४५
सूत म्हणे स्वामीचें जें मत ऐसेंचि आसुचें परि तें

१माझी, २इंद्र, ३ पत्कारलें, ४अर्जुनास, ५गृहाला, ६शिवनामीं, ७अर्जुन, ८गतप्राण, ९मस्तक, १०सहर्षा, ११संजयासि, १२धृतराष्ट्र, १३जारिणी.

झालें विफळ कपाळ प्रभुजी तुमचेंचि घात हें करितें ४६
भलत्या कृष्णीं टाकिन शक्ति असा वृषविचार करि पक्क
नित्य म्हणे सिंहो[1]ऽस्मि श्वस्त्वं-गंतासि कृष्णकरिप क्क ४७
योजावें तें समयीं आम्हां कोण्हा न आठवावें हो
[2]देव प्रभु अष्टांऽगुल जें त्यासि म्हणेल आठ-वावें हो ४८
गत-शोक कशास पुरे होउनि सावध पुढील परिसा हो
गुरुवध-वृत्त स्रदुःसह बहु तुमचें हृदय मृदुल परि साहो ४९
भीमाला जय-मत्त- द्वेषि-कटक-मर्दनासि पाठवुनी
[3]राजा रडे घटोत्कच- कृत बहु सेवो[4]पकार आठवुनी ५०
कृष्ण म्हणे विकलत्वा अनुचित तूं धीर शूद्र समयज्ञ
सोडुनि शोक करावा समर नसे श्रेष्ठ युद्धसम यज्ञ ५१
धर्म म्हणे बहु दुःसह सदपत्य-वियोग विषम हा देवा
मज वाटे न गिळेलचि सदऽपत्य-वियोग-विष महादेवा ५२
कसें घटोत्कचें बहु केलें होउनि वनांत नत दास्य
गुरुवत्सलांत स्वालीं झालें या त्रिभुवनांत न त[5]दास्य ५३
जी सहदेवीं तीच प्रीति मुकुंदा घटोत्कचीं माझी
बा जीवदान दिधलें विजयासि मरोनि शेवटीं आजी ५४
आम्हीं तुम्हीहि नव्हतों अरिनीं अभिमन्यु मारितां जवळ
जिष्णु-समक्ष कसा हा झाला त्या शक्तिच्या मुखीं कवळ ५५

१ सिंहः-अस्मि-मी सिंह आहें-कृष्णकरिप-त्वं-श्वः-क्क-गंतासि-हे कृष्णरूपहस्तिश्रेष्ठा तूं उद्यां कोठें जाशील, २ कृष्ण, ३ धर्म, ४ सेवा-उपकार, ५ तत्-आस्य-त्याचें मुख.+ माझी

अभिमन्यु-घात-कारण   ते मुख्य द्रोण कर्ण सोडून
काय मिळविलें त्वत्या   ऽगस्कृत-सैंधव-शिरासि तोडून ५६
न बहु मम प्रिय केलें   मारूनि जयद्रथा अधन्या या
कर्णाचा कीं गुरुचा   करितां तरि मानता वध न्याया ५७
ते हे प्रवर्तले वृष   गुरु अहि शर-गर वमून भाजाया
केसें साहों पाहों   कीं भर्त्ता मीं चमू न भाजा या ५८
पाठविला भीम मथुनि   बळ गुरुलाही रणीं मथिल आजी
मी कर्णावरि जातों   तो मृत कीं हो तुम्हां कथिल ओजी ५९
ऐसें बोलुनि कोपें   कर्णावरि नीट धांवला राजा
मागुनि हरि हरि हांकी   तों झाला प्रकट त्यापुढें आजा ६०
व्यास म्हणे बा धर्मा   क्रोध सितार्श्वी करूं नको परत
सावध हो बा व्यसनीं   पडतो साहस करून कोपरत ६१
जरि कर्णार्जुन भिडते   तरि समरीं सकळ योजिते शस्त्रें
परमास्त्र धनंजय   राधेयाचीं निवारिता अस्त्रें ६२
त्या शक्रशक्तिनें जरि   पार्थी वृष टाकिता कसें होतें
व्यसन तरंडक भंगे   होय समुद्रीं जसें तसें हो तें ६३
सर्वस्वांत चुकविला   जेणें तो कां नको पलोशांत
हें किनि गा बा वधितां   शतमितंनोकां न कोपला शांत ६४
काळें वधिला राक्षस   ती शक्ति निमित्त मात्र हें साचें
भावंड बुद्बुदाचें   वपु अति-निःसार मित्र फेंसाचें ६५

१शररूपविष, २भार्या, ३घटोत्कच, ४धर्म, ५संग्राम, ६घोडे, ७व्यास, ८क्रोधवश, ९पलाश-अंत-घटोत्कचाचानाश, १०शंभरपुत्रांना, ११वसिष्ठऋषी, १२पाण्यावरीलबुडबुड्याचें, + तरांडें, (झाज)

विकळवें यश पात्र- च्छिद्रें पीयूषसें न सांडावें
मांडावें निज-धर्मा- ऽनुष्ठान तुवां असेंचि भांडावें ६६
पंचम-दिवसीं धर्मा होइल सकळाहि हे तुझी वसुधा
लोकत्रयीं बहु-मता कीर्तिहि बहु तृप्तिहेतु जीव सुधा ६७
सांगुनि हित अंतर्हित झाला तो वेद-खग-नग व्यास
ज्याच्या पद-रेणुपुटें पटु घाया देवनग न भव्यास ६८
मग सफळ हो पितृ-मनो- रथ पंचमवेद पाठ वीरा ज्या
ऐसें म्हणोनि गुरुवरि धृष्टद्युम्नासि पाठवी राजा ६९
तैसेंचि परबळातें विजयाद्यऽखिलांसि पाठवी रगडी
आम्हां कडीलहि सकळ देती न रिपूंसि पाठ वीर गडी ७०
रात्रि परम दारुण तें मेले बहु लक्ष योध यामाजी
झाली जरि त्रियामा तरि अति-घोरा सहस्र-यामा जी ७१
झाले निद्रांध सकळ भट न वधिति शत्रु जवळ राहुनि जे
अत्यद्भुत तें वाटे मिळतांहि सुधांशु-कवळ राहु निजे ७२
पार्थ स्वभटांसि म्हणे स्वस्थ निजावें तुम्हीं न पेंगावें
मग यश शशि-प्रकाशें जोडावें जें महातपें गावें ७३
त्या अभिमत-वरदानें पार्थासि स्व पर सर्व मानवले
दुष्काळीं क्षुधितांतें जाणो दिधले यथेष्ट कानवले ७४
अश्वीं रथीं गजीं जे जेथें होते तसेचि ते निजले
क्षतजें जय साधुत्व प्राप्त प्रेमाऽश्रु-जळ-भरें भिजले ७५

---

१ शुभ, २ वेदरूपपक्ष्यांसआकाशरूपअसा, ३ कल्पतरू, ४ कल्याणास ५ धनुर्वेद, ६ युद्धामध्यें, ७ पक्कान्नविशेष (कर्ज्या)

शोभे बळ जेविं लिही चित्रपटीं रंग अर्जुन चितारी
व्यसनीं स्वपरांसहि सम तो सभ्रीरंग अर्जुनचि तारी ७६
स्त्री-कुचलीन तरुणसे क्षत्रिय गजकुंभलीन ते रमले
रमले मुहूर्त-परिमित निद्रेसीं सर्व जीव विश्रमले ७७
मग भगवान् विधु उगवे पळवी देऊनि कांप तिमिरासी
खोट्याला तेजस्वी नांदों देईल कां पति मिरासी ७८
कारिति पुन्हा रुखवाया शक्रसुखा सृष्टिपा रणाऽरंभा
यावे पराक्रमि पुरुष पति पाहुनि दृष्टि-पारणा रंभा ७९
चंद्रोदय झाल्यावरि कुरुपति गुरुला म्हणे बहु श्रमले
पांडव पांचाळ रणीं होउनि निद्रांध केवळ भ्रमले ८०
कैसे निजों दिले बा आले होतेचि आयते हातीं
म्हणतचि होतीं शस्त्रें भ्रमता धरणार राय ते हातीं ८१
गुरुजी प्रियार्थ तुमच्या हें आम्हीं साहिलें गरळ गिळिलें
स्वापत्याचें नरडें व्याघ्रीनें मात्र ऐकतों पिळिलें ८२
शस्त्रास्त्रज्ञ त्रिजगीं स्पष्ट तुम्हासम तुम्ही तदपि त्याचें
लंघन करवें सहातां कळलें कीं गुरुकडे पद पित्याचें ८३
ते मीहि शिष्य तुमचि परि तिकडे प्रेम न इकडे कां जी
हत-भाग्या ये धावुनि जातां पीयूषनइ कडे कांजी ८४
ऐसें द्रोणाला बहु वदला जें काय राय तें नाकीं
नहुषचरितसें दुःसह झालें कीं जेविं रायतें नाकीं ८५

---

१ मिळवून, २ मिरासदार (वतनदार) ३ लोकपालांस, ४ मोठ्याकडे, ५ नाकांत.

कोपें द्रोण म्हणे मी वृद्ध तरि तरुण-सहस्त्र-सम झटतों
मजसम कटकीं टिकता न दिसे भीष्माविना इतर भट तों ८६
शक्त्यधिक यत्न करितों जरि सर्व स्वपरबल मळा गातें
परि वृद्ध-भोरपीसा तूं एकचि मानिसी न लोगातें ८७
धर्म असा मारावा अस्त्रें ज्या विदित अस्त्र तें ज्याचें
न विदित त्या न वधावें प्रगटूनि रणांत अस्त्र तेजाचें ८८
परि अस्त्रें मी परबळ जाळिन काढीन नरिच हें वर्म
कर्म क्रूर करिन कीं लेशहि लुब्ध-श्रितीं तुरे धर्म ८९
हें युद्ध काय रुद्रें- हि न नारायण-सखा नर थकविला
रविच्या रथाहुनि उणा तेजें ज्याचा गमे न रथ कविला ९०
न हरि न निवात कवच न षष्टि सहस्त्रहि हिरण्यपुर-वासी
शकले ज्याच्या धनुच्या सोसाया संगरांत स्वर्वासी ९१
ऐसा बहु तेजस्वी नरमूर्ति न होय कामहा काळ
पळतांहि त्यापुढें हय मग कैसें हतुकाम हाकाल ९२
गंधर्व-गर्व सर्वहि हरुनि हरी तुमचि याहि बंधानें
श्रुत राहो अनुभूतहि न स्मरसी वीर्य संपदंधा तें ९३
प्रत्यक्ष नव बलक्षय करितो सर्वहि उदंड जरि झटतों
भट तो विजयचि आम्ही जिंकाया ईश्वरापुढें नटतों ९४
कुपित नृप म्हणे गुरुजी पार्थ-गुणाचें पुरे करा कथन
करुनि द्विधा बळ करूं आम्ही चवघेचि जिष्णुचें मथन ९५

१ गोलांगतें, २ कवच, ३ द्वारकावासी, ४ उत्तमशब्दास, ५ कामहंता-मदनारि-(शिव.)

द्रोण म्हणे स्वस्ति असो   हरिला मारिन म्हणेल कोण ससा
तूं धन्य बा गरुडसा   जय त्या खाईन म्हणसि घोणससा ९६
वदसी भलतेंचि करें   जें हास्यावह वदोत बालिश तें
एकें काय पराभव   रामाचा न घडताचि बालिशतें ९७
प्राणाधिक बहु मत जो   श्रीकृष्णा गोपलोकपाळाला
करिल मृषा अमरांच्या   येतां क्षण कोप तो कपोळाला ९८
मूळ अनर्थाचें तूं   कां क्षत्रिय निरपराध मारविशी
जा विजय-शरें मरतां   भेदुनि जासिल नराऽधमा रविशी ९९
दुःशासनाहि मारिल   मारिल कर्णाहि त्याहि कितवा हा
हित वाहा निकरसम रू-   गनिदा देवा नसेंचि सितवाहा १००
मी दुःशासन तिसरा   कर्ण तिघे पांडवांसि माराया
आम्हीं समर्थ युद्धचि   व्हावें चिंता नसेचि बा राया १०१
ऐसें त्या अंधाला   सांगत होतासि सर्वदा साचें
तें व्हावें तुज काम-   क्रोध-कपट-लोभ-गर्वदासाचें १०२
तो पार्थ विशंक पुढें   आहे जा गांठि घाल बापा हूं
कर्तव्य सर्व केलें   कैसें करितोसि युद्ध बा पाहूं १०३
जिष्णुशरें तुज मरण   श्लाघ्यचि शेवट नृपा करीं गोड
सोड स्वजीविनाशा   लोंड करीं धैर्य-शर गुणीं जोड १०४
अद्भुत ऐश्वर्य बळें   मेळविलें भोगिलें द्रिल्हें उरलें
स्फुरलें बरें रणमरण   तेज तुझें श्रेय सर्वही पुरलें १०५

---

१ सिंहाला, २ सर्पविशेष, ३ दैवाला, ४ टेंकणा.

ऐसें वदोनि गेला गुरु-हरि पर-गज-घटेकडे नीट[1]
धीट द्विधा करुनि बळ करिति समर धरुनि जीवितीं नीट १०६

अध्याय-२१

नसतांही शस्त्र करीं चवथ्या यामांत घात लात रणीं
देवें स्व-पर-विवेचन जें या कामांत घातला तरणीं[2] १
वाटे स्वकरसहस्त्रें करुनि द्रव दिव्य कनक सारवितो
शुचि करि हरुनि तमोमल होय जगदऽपत्य जनकसा रवि तो २
संध्या-विधि संपादिति जपती जोडूनि अंजलीला हो
भट धरिती क्षण वीक्षण करितां संफुल्ल-कंज-लीला हो ३
करि जो परांसि विजया- नुमतें तो देवें[3] सात्वतप[4] सव्य
करवी बळेंचि दूरुनि हाका मारूनि भीम अपसव्य[5] ४
डावेविले भीमाच्या आज्ञेनें अर्जुनें वृषद्रोण
न करिल समयीं रुझें सूचविले धर्म धर्मपर कोण ५
दीप्त-दवा जेविं ससे शकले कोण्ही जया न वाराया
खवळे अधिक विकळ करी शमनेंपरा[6] ज्वर जसा नवा[7] राया ६
दुर्योधन कर्ण शकुनि शस्त्रांच्या शीघ्र वर्षती व्रातें
तप्तस्नेहा[8] जळसें त्या क्षोभवि शस्त्रवर्ष तीव्रा तें ७

१ सारखा, २ सूर्य (स्वकीयपरकीय यांचा शोध लावण्याचें काम रवीस सांगितलें म्हणून तो आला) ३ कृष्ण, ४ यादवपति, ५ एकीकडे सोडलें, ६ औषधानें ज्वर शमन करणारा, ७ तरुण ८ तापलेल्या तेलास.

त्यां सर्वांसहि दशदश- बाणांहीं तो महातपा वेधी
भीति-नदींत कुरूंची बहु मोहातें वहात पावे धी ८
पार्थ प्रलय-जलदसा दे वृष्टि करूनि हर्ष तिमिरासी
वंचक पुनरपि जैसे बहु भरतां ग्राम हर्षति मिरासी[1] ९
अकुलीं श्रीविघाशा समरीं शर वृष्टि घनरजोवृष्टि[2]
असतांहि करिति सहसा नाहींच तमें भरूनियां दृष्टि १०
तो व्यामोहक[3] संगर संसारचि त्यांत सर्वही भ्रमला
भ्रमला न गुरुचि दूर त्यागुनि गेला विरक्तसा गमला ११
उत्तर-देशीं होता द्रोण रणांतुनि निघोनि एकिकडे
बा त्याकडे न पाहों शकले पर सर्प जेविं केकिंकडे १२
द्रुपद विराट तयांवरि गेले तत्तेज परम राया तें
द्रोण म्हणे योग्य रणीं हे दोघे वृद्ध पर मरायातें १३
द्रुपदाचे पौत्रे[6] तिघे तीं-बाणानीं पळांत लोळविले
स्वर्गासि चेदि केकय सृंजय वीर क्षणांत बोळविले १४
वृद्ध तरुणासे झटले समयीं कर्तव्य किमपि न विसरले
द्रोणें शिर हरितांहि न[7] मागें ते एक पदहि कवि सरले १५
द्रुपदें धरितां प्रकुपित- सिंहातिक्रमण-कर-करीश-पथ
क्रोधें धृष्टद्युम्न द्रोण-वधाकारणें करी शपथ १६
मग खगपति-गति धांवे पांडव-पांचाळ-वीर-सहित रणीं
तो धृष्टद्युम्न गमे साक्षात् महिराहु विप्र महितरणी १७

---

१ वतनदार, २ दाटधुळीची वृष्टी, ३ मोहकारक, ४ मयूराकडे, ५ द्रोणावर, ६ नातू, ७ कोपले त्यासिंहाचें उल्लंघन करणारा जो करींद्र त्याचा मार्ग, ८ पृथ्वीवरचा राहु, ९ द्रोण, १० पृथ्वीवरचा सूर्य.

कर्ण शकुनि दुर्योधन नदनुज जे मुख्य मुख्य ते ज्यातें
रक्षित होते त्यांच्या कैसे पर साहतील तेजातें १८
वध कैंचा न दुरूनहि पांचाळां गुरुकडे पहावेना
ते पळती भीमाला हृदयींचें शल्यसें सहावेना १९
भीम म्हणे रे धृष्ट- द्युम्ना कळलासि आज पोकळसा
वचनासि कुलज न शिरा स्ववशासि न देवता जयो कळसा २०
पितृकृत-मारण जें तूं तेजस्वि शिखीसमान साहसि तें
मरणाधिक दुःख तुझ्या होइल वांचोनि मानसा हसितें २१
तूं मजकडे तरि पहा जरि तुज त्या अरिकडे पहावेना
जातों मीच मला तो सोसूनि स्वजन-वध रहावेना २२
द्रोणबळांत वृकोदर शिरला हो बळि-बळांत मघवासा
तें त्यां बहु भी हरि-पद- तुळसीच्या जेविं सर्व अघ त्रासा २३
धृष्टद्युम्नहि देहीं ज्वरसा कुरुगुरु-बळांत शिरला हो
निकट भिडोनि म्हणे असि माझा मत्तात-शत्रु-शिर लाहो २४
अपसव्य करुनि नकुळें तेव्हां कुरुपति रणीं विमुख केला
सहदेवें दुःशासन- सूत नकळतां यमालया नेला २५
भीमाची कर्णानें शरनिकरें फिरविली गदा मागें
ध्वज मथुनि सूत मूर्च्छित करि कृत्या जेविं मुरडली रागें २६
होउनि विरथ वृकोदर नकुल-रथावरि चढे कढे कोपें
द्रोणार्जुनरणाहि परिस ज्याचें कथनहि नृपा नव्हे सोपें २७

१अग्नीसारिखा, २ द्रोणाकडे, ३ बळीच्यासैन्यांत, ४इंद्रासारिखा, ५सैन्य, ६ भीमा, ७रख ड्र, ८ मागेंफिरली;

गगनांत आमिषार्थ श्येनाचें युद्ध नरवरा होतें
तेविं म्हणावें तरि हा दृष्टांतीं शुद्ध न रव राहो तें २८
करिवर हरि शरभहि पक्ष अशनिचि निशाचर तसेच दानवही
यांसम हे यांच्या गुण- लिपिसि पुरेल न मही-समान वही २९
कौरव-पांडव-कटकें झालीं जैसीं पटार्पितें चित्रें
गुरुनें जैसीं केलीं कुतुकें तैसींच विष्णुच्या मित्रें ३०
शिष्याला गुरु गुरुला शिष्यहि त्या रणमखांत आटेना
दाटे नारद-कंठहि युद्ध पुरेसें कदापि वाटेना ३१
शिष्यें निवारिलीं बहु ऐंद्र-प्रमुखेंहि वाडवेशास्त्रें
म्हणती सच्छिष्या तों तिलमात्र उणें न पाडवे शास्त्रें ३२
पार्था-पुढें न चाले यत्न परि न स्वगुरु तो असुख पावे
झालों मी धन्य म्हणे यासीं भिडतां रणीं असें स्वपावे ३३
स्वगुरुसि म्हणे यशें तुज- सम स्वचिर विभो टिको परम हर्षें
पितृमन लागुनि दे प्रिय- शिष्यचा सुखकोटि कोंपर महर्षें ३४
जरि आपणासि आपण कलुनि रुद्र द्विधा करिल समर
तरि उपमा होय असें म्हणती शक्रादि सर्वही अमर ३५
सुर नर करीत होते मानुनि परमेश्वरा-समस्तवन
ते चंद्र सूर्य जाणों जळजांचें कटक तें समस्त वन ३६
मग भगवान् द्रोण करी ब्रम्हास्त्राचा प्रयोग बा राजा
असमर्थ सहायाला बहु तेजस्वींहि अर्क बारा ज्या ३७

१ मांसार्थ, २ वाडव-ईश-अस्त्र; द्रोणाचीं अस्त्रें, ३ प्राण.

लोक गडबडे जैसा निरुदक-देशीं दवाऽनळीं सार्थ[1]
शमवी ब्रम्हास्त्रेंचि ब्रम्हास्त्रातें प्रबुद्धी पार्थ ३८
तों दुःशासन धांवे वाराया द्रुपदराज तनयातें
त्यास रणीं विमुख करी तो धर्मन्याय जेविं अनयातें ३९
कृतवर्मा एक तिघे तव सुत हे वीर कोपले चवघे
दोघे नकुळें दोघे सहदेवें खरित वारिले अवघे ४०
पाहुनि वात नगानीं तैसे भट रोधिले निज येमानीं[2]
धांवे दुर्योधन ये मध्यें साधावया विजय मानीं ४१
हरिवरि हरिसा उठला कोपें सात्यकि सुयोधनावरि तो
समयीं दाता हाता नाता त्राता सुयोध नावेरितो ४२
सात्यकिला दुर्योधन पाहुनि हांसे म्हणे सख्या सुकवी
शुक वीतमोह[4] चुकवी भोगा घरजाचि पयोधिला सुकवी ४३
व[illegible]नि तुज मज सहवासें परम सुख कसें गा तें
सख्य जिरालें क्षत्रा ऽचाराला सुकवि-मुख कसें गातें ४४
शर धरुनि यदु[6] म्हणे कुरु- गुरु-सदनीं सख्य आमुचें होतें
तेथेंचि स्वस्थ असो आणावें संगरांत कां हो तें ४५
भूप म्हणे कोठें ती कोठें ही प्राण घातक क्रीडा[7]
दुरतिक्रम काळ उरे धनलोभें प्रीति नीति न व्रीडा ४६
सात्यकि म्हणे कुरुवरा ऐसाचि क्षत्रधर्म हा क्रूर
दूर स्नेह त्यागुनि हाणिति गुरुतेंहि संगरीं शूर ४७

---

१ पांथस्थ. २ नकुलसहदेवांनीं, ३ आवरीत नाहीं ,४ गतमोह, ५ शुकरी,
६ सात्यकि, ७ लज्जा.

जरि मी प्रिय तुज तरि तूं भेदाया शिर उर प्रहार करीं
धरिल मज वराया गति बाखां धरितां स्मरप्र हार करीं ४८
जरि वधिशिल या समरीं तरि मी पावेन सुकृत-लोकांतें
मजला न देखवे प्रिय- मित्र-स्वजन-प्रणाश- शोकातें ४९
झालें प्रेमें भाषण मग त्यांसीं युद्ध परम कोपानें
रचिती बहु शरपटलें जाणों ते स्वर्गमार्ग-सोपानें ५०
सात्यकिचें धनु कुरुपति कुरुपतिचें धन्व सात्यकी छेदी
भेदी मर्में रविसा पाहोंही आपणाकडे नेदी ५१
भंगे भूप निघे मग सावध होउनि पुन्हाहि करि लगट
तों तद्वनार्थ धांवे कर्ण म्हणे शत्रु यासि करिल गट ५२
त्यावरि भीम उठे तों कर्ण तयाच्या शरांसि तोडून
छेदी धनु-सूतातें विकल करी विशिख-जाल सोडून ५३
दुःसह गदा-प्रहारें ध्वज-कार्मुक-सूत-कनकरथचक्रें
मर्दुनि भीमें व्याकुळ केला क्षण कर्ण बल जसा शक्रें ५४
रथ एकचक्र रविचा जैसा शोभे तसाचि कर्णाचा
स्वर्णाचा मद नुरवी होताचि असा प्रकर्ष-वर्णाचा ५५
तो धर्म भटांसि म्हणे लिहिलें न चळेचि आयु धात्यानें
जेणें हस्तीं धरिलें सफळ करावेंचि आयुधा त्यानें ५६
जे आमुचे प्रिय परम सर्वस्व प्राण शिर अहो भट हो
ते अडकले अरि-बळीं धांवा रे काय पाहतां फंटे हो ५७

१सुगति, २हातीं, ३पुण्यलोकांतें, ४आकाशमार्गाच्या पायऱ्या, ५धनुष्य, ६न देई, ७त्याच्या रक्षणार्थ, ८शरसमूह, ९सुवर्णाचा, १० ब्रम्हदेवानें, ११मार्ग, १२होवो.

मेलों कीर्ति-धनाचा   जरि करितां सोस वेचुना नाकीं
सोसे कुळजा मृत्यु न   अयशाचा सोसवे चुना नोकीं ५८
या धर्माच्या बोधें   गेले पांचाळ मत्स्य गुरु-वरते
कीं निज-धर्मापासुनि   मिळती जेजे अभीष्ट गुरु वर ते ५९
येम भीम म्हणति हाका   मारुनि ये धांव अर्जुना क्षिप्र
वां कुरु मर्दावे मग   माराया सांपडेल हा विप्रे ६०
त्या समयीं द्रोणानें   प्रकट करुनियां महास्त्र कोपानें
केला बहु-शत्रु-बळ-   क्षय पूर्वीं जेविं रुद्र-रोपानें ६१
गुरुशर-निकर-दवाऽनळ   सृंजय पांचाळ भासले शलभ
बळभद्राऽनुजनि म्हणे   हा सिंहचि सर्व यापुढें कलभ ६२
अति तूर्ण जयाविषयीं   योग करा त्यजुनि धर्म पांडव हो
या विप्ररूप-दहनीं   तुमचें न समग्र सैन्य खांडव हो ६३
जों आहे चाप करीं   तों हा ब्राम्हण न आवरायाचा
जाईल यापुढें बा   त्या देवांच्याहि आव रायाचा ६४
होइल मनुष्य-वध्य   द्विजवर जरि करिल आयुधन्यास
या जेव्हां सोडिल धनु   सोडिल तेव्हांचि आयु धन्यास ६५
जरि तो मरेल अश्व-   त्थामा हा तरिच शस्त्र सोडील
हें न घडतां शिरें या   सर्वांचींही रणांत तोडील ६६
अश्वत्थामा मेला   हें मिथ्या म्हणुनि हाय सांगावें
अनृत बहुमत व्यसनीं   जाया प्रेतत्व वायासां गावें ६७

१काबर, २नकुलसहदेव, ३द्रोण, ४कीटकविशेष(टोळ), ५बलभद्र-अनुजनि-कृष्ण, ६जळावे, ७युक्ति, ८इंद्राचा, ९शस्त्रत्याग, + होवू,

हाचि उपाय प्राण- व्यसनीं सर्वांसि आज तारील
वारील शत्रूहि न या सर्वांसहि संगरांत मारील ६८
बाल्यापासूनि बहु गुरु- वत्सल जो गुरुसि तोकसा मान्य
होईल अर्जुन तादृश- घातोपायासि तो कसा मान्य ६९
भीमादि सूरवें वळले म्हणति जयोपाय हा असामान्य
हित-कर न जगीं कोण्हीं आम्हां या कृष्णाजी असा मान्य ७०
कष्टें धर्म झाला बहु हि कौंतेसि लक्ष्न सा मान्य
कीं त्रिजग द्दुरुवर-वच जो न करिल तोचि पशू न सामान्य ७१
शत्रु-प्रदीप ज्याच्या लीला-श्वासेंचि मालवे शतदा
तो कदन करित होता पांडव-कटकांत मोलवेश तदा ७२
तन्नाम इंद्रवर्मा अश्वत्थामा तदीय-नागाचें
त्याचें भीमें केलें पक्षिवरें कदन जेविं नागाचें ७३
मेला अश्वत्थामा हें ऐकविलें गुरूसि मग राजा
तो भीसूत-शोका कीं नच तरले [illegible]दे मगरा ज्या ७४
श्रवणीं शिरतां प्रथमाचि ती द्रोणा होय शोकदा वार्ता
सूतवीर्य-विचार-सखा- घन निववी शीघ्र शोकदावार्ता ७५
लटकी वार्ता ऐसा निश्चय चित्तीं करूनि जो जवळ
भिडला होता द्रौपद त्याचा पाहे [illegible] कवळ ७६
ध्वज धनु खंडुनि मारी तो तात्काळ स्वमृत्युसूतानें
त्या अहितातें न गणी हरि-सेवक जेविं काळ-दूतातें ७७

१अपत्यसा, २उचकीनें पीडितझाल्यास, ३ मालवदेशाधिपती, ४ गजाचें, ५ सर्पाचें, ६शोकरूपअरण्याग्नीनेंपीं[illegible]द्रोणास, ७ धृष्टद्युम्न; ८ स्वमृत्युजोधृष्टद्युम्नत्याच्यासूताते, + सुसरीला (सूतशोकरूपमगरानें दशरथादिकांसगिळून टाकिलें नसें मला गिळील-असाभाव.)

दुसरेंहि खंडिलें धनु जें हस्तीं शस्त्र शत्रुनें धरिलें
तें तें सर्व द्रोणें दुर्दैवें वस्तु-मात्रसें हरिलें ७८

धृष्टद्युम्न स्वहय द्रोण-हयांमाजि होय शिरकविता
त्याची मिठी सकळबळ कंपित करि जेविं तज्ज्ञ-शिर कविता

तत्काळ द्रोण प्रभु ईषा रथचक्रबंधनें तोडी
धृष्टद्युम्न तयावरि गरगर फिरउनि महागदा सोडी ८०

विप्र क्षिप्र गदेतें खंडी दंडी जसाचि आशेनें
पसरिति त्याच्या विजया कटकें जैसीं घनासि आशेनें ८१

मग खड्ग चर्म घेउनि यत्न करी श्येनसाचि झडपाया
वाटे त्यास स्वतनु-प्रासादाचा नसेचि झडपा या ८२

रथ शक्तिनें पद तुरग वधुनि करी स्वहय मोकळे विप्र
विप्रतिमद्विष खंडी तेव्हां वैतस्तिकेषुनीं क्षिप्र ८३

विरथ विशस्त्र करुनि त्या द्रुपद-सुत-वधार्थ बाण जो सोडी
त्यातें [illegible]दीं शिनिपुंगव बहु परा[illegible]मे तोडी ८४

तें पाहुनि पार्थ म्हणे पतितपटा परमपूरुषा पाहें
कर्ण-द्रोण-कृपांत स्वस्थ कसा सात्यकी नवल बा हें ८५

सत्कवि निज वाचेला म्हणतिल बहु मधुर-वाणि-मैने या
रामा कृष्णा मग गा आधीं तूं तत्प्रियाचि शैनेया ८६

कर्ण- द्रोण- कृपांत द्विरदांत विशंक सिंहसा साजे
लाजविले ते धन्वी म्हणवुनि घेतें जगन्निवासा जे ८७

---

१ कवितारसज्ञ, २ धूर, ३ संन्यासी, ४ पक्षिविशेष, ५ आपलेशरीररूपराजवाड्याचा, ६ दरवाजा, ७ प्रतिमारहित, ८ वीतवीत लांबीच्या बाणानीं, ९ सात्यकि, १० हे कृष्णा, ११ वाणीरूपमैनेला. १२ सात्यकिला.

तेज न तव प्रसादें कोणांतहि सात्यकिस लया नेतें
येणें दृष्टि-सुख दिलें धावें त्वत्पाद-किसलयानें तें ८८
इतुक्यांत सुयोधन-मुख तव सुत कृप कर्ण अन्यही योध
क्रोध-मदांध चहुंकडुनि करिती शिनिसूनुचा रणीं रोध ८९
यम भीम धर्म समरीं बहुतचि शैनेय-रक्षणीं जपले
नपले परि पर पशु ते यदुपति-पशुपतिपुढें प्रचुर खपले ९०
वदले सुर देवासुर- सम त्या आयोधना शपथ करुनी
न तुम्ही किमपि मिळविलें ऐसा हा योधनाश पथ करुनी ९१
धर्म म्हणे क्षत्रिय हो यत्न करा कुंभयोनिला वेढा
जाणा पार्षत-तेजें गिळिलाचि बुभुक्षितें जसा पेढा ९२
आज्ञा होतांचि सकळ पांचाळ-प्रमुख वीर बलजलधी
बुडवाया धांवे परि तो घटज तसाचि हाहि निश्चल-धी ९३
गुरु परबळें बळकरग जेविं न करिजेल लग्न हैंळ दीनें
पीतिमगुणें शुचिकनक- रुचि कीं लज्जेंत मग्न हळदीनें ९४
धांवे रणार्थ गुरु तों तद्वामाक्षि स्फुरे पडे उल्का
समजुनि म्हणे वरावी सुगति समर्पूनि जीविता शुल्का ९५
योजुनि तो ब्रम्हास्त्र क्षत्रिय विंशति-सहस्त्र बा मारी
अन्य दशाऽयुत मर्दुनि ठाके निःशंक जेविं कामारी ९६
सुविषण्णं विरथ पार्षतें परमापद्ग्रस्त पाहिला भीमें
धांवोनि स्व-रथीं तो बा जेविं स्कंद वाहिला भीमें ९७

१ तुझ्या पादपल्लवानें, २ सात्यकीचा, ३ पुष्कळ, ४ युद्धास, ५ द्रोणाला, ६ धृष्टद्युम्नाच्या तेजानें, ७ स्थिरबु-
८ तत्-वाम-अक्षि-त्याचा डावा डोळा, ९ मोला, १० खिन्न, ११ परम-आपत्-ग्रस्त-महाविप-
त्तीनें ग्रासलेला, १२ शिवानें, + बळरामाच्या हातांतील, ∗ नागर, * निर्बळपुरुषें.

त्या परिभव-विकळाला रुस्यंदन चाप धीर दे हातें
थापटुनि पृष्ठ-देशीं कुरवाळुनि तो रुधीर देहातें ९८
अन्य-रुदुर्वह[1] हा गुरु- वध-भार शिरीं तुझ्याचि आजि असे
बाहु न तुटतां व्हावें निर्विण्ण न आदरूनि आजि असे ९९
घेतां भीम-कृत असा उत्साहविवृद्धि-हेतु बोध मनें
होय अधिक तेजस्वी जाणों नररूप वन्हि तो धमनें[3] १००
द्रुपदसुत गुरुसि गांठुनि झांकी इषुनीं हुताशो[4]-विष-कटुनीं
तद्रक्षक शिबि बाल्हिक कौरव-कटकें क्षणांत विसकटुनी १०१
काळें पाठविला द्विज मारावा हा निरोप ज्याला तें
अरि-धनु खंडुनि गुरुनें त्याहि दिली हानि रोप[5]-जालानें १०२
तेव्हां पांचाळांहीं कांहीं मागें पुढें न पाहून
गुरु गांठिलाचि जाणुनि रण-मरण अधिक जप -तपाहून १०३
घन-जालें रवि गगनीं क्षण नाहींसाचि लोपला होतो
गुरुहि तसाचि पर-शर- व्रातें मग फार कोपला होतो १०४
पर सर्व धैर्य-पर्वत गमला गुरु हॅरि[6] तदीय विशिख पॅवी[7]
कीं सकळांला लीला- लेशें कुरवाळुनीहि शिर खपवी १०५
वधिले पांचाळ अयुत- युग सृंजय षट्सहस्र समरांत
गज अयुत हय अयुत तें कर्म करी प्रकट कंप अमरांत १०६
जे मत्स्य वीर मथिले गमले ते मर्त्य न रवि पन्नास
प्रेमें कां गति-नर्वरी[8] न वरील द्रोण- शर[9]-विपन्नास १०७

१राहे, २ बाहूंचें विशेषण, ३ फुंकण्यानें, ४ अग्निआणिविषयांसारिखेतीक्ष्णअशा ५ बाणस मूहानें, ६ इंद्र, ७ वज्र, ८ गतिरूपनवरी, ९ द्रोणशरांनीं विपन्न (मृत) जे त्यांस.

क्षत्र-विनाशीं द्रोण   श्री-भार्गवसा प्रवर्तता क्षिप्र
तेथें धांवुनि आले   विश्वामित्रादि जे महा विप्र   १०८
भृगु अंगिरा मरीचि   पृश्नि सिकत वालखिल्य हे राया
अग्नि पुढें करुनि वदति   कीं शकति मुखाकडे न हे[1]राया १०९
बा हा तव निधनसमय   चाल कसा ब्रम्हलोकवास करीं
यावा नित्य कुशाचा   या बाणाचा कधीं न वास करीं   ११०
ये उत्तम-लोका यो   म्हणती घात कवि लोक-वासासी
विनविति नयनातें कीं   विप्र न घातक विलो- वा सोसी १११
त्वां ब्रम्हास्त्रें केले   दग्ध अनस्त्रज्ञ[6] नर न हा धर्म
शर्म समस्तां जीवां   जेणें उचित द्विजांसि तें कर्म   ११२
घडला अधर्म आतां   शीघ्र करावाचि आयुध-न्यास
जेणें भूतहित नव्हे   न रुचे तें पळहि आयु धन्यास ११३
भीम मुनि-वचन परिसुनि   पाहुनि वध-सिद्ध रिपु पुरोवर्ती
द्रोण म्हणे आयूची   सरलीच पुरेल तों पुरो वर्ती   ११४
सुत मृत कीं न मृत असें   जावें धर्मासि तरि पुसायास
कीं एक सत्यवादी   [11]हो भासे रिपुहि न रिपुसा यास   ११५
मिळतां त्रिभुवन-राज्यहि   अनृत न बोलेल धर्म-[13]स्रैत लेश
हा सत्य-संध जाणे   जैसा तो सत्य-धर्म [14]स्रैतलेश   ११६
बावी मज प्रतिज्ञा   वत्साची सत्यशी लहानपणीं
बाळांत खेळतां तिळ-   भरि चळला सत्यशील हा न पणीं ११७

१ पहाण्यास, २ हातीं, ३ मृत्युलोकवासास, ४ दारवबा, ५ स-असि-सखड्ग, ६ अस्त्रनजाणते, ७ शस्त्रत्याग, ८ भयंकर, ९ समीपभागीं रहाणारा, १० वात, ११ धर्मास, १२ खोटें, १३ यमपुत्र (युधिष्ठिर), १४ स्रुतल-ईश- बळी.

गुरु होय असें योजुनि जों सिद्ध युधिष्ठिरा विचाराया
जाणे त्रिजगत्साक्षी कृष्ण द्रोणाचिया विचारा या ११८
अश्वत्थामा मेला कीं आहे गुरु असें पुसे धर्मा
तों कृष्ण म्हणे मेला म्हण कवि अनृतेंहि जोडिती धर्मा[+] ११९
दिवसाऽर्ध होय तों जरि युद्ध करिल वधिल सकळही सैन्य
दैन्यद होइल कार्मुक- तेजें भूभृत्[1]-कुळा जसा वैन्य १२०
प्राणात्ययप्रसंगीं अनृत वदावें स्मरवें असें आहे
तुज जीवनदा मेघा चातकसे सर्व पसरिती आ हे १२१
आम्हां सर्वांतें गुरु- काळापासूनि आजि वांचीव
बहु-लक्ष-जीवजीवन- दानामित-सुकृत-सुवस्तु सांचीव १२२
भीम म्हणे गुरुवर-हरि- वचन अहो धर्मराज परिसा हो
दुःसह विषसेंचि अनृत हरिसा तुष्मत्प्रताप परि साहो १२३
अश्वत्थामा मेला तुच्चारुनि मालवेंद्र[4]-वर्म-करी
म्यां कथिलें परि सत्य प्रत्यय मद्वचन तन्मनीं न करी १२४
त्यजिल गुरु धैर्य धनुसह तुमचाचि असे तयास विश्वास
कीं धर्म सत्यवादी हे आहे कीर्ति विदित विश्वौकस १२५
वळला प्रभु भीमोक्तें धर्माहि कीं अचुक अर्थ तो भावी
क्षुद्र-पदीं लोभ धरी यन्मति न स्वःपदींहि[7] लोभावी[8] १२६
तों धर्मराज होउनि अनृत-भय-जलधि- मग्न जय-सक्त
अश्वत्थामा मेला व्यक्त[9] म्हणे गज असेंहि अव्यक्त[10] १२७

---

१ राजकुळास, २ प्राण-अत्यय-प्रसंग-प्राणनाशसमयीं, ३ तुमचा प्रताप, ४ मालवेंद्र नामक राजाचा गज, ५ जगास, ६ भीम-उक्त-भीमाच्या बोलण्यानें, ७ स्वर्गपदीं, ८ लोभयुक्त व्हावी, ९ स्पष्ट, १० अस्पष्ट, + धर्माला.

रथ भूवरि चतुरंगुल उच्छ्रित त्या धर्मसूनुचा चाले
झाले ऐसें वदतां भूस्पर्शक प्राकृतपणासि हय आले २२८
अश्वत्थामा मेला हें ऐकुनि धर्मवाक्य तों कानें
जीवित-निराश झाला गुरु होउनि तप्त पुत्र-शोकानें २२९
पांडव साधु तयांचा आपण केवळ कृतघ्न अपराधी
ऐशी त्या ऋषि-वाक्यें झाली नाहींच त्यास अपराधी १२०
त्या धृष्टद्युम्नासहि पाहुनि उद्विग्न होय परम रणीं
गेला सखाहि सोडुनि तो जों उत्साह-हेतु पर-मरणीं १२१
तों पार्थत दिव्य-विशिख तत्सकसा जैत्र-कार्मुकीं योजी
आपणाचे गुरु विनाशीं कारण तुमच्या मनीं असे योजी १२
त्याच्या निवारणीं करि यत्न परि न योग्य राहिलें शस्त्र
त्या समयीं एकहि वा कुरु-गुरु-हृदयांत न स्फुरे अस्त्र १२३
चारि दिवस एक निशा पंचमदिवस त्रि[illegible]गपर्यंत
पुरले शर सरले मग गुरुला कैसा घडेल अंर्यंत १२४
दु[illegible]नें सोडावा शर तों गुरुनिकट भीम ये राजा
बोले उक्ति वदवतिल न कधींहि तशा समीप येरा ज्या १२
गुरुजी क्षत्रक्षय कां होता जरि न करितां तुम्ही युद्ध
शुद्ध स्वधर्म सोडुनि परधर्मीं म प्रवर्तले शुद्ध १२६
धर्म अहिंसा त्याचें मूल ब्राह्मण तुम्हींच हें कथिलें
रजतापुढें कसें जी मिरवावें तेज आपुलें कथिलें १२

१उंच, २पृथ्वीस स्पर्श करणारे, ३द्रोण, ४अश्वत्थामा, ५जयनशील असा धनुष्यीं, ६
७अरि-अंत-शत्रुनाश, ८इतरास, ९रुप्यापुढें, १० कथिलानें (धातुविशेष)

करितां काय ब्राम्हण मुख्य तुम्हीं ब्रम्हवित्तम[1] रणातें
मेळवितां पुत्राच्या परिसूनि काशास वित्त मरणातें १३८
पर-धर्मस्थ तुम्ही कां निज-धर्मस्था जनांसि बुडवीतां
जे चरणा शरणागत सांष्टांग-प्रणत त्यांसि तुडवीतां १३९
ज्या एका पुत्रास्तव अर्थ अनयही करूनि जोडावा
तो मेला फळ झालें आजुनि तरि हा अधर्म सोडावा १४०
कोणही सुतादि-नाश- व्यसनीं न करूनि अनेय न बुडाला
टाटुनि अमृतघटाच्या नुकेरिल भवदन्य अंनयन बुडोला १४१
ज्याच्या वचनीं धरिती बहु सर्वहि सूज्ञ लोक विश्वास
अनृत वदेल कसा तो सोडीना व्यर्थ जो कवि श्वास १४२
त्या धर्माच्या वचनीं तुमचा नाहींच लेश विश्वास
होंहि अधर्माचें फळ पाहे स्वसमच्चि खलेश विश्वास १४३
एवंविध भीम-वचन परिसूनि सुनिराश जीवितीं होय
तो यज्ञसेन-सुत-भय धनु सोडी जीवितासही तोय १४४
गुरु मग म्हणे अहो कृप नृप कर्ण समस्त वीर हो हा मी
शस्त्रास्त्रांतें त्यजितों विटलों अत्यंत जीवितीं धामीं १४५
पांडु-सुतांपासूनि स्वस्ति तुम्हांकारणें असो भटहो
सखा मार्कंडेया देव रणेकार्णवांतरीं वट हो १४६
करि हा अश्वत्थामन् सत्पुत्र असें म्हणोनि आक्रोश
त्या सुत-मृति ब्रजों जसि मोडी क्षण तीं पडोनि सो कोश १४७

१ ब्रम्हज्ञश्रेष्ठ, २ अन्याय, ३ नउकरिल, ४ अंध, ५ अमृतघटाच्याबुडाला, (तळास) ६ जगास, ७ धूर घुम्मानें भय, ८ पाणी, ९ रणहा [illegible] अर्णव (समुद्र) त्यांत, १० गोकुळाला. * खल-रा-[illegible]श्रेष्ठ, + पूतना, ‡ सहा.

करुनि परांतें योजुनि परमास्त्रविधी सभल्ल भल्ल रणीं
शस्त्रें सोडुनि झाला निरत श्री-प्राणवल्लभ-स्मरणीं १४८
तों धनु घेउनि पार्षत धांवे घेऊनि असि वधा त्याच्या
आलें मनासि अरिच्या किंवा तें कर्म अशिव धात्याच्या १४९
कौरव-कटकीं हा हा पांडवकटकींहि होय बहु हा हा
हा हा दश-दिग्भागीं म्हणति वध न योग्य रुक्मवाहा हा १५०
निज-योग-धारणेनें द्रोणमुनि करी शरीर-सन्यास
त्याचें त्याला किंवा तज्ज्ञाला तें कळे न अन्यास १५१
ज्योतिर्भूत द्रोण व्योमीं दुसरा द्युदीपसा गमला
तो ब्रम्हलोक-गामी दुष्टा दुर्दर्श पार्षत भ्रमला १५२
अश्वत्थामा अर्जुन कृष्ण युधिष्ठिरहि तेज तें पाहे
आहे प्रसाद मुनिंचा तद्दर्शन म्हणुनि दास हा लाहे १५३
धांवे न्यस्तायुध शिर कापाया धरुनि मति कुडी लौंजों
नेणे पार्षत गुरुच्या तो नव्हता स्पर्शला कुडीला जों १५४
पार्थ रथावरुनि उडी टाकुनि धांवूनि शीघ्रतर वारी
तन्हि लाविलीच दुष्टें कंठीं कच धरुनि शीघ्र तरवारी १५५
न वधावें न वधावें ऐसें म्हणतांहि तो महापापी
कापी गुरुचें मस्तक तच्छोक सरांसही बहु व्यापी १५६
तें कौरवांकडे शिर बहु गर्जुनि पार्षतें उडविलें हो
यश सर्व बुडविलें हो गमलें पंकज पदें तुडविलें हो १५७

१ ब्रम्हास्त्रादिकांचें विधान, २ लंपट, ३ श्रीकृष्णस्मरणीं, ४ निंद्य, ५ धृष्टद्युम्न, ६ तेजोरूपी, ७ स्वर्गस्थदीपसा, ८ व्यासाचा, ९ संजय, १० शस्त्ररहित, ११ दुष्टमति, १२ ल[illegible]

भीम प्रळय-जलदसा गर्जे पार्षत-गळां मिठी घाली
भ्याली बहु कुरुसेना शीघ्र पलायन-परायणा झाली १५८
भीम तसा जेसा हरि हरिनें वधितांचि कनककशिपु निवे
पार्षतच्चमू म्हणे निज- पतिंच म्हणसि हर्षजनक कशि पुनिवे
दुःशासन कर्ण शकुनि कृप कृतवर्मा सुयोधनहि मानी
सर्वहि विरे नृपा ज्या- परि परितापें सुयोध न हिमानी १६०
न +कळ पडे सकळ पडे व्यसनीं पाहे सुयोध न हित रणीं
झाला गुरु-पात-महा- भय-राहु-मुखीं सुयोधनहि तरणी १६१
सुटतां पळ बळ देउनि बाजो [illegible]धे आवरायाचा
कुरुप-गुरुपतन होतां प्रथमचि त्यो जाय भाव रायाचा १६२
कौरव-बळ सकळ पळे त्यांत तुझा पुत्र ही असीमकर
तों ये अश्वत्थामा वीर [illegible] जसा मकर १६३
करुनि शिखंडी-प्रमुख- प्रबळ-भटांसीं महासमर सुटला
स्फुट लाजवुनि परांला आला तों कुरुबळाब्धि हा फुटला १६४
कुरुपतिस पुसे कां हो पळतां पळत्यांचियाचि सांगातें
ऐशा पलायनाचें जें काय निमित्त तूर्ण सांगा तें १६५
गुरु-शोकें गहिंवरला महिंवर लाजे स्वयें कथायास
पाहे कृपाकडे तों सांगे गुरु-हानिची कथा यास १६६
वृत्त सविस्तर सर्व श्रवण करुनि परशुरामसा खवळे
कीं मंतुकेरा तक्षक सर्प कराया डसोनि राख वळे १६७

१पलायनतत्परा,२इंद्र,३हिरण्यकशिपु,४आपलास्वामी (चंद्र) ५अत्यंतथंडी,६दुर्योधनाचा,७ संधी न करणारा, ८उदक प्रवाह[illegible]न,९ग्राह,सुसर,१०स्पष्ट,११भूपति,
१२अश्वत्थाम्यास, १३ अपराधकर्त्यास,+ विश्रांती.

अध्याय. २२

द्रौणि म्हणे मदधिक जें केलें वात्सल्य नित्य मत्तातें
रे धर्मा रे भीमा कैसा रे विसरलासि मत्ता तैं १
गोपीजन ठकवावा खाया नवनीत साय कनकपटें
त्याळीं देइल माझा शिरतां अवनींत सायक न कपटें २
गुरुच्या सफळ कसा रे होइल तव राज्य-काम हा घातें
हा मंदा संपादुनि इत्सावें राज्य का महाघातें ३
शिवशिव कोण कुलज नर कपटें गुरुच्या करील अहितातें
पांडव न शिष्य पाजुनि पय केले पुष्ट दुष्ट अहि तातें ४
परमास्त्ररहस्य नृपा आहे उपदेशिलें मज्ञा तातें
पांडव काय भजे स्मर- हरनयना तेज जें अलाता तें ५
समुपेक्षिलें ठकविलें पृतनामहिमानका पित्या सहसा
त्यां मारावे खळ ते कृतनामहि मानकापित्यासह सो ६
नारायणाऽस्त्र योजुनि करितों अहितांसि आजि भस्म रहा
कुतुक पहा म्हणतिल सुर जग खातो काळ परम घस्मर हा ७
ऐसी महा प्रतिज्ञा परिसुनि कुरुकटक सर्वही परते
गर्जे सिंह-रवें तों धर्मादि समस्त वचकले पर ते ८
धर्म पुसे विजयातें सर्व पळाले भिवोनि गुरुपातें
गर्जति कां हे झाला बा कोण सहाय वीर कुरुपातें ९

---

१ वात्सल्य, २ श्रीकृष्णें, ३ सर्प, ४ ज्वलितकाष्ठास, ५ पृतना-महिमा-आनक-सेनेचा महिमा कळविण्याविषयीं नोबदीसारिखा अशा, ६ पांडव आणि धृष्टद्युम्न, ७ कौतुक, ८ भक्षक, ९ प्याले.

हा रव कोणाचा गा दर-दुंदुभि-सिंहनाद लोपविता
वाटे सहाय त्याला झाला धरितो सदैव जो पवि तो[2] १०
जिष्णु म्हणे पळ परबळ- सागर जेणें गमे अनाद[3] रिता
हा गुरुसुत-रव जैसा भास्कर तेजो[4]वरा अनादरिता[5] ११
कुपित गुरुसुत सकळ पर- [6]दाराच्या आजि हरिल टिक[7]ल्याला
जें करिवर-मदहर तें साहजिक न तेज हरि लडिक त्याला १२
अनृत सुत-मरण सांगुनि गुरुकरवीं त्वां धनुष्य सोडविलें
पार्षत-करें पितृशाता ऽधिक-गुरुचें शिर रणांत तोडविलें १३
त्वां वधुनि घेतलें यश गति व्हाया कां न देशिकाकरवीं
जरि हंस काक सत्या ऽनृत तरि तूं कां न देशी काकरवीं १४
स्वर्गपद ब्रम्हपदहि किंबहुना मोक्षपदहि सोडावें
श्रीगुरु-पदचि म्हणति कवि सर्वस्वार्पण करूनि जोडावें १५
राज्यपद अनर्थास्पद केवळ त्याच्या धरूनि लोभातें
गुरुपद गमाविलें कीं गेलें घेऊनि सत्य शोभा तें १६
वालि-वधीं रामाचें द्रोण-वधीं हें तुझें अयश राजा
तो व्यर्थ असोनि सुरवी सत्य नरा ज्या नसे अय[11] शराज्या
पक्षांत हळुच शिरला जेविं भरतनायका पिलें शिरतें
सद्गुरुचें निष्करुणें वाळुकसें होय कापिलें शिर तें १८
गुरुघातकासि आतां रक्षीं सामात्य तूं अजातारी

---

१ वज्र, २ इंद्र, ३ नादरहित, ४ तेजःश्रेष्ठा, ५ अपमानकर्ता, ६ शत्रूच्या स्त्रियांच्या, ७ कुंकुमतिलकाला, ८ गुरूकडून, ९ काकशब्दीं (अनृतीं), १० अनर्थाचें स्थान, ११ लोहाग्र.

नच पर नर-कुंजर जो त्या हरिपासूनियां अजा तारी १९
बहु वय सरलें उरलें थोडें तों काय कर्म बोडवलें
सिंधु बहु तरुनि शेषीं कैसें बा सत्व-उडुप फोडवलें २०
हाहा उपेक्षिला गुरु [illegible] पावलोंचि नरका मी
बुडतो सर्व बुडवितो लोभी क्रोधी तसाचि नर कामी २१
सर्वहि उगेचि होते ऐसा गुरुशोक अर्जुनें करितां
वरितां उदासपण बहु चापलता त्यजुनि मृदुलता धरितां २२
भीम म्हणे चालविला वर्षे संन्यासि-धर्म हा तेरा
क्षत्रिय धरिति कराया समरीं ऐसेंचि कर्म हो तेरा २३
सर्वस्व हरुनि कपटें स्त्रीचीही सोडिली निरी ह्यातें
क्षमिलें खलकृत-धर्षण दुःसह कपिलो अशा निरीहातें २४
समय न विलंघिला तरि जीवनहि हरावया झगडतात
सुज्ञहि उगाचि आम्हां- विषयीं झाला खरा दगड तात २५
त्वदनुमतें या हिततम- कृष्णाऽनुमतेंचि धर्म वर्ततसे
नहि खल अति-दुस्तर हे तिमिरीं पथ सर्पगर्भगर्त तसे २६
सर्व यथाशक्ति रणीं झटतों विजयार्थ धरुनियां सदरी
त्या आम्हां अति दुःसह जेविं क्षार क्षतीं असें वदसी २७
वर्णुनि गुरु-स्तत भिवविसि मज खल-बल-व्रात-प्र[illegible]वहा काय
आहे गदा सहाय द्रौणिपुढें धरिल दर न हा [illegible]काय २८
व्यसनीं मद्धृदयातें ऐसें बोलों नको वि[illegible]राया

१ सत्वरूप नौका, २ शत्यास, ३ नामविशेष, (ऋषि) ४ नि[illegible]च्छातें, ५ [illegible]ांचे पोटीं असे खळगे, ६ सत्-असि, ७ व्रणांत, ८ भीती, [illegible] देह.

व्यसनीं दुखविसि निष्ठुर केसें बोलोन कोविदा राया २९
द्रोणि किती द्रोणाचल यों भस्मचि करिन तो गदाघातें
भगवत्स्मरणें भगवत्- भक्त जसा नरकभोगदा घातें ३०
त्यजुनि भय स्वस्थ रहा म्हणवी धर्मा हतासि हा नर [?]
हा नर-[4]वासव देइल न सलोकप-मृत्युच्याहि मान रवा ३१
झालासि कृष्ण सारथि असतां वद सत्य पांडवा रवातो
नरकीं नग पाहे रुचि जरि गिळिलहि [?] पांड वारवातो ३२
पार्थनहि म्हणे होता षट्कर्मीं निरत काय हा नियमें
केली जेविं करावी बहु-जीवनिकाय-काय-हानि यमें ३३
त्यजुनि स्वधर्म झाला पर-धर्माऽश्रित अज्ञान जरि पिकेला
हा ब्राम्हण-[6]ध्रुव ध्रुव धन घेउनि कौरवां स्वयें विकला ३४
क्षत्रिय-धर्महि उत्तम परि त्यातें नीट चालवीना कीं
यन्निष्ठ पुरुषातें स्वर्गश्री नित्य पाळवी नाकीं ३५
मद्बांधवच खपविले इतरांसि नसेचि अवधि लेखाया
यां अधमापरि वाटे त्या घटकर्णेंहि न वधिले खाया ३६
साला कनककशिपुचा जैसा तैसाचि हा वध मनातें
कैंचा द्विज कैंचा गुरु दुरितें[10] करुनि बुडवितो अधम नातें ३७
अर्जुनजी स्फुरत नव्हे अरि अति दारुण असा वधाना तें
खल सावधान न मरे तरि मारावें असावधानातें ३८
केला लक्षींनेंही खाया तांबूल-कवळ आ ज्यास

१ जाणत्या, २ येवो, ३ नरकभोगदेणाऱ्या पापानें, ४ नरेंद्र, ५ इंद्र, ६ ब्राम्हण [illegible] णारा, ७ बोलावी, ८ द्रोण, ९ कुंभकर्णें, १० पाप, ११ पांडूनेंही.

शर-शयनीं न निजविलें   काय तुवां त्या नशाहि आर्यास
बापाचा परम सखा   जो नृप भगदत्त बापसा मान्य
पोतीं पाडुनि कपटें   वधिला तें काय पाप सामान्य ४
गेलें काय तुझें त्यां   जरि पितृघातक हरूनि मद वधिला
खल जो मवतेला जन   सकळ वधाया करूनि [illegible]ला ४
भगिनी-भाच्या-करितां   आवरुनी चाप रोषें हा साहो
द्रुपद कृत-भुज स्तवना   योग्य न नीचा परोपहासा हो ४
रामें रावणसा हा   त्यांचि वधावा रणीं असें होतें
याजोपयाज-मुनि-कृत   होइल लटिकें तुम्हां कसें हो तें ५
धर्माकडे मजकडे   नाहींच अधर्म-लेश हा कांहीं
शिष्यद्रोहें मेला   गेला परतेल काय हा कांहीं ५
पार्षत-कृत गुरु-दूषण   बहुतचि मज सर्व वर्णवेना तें
धिक् धिक् सकळहि म्हणती   त्यासम जे सर्व वर्ण वेनातें
अश्रु-परिप्लुत-नयनें   धृष्टद्युम्नाकडे विजय पाहे
राहे धर्म अधोमुख   भीमहि कोणहासही न तें साहे
शैनेय म्हणे कैसें   वदतो जाणों नव्हेचि पापीसा
नाहीं कोणी येथें   याची जिव्हा स[illegible] कापीसा
सत्य रसज्ञा म्हणतों   गुरुनिंदा बोलतां तडकलीला
करितील दर्शनार्थ   प्रि[illegible] हे बोल तांतड कलील

१ भीष्मास, २ भगदत्त वृद्ध झाल्यानें त्याच्या डोळ्यांच्या पापण्याचे केश फार झालेहोते म्हणून तो त्या प[illegible] शीम बांधून मुकुटास बांधित असे, ३ मवधि-माझ्या मर्यादेला, ४ बाणविशेष, ५ पर-उपहास- शत्रूनीं केलेल्या निंदेस, ६ मविशेष (ऋषि) ७ सात्यकी, ८ जिव्हा. + रोदनोदकयुक्त नेत्रानें.

ीम चिरावी शतधा शिरहि उलावें खळा पुज गळावे
पच-गृहाला पथिक द्विजसे सोडुनि तुला असु पळावे ४९
तशत्रु काम ःख हे नरकीं म्हणती अपत्रपा पड सो
पडसाया लाविल अहि वृश्चिक भाजशील [illegible] ५०
-सम अबेर पर जे त्यांतें नरकांत घातलें कानें
रेरुनि म्हणेल पौर्षत केला द्रोणें न घात लेंकानें ५१
षें महानुभावें आदरिला तो तसा स्वयें स्वांत
नेविं कृतघ्न तसें मानी शूद्रासही तुझें स्वांत ५२
ोष्म-वधींहि शिखंडी कारण उत्पादिला तुझ्या बापें
ण तुम्हां द्रुपद-सुतां- वांचुनि जोडील हीं महापा[illegible] ५३
हघ्ना जन पाहे तुज स[illegible]सा आजि पाहुनि रवीला
त-राजघ्ना बहुधा विधिनें तुजलाचि राहु निरवीला ५४
लें आयुष्य तरिच निंदिसि तूं [illegible] गुरुगुरुतें
जर वांचेल कसें करिल व्याघ्रा-समीप गुरुगुरु तें ५५
हीं उपयोग तुझा कटकीं पळमात्रही नसा[illegible]स
-तुरग मृग-मदसा तूं अस्तुति-पात्र हीनसा वास ५६
इन तुझे शत मी एकचि माझा गदा-प्रहार सहा
पळों नको घे अमृतरस असा नसे महारस हा ५७
ति म्हणे वदेल न दुर्वचनें मन्त अशुभ-जन कां हीं
क्षमा-रतांचें त्वत्तुल्य मनुष्य-पशु भजन कांहीं ५८

ाळगृहाला, २आलिकडच्चे, ३ द्रुपद, ४स्व-अंत-आपलें मरण, ५ अंतः करण, ोपास मारणाऱ्या-पक्षी चंद्रास ग्रासणाऱ्या, ७अर्जुनगुरूतें, ८अर्जुन, ९ क ारिखा, + सहा, * उत्पन्न केला, ‡ निर्लज्जा.

हृदयीं क्षमा असावी   सर्वत्र सदा असों नये पण ती
म्हणती क्षमितां दुर्बळ   न क्षमितां करिति दुर्जन प्रणती ५
गिळिलासि महादुरितें   दुष्टा करिशील काय वध मोजा
पाहों नये तुजकडे   [illegible] दृष्टी-पुढोनि अधमा जा ६०
जो घोळशी तुज जसा   स्फुरती अति कामरस कलत्रास
पाहोनि पावले ज्या   नरसिंहा सोमर सकळ त्रास ६१
भूरिश्रवा सिताश्व-   च्छिन्नभुज प्राय-गत महातेजा
बहु धन्य म्हणत होते   अमरसम रसिक बुध पहाते ज्यां ६२
त्यातें वधुनि न लाजसि   नरकफळा वरुनि वीरहानीच्या
मिरविशि पुरुषार्थ म्हणसि   लोकीं आपणाचि वीर हा नीच्या ६३
केवळ चांडाळचि तूं   झालासि प्रायगत स्वजन-घातें
पाप्या तुलाचि घडलें   कर्म तसें नच घडेल अनघातें ६४
त्या नसतां छिन्न-भुज   प्राय-गत द्रोण मारिला मंदरी
बदरी निवेल विप्रा   अधम-शमनें सर्व-शांत-धाम-दरी ६५
द्रोण-शिर कापिलें तें   नाक तुझें काय जेविं घटकर्ण
तैसाचि रणीं मर तूं   येणेंचि फिटेल आप्त-कटकर्ण ६६
दुर्वाक्य पुन्हा वदतां   द्रोण-शिर तसें तुझेंहि कापीन
न मथितिल खळा तरि हे   भुज केले व्यर्थ काय गा पीन ६७
मूढा केवळ धर्में   राज्य-व्यवहार चालतो काय
न करी अधर्म ऐसा   जो एक तुम्हीं रचाल तो काय ६८
दुर्योधनें अधर्में   द्यूत-क्रीडेंत वंचिला पार्थ

---

१ माझा, २ स्त्रियेस, ३ देवासह वर्तमान, ४ द्रोणास, ५ निस्तेज, ६ पातकरहितातें, ७ आप्त आणि कटक त्यांचें ऋण, ८ पुष्ट, ९ देह, + प्राणनिरोध केलेला असा, ++ माझा शत्रु द्रोण, ‡ बदरिकाश्रम, ‡‡ सात्विक तपस्व्यांचे [illegible].

लुटिला कुटिलानें हा चोर-समूहें वनीं जसा सौर्थ ६९
छळिली सती अधर्मे होता फेडीत पापजन वोसा
पाठविले वल्कल-धर करुनि अधर्मेंचि सर्व वनवासा ७०
धांवोनि येत होता जो मद्रूप एक भट कुळवळून
नेला पुजुनि अधर्मे व्हाया याचेंचि फटकळ वळून ७१
वधिला बाळ अधर्मे कोंडुनि विपिनीं जसा शशक सारे
...ले एकसे नाहीं- तरि होता यांसि ती वश्य कसा रे ७२
...ष्म-प्रमुख्या पांतें घडलाचि अधर्म धवलतुरगाही
...स खरें कीं खोटें देतिल देवर्षि सिद्ध सुर गोही ७३
भूरिश्रवा अधर्मे संहरिला त्वांहि पंडितंमन्यें
देवद्रुम दुर्दैवें जेविं मदांधें करीश्वरें वन्यें ७४
...ांहीं तसाचि योंहीं केला आहे अधर्म हा कांहीं
...ा कांहीं म्हणति बळें होईल तुझ्याहि काय हाकांहीं ७५
...ें धर्माधर्माचें तव कळेनाच बालिशमना तें
...ातें नेणुनि निंदिशि तूं पामर जेविं वालि-शेमनातें ७६
...स परांचे पथ तूं पांचाळाच्याचि सोड गावांचे
...मज-शश-मृगांतचि बळी पळहि हरिपुढें न लांडगा वांचे ७७
...कोपें सात्यकि लेउनि शर कार्मुक घे महा-भुज गदे तो
...बाटे गरुडासि शिव्या बहु-चक्षुर्विष महाभुजग देतो ७८
...शावरि सात्यकि धांवे पार्षत टाकी उडी रथावरुनी
...गमले ते अंतकसे अन्योन्य-क्षय-करा पथा वरुनी ७९

---

१ स-अर्थ-द्रव्यवान्, २वस्त्रास.३ विषमर विपरीत ४ अभिमन्यु, ५अरण्यांत, ६ससा, ७पतना नें, ८अर्जुनाशीही, ९साक्ष, १०आपल्यासपंडितअसेंमानणाराअशा, ११कल्पतरु, १२ कौर वानीं, १३पांडवानीं, १४सैन्यें, १५रामातें, १६मेंढा, + अरण्यासंबंधीं अशा.

प्रभु-वचनें द्रुत धांवे   भीम बळें माधवारि कवटाळी
यमुना-ह्रद गरुडाची   वृष्णि-वराची नसीच कैंव टाळी ८०
आवरितां आटोपी   त्यासि पदीं भीमसेन तो सोंव्या
त्यातें सहदेव म्हणे   आम्हाकरितां दुरुक्ति सोसाव्या ८१
पांचाल्य म्हणे सोडा   सोडा धरितां कशास भावोजी
खल-दहनें हर्षो द्या   देत्ये राघवयशा सभा वो जी ८२
येवूं द्या हो मजवरि   हा सात्यकि सत्य वात पर्वत मी
तुरवीन या वराकीं   तुरवी रवि जेविं तिळहि गर्व तमीं ८३
हे कौरव आले कीं   यांचेंही मथन हें महाकार्य
आम्हीं मुदित करावा   सर्वांनीं मथुनि औहित हा आर्य ८
अथवा याच्या कांहीं   नाहीं पार्था महातपा लेखा
म्हणतो काळा दावुनि   अरि जेविं गजा महात पाले खा ८
जो छिन्न-बाहु वधिला   कौरव्य मला तयापरि समजला
वाटे अधिक शतगुणें   तेजस्वि अलौत यापरिस मजला
तेजस्वी धरवेना   कळलासि स्पष्ट तूंचि फुसका रे
हें परिसुनि मारुति-भुज-   धृत सात्यकि सर्पसाचि फुसक
[illegible]भुजांतुनि न सुटे   संसारांतुनि जसाचि संसारी
त्यातें धांवुनि धरिलें   समजाविति धर्मराज कंसारी ८
कोपीं ऐकुनि कुरुवर   सौवरि ते शीघ्र नरवरा गेले
तैसे हरिपरिसुनियां   मत्तगजांचाहि न रव रागेले ८
क्रुद्ध व्याघ्रचि सात्वत   पार्षत ते [illegible] राक्षस ससे
पर गमले तद्रिपुहि असृ-[illegible]-लब्ध-मोद राक्षससे

१ खर, २ सात्यकीस, ३ सात्यकीची, ४ झडप, ५ धृष्टद्युम्न, ६ शत्रु, ७ धर्मराज, ८ गण

अध्याय - २३

पडले गर्ळांचि धांवुनि सेवुनि बहु रुद्र[1]-करा करथ डकले
अभिमान-डिकें न फुटति कुरु पांडु जसे करा ऽकार थडकले १
नारायणाऽस्त्र योजी गुरुपुत्र पराऽबेला-विलापार्थ
वाटे त्या असुरांच्या दुर्दैवें तो वलाविला पार्थ २
वृष्टि विविध-शस्त्रांची बहु होऊं लागली असे सहा ती
कलि-लीलेला बुधरे न च वीरांचे निला असू सहाती ३
जाळी पर-कटकातें ग्रीष्मीं दव-दहन जेविं कक्षातें
कोणाचीही चालो नेदी नारायणाऽस्त्र कक्षा तें ४
येरे अधिकचि जोंजों वारा या करिति यत्न ते जन गा
नावी परा जसें रवि- कांताच्या दिवसरत्न-तेज नगा ५
धर्म म्हणे क्षत्रिय हो करितां काशास काय-होमातें
मी मंद-भाग्य केवळ पापी ताराल काय हो मातें ६
धृष्टद्युम्ना उरलें बळ रक्षावें वृथा न भाजावें
वा विहंगांहीं सोडुनि दव-परिवृत-पादपा नभा जावें ७
जा शैनेया माझें मामातें सांग नमन सामीतें
जें केलें साह्य तुवां शत-जन्में आठवीन बा मी तें ८
आहे सुज्ञ समर्थ स्व-श्रेय करील हा यदुपदेश
विपदब्धि-सेतु होउनि लोकाला तारितो यदुपदेश ९
सानुज मी या अस्त्र- ज्वलनीं शिरतों अरे अहीन-कुला
सहदेवा मेलाही तो धन्यचि जो न मी अही नकुला १०

---

१ औषधसमय, २ [illegible] विलापार्थ, ३ दुःसहा, ४ गवताने, ५ कोटी, ६ सूर्यकांताच्या, ७ सूर्यतेज, ८ दावानलानें वेष्टित अशा वृक्षास, ९ यदु-पद-ईश- कृष्ण, १० यदु-उपदेश- ज्याचा उपदेश, ११ भंगसाला, + पक्ष्यानीं, *: विपत्-अब्धि-सेतु-विपत्ति [illegible] विषयी सेतु

जननीस शोक बाधे पुत्राचा वेचतां वृथा कार्य
रण-मरणें हर्षेल प्राकृत-माता तसी[2] पृथा कार्य ११
भीष्म-द्रोण-समुद्रीं तरलों या द्रौणि-गोष्पदीं बुडतों
अचल प्रकंपना[3] जें तें व्यंजनें[4] तुच्छ तूळसें[5] उडतों १२
जिष्णु-मनीं गुरुपुत्रें पांडव पांचाल शेष आहेत
हे मारुनि पुरवावा गुरुचा वधिले न सर्व हा हेत १३
अभिमन्यु बाळ जेणें कथुनि वधाचा उपाय मारविला
लाजविलें उग्रत्वें दुष्प्रेक्षत्वें-गुणें यमा रविला १४
सरकूतें जेणें पुसतां धर्म-द्यूतांत वदन वारून
कृष्णा उपेक्षिली दे हर्षे नमुनि नित्य पद नवा रून १५
जेणें जयद्रथातें त्या व्यसन-महाऽर्णवांत [illegible]
लेवधुनि कवच केला सम कुरुपति अर्जुनासि [illegible] १६
पांचाळ सत्यजिन्मुख जे होते मज्जयार्थ झटत रणीं
ब्रम्हाऽस्त्र राहु करवीं जेणें ते गिळविले सुभट-तरणी १७
घाया आम्हां सर्वां स्वर्ग-निवास प्रवर्तला होता
कल्याण-हत्त-गुरु त्यां मारविला युद्ध-मन्युचा होता १८
अस्त्राऽग्नींत जळावें हें प्रायश्चित्त सर्वथा युक्त
उक्त प्रकार जेजे त्यांत बरा शीघ्र करिल हा मुक्त १९
प्रभु भुज उभारुनि म्हणे सैनिक हो शीघ्र आयुधें सोडा
यानावरूनि उतरा कर या अस्त्रासि सर्वही जोडा २०
भस्म करिल योध-जना बहुतां [illegible] वेमा शम हीं

---

१ देह, २ कुंती, ३ महावातास, ४ विंजण्यानें, ५ कापस[illegible], ६ परसरून, ७ द्रौपदी, ८ समर्थ ९ मत्-जय-अर्थ-माझ्याजयासाठीं, १० हवनकर्ता, ११ ब्रम्हास्त्रानल.

न धरिल उरविल कोणा न हुताश रणागता विनाश महा २१
तों भीम म्हणे कथितो हा हितहि तमालनील परि सारे
मानधन कुलज-जन हो मन हो न भक्त वाक्य परिसा रे २२
सोडावें कुळजांहीं जीवित समरीं न शस्त्र सोडावें
मोडावें आप्त-वचन अयश शरीरार्थ केविं जोडावें २३
धरितों मी या अस्त्रीं न उराया तिळहि उर गदा हातें
रे गरुड-संश्रिताच्या विष-दहनें करिल उरग दाहातें २४
पावेल मजपुढें हा घेउनियां हार विप्र तापातें
भेटुनि रघुरामा भृगु- राम कसा हारवि प्रतापातें २५
रे जिष्णो[3] त्वां समरीं भिउनि परां सत्व बळ न सोडावें
कर[4]पद्म तुझें उजवें वि[5]शर विगांडीव पळ नसो डावें २६
जिष्णु म्हणे आर्या मी न करिन अन्यत्र कार्मुक-न्यास
नारायणाऽस्त्र-गो-द्विज- तेजा द्यावा न मान अन्यास २७
तेज[6]-वच परिसुनि तो अत्यद्भुतमान -सत्व रागेला
घनसाचि द्रौण - रि स्वीकारुनि मान सत्वरा गेला २८
हास्य करुनि गुरु-नंदन ताडी अस्त्राऽभिमंत्रित-शरानीं
वाटे दाव-ग्रस्तीं शिरला तो द्विरद काल-वश रानीं २९
भीमा[7]ऽचलावरिच बा अस्त्र-जलद-पटल तें सकळ वळलें
कटक कळवळे बहु परि हृदय पवन-सूनुचें न कळवळलें ३०
क्षितिवरि उतरुनि सर्वहि करिती तत्काळ आयुध-न्यास
म्हणती स्मर नरहि असो देवा द्या विपुल आयु धन्यास ३१

---

१ श्रीकृष्ण, २ जिंकपणा, ३ अर्जुना, ४ करकमल, ५ बाणरहित, ६ अर्जुनवचन, ७ भीमरूपपर्वतावर, ८ भीमाचें, ९ शस्त्रत्याग.

जेय आच्छादी भीमा अस्त्र-ज्वलनांत वारुणें-अस्त्रें
केशव-कृपाचि झांकी त्या बाळा त्या महातपीं वस्त्रें ३२
दहनीं मिळोनि कळवी कीं दहन-समान वेगळा मीन
मजहि गमे तो अस्त्रा प्रथम जसा मानवे गळा मीन ३३
वारुण-परिवृत [illegible]ने भस्म न करि दहन-राशि [illegible]ला
रूरवदचि पर-प्रतापा ऽतप त्या जो हरि-दया शिशिर त्याला ३४
भीमा वनार्थ धांवे ब्रम्ह करी जें चिराऽयु धात्यातें
पद-धावन बहु यश दे विस्रस्तपटा निरायुधा त्या तें ३५
दीनाऽलयांत शिरवी जेविं कृपण-धनिक-मानवास वहीं
प्रभुसि तसा अस्त्रीं तो पावेना भक्त-मान वासवहीं ३६
दोघे नरःन राथण गांठिति भीमासि धरुनि स्रवयातें
जरि हा असा दुराऽग्रह वदले बहु धन्य वरुनि स्रर यातें ३७
झोंबति ते भीमाच्या जेसे याचक करास दात्याच्या
वंदन दुराग्रहा स्व-दु- राग्रह जाया करा सदा [illegible] ३८
घे धनु धनंजय नृपा शौरि शरातें बळेंचि झोंबोनि
ओढिति रथावरुनि मग घालूनि मिठी भुजासि लोंबोनि ३९
तों तों गर्जे भीम प्रभु जोंजों बल करूनि आकर्षी
नारायणाऽस्त्र खवळे प्याले बहु न रदाद नौकर्षी ४०
कृष्ण म्हणे हें काय त्यज आग्रह या न उचित हें वविला
उतर रथावरुनि क्षण अभिमानें कोणकोण न ठकविला ४१
युद्धें निवारितें तरि कां आम्ही सर्व न करितों युद्ध

१ अर्जुन, २ पर्जन्यास्त्रानें, ३ मासा, ४ शत्रुप्रतापरूपसूर्य, ५ शीतळ, ६ दीर्घायु, ७ ब्रम्ह्यातें, ८ पायानीं धांवणें, ९ कृष्णास, १० उत्तमवेगानें, ११ नाक-ऋषि- स्वर्गस्थऋषि, १२ आग्रह, + उधाराची वही, ✻ गेलें आहे वस्त्र ज्याचें असा.

क्रुद्ध नको होऊं बा   या अस्त्र-[1]शमीं उपाय हा शुद्ध   ४२
शस्त्र-न्यास करुनि हे   वीर तुझे उतरले पहा सारे
या रेवती-धवाऽनुज-[2]   वचना दे मान मानदा बा रे   ४३
दुर्योधन-दुर्दैवें   प्रभुकरवीं तो बळेंचि उतरविला
कीं देणार पवन-सुत   शोक तुला जेविं शक्र-सुत रविला ४४
ज्या स्मरतां कामारि-   षट्काऽहंकार सर्व हरपावे
भीम बळें बहु-कष्टें   पूर्वी त्या प्रभुसि जेविं हर पावे   ४५
भीम-प्रेम-बळेंचि न   पावुनि नारायणाऽस्त्र-दर[5] वळला
त्या सुयशें जेविं तसा   सुर-तरु-कुसुमें न नाक दरवळला[6] ४६
नारायणाऽस्त्र शमलें   जेव्हां तो वायुचा तनय शमला
प्रभुचेंसें प्रभु[7]त्यांचें   सांगों दे दुसरि मात न यश मला ४७
पुनरपि पर[8] प्रमुदित   प्रेक्षुनि पौरव[9]पती असुख पावे
त्यांसि म्हणे उरल्यांचे   याचि महाऽस्त्रानें असु खपावे ४८
द्रौणि म्हणे मृत्युपुरिस   भंग अधिक शत-गुणें असें आहे
मृत-मारण[10] नीचोचित[11]   होतें पसरीत कीं पदर आहे   ४९
अस्त्र-प्रदीप म्हणासी   उजळीं तुरवावयासि पर[12]-तेल
योजूं नये पुन्हा हें   योजिन तरि मजवरीच परतेल   ५०
मज-हरि पुढें उरावें   न पळमारिहि शत्रुकटक-कौळविटें[13]
केला दिव्यास्त्र प्रति-   घात खरा गोपदार-[14]बोळविटें   ५१
नृप म्हणे न जय श्री   देशिल तूं बा परंतु कामातें
देतो सुबंधु[15] साधुनि   यत्नें प्रभु बाप रंतु[16]कामातें   ५२

१ अस्त्रशांतीविषयीं, २ कृष्णवचना, ३ धृतराष्ट्राला, ४ अर्जुन, ५ नारायणास्त्राचें भय, ६ सुवासित झाला, ७ भक्तांचें, ८ शत्रु, ९ दुर्योधन, १० मेलेल्यास मारणें, ११ नीच-उचित-नीचाला योग्य, १२ शत्रुरूप तेल, १३ हरणानें, १४ कृष्णानें १५ उत्तम स्त्री, १६ [illegible]तें,
– अश्वत्थाम्यास

त्र्यंबक [illegible] कीं तूं न पळों देसील पदहि स्तोम्या
तुजवरि गुरुघ्न-वध हा भार दिला फार न गुरुपुत्रा म्यां ५३
नृप गुरु-सुता स्तवे पटु जेविं ह्या तापवी मतोदानें
धांवे परासि घाया चिंतुनि तें पाप विप्र तो दानें ५४
शरभ जसा सिंहातें गांठुनि करि भग्न [illegible] राया
सात्यकि भेदे व्यसनीं त्या [illegible] जेविं ओर्ष
द्रौणि म्हणे शैनेया रक्षिसिल न [illegible]हि आपण जा
रक्षिल न शक्र याचा जरि बा आजाहि करिल आ पणजा ५
पांचाळ सर्व वधिल्या- वांचुनि पावेल कोप उपशम न
वेंचुनि वाढविसिल तूं ज्वलनाचें करिल काय तुप शमन ५
ऐसें गर्जुन अर्जुन- समजो समजोनि करुनि पाठ कवी
पाठक विख्यात जगीं तैशासहि तो [illegible] वकवी ५८
एकेंचि शरें भेदुनि कवच उर क्षतेज ओकवी राया
सात्यकिला लोळवितां भ्याले बहु सर्व लोक वीरा या ५९
गमला झाला तो गुण- सद्दलाचा डबा परेत रणीं
वदला असेलचि धरुनि तेजाची चाड बा परे तरणी ६०
सूतें शीघ्र पळविला सात्यकि तो त्यजुनि समर-महि मार्गे
ज्या क्षमिच गुणा म्हणावें स्व शिरीं तूं शं[illegible]सम रम हिमागें ६१
पाडी द्रुपद-सुता शर हाणुनि जैं विप्र मोवयांमाजी
पाहे दृष्टि परां रवि- भीतां जेविं प्रभो वयां मांजी ६२
पांचाळ-चमू खवळे स्वर्गाभा तें शीघ्र बोळवी वीतें

१ इंद्रास, २ स्तुतीनें, ३ चाबुकानें, ४ वाल्मीकिरामायण, ५ शांति, ६ रक्त, ७ अश्वत्थाम्यास, ८ म
न, ९ मृनोद्यापन मंत्रविशेष, १० युद्धभूमि, ११ हिमाचलानें, १२ दिवांधांस (घुबडांस, १३ म

रण-मृत्यु नच रुचे जरि   बहु हित तरि जेविं बोळ वीतीतें ६३
भीम धनंजय मालव   पौरव युवराजनाम चेदिपती
हे पांच धांवले ज्यां   डोळे पाहोनि आमचे दिपती   ६४
वधिला युवराज पळें   पौरवहि पळें पळेंचि मालव तो
त्या गुरुसुतापुढें पर   वायुपुढें जेविं दीप मालवतो   ६५
नंदावधि हरि बुडवुनि   निज मख करितां जसा पर-मख वळे
शर वृष्टि गुरु-सुतावरि   भीम तसा बहु करी परम खवळे ६६
तेज पर-हृदय-कंपद   राम तसें द्रोणिही किमपि त्याला
उचिताचि जरि हरिणींच्या   येइल वृक-दर्शनें हिम पिल्याला ६७
एक जगत्प्राणाऽत्मज   एक महाऽचार्यराज-कायज गा
ते क्रुद्ध युद्ध करितां   कल्पांत-भ्रम न होय काय जगा   ६८
समर-मखीं कोपविला   प्रथमचि आचार्य-पुत्र तो धनुतें
खंडुनि मुहूर्त मूर्छित   केला भीमें स-[illegible]-योध-नुतें   ६९
नभ त्याच्या शर-जाळें   कोंदे वाहों शके न वात रणीं
एक कुपित रुद्र गमे   एक प्रळयीं जसा नवा तरणीं   ७०
भीमाचेंहि द्रौणि   छेदी कोदंड दोनदां देवा
वाटे गजा महागज   भंग महानदचि तो नदा दे वा   ७१
सूतासि अळिक भेदुनि   पाडी प्रकटूनि अस्त्र-मायेतें
जैसें दैर्पं धृतितें   गुरु-पुत्रीं तुरवि शस्त्र मायेतें   ७२
अश्व स्वैर उधळले   मूर्छित होतांचि रश्मि-औवरिता
पडला भीम गुरु-सुत-   क्षोभें समयीं असोनि आव रिता ७३

१ बाळंतिणीतें, २ इंद्र, ३ हिंव, ४ वायुपुत्र, ५ द्रोणपुत्र, ६ अथवा, ७ ललाट, ८ अस्त्ररूप कपटातें, ९ ऋण, १० धैर्यातें, ११ सारथि

जैसा करिता झाला दैत्यांसीं धरुनि शक्र संगर[1] जी
तैसा गुरु-कृत पांडव- पांचालांसीं असीम-संगर जी[2] ७४
गेली द्रुपद-सुताला पांचाल-चमू तिलाहि सोडुन भो[3]
तपन-प्रताप-समयीं न म्हणति कोणीहि सेंदु[4] सोडुं[5] नभा ७५
द्रौणि-पर-चमू मर्दी देवूनि भय-व्यथा पिटी कांहीं
मूल-[6]महत्व न हरिलें मोठ्या झाल्या तथापि [7]कांहीं ७६
केले भग्न बहुत परि न मनीं तो अजित-सारथि वरमला
त्या कदनांत न कोणी आढळला अजि तसा रथि-वर मला ७७
होउनि गुरु-सूनुपुढें श्वेताश्व म्हणे त्यजूनि भीड अरे
उद्वृत्ता अबळांतें[9] कां वधिसी गजसवेंचि भीडें[10] अरे[11] ७८
हरितों मी तव दर्पा त्याहीज्या माजलासि भांडवलें[12]
या मागें बहु निष्ठुर होउनि तुजसीं मला न भांडवलें ७९
आम्हांवरि जो द्वेष प्रीति तुझी जी सुयोधनावरि ती
शक्तिहि दावीं समयीं निज-तेजातें सुयोध नावरिती ८०
नाशिल सर्व तुझा हा मद तोचि द्रोण-[13]घातकर हातें
सोडुनि साहंकारा अन्य-जनीं कोण पातक रहातें ८१
पुससि कसें अतिअप्रिय [14]गुरु-सुत-कोपार्थ अर्जुन वदे हें
का पुरुषत्व असें जरि अर्जिल तो पार्थ अर्जुन-देहें ८२
तरि परुष-[15]भाषणाचीं कथि तों तुज कारणें [16]नृपा परिस
बहु गुरु-पुत्रीं पार्थ- प्रेमा गुरुपरिस त्या कृपापरिस ८३

---

१ प्रतिज्ञा. २ अजी, ३ कांती, ४ स-इंदु-चंद्रान्वित, ५ स-उडु-तारान्वित, ६ मूळ ग्रंथाचें महत्व, ७ व्याख्यांहीं, ८ दांडग्या, ९ निर्बळांतें, १० युद्धकर, ११ शत्रो, १२ द्रव्यानें, १३ धृष्टद्युम्न, १४ संपादील, १५ कठोरभाषणाचीं, १६ हे धृतराष्ट्रा, + संबोधनार्थ अव्यय

पार्थाचा विनय कृपीं द्रोणीं भीष्मीं युधिष्ठिरीं विदुरीं
तोचि गुरु-कृतीं लोभहि बहुताचि वाजेवि जिष्णुचा भिदुरीं[1] ८४
परि भवदनयें[3] पडला विपड[4] तशाही सख्यांत हा [illegible]ना
अहित अहि तसा झाला उचित गळें[+]-विहार रत्न-हारा ज्या ८५
वधिले मालव पौरव युवराज स्व-कीर्ति-भाजन तिघे ते
सात्वत पार्षत मारुति दमिले[5] जे वीरराज नति[6] घेते ८६
पडले होते हृदया धर्मोक्तें धिरडियासि जेवि घरें
कीं उदकें ढेंकुळसें परुषें[7] वचनें पकांत जें विघरे ८७
दैवें पार्षत सात्यकि यांत कलि[8] भेद घातला खोटा
तो उकलिला मनें जो करिता धृति-दृष्टि-घात लाखोटा ८८
यास्तव अभूत-पूर्व[9] क्रोध श्वेताऽश्व-मानसीं पेटे
कक्षीं जेविं दवाऽनळ वळज्वाला घावया सखा भेटे ८९
झाला गुरु-कृत-हृदयीं तो बहु कटु परुष-वाद शर भाला
निद्रेंत लाविला मृग- राजानें काय पाद शरपाला[10] ९०
कोपे बहु तो वाटे उन्मूलिल कृष्ण-युग्म रोपें[11] करी[12]
हरसा दृश्याऽदृश्या ऽहित-गण-दाहार्थ सिद्ध रोपें करी ९१
परमाऽन्यस्त्रें सकळहि शत्रु कराया परास्त[14] रोपाऽस्या[15]
करुनि मर्दास सोडी तृण मानुनि त्या परो[16] स्वरोपास्या[17] ९२
भस्म प्रकटी ज्वाळा- माळाऽकुळ शर अनंत राया तें
करि सांतराय योगी- श्वर-योगांतें अनंतरायातें ९३

---

१ इंद्राच्या, २ वज्रावर, ३ भवत्-अनय-तुमच्या अन्यायानें, ४ विरोध, ५ हतवीर्य केले, ६ नमस्कार, ७ कठोर अशा, ८ कलह, ९ पूर्वी न झालेला, १० गवतांत, ११ बाल वृक्ष, १२ गज, १३ बाण, १४ मृत, १५ बाणमुखवास, १६ कृष्णास, १७ स्व-उपास्य-देवास सेव्य अशा, + कंठाचा परिक्रीडा.

त्यजिती जलौशया गुरु गंभीराही नदी नदा यादें
गुरुच्या पर-बळ केलें क्षणमात्रें हीन दीन दायादें[2] ९४
अहि बाहेर निघाले सोडुनि बहु तापतां महि बिळाला
कोणासहि अभय-प्रद आश्रय त्या संकटांत न मिळाला ९५
त्या अग्न्यस्त्रें सहसा सेना अक्षौहिणी-मित जळाली
बहुत न हुत होणारी जी तीच स्फुटोनि तेथुनि पळाली ९६
ऐसा करिता झाला एकचि सोडून बाण विप्र लया
रुद्राऽधिक गमला तो कीं नसतां समय जाणवि प्रलया ९७
धरि पर-चमू धृति जसी श्रुत-सिंह-रवा द्वाऽहता न गजी
पार्थें सर्वास्त्र-प्रति- पक्ष ब्रम्हास्त्र योजिलें मग जी ९८
घन शस्त्र-वर्ष शमलें शमतां अग्न्यस्त्र सर्व तमही तें
स्फुर म्हणति मुख्य कृष्णाचि हे धरति न शेष पर्वत महीतें ९९
मेलेचि कृष्ण ऐसें या सर्वांनीहि मानिलें होतें
अ[4]क्षत शस्त्र-प्रशमीं पाहुनि बहु तेज मानिलें हो तें १००
घन-पटल-मुक्त रवि-शशि- निभ-कृष्णांहीं स्व शंख वाजविले
गाजविले लोक सकळ ता[5]वक कुरु-नंदनादि लाजविले १०१
शोक-ध्यान-परायण अश्वत्थामा कराऽगुळी मोडी
जोडी हस्त श्वसिला दीर्घोष्ण-श्वास चापही सोडी १०२
तो[6] धिक्धिक् सर्वमिदं मिथ्या ऐसें म्हणे स्वाचरुनो
टाकुनि उडी पळे हो शीघ्र तपोयोग्य-वन-पथा वरुनी १०३
तो ज्याच्या उपदेशें बहु जनि[7]-मरणाद्यऽनर्थ चुकतात

१ जलाधार अशा २ पुत्रें, ३ कृष्णाऽर्जुन, ४ नाशरहित, ५ तुझे, ६ अश्वत्थामा, ७ जन्ममरणादिरूप अनर्थ.

तो भेटे भर्गप्रभें[1] भगवान् भव्य-प्रभाव शुक-तात[2] १०४
ह्यावें धन्य जयाचें तीर्थांचें तीर्थ पद नमुनि पतितें
त्या वंदी तो चिंता- शोक-परिम्लान-वदन मुनिपतितें १०५
सविनय पुसे अहो म्यां आग्नेयास्त्र-प्रयोग हा केला
रुद्रेंहि न पावावें यद्भीतें[3]-गुहाचियाहि हा केला १०६
सर्व चमू न जळाली कृष्णाऽर्जुन वांचले कसे या हे
जे हर-चक्रासि त्यांची प्याले कीं आंच लेकसे बाहे १०७
हे माया कीं काळें केलें विपरीत पूर्व कीं चुकलों
सांगा कां गायत्री- जप-पर मी मंत्र-सिद्धिला मुकलों १०८
व्यास म्हणे नारायण होउनि कार्यार्थ धर्म-कृत पाळा
जळहि न सेवुनि पूर्वी करि मैनाकीं[4] अखिन्न कृतपाळा १०९
सासष्ट-सहस्र समां[5] धृत-यम-नियमासि सर्वदा जपला
तितुकेंचि पुन्हा तप तो ऊर्ध्व-भुज स्थाणु वात-भुक् तपला ११०
तो ब्रह्मभूत जेव्हां प्रभुची तेव्हांचि पूर्ण होय दया
मग दर्शन भगवान् दे भव हर सेवक-मयूर तोयद[+] या १११
प्रेमें स्मितां निववितो शशिशत-मद-दळन देव देव-रद
नमितां शिरीं कर स्तुति करितां श्रुति[**] चित्त दे वदे वरद ११२
मद्भक्त मत्प्रसादें हो तूं मत्तुल्य मदधिकहि समरीं
त्वदधिक तेज यश नसो कोणाही योगि-मुनि-जनीं अमरीं ११३
त्या नारसील वधिसिल म्हणसिल ज्याज्यासि ना गिन वधीन
शस्त्राऽस्त्रापासूनि भय तुज किमपि नसो असो जय अधीन[6] ११४

---

१ शिवसदृश, २ व्यास, ३ ज्या अस्त्रापासून त्याला जो कार्तिकस्वामी त्याच्या, ४ मैनाक नामक पर्वतीं, ५ वर्षे, ६ स्वाधीन, + मेघ, ** कर्णी.

विश्वेश असे पुष्कळ होउनि परम प्रसन्न देवर ज्या
तो हा यदुपति याच्या नमिति पदाच्या समस्त देव रजा १
याच्याचि तपापासुनि झाला यासमचि नर महातेजा
तो हा अर्जुन नारा- यणाचि म्हणति कवि बरे पहाते ज्या १
रक्षिति युगीं युगीं हे साधूंतें आदरें अवतरून
यांच्या पद्-पद्म-रजः कणाहि न होइल शचीधवतरून १
श्रीकृष्ण रुद्र-संभव पूजितसे शंकरासि हा लिंगीं
अहि चंद्रमा तसा तूं मनिं तरि कृष्ण- ह्यासि आलिंगीं
तूंही रौद्र तपस्वी तेजस्वी रुद्र-भक्त पूर्वींचा
ईश्वर-वर-प्रसादें झालासि त्रासक रविपूर्वींचा ११
इत्यादि तत्व ऐकुनि तो कुरुगुरुचा कुमार बहु मानी
श्रीशंभुकारणें नति करुनि श्रीकेशवासि बहु मानी १
हृष्टात्मा व्यासातें वंदुनि अवहार शीघ्र तो करवी
आवरि वीरां स्वकरां निववाया जेविं सर्व लोक रवी १

अध्याय-२४

अर्जुन निज विजयाबद्द मोठें आश्चर्य किमपि पाहोनि
वाहोनि विस्मय-भर ध्यानीं होता तटस्थ राहोनि
तों व्यासातें पाहे नमुनि म्हणे करुनि आ तपस्वा मी
पुसतों सांगा न तुम्ही उज्वाल तमासि आतप स्वामी

१ शची-धव-तरू-ऊन-इंद्रतरू (कल्पतरू) हून उणा, २ अभिमानी, ३ सैन्यसमा
४ आपल्याकिरणास, ५ तपोरूपधना.

जेव्हांजेव्हां करितों जिकडेजिकडे शिरोनि परम रणा
तिकडेतिकडे दिसतो दिव्य पुरुष तोचि हेतु पर-मरणा ३
वर्णे कृष्ण भयंकर बहु चालतसे त्यजूनि तो धरणी
मरती तच्छूलोत्थित- शूल-सहस्रेंचि सर्व योध रणीं ४
दीप-पुरोवर्ति तिमिर वायु-पुरोवर्ति घन-पटल फाटे
तेसें तयांपुढें पर- बल तें पाहुनि मला नवल वाटे ५
पाहुनि मी आधीं रवि-[1] शत-संप्रभ बल-समुद्र अनवधि[2] तो
शूल-विनिःसृत-शूल- प्रकरें मच्छत्रु-योधजन वधितो ६
जन मानितसे वधितो पार्थ शरांचीं शरोत्करें कटकें
कृत-मारणाचि मज रणीं घडलें दिसतें जनास तें लटकें ७
स्वामी तो पुरुषोत्तम कोण बरें हें तुम्हीच सांगाल
आपण सर्वज्ञ म्हणुनि पर गर्वे फुगविनात कां गाल ८
व्यास म्हणे ज्या साहे न शशी न हुताश न रवि शंकर तो
प्रभु-भाव असा स्व पदीं होउनि असपत्न[3] नर[4] विशंक रतो ९
सिंधुवे-वध-पण-समयीं कृष्णें स्वभांत दाविला परवा
झालासि हेतु वंदुनि ज्या असुरीच्या तदा विलाप रवा १०
प्रचुर प्रसाद तुजवरि म्हणुनि प्रभु चालतो पुढें पार्था
बहु जपतो भक्त-जना भगवान् सार्थप जसा सदा सार्था
त्यास्यासि शरण चरण- स्मरणाच रण-मरण-संकटीं तारी
हरी तोचि खळांतें दासासि पडों न देचि जड भारी १२
कृप-वृष-गुरुकृत-रक्षित- सेनेतें वक्र-दृष्टिनें पाहे

१ शंभरसूर्यांसारिखीकांतीज्याची, २अमर्याद, ३ शत्रुरहित, ४अर्जुन, ५जयद्रथवध
तेसेच्यासमयीं.

बा हेतिधर असा या   प्रभुवांचुनि अन्य कोण गा आहे १३
नमन त्रिकाल करिती   स्वर्गीं शक्रादि सुर तरिच वसती
दाखविती झाली या   प्रभुचरिताची जना बरि चव सती+ १४
प्रभुवर दशा जेविं स-   दर्पा सर्पाऽधमा सुपर्ण कुटी
याच्या प्रसाद इच्छुनि   वरिली कविनीं वनीं सुपर्णकुटी १५
जें खेँचर लोह-रजत-   कनकमय त्रिपुर पांडवा तें गा
एकेंचि शरें केलें   भस्म उडविलेंहि कांडवातें गा   १६
एके समयीं अंकीं   घेउनियां खेळवी कुमार-मणी
देवांला सांगा हा   कोण म्हणे शंभुची उमा रमणी   १७
तेजस्वी शिशु दिसतो   हा मसद वादतां हरिल याला
न उपेक्षावें चिंतुनि   हें धांवे न्यावया हरि लयाला   १८
तत्काल सवज्र भुज   स्तंभित झाला अगा धवळबाहा
भ्रमले सर्व न कळला   कोणालाही अगाध-बळ बा हा १९
साऽमर शक्र विधिकडे   जाय पळत बहु भुजास कळ लागे
स्व-मनीं उमा म्हणे गुरु-   मति तुजही मूढ हा न कळला गे २०
परिसुनि वृत्त विधि म्हणे   रे शक्रा देवदेव अज तो कीं
हरिहरि हर-परिभव-बळ   तुज आढळलें असेल अज-लोकीं
प्रेमें तरीच भजली   शुचि-गुण-मणि सुखनिधी उमा पति
देतां नाना सुख बहु-   रूप प्रभु सुखनिधी उमोप तितें   २२
येतो चळा भ्रमाया   संसारीं चाकेंवत चुकाना कीं

१ शस्त्रधर, २ गरुड, ३ बाणवायूनें, ४ धवळवाहा (अर्जुना) प्रासाकरितां धवळबाहा
५ पुष्कळ, ६ चक्रवत्. ** आकाशामध्यें संचारकरणारे, + पार्वती.

कैचें अमृत मिळेल न   चाखाया चाकवेत चुका नाकीं २३
आला धांवुनि साऽमर   विधि विनवाया प्रभूरि कैलासीं
काळाचेंहि न चाले   बळ ज्याच्या द्वारपाळ-चेलासीं २४
पसरी विधि करुनि सुरां-सह नमन स्तवन दीनपा पदर
प्रभुपद-युगुली निववी   कां हारिल विबुध न दीनपाप-दर २५
प्रभुनें न शूल धरिला   न अरि न नाशावया मद विनोक
नाक-भ्रष्ट न व्हाया   वज्री घांसी पुढें तदपि नाक २६
ऐसा प्रताप ऐसी   लीला ऐसें दयालुपण समज
बापा पहा प्रभुयशें   केलें केवळ पळांत पणैस गज २७
मातेची सरि येना   उपमा तेला अगा धवळबाहा
काय तुपाची साजे   उपमा तेला अगाध-बळ बा हा २८
हरिहर सहाय झाले   तेव्हां तत्तुल्य तूंहि अजित रणीं
काय इतर तेजस्वी   वत्सा तुजला म्हणेल अजि तरणी २९
माधव-मित्र-मयूरा   मुनि-मुदिरें मुदित करुनियां गेला
केला धन्य जयें असा   शिखिरा-शिबिराज-नुत-पदें नेला   ३०
श्रीगुरुराम-पदाऽब्जीं   भावें हें द्रोणपर्व वाहून
झालों प्रसाद-भाजन   सर्वहि होतील असेचि पाहून   ३१

समाप्त.

ग्रंथसंख्या. २५००.

...काविशेष, २ अजगवसतकशिवधनु, ३ इंद्र, ४ सकटक (रोमांचयुक्त असा भाव), ५ मेघ, ६ अ...नि, ७ सूर्य.